म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२५४

REFBK-0020244

श्री. अप्पासाहेब मेटकर
यांजकडून सप्रेम भेट
किंमत ३ रुपये.

वाग्मय
२२५९४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
[illegible]
[illegible]
विभाग
क्रमांक
नों. दि.

[ काव्येतिहास-संग्रह ]

२०२४४

॥ श्री ॥

# वामनपंडित-कृत प्रकरणें

हीं शुद्ध करून विपुल टीपांसह

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.

यांनीं

प्रकाशित केलीं.

REFBK-0020244

इ० स० १८८९.

# वामनपंडितकृत प्रकरणांची अनुक्रमणिका.


| प्रकरण. | पृष्ठ. |
|---|---|
| १. रासक्रीडा | १ |
| २. कात्यायनीव्रत (श्लोक) | ३१ |
| ३. राजयोग | ४१ |
| ४. सुदामचरित्र | ४५ |
| ५. योगवासिष्ठ | ५७ |
| ६. पार्थभाग्य | ५९ |
| ७. दशअवतार | ६० |
| ८. अपरोक्षानुभूति (मराठी) | ६१ |
| ९. हनुमंतस्तव | ७१ |
| १०. रामस्तव | ७१ |
| ११. भगवद्गीता | ७२ |
| १२. विष्णुध्यान | ७४ |
| १३. स्फुट सवाया | ७७ |
| १४. आणखी स्फुट सवाया | ७८ |
| १५. कात्यायनीव्रत (सवाया) | ८१ |
| १६. बालक्रीडा | ८३ |
| १७. प्रेमसरी | ८५ |
| १८. नृहरिदर्पण | ८९ |
| १९. स्थालीपाक | १०२ |
| २०. राधाभुजंग | १०३ |
| २१. सत्यभामाविनोद | १०७ |
| २२. द्वितीय सुदामचरित्र | १०९ |
| २३. जलक्रीडा | ११३ |
| २४. उपदेशमाला (प्रकरण १लें) | ११६ |
| २५. गोपीगीत | ११९ |
| २६. भक्तिमहिमा | १२३ |
| २७. लघु चेंडूफळी | १२३ |
| २८. मनाचे श्लोक | १२५ |

२९. सिद्धांत सवाई .. .. .. .. .. .. .. १३३
३०. करुणाष्टक .. .. .. .. .. .. .. १३५
३१. चतुःश्लोकी भागवत .. .. .. .. .. .. १३६
३२. स्फुट श्लोक .. .. .. .. .. .. .. १३६
३३. उपादान .. .. .. .. .. .. .. .. १४०
३४. व्याधाख्यान .. .. .. .. .. .. .. १४३
३५. भीष्म शरपंजर .. .. .. .. .. .. .. १४६
३६. राधाविलास .. .. .. .. .. .. .. १४९
३७. द्वितीय राजयोग .. .. .. .. .. .. .. १५७
३८. अनुभूति लेश (मराठी) .. .. .. .. .. .. १५९
३९. भूगोल वर्णन .. .. .. .. .. .. .. १९५
४०. रसनास्तुति .. .. .. .. .. .. .. १९९
४१. कंसवध (सवाया) .. .. .. .. .. .. २००
४२. ब्रह्मबोध .. .. .. .. .. .. .. .. २०१
४३. गोरसहरण .. .. .. .. .. .. .. २०५
४४. द्वितीय जलक्रीडा (श्लोक) .. .. .. .. .. २०६
४५. उपदेशमाला (प्रकरण २ रें) .. .. .. .. २०९
शुद्धि पत्र .. .. .. .. .. .. .. २१०

मराठी ... ठाणें.
... आ.

२२५४८

# वामन पंडित.

२८३

जैसा चंडांशु सतेज व्योमीं । तैसाचि केवळ **वामन स्वामी** ।
ज्याची श्लोकरचना ये भूमी । भूमंडळावरी अपूर्व ॥

**श्रीधर.**

**सातार** प्रांतांतील **कोरेगांव** नामक गांवीं **नृहरि पंडित जोशी** ह्मणून शांडिल्य गोत्री मध्वसंप्रदायी वैष्णव गृहस्थ राहात होते. त्यांचा पुत्र **वामन पंडित. वामना**च्या आईचें नांव **लक्ष्मी** व बायकोचें नांव **गिरीबाई** असें होतें. **काशीं**त बारा वर्षे शास्त्राध्ययन केल्यावर **वामनपंडित** इतका विद्वान झाला कीं, खुद्द आपल्या गुरूचाहि वादांत पराजय करण्याची त्यास शक्ति आली. नंतर तेथून निघून घरीं परत येत असतां वाटेंत **इंद्रायणी** नदीचे कांठीं एके दिवशीं उतरला. तेव्हां येथें आजपर्यंत लोकांस वादांत हटवून त्यांचा उपमर्द केल्याबद्दल आपणास ब्रह्मराक्षसयोनी प्राप्त होणार असें एका राक्षसाचे द्वारें त्यास समजलें. तेणेंकरून फार खिन्नता प्राप्त झाल्यामुळें पश्चात्ताप पावून लागलाच निघाला तो त्यावेळीं **तुकाराम अळंदीस** गेला होता त्याजकडे जाऊन अनुग्रह करण्याविषयीं त्याची विनंती केली. तेव्हां **तुकारामा**नें त्यास **रामदास स्वामीं**कडे जावयास सांगितल्या-वरून त्यांजकडे गेला. त्यांनीं **बदरिकाश्रमीं** जाऊन तपश्चर्या करण्याची आज्ञा केली. तदनुरूप तेथें बारा वर्षे तपश्चर्या करून ईश्वरप्रसाद पाव-ल्यावर पुनः स्वामींकडे आला तेव्हां त्यांनीं **श्रीशैल्यपर्वतावर अवधूत** म्हणू-न एक साधु होता त्याजकडे जावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्या साधूजवळ कांहीं काळ राहून तो समाधिस्थ झाल्यावर परत स्त्रीसहवर्तमान येत असतां एके ठिकाणीं दोन प्रहरीं मुक्कामास उतरून स्नानसंध्यादि नित्यकर्में आटोपल्यावर सत्, चित्, व आनंद या तीन पदांचे अर्थाविषयीं विचार करीत समाधि लावून बसला. इकडे स्त्री **गिरीबाई** इनें भाताचें भांडें चु-लीवर चढविलें होतें त्यावरील झांकण सरकलें. परंतु वैष्णवांचे विलक्षण चालीप्रमाणें **वामन** आपल्या बायकोच्या हातचें जेवीत नसल्यामुळें तिला



२०८८५

तें नीट करतां येईना. त्यामुळें ती किंचित् हंसली. तेवढ्यावरूनच अनुताप होऊन तेव्हांपासून तो आपल्या बायकोचें हातचें जेवूं लागला. पुढें **रामदास स्वामीं**कडे येऊन त्यांच्या **दासबोध** ग्रंथाचें पारायण करीत असतां **वामना**स एक शंका आली. तिचें समाधान **स्वामींनीं** केलें. तथापि **वामना**चा संशय जाईना. तेव्हां आपलें रुद्रस्वरूप प्रकट करून शेंपूट आपटून **स्वामींनीं** विचारिलें "**वामना** ! समस्या पूर्ण झाली कीं नाहीं?" तेव्हां तो त्या उग्र स्वरूपास भिऊन होय म्हणाला. पुढें पूर्ववत् सौम्य स्वरूप धारण केल्यावर तोच प्रश्न विचारितां **वामन** "शंका गेली नाहीं" असें म्हणाला. तेव्हां त्यास तोच विषय बृहदारण्यकांत आहे तो वाचावयास सांगितला. त्याचे योगानें त्याच्या संशयाचें निराकरण झालें. पुढें स्वामींच्या आज्ञेवरून तो प्राकृत काव्यरचना करूं लागला. त्याच्या काव्यांतील उत्तम यमकें पाहून स्वामींनीं त्यास "**यमक्या वामन**" असें नांव दिलें. **वामन** कृष्णातिरीं **वांई** क्षेत्राजवळ **पांडववाडी** ह्मणून गांव आहे तेथें शके १५९५ वैशाख शुद्ध ६ या दिवशीं मरण पावला. **वामनाचा** जन्मशक पक्केपणें समजला नाहीं, तथापि **रामदास स्वामी** शके १५३० पासून शके १६०३ पर्यंत भूतलावर होते हें चांगलें माहीत असल्यामुळें तो **शालिवाहन शकाचे** १६ वे शतकांत होता यांविषयीं संदेह नाहीं. शिवाय **निगमसार** ह्मणून एक त्याचा ओवीबद्ध वेदांतावर ग्रंथ आहे तो शके १५९९ त समाप्त झाला असा त्या ग्रंथाचे शेवटीं त्याचा स्वतःचाच लेख आहे.

आपणांविषयींची थोडिशी माहिती **वामनानें** 'भीष्मयुद्ध' नामक प्रकरणांत दिली आहे. खेरीज आपल्या प्रिय पत्नीस उद्देशून "प्रियसुधा" ह्मणून एक प्रकरण त्यानें लिहिलें आहे त्यांत आपल्या स्त्रीचे नांवाचा उल्लेख केला आहे तो असाः—

तताभिधा **नृहरि पंडित** माय **लक्ष्मी** ।
दे सर्वदा सुगुण युक्त उदार लक्ष्मी ॥
**शांडिल्य** गोत्र कुलदेव **नृसिंह** ज्याचा ।
दासानुदास निज वामन हो निजाचा ॥१॥

प्रियसुधा उपदेश **गिरा** (गिरी?) प्रती । करुनि **वामन** तीस ह्मणे सती ॥
परम आवडि आपुलि आपणा । वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥१॥

बायकोचे हातचें न जेवण्याची वैष्णवी वेडगळ चाल **वामनानें** सोडून दिली असें वर सांगितलेंच आहे. पुढें त्यास माध्व द्वैतमताचा अतिशय कंटाळा येऊन तो पुरा अद्वैतवादी बनला. या गोष्टीस उद्देशून त्यानें द्वारकाविजयांत ह्मटलें आहे:—

कंढाळलों मी तुमच्या मतातें । देखोनि सर्वत्र असंमतातें ॥
पाहेन मीं माधव सर्व भूतीं । अद्वैत विद्या हरिची विभूती ॥१॥

त्याचा वेदांतावर फार भर असल्यामुळें पुढील यादींत सांगितलेल्या वेदांतावरील ग्रंथांखेरीज इतरांतही त्या विषयाकडे वळल्याखेरीज त्याच्यानें रहावत नाहीं. आह्मी सांप्रत छापण्यास आरंभ केलेलें प्रकरण जरी प्रथमरसप्रधान आहे तथापि त्यांत देखील वेदांताचें प्रतिपादन वाचकांचे दृष्टीस पडेल.

**वामनानें** बहुत ग्रंथ केले त्यांपैकीं आमच्या पहाण्यांत व ऐकण्यांत जे आले आहेत त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:—

## श्लोकबद्ध प्रकरणें.

### भागवतांतील.

१ कृष्णजन्म २ मृत्तिकाभक्षण ३ उखलबंधन ४ बालक्रीडा ५ वनसुधा ६ वेणुसुधा ७ हरिविलास ८ यज्ञपत्न्याख्यान ९ कंसवध १० रुक्मिणीविलास ११ भामाविलास १२ नामसुधा १३ गजेंद्रमोक्ष १४ मुकुंदविलास १५ ब्रह्मस्तुति १६ रुक्मिणीपत्रिका १७ शुकाष्टक १८ वामनचरित्र १९ द्वारकाविजय *२० रासक्रीडा २१ राधाभुजंग *२२ राधाविलास *२३ कात्यायनीव्रत २४ ध्यानमाला २५ भागवतरामायण.

### रामायणांतील.

१ रामजन्म २ अहल्योद्धार ३ लोपामुद्रासंवाद ४ सीतास्वयंवर ५ भरतभाव

### भारतांतील.

१ भीष्मयुद्ध २ दंपत्यचरित्र *३ पार्थभाग्य.

### वेदांतावर.

१चित्सुधा २ प्रियसुधा ३ तत्त्वमाळा ४कर्मतत्त्व ५ गीतार्णव ६ चरमगुरुमंजरी ७ विश्वासबंध *८ राजयोग.

### भाषांतरें.

१ गंगालहरी २ गोपीगीत ३ भर्तृहरिकृत शतकें तीन ४समश्लोकी गीता *५अपरोक्षानुभूति.

### ओंविबद्ध.

*१निगमसार *२श्रुतिकल्पलता ३यथार्थदीपिका.

यांखेरीज अनुभूतिलेश व सिद्धांतविजय हे दोन **वामन**कृत संस्कृत ग्रंथ आमचे संग्रहीं आहेत. व शोधाअंतीं आणखीही याचे ग्रंथ उपलब्ध होण्याचा संभव आहे. वरील यादींत ज्यांचे मागें फुली केली आहे तेवढे मात्र छापलेले आढळण्यांत आले नाहींत.

# वामनपंडितकृत रासक्रीडा.

करुनि नमन गोपीवल्लभा श्रीपतीतें ।
कथिन चरित त्याचें जें भवातें हरीतें ॥
वरद वर दयेनें दे [१]व्रजीं कामिनीला ।
मनिं धरि रमणेच्छा देखतां [२]यामिनीला ॥१॥

प्रकटतलि शरदृतु यामिनी । तयिं तुह्मीं मजशीं व्रजकामिनी ॥
रति रमाल [३]तमालतनू असा । वर वदूनि म्हणे स्वसुखीं असा ॥२॥

शरत्कालरातीं फुलें [४]पुष्पजाती । नदीचे तिरीं मोगरे कुंद [५]जाती ॥
असें देखतां आपल्या त्या वरातें । करूं सत्य हें वाटलें श्रीवरातें ॥३॥

पूर्वेस पूर्ण उगवे शशि त्या सुकाळीं ।
दे औषधींस सुख तो [६]स्वकुळा [७]सुकाळीं ॥
दिक् सुंदरी मुख उटी पति यामिनीचा ।
जाणो सुकुंकुमकरें प्रिय कामिनीचा ॥४॥

चंद्रप्रभा करित थोर खमंडलाला ।
देखूनि त्या हरि अखंडित मंडलाला ॥
जो वाजवी [८]स्वरगती व्रजराज [९]पांवा ।
[१०]नाशावया मरण तीव्र जरा जपावा ॥५॥

तो इंदु सुंदर रमावदना समान । देखूनि दे व्रजवधू मदनास मान ॥
कीं या अगे ह्मणुनियां व्रजराज पांवा।जो वाजवी हरि मनीं चतुरीं जपावा॥६॥

कृष्णानुरक्ता पहिल्याच होत्या । वेणुध्वनी आयकतां अहो त्या ॥
आधींच कृष्णीं सकला सकामा । पांवा करी [११]फारचि वृद्धि कामा॥७॥

वेणु तो परिसतां व्रजदारा । चालिल्या त्यजुनियां गृहदारा ॥
टाकिलीं सकल ही गृहकामें । व्याकुळा परम होउनि कामें ॥८॥

---

१ गोकुळांत २ रात्रीला ३ तमाल वृक्षाचे पाना सारखा सांवळा ४ पुष्प समूह ५ जाई. ६ "मग त्या" असा ही पाठ आहे. ७ विपुल ८ स्वेच्छ ९ मुरली. १० "तो यामिनीदिन सखा हृदयीं जपावा" ११ "त्यांताचि" असा ही पाठ आहे.

[1]दुहिति या त्यजिती निज दोहनें । मन असे हरिलें मनमोहनें ॥
त्यजुनि रंधन वाढण धांवल्या । त्वरित **कृष्ण**पदाप्रति पावल्या ॥९॥
स्तन धरूनि मुखीं पिति लेंकुरें । त्वरित लोटुनियां निकरें करें ॥
[2]द्विरदराजगती [3]गजगामिनी । हरिस पावलिया व्रजकामिनी ॥१०॥

त्यजुनि पतिस एकी सेवितां त्या पतीतें ।
मुरलि मधुर मोहें पावल्या **श्रीपतीतें** ॥
त्यजुनि अशन आल्या त्याचिया काननांत ।
कवळ **हरिस** त्या ही पावल्या [4]आननांत ॥११॥

**कृष्ण**गीत रूचतां श्रवणातें । कर्मकांड रुचि दे कवणातें ॥
भीक कां नृपतिनें उकळावी । या कथेंत अशि गोष्ट कळावी ॥१२॥
परिसतां व्रजराजकथारसा । मधुप चित्त मिळे पदसारसा ॥
करिति कर्म हि ते नर मागती । परि कथाचि तयां परमा गती ॥१३॥
कथारसीं चित्त निमग्न सारें । कर्में जडें सर्व तया असारें ॥
[5]व्यत्यस्त होतो जिहिं तें करावें । कां काननीं नीर चिरें भरावें ॥१४॥

सव्यें करूनि करितो पितृतर्पणातें ।
यज्ञोपवीत अपसव्य सुरार्पणातें ॥
देवां स्वधा म्हणवुनी यजितां वदे तो ।
स्वाहा म्हणूनि पितरां तिळ पिंड देतो ॥१५॥

[6]व्यत्यस्त ऐसें करि कर्म सारें ॥ ज्याला हरीचें श्रवणादि सारें ॥
आल्या तशा वेणुरवें करूनी ॥ व्यत्यस्त वस्त्राभरणें धरूनी ॥ १६ ॥

कटीं शेले शाला कनकमय चोळी मिरविती ॥
शिरीं नेसायाचीं धरिति वसनें दिव्य युवती ॥
पखे वाळ्या नाकीं श्रवणिं झळके [7]नासिकमणी ॥
हरी तेजें पावे वरि भलतशी तेचि रमणी ॥ १७ ॥

---

१ "दुहिता त्यजुनि त्या निज दोहनें" असा ही पाठ आहे. २ गजगती ३ गजगती ४ तोंडांत. ५ "व्यत्यस्त होतें जरि तें करावें" असा ही पाठ आहे. ६ उलटें ७ नाकांतील नथ.

नव्हे वीतरागी धरी लोकरीती ॥ हरिप्राप्ति विघ्नें अशीं जे करीती ॥
स्वमाता पिता बंधु संतान वारी ॥ तया मानिती अंतरे दानवारी ॥ १८ ॥

स्वजन वर्जिति जे हरिसेवनी ॥ कुशल लंघुनि त्यांत वसे वनीं ॥
व्रजवधू गमनीं [१]शुकवैखरी ॥ प्रकट गोष्ट अशीच वदे हरी ॥१९॥

पिता माता भ्राता स्वजन जरि गोपींस वरजी ॥
तरी आल्या तेथें वनिं कमलजा प्राणवर जी ॥
हरीतें पावावें त्यजुनि सकळांतें शुभ जनीं ॥
प्रवर्तावें ऐसें कुशल मतिनें आशु भजनीं ॥ २० ॥

आल्या अशा जवळि ज्या व्रजगोपदारा ॥
देणें असे सुखचि त्यांस तया उदारा ॥
ऐसें असूनि हि विपर्ययताचि दावी ॥
शद्वांत कीं स्वगत भक्ति तई वदावी ॥२१॥

सभाग्या हो येणें मजजवळि हो उत्तम परी ॥
करूं कैसें बोला प्रिय तुमचिया ही तदुपरी ॥
व्रज स्वस्थ क्षेम प्रथम मज सांगाच सकळा ॥
कळावें कां ऐशा पळत तुह्मि आल्यात विकळा ॥२२॥

ह्मणे गोपिकांतें अघाचा अराती ॥ तुह्मी गोजिऱ्या आणि हे घोर राती ॥
नयांचा दिसे सूक्ष्म दृष्टीस [२]माज ॥ स्त्रियांचा असा काननीं ये समाज ॥ २३ ॥
करिती गजव्याघ्र मोठे [३]चपेटे ॥ विषें [४]तक्षकाच्या भडाग्नीच पेटे ॥
मरे जो भरे यावनीं आड वाटे ॥ तयाची तुह्मा काय हो [५]चाड वाटे ॥ २४॥

यालागिं मूढपण हें सहसा त्यजावें ॥
वेगें [६]व्रजासि परतोनि अगत्य जावें ॥
काढी मुखामधुनि शद्व असा हरी तो ॥
जाणों तया प्रबळ [७]अंतक (तो!) हरीतो ॥ २५ ॥

---

१ कंबर २ दुर्दशा अ० ३ नाश ४ सापाच्या ५ आवड ६ गोकूळास ७ यम.

मुखपणें मुख इंदुचि बोलतो ॥ परि करी [१]प्रलयार्कचि बोल तो ॥
ह्मणुनि पाहति त्या न तदानना ॥ प्रभु ह्मणे अवलोकिति कानना ॥२६॥

पहायासि आलों असों काननातें ॥ अहा वाटलें हें [२]मृगांकाननातें ॥
असें त्यासि वाटे म्हणूनी हरी तो ॥ स्वशद्बार्थ दाऊनि चित्तें [३]हरीतो ॥२७॥

वन विचित्र असें तुह्मि देखिलें ॥ स्वहृदयीं कुसुमांकित रेखिलें ॥
लखलखी परिपूर्ण सुधाकरें ॥ निववि जो अवघी वसुधा [४]करें ॥२८॥

मंद वेग यमुनापवनाचे ॥ लल्ल पल्लव समीप वनाचे ॥
देखिल्या सकळ कौतुकरीती ॥ ज्या मनास सुखहेतु करीती ॥२९॥

वन असें तुम्हि सुंदर पाहिलें ॥ परि गृहीं गृहकारण राहिलें ॥
हुडकिती सुत बंधु पिता पती ॥ तडफडूनि तुह्मांवरि तापती ॥३०॥

हरिकडे न पहाति चहूंकडे ॥ नयन चाळिति तों शर रोकडे ॥
हृदय भेदिति यास्तव त्या वधू ॥ प्रभुसि पाहति कीं वधितो विधू ॥३१॥

जरी पावल्या दुःख पोटांत नारि ॥ पहातीच सप्रेम त्या [५]पूतनारी ॥
अशां तें पुनः होय जे शल्य वाणी । वदे ते न जी माजि [६]कौशल्यवाणी ॥३२॥

अशा स्नेहीं माझ्या जरि खवळल्या आशय असा ।
तरी ध्यानीं कीर्ति श्रवण गुणगानीं तुम्हि असा ॥
अशी ध्यातां गातां श्रवण करितां भक्ति कवळे ।
न तैशी कामातें मजजवळि अत्यंत विकळे ॥ ३३ ॥

होतो स्वधर्म मज अर्पिति मानवाचा ।
तो येक योग करि भक्ति सुखानुवाचा ॥
स्त्री–धर्म यास्तव तुह्मीं पहिले करावे ।
संक्षिप्त भक्तनिधि ते मग ऊतरावे ॥ ३४ ॥

निशिदिनिं पतिसेवे कारणें अंग नाचे ।
कपटरहित धर्म श्रेष्ठ ही अंगनांचे ॥

---

१ प्रळय काळचासूर्य २ चंद्रवदन कृष्णातें ३ हरण करितो ४ किरणानें ५ पूतनेचा शत्रु कृष्ण ६ कुशलतेची कमताई.

प्रिय जन हि तयांचें पोसणें संततीचें ।
कुळ सफळ म्हणूनी मानिती संत तीचें ॥ ३५ ॥

बहुत धर्म तिचे कथिले प्रियें । गमति तीं वचनें अति अप्रियें ॥
सुरत भग्न मनोरथ झालिया । नयनिं शोक-[1]नद्या स्फुट आलिया ॥ ३६

ऐकूनि हे प्रियमुखें सुखहीन [2]वाणी ।
केलीं रडोनि वदनें अति [3]दीनवाणी ॥
चिंताब्धिमग्न मन भग्नमनोरथानें ।
[4]निःकुंकुमें करि सकज्जल [5]नीर [6]थानें ॥ ३७ ॥

ज्या कारणें त्यजिति सर्व हि [7]गोपदारा ।
तो शत्रुतुल्य वदतो प्रिय त्या उदारा ॥
सप्रेम कोपसहिता [7]पशुपाळकांता ।
हें बोलती पुसुनि नेत्र जल स्वकांता ॥ ३८ ॥

अहा हो गोविंदा वचनशर हें भग्न हृदया ।
करीती ये वाचे न दिसति तुझ्या योग्य सदया ॥
पदांपाशीं आलों त्यजुनि अबळा सर्व विषयां ।
न आम्हीं हीं योग्या अति कठिण गोष्टी सविनया ॥ ३९ ।

आलोंचि ज्या त्यजुनि सर्व तुतें वराया ।
त्यांशीं कसा वदसि अप्रिय देवराया
जैसे [8]मुमुक्षु जन सेविति वासुदेवा ।
तैशाच कीं भजतसों तुज [9]वासु देवा ॥ ४० ॥

तरि [8]मुमुक्षु जनासि दया करीं । युवति या धरिं रे सदया करीं ॥
न धनमुक्तिचिहि बरि कामना । तुजविणें छळिती हरि कामना ॥ ४१ ॥

आतां स्त्रियांस पतिपुत्र जनानुवृत्ती ।
धर्मज्ञ तूं वदसि धर्मपथप्रवृत्ती ॥

---

१ नद्या २ भाषण ३ गरीबासारखीं ४ केशररहित ५ पाणी ६ स्तन ७ गवळिणी ८ मोक्षेच्छु ९ सुंदर स्त्रि ।

२२५

तो तूंचि सर्व जगदीश गुरू विशेष ।
जालासि तें तव पदींच पडो अशेष ॥ ४२ ॥

चर अचर [१]तरंग श्री गुरू [२]सिंधुसारा ।
तरि इतर जडत्वें भाविजे कां असारा ॥
म्हणुनि म्हणति गोपी तूं गुरू देवराया ।
पति सुत पद तूझें तेंचि हो दे वराया ॥ ४३ ॥

धरुनि अद्वय आश्रय कामिनी । निजगळां पडती गजगामिनी ॥
जरि असो म्हणशील भले असे । भजति मार्ग अनादिच हा असे ॥ ४४ ॥

दुःखापदा त्यजुनि सर्व गृहक्रतूतें ।
नित्य प्रिया भजति संत अवक्र तूतें ॥
एवं दिला वर कृपा बरि तेंचि साची ।
कां छेदिशी तुझिच आस बहू दिसांची ॥ ४५ ॥

स्वर्गासि रक्षक मुकुंद तसा [३]व्रजाला ।
हा विश्व मंगल तुझा अवतार जाला ॥
या लागिं ठेउनि करा अभयप्रदासि ।
तप्त स्तनीं शिरिं हि या विनवीत दासी ॥ ४६ ॥

गृहस्थांच्या दारा त्यजुनि गृहदारा स्वबटकी ।
फुका कां होती या म्हणुनि हरि हो गोष्ट लटकी ॥
झणी मानी ऐसें मनिं भिउनि गोपी [४]अडकरी ।
तुझें रूपें केल्या म्हणसी गरती या विधिकरी ॥ ४७ ॥

वक्त्र मंडित सुरत्नकुंडलीं । तेज तें उभय [५]गंडमंडलीं ॥
देखतां सरळ रम्य नासिका । होतसों फुकट सर्व दासिका ॥ ४८ ॥

अधर [६]शोणित पातळ चांगले । [७]खदिरपर्णरसें अति रंगले ॥
अमृत इच्छुनियां दिन[८]यामिनी । बटकि होत असों [९]व्रजकामिनी ॥४९॥

---

१ लाटा २ समुद्र ३ गोकुळाला ४ अडणाऱ्या ५ गाल ६ लाल ७ कात ८ दिवस रात्र ९ गोकुळवासी स्त्रिया.

भ्रमर वाटति केश मस्तकीं । [1]मुख सरोरुहलंपट [2]मस्त कीं ॥
सरस हास्य [3]निरीक्षण तें करी । वदन तें करितें अजि[4]किंकरी ॥ ९० ॥

रक्षिले शरण लोक [5]उदंड । ते हरी अजि तुझे भुज दंड ॥
योजिति [6]स्मर-मना प्रमदांसी । होतसों फुकट यास्तव दासी ॥ ९१ ॥

या सुंदरा देखुनियां वरारे । दासी नव्हे कोण हरे मुरारे ॥
शोभेस त्या लुब्ध रमा रमाया । तूझी अजी नंदकुमार माया ॥ ९२ ॥

ज्या अशा त्वदधरामृत दासी । जाळिशी स्मर[7]दवें प्रमदांसी ॥
ने दिशी जारिजितामृत लाहो । मेलिया वारि धरूं तुजला हो ॥ ९३ ॥

स्मरण मरण काळीं सद्य होतांचि वाचे ।
परम पद पदातें नेति ज्या माधवाचे ॥
स्मरत मरत आहों त्यासि त्यांचे वियोगें ।
तरि गति हरि आम्हां योगिया जेंवि योगें ॥ ९४ ॥

तुझ्या-गोडा-गिती-हसित-[8]अवलोकीं उजळतो ।
तया कामाग्नीनें [9]व्रजजनवधूवृंद जळतो ॥
म्हणूनी जी पाजीं त्वरित अधराच्या स्व अमृता ।
वियोगाग्नीनें जों नव्हति तुझिया भस्महि मृता ॥ ९५ ॥

[10]स्मरहुताशन हे तुमचे पती । विनविती म्हणशील रमापती ॥
तरि तुझें पद हें जयिं देखिलें । न तयिं पासुनि हे प्रिय लेखिले॥ ९६ ॥

सुख [11]सुधाकर टाकुनि कां मना । मृगजळीं उपजे अति कामना ॥
म्हणुनि पाजुनियां अधरामृता । जिवावें सत्वर [12]अद्रिधरा मृता ॥९७॥

पर नर जरि गातो गोड तो चांगला हो ।
न करिति कुलनारी आपुला अंग-[13]लाहो ॥

---

१ मुखकमलाचे ठायीं लुब्ध  २ माजलेले  ३ पाहाणें  ४ दासी  ५ पुष्कळ  ६ मदन  ७ मदनाग्नी  ८ पाहाणें  ९ गोकुळांतील स्त्री समूह  १० मदनाग्नि  ११ सुखामृत सागर  १२ गोवर्धन पर्वत धारण करणाऱ्या  १३ लाभ.

म्हणशिल तरि कोण स्त्री तुतें जी न मोहे ।
इतर-पुरुष-वार्तादेव देवा नमो हे ॥ ५८ ॥

तुझ्या या वेणूचा ध्वनि मृदु जगन्मोहन मनीं ।
निघे जीच्या ते स्त्री स्रवण कसि जे मोह न [1]मनी ॥
जया रूपें गाई मृग तृण अगाई विसरती ।
कुळाचारी नारी तुज विण हरी केविं सरती ॥ ५९ ॥
अनायासें चित्तें हरुनि म्हणसी जा स्वसदना ।
कसें जावें सांगा त्यजुनि मन जी इंदुवदना ॥
तनू राहूं देशी न पद चळतें पाउल हरी ।
कसें जावें ऐसें तरि अजि म्हणावें हरिहरी ॥ ६० ॥

खुपेल हा शद्ब चि जेविं कांटा । [illegible] येथूनि तुम्ही [2]निकाटा ।
या लागिं पोटांतिल कोप जाया । काकूळती बोलति गोपजाया॥ ६१॥
चित्तें जया ये स्थळिंहूनि जावें । चित्तें जया भर्तृसुखा भजावें ।
तें चित्त चित्तें अवघें हरूनी । कां जा म्हणावें हट हा धरूनी ॥६२॥
जाऊनि गेहीं गृह–कृत्य कांहीं । करावया शक्ति करांदिकां ही ।
चित्तेंचि येते परि ते हरूनी । कां जा म्हणावें हट हा धरूनी ॥६३॥
ये स्थळींहुनि कशा तरि जाच । स्वामि तूं करिशि हा जरि जाच ।
पाय पाउल न येथुनि जाती । चित्तहीन विषयेंद्रिय [3]जाती ॥६४॥
स्वकर्म हें याहि कुळीं कराया । चित्ताविणें शक्ति न देवराया ।
आतां अजी काय तरी करावें । मार्गा तरी जी कवण्या भजावें ॥६५॥

[4]अघटित हरि आतां तूज पासूनि जाणें ।
तदपि करणि तूझी आयकावी सुकानें ॥
चळति चरण तूझे चित्त तें जो हरीतो ।
निजपद तिकडे ही जीकडे श्रीहरी तो ॥६६॥
न एथूनी जेव्हां ढळत पद येथें तुम्हि असा ।
स्वयें जातों वेगें म्हणुनि पळशी तूं जरि असा

---

१ म.नी  २ निघून जा  ३ समूह  ४ अशक्य.

तुझ्या पायीं चित्तें चलन तुज सगोंचे चरणा ।
न सोडों जी तूतें त्यजसिल कसा सांग शरणा ॥६७॥

धावों सर्वे तूं जरि तीव्र जासी । परंतु जाऊं न कधीं व्रजासी ॥
कीं देह-चक्रा हरि चित्त-दोरी । शिक्या सवें जेंवि फिरे शिदोरी ॥६८॥

हे आयकूनि शरणागति कामिनींची ।
देखूनि भक्ती मदकुंजरगामिनींची ॥
हांसे दये करुनियां सकळांस पाहे ।
त्यांशीं रमे करि रमेहुनि कीं कृपा हे ॥६९॥

सदय-हृदय जेव्हां कृष्ण गोपींस पाहे ।
विकसित मुख-पद्में होति होतां कृपा हे ॥
उडु-पति सह तारा ये रितीं गोप-दारा ।
मिरवति यदुवीरा भोंवत्या त्या उदारा ॥७०॥

कृष्ण-गायन विलास-कळांतें । यांस दावित कळा सकळांतें ॥
घेउनी फिरतसे गजरानें । हस्तिनीं सह जसा गज रानें ॥७१॥

[illegible] वृंदें आधिन करून मनांत टाकी ।
[illegible]णी तयां हरि अशा यमुना-तटाकीं ॥
[illegible] समीर सुख दे स्थिरजंगमाला ।
सेवूनियां कुमुद-मंद तरंग-माला ॥७२॥

दाखवी स्मर-विलास कळांतें । कोण वर्णिल तयां सकळांतें ॥
चेतवी मदन तृप्त करूनी । बाळ चंद्र करजीं उकरूनी ॥७३॥

आत्मत्व योग परिपकहि दक्ष जाला ।
होवोनि तृप्त हि भजे च अधोक्षजाला ॥

---

१ सत्वर २ गोकुळीं ३ मत्त हत्तीं सारखी मंद आहे गति ज्यांची अशा ४ (नक्षत्र स्वामी) चंद्र ५ गवळ्याच्या स्त्रिया ६ कृष्णाचें गाणें व विलास यां विषयीं ज्या उत्कंठित आहेत अशांतें ७ सर्व ८ समूह ९ वायु १० कमळ ११ लाटा १२ पंक्ति १३ मदन १४ नखांनीं.

कामाग्नि ये रिति विझोनि [1]रतिप्रसंगें ।
पेटे पुन्हा त्वरित माधव-विप्रे-[2]संगें ॥७४॥

क्रीडेत जे सुरत-संभ्रम-भाव दावी ।
ते काम-शास्त्र-मति काय विभो [3]वदावी ॥

संक्षेपरूप म्हणवूनिच ते शुकानें ।
श्लोकैकमात्र कथिली रति *कौतुकानें ॥७५॥

इत्यादि देतां रति-रंग-लाहो । गोपींस वाटे रति-रंग [4]लाहो ॥
आम्ही सुरूपा त्रिजगांत नारी । हा मोहला यास्तव [5]पूतनारी ॥७६॥

मनींच इत्यादिक गर्व झाला । या गोष्टिचा देव न तो भुकेला ॥
हा गर्व जेथें न वसे हरी तो । सा शत्रु कामादिक जो हरीतो ॥७७॥

त्यांचा हरावा मग गर्व सारा । तेंव्हां गमे यारिति [6]विश्वसारा ॥
अदृश्य त्यांच्या नयनांसि जाला । कीं गर्व सोसे न अधोक्षजाला ॥७८॥

बहु धन अधनाचें हारपे सांपडूनी ।
त्यजुनि सकळ धुंडी मोहफासां पडूनी ॥

हरि विण [7]हरिपीसें लागलें कामिनींतें ।
करुनि हरिचरित्रे कंठिती यामिनींतें ॥ ७९ ॥

मिळूनि गाती सकळा हरीतें । गाणें जयाचें अशुभा हरीतें ॥
या नंतरें त्या व्रज-गोप दारा । रात्री वनीं धुंडिति त्या उदारा ॥८०॥

वदें हो कल्याणी हरि-चरण-गोडी [8]अतुळसी ।
दिसे तूझ्या ठायीं ह्मणूनि पुसतो माय तुळसी ॥

तुझी माला कंठीं [9]भव-कल[10]भ-कंठी[11]रवे धरी ।
असे कोठें झाली [12]अनेल-विरहाची च लहरी ॥ ८१ ॥

---

१ सुरत समयीं २ कृष्णरूपी ब्राम्हणाच्या योगानें ३ तेज; सौंदर्य *' संभ्रमानें ' असाही पाठ आहे ४ लाभ ५ पूतनेचा शत्रु कृष्ण ६ सर्व जगताचें सार असा कृष्ण ७ कृष्णाचें वेड ८ जीस तुलना नाहीं अशी ९ संसार १० हत्तीचा छावा ११ सिंह १२ अग्नि.

रे चंपका कुरबका तिलका अशोका ।
छेदा अरे त्वरित कृष्ण-वियोग-शोका ॥
जो दे तुह्मांसि सुख लावुनियां करातें ।
दावा तया स्व-सुख-सिंधु-सुधाकेरातें ॥ ८२ ॥

कोणी तयांत अबळा पुसते क्षितीतें ।
रोमांचरूप दिसतो तृण-वृक्ष जीतें ॥
कीं कृष्ण-पाद-तळ लागलिया विना ही ।
होणार तें सुख असें घडणार नाहीं ॥ ८३ ॥

तुझ्या तपा न तुलना क्षिति लेश वाचे ॥
मोडूनि पाय जिस लागति केशवाचे ॥
जो स्पर्श-उत्सव मनांतिल भाव दावी ॥
प्रेमांकुरीं तनुचि ही किति भौं वदावी ॥ ८४ ॥

गोवर्धन-स्तन-तटीं हरिच्या पदातें ॥
स्पर्शोनि दाविसि अशा तनु-संपदांतें ॥
पाय त्रिविक्रमपणीं तायें तूज लागे ॥
हें काय तें सुख पुसों क्षिति तूजला गे ॥ ८५ ॥

तो कृष्ण-विक्रमतनू-द्वय-पाद-पद्मीं ॥
तूं स्पर्शलीस करि वास जयांत सद्मीं ॥
किंवा वैराहपणिं हें सुख पावलीस ।
आलिंगनें करुनि फार सुखावलीस ॥ ८६ ॥

आशा धुंडिती तों लता एक वांटे । दिसे तीस तो ठाउका कृष्ण वाटे ॥
फुलें खुंटिलीं कृष्णजीनीं सदैवें । नख-स्पर्श-केला ह्मणे ईस देवें ॥ ८७ ॥

नखें आपणा स्पर्शतां कैठभारी । गुड्या देह रोमांच-रूपें उभारी ॥
लतेच्या शरीरासि कांटे स्वभावें । ह्मणे ते नखांच्या सुखाच्या प्रभावें ॥ ८८ ॥

---

१ समुद्र २ चंद्र ३ शोभा ४ कमळ ५ लक्ष्मी ६ डुकर ७ मार्गांत ८ कैठभ दैत्याचा शत्रु कृष्ण.

तरू नम्र भारें फळापल्लवांच्या । तया पूसती त्या स्त्रिया वेल्लवांच्या ॥
असें कां करितां तया वंदनातें । दुरूनीच नंदाचिया नंदनातें ॥ ८९ ॥

असें धुंडितां देखिले पाय त्याचे । वनीं आत्मयाच्या प्रिया आत्मयाचे ॥
निशा चांदणी पाय विन्यास-मुद्रा । पहाती स्मरूनी तया चित्तमुद्रा ॥९०॥

अगाई कृष्णाचे चरण-तळ हे मिरवती ।
ध्वजो पद्मी वज्री करून ह्मणती सर्व युवती ।
अचिंत्याच्या पायांविण परम चिन्हेंचि नसती ।
अशी जे ते बोले भरुनि उदकें लोचनें सती ॥ ९१ ॥

जो रेणु दुर्लभ सुरांसि महा उपायीं ॥
देखूनि ते धरणि मंडित कृष्ण पायीं ॥
अन्योन्य त्या वदति दुर्लभ लाभ-वार्ता ॥
आरोग्य ज्या श्रुतिमुखा करिती भवार्ता ॥ ९२ ॥

चरण-रज सया हा धन्य या श्री-पतीचें ॥
शिरं धरुनि कृतार्था होतसे श्री पतीच ॥
भव-कमलभवादी *आपुला ताप जाया ॥
मिरविति मुकुटीं तें लाधल्या गोप-जाया ॥ ९३ ॥

वदति गौळिणि ये रिति लोळती । हरि पदाब्ज-रजीं अजि लोळती ॥
बसति मागुति विस्मित बोलती । स्तुनि शब्द मुखें मग डोलती ॥९४॥

असें धुंडितां धुंडितां त्याच मार्गे । पदें दूसरीं देखिलीं त्याच मार्गे ॥
हरीच्या पदाच्या रजाचे चि संगे । वधूचीं पदें देखिलीं त्या प्रसंगे ॥९५॥

दुःखाग्नि जो किमपि कृष्ण पदीं विझाला ।
तो दीप्त मत्सर सर्वेचि समीप आला ॥

---

१ गवळ्यांच्या २ ठेवणें ३ खुणा ४ डोळे ५ संसार-रोगानें पिडिलास ६ हे सख्यानों ७ लक्ष्मी ८ शिव ९ ब्रह्मदेवादी *'प्रीतिनें' असा ही पाठ आहे १० पदकमळाच्या धुळींत ११ भुजीचे

गोष्टी मुकुंद-पद-भक्तिचिया उडाल्या ।
सापत्न मत्सर-जळीं युवती बुडाल्या ॥ ९६ ॥

अहाहा! हें पाहा अमृत मथितां तें विष महा ।
उदेलें कीं जाला सम सदय आत्मा विषम हा ॥
समा आह्मीं रामा चतुर अभिरामा[1] परि हरि ।
रमे तो एकीशीं लपत मग आह्मां परिहरि ॥ ९७ ॥

लपत तो अबळा सकळा वधू[2] । वधु[3] हि तो बरवा[4] परि हे वधू ॥
गिरि-धराधर[5] एक फुका पिते । स्वपद लावुनि काळिज कापिते ॥९८॥
हरिपदीं पथ जो विमल क्षिती । चरण त्यांतचि ते समलक्षिती[6] ॥
निकट चालतसे गजगामिनी । ह्मणुनि तर्क उभारिती कामिनी॥९९॥

बहु इणें चि असे हरि पूजिला । सवतिरूप दिसे न रिपू जिला ॥
त्यजुनियां सकळा व्रजनायिका[7] । परम जे रुचली व्रज-नायका[8] ॥१००॥

पुढें पाय तीचे न देखोनि[9] वाटे । कडे घेतलीसे असें त्यांसि वाटे ॥
हरीचीं पदें रुतलीं खोल भारी । गमे भार वाहे तिचा कैटभारी॥१०१॥
पद तिचे न दीसाति अलीकडे । तरि असेल चि बैसली कडे ॥
उचलिली मानें मानुनि भीरु ते । तृण शिखा ह्मणि तीस उभी रुते ॥१०२॥
पहा गोपिका हो कसा कृष्ण कामी । कसे घेतसे भोग ते ही रिकामी ॥
अशा बोलती आणि धुंडीत जाती । पथीं त्याच त्या देखती पुष्प जाती[10]॥१०३॥
प्रियानें प्रिये कारणें जेंवि हार । स्वयें गुंफिले दीसतो तो विहार[11] ॥
अशीं लक्षणें लक्षितां कासया हो । न वाटे खरें त्या पहायास या हो ॥१०४॥

न सारे हे पाय क्षितिस रुतले अर्ध चवडे ।
तिच्या ऐशा चिन्हें करुनि तरि हे गोष्ट निवडे ॥
स्वजानु-द्वंद्वीं ती बसवुनि पुढें विश्व-शरण ।
स्वयें वेणी घाली उमटाति असे अर्ध चरण ॥ १०५ ॥

---

१ सुंदर. २ स्त्रिया ३ मृत्यु. ४ चांगला. ५ गोवर्धन पर्वत धारण करणारा जो कृष्ण त्याचा ओंठ. ६ पाहती. ७ गोकुळांतील स्त्रिया. ८ गोकुळाचा स्वामी कृष्ण. ९ मार्गांत. १० प्रकार ११ क्रीडा.

ठेवी गंजीवरी करी कर-पुष्करातें ।
स्कंधीं तिच्या हरि तसा कर-पुष्करातें ॥
स्थापूनि चालतअसे ह्मणवूनी वाटे ।
या मत्सरें तडफडा बहु हाय वाटे ॥ १०६ ॥

भज वाळुवंटीं बहू पुष्प जाती । नवे मोगरे कुंद मंदार जाती ॥
पदे देखिलीं त्या-स्थळीं फार तीचीं । दिसों लागलीं चित्र चिन्हें रतीचीं ॥ १०७ ॥

तेथें चि चिन्ह अवलोकुनियां रतीचें ॥
त्या मत्सरें ह्मणति पुण्य अपार तीचें ॥
कीं गुंफितां शिरिं फुलें बसला रमाया ।
देखूनियां तिचिच नेत्र-विकार-माया ॥ १०८ ॥

पद तिचे अबळा-जन लक्षिती । ह्मणाते देखुनि हे मृदुल क्षिती ॥
उतरूनी कुसुमे व्रजशेखरें । विविध तोडुनि तीस दिलीं करें ॥ १०९ ॥

तो स्वयें हरि अखंड विरक्त । स्त्री-जनीं प्रभु न जो अनुरक्त ॥
कल्पवृक्ष-फळ दे भजनाचें । वाक्य हें जलज-नाभ-जनाचें ॥ ११० ॥

खादां कडे घेउनि देव दावी । कामी जनांची गति हे वदावी ॥
कामातुर स्त्री वश ज्या प्रकारें । दावीतसे बद्ध जनानुकारें ॥ १११ ॥

असेल स्त्रीवृंदीं किमपि हि दुरात्मत्व घडलें ॥
तरी च श्री-कांता सह विहरणें हें विघडलें ॥
सदोषा कीं आम्हीं विरह-फळ दावी परम तो ॥
भली ते कीं सर्वां त्यजुनि हरि तीशीं च रमतो ॥ ११२ ॥

विझाला असें बोलतां क्षिप्र ताप । प्रियाच्या पदाच्या रजाचा प्रताप ॥
तरी भ्रांत चित्ता न सोसे वियोग। स्त्रिया धुंडिती कीं घडो जेंवि योग॥ ११३ ॥

तो डोल ही त्यजुनि चित्त हरीस पाहे ।
दे अंग-संग हरि त्याहुनि ही कृपा हे ॥

---

१ हर्नाण २ शुद्धभानं ३ हस्तकमळातें ४ जाईचें फल ५ सुरताची ६ कटाक्ष मारण्याचें कौशल्य ७ गोकुळनायक कृष्ण ८ कमळासारखी आहे नाभी ज्याची कृष्ण— त्याचे जन वा० भक्त त्याचें ९ स्त्रीम्महांत. १० क्रीडणें. ११ सत्वर.

एवं च तें स्थळ हि सांडुनि त्या उदारा ॥
मार्गें तया हुडकिती पशुपाळ-दारा[1] ॥ ११४ ॥
अदृश्य एथें जलजाक्ष[2] जाला । जाणों तदात्म्य अधोक्षजाला ॥
जो आमुचा नंद-कुमार साचा । हा मोह ज्याच्या पद-सारसांचा[3] ॥११५॥
स्कंधीं स्त्रियांच्या भुज-दंड भारी । ठेवीतसे जो मधुकैठभारी[4] ॥
सरोजपाळा स्वकरें उदारा । दावा तया बोलति गोप[5]-दारा ॥११६॥
तुह्मां आम्रवृक्षांसि किंवा कदंबा[6] । पुसों आणिका ही तरूच्या कदंबा ॥
तुह्मीं वंदितां ज्यासि जो मेघकार्य । पहातां कृपेनें नमस्कार काय ॥११७॥
अशा धुंडिती तों [9]मृगी एक वाटे ॥ दिसे ठाउका कृष्ण तो तीस वाटे ॥
म्हणे पाहतां [10]मा-धवाच्या मुखातें । पहा लाधली लोचनीं या सुखातें॥११८॥
तों वाटला जवळि त्या सि [11]जगन्निवास ।
ये कुंद मंद कुच-कुंकुम[12]-मिश्र वास ॥
कीं कुंदपुष्पकृत जो प्रभु-कंठ-हार ।
[13]घ्राणीं तयावरिल वायु करी विहार ॥ ११९ ॥
न केला मनीं गर्व तों गोप-जाया । स्वयें योग्य झाली अशी हे सजाया ॥
तिनें ही बहू मानिलें आपणातें । हरी अंतरे त्या धरी मी[14]पणातें ॥१२०॥
सर्वांत मी बरि म्हणोनि च एकलीला ।
त्यांतूनि आणुनि करी [15]मकरांक-लीला ॥
ऐसा मदें करुनयां तिस गर्व जाला ।
+लाडें वदे वचन हें [16]गद-पूर्वजाला ॥ १२१ ॥
भागलें अजि न चालति पाय । काय यासि करितोसि उपाय ॥
पाहिजे जरि असें तुज वाटे । [17]वागवूनि तरि ने मज वाटे ॥ १२२ ॥
दे उत्तर प्रभु न होत विलंब ईस ।
स्कंधावरी तरि म्हणे हरि येच बैस ॥

---

१ गवळ्यांच्या स्त्रिया २ कमलनेत्र ३ पदकमलाचा ४ मधु व कैठभ या दोन दैत्यांचा शत्रु ५ गवळी ६ वृक्षविशेष (म. कळंब) ७ समूल्हास ८ मेघशरीर ९ हरिणी १० लक्ष्मी ११ जगद्व्यापी कृष्ण १२ केशर १३ नाका- १४ अहंकारानें. १५ मदन. १६ कृष्णचा भाऊ १७ उचलून.
+ "ताठें" असाही पाठ आहे.

देखोनि नम्र उचली पद [१]सारसाक्षी ।
तों गुप्त होय प्रभु [२]सार-असार-साक्षी ॥ १२३ ॥

गोपी न देखे जशि लोक पाळा । हाणोनि घे आपुलिया कपाळा ॥
म्हणे शिवे गर्व जिच्या मतीतें । भोगील कैसा सुख-धाम[३] तीतें ॥१२४॥

म्हणे कृष्णा कोठें त्यजुनि अजि गेलास मजला ।
अनर्थाचा हेतु त्वरित मज नाहीं समजला ॥
तुझी मी तों दासी ह्मणि मज उदासीन गमसी ।
फिरेन श्री-कांता रमत तुजशीं जेवि रमसी ॥ १२५ ॥

विविध भोगितसोनि हि सोहळे । उपजले मज गर्वित डोहळे ॥
निज शरीरचि म्यां अभिमानिलें । प्रभुसि गर्व-भरें अपमानिलें ॥१२६॥

परोपरी स्वप्रियकोप जाया । आक्रंदली ये रिति गोप-जाया ॥
तयेचि ही दूरि तथापि कानीं । ते ऐकिली वैखरि[४] गोपिकांनीं ॥१२७॥

ज्यातें वधू धुंडितसे स्वकांता । आकांत हा ऐकति गोप-कांता ॥
धांवोनियां त्या पुसती तयेतें । टाकोनि गेला प्रिय जीस तीतें ॥ १२८॥

म्हणे ती वायां हो बहु मजशिं गोविंद रमला ।
अशा लाडें जाला बहुत ह्रदयीं गर्व मजला ॥
हरी येणें जातो म्हणुनि मज नाहीं समजला ।
अहो बाई गेला मग [५]विधि असा हो समजला ॥ १२९ ॥
दचकति वचनें त्या सर्व ही गोप-जाया ।
ह्मणति अवघियां ही हेतु हाची त्यजाया ॥
त्यजुनि सुख पथातें कष्टलों आड वाटे ।
ह्मणवुनि अबळांतें हा स्वअन्याय वाटे ॥ १३० ॥
नवल करुनि जी ती राहिली सारसाक्षी ।

---

१ कमळनेत्री २ सर्व द्रष्टा ३ गृह ४ वाणी ५ नशीब.

जिस तिस हरि वाटे सर्व संसार-साक्षी ॥
फिरवि विषय त्यासी इंद्रियादीक गाई ।
पशुप-तनयआह्मी मानिला तो अगाई ॥ १३१ ॥
हुडकिती मग ती सह कामिनी । चहुंकडे फिरती गजगामिनी ॥
शशिकरें न दिसे अति सत्तमीं । हरि अदृश्य गमे निबिडा तमीं ॥१३२॥
समजति न कितेकीं ज्ञानसिद्धि-प्रदाया ।
धरुनि अगुण मार्ग क्लेशकृत् सांप्रदाया ॥
श्रम विफळ पहातां मागती ते अजाला ।
भजति मद वधूंचा येरिती दूर झाला ॥ १३३ ॥
आत्मा मनीं स्फुरतसे व्यतिरेक-रीती ।
तो अन्वयें जडचि निश्चय हा करीती ॥
गर्वें न तो मनिं दिसे मग नैश्वरांत ।
अद्वैत कैंवि गवसे जगदेश्वरांत ॥ १३४ ॥
चंद्र-प्रकाशक मनीं न दिसे हरी तो ।
त्या चाळवूनि मद ये रिति जो हरीतो ॥
गर्वें जसें मुनि न देखति बोध मैनी ।
कीं चंद्र तोचि मति सर्वमनोभिमानी ॥ १३५ ॥
आत्मा न देखति मनीं व्यतिरेक-रीती ।
गर्विष्ठ ते जडचिदैक्य मुखें करीती ॥
जाणोनि अन्वय जडैक्य दिसे न कांहीं ।
ऐसा तमांत हरि मानिती गोपिका ही ॥ १६६ ॥
जड-तरंग चिदब्धि च भासतो । परि तमोगुण मात्रचि भासतो ।
हरि समीं न दिसोनि गम असे । वदति बोध मदान्वित हें असें ॥ १३७॥
प्रकाशीं शशीच्या हरी सांपडेना । नसोनी तमा माजि ठायीं पडेना ॥
असें बोलतां भाव हा व्यास-देवें । असा दाविला कीं पहावा सदैवें ॥१३८॥
मनातें जरी गर्व टाकूनि योजी । ह्मणे ध्यान योगांत तो देव योजी ॥
तरी वो बळें स्पर्शतां मीपणातें । हरी त्यासि नेदी शिवों आपणातें ॥ १३९ ॥

---

१ गवळी २ दाट ३ नाशिवतांत ४ गर्वो ५ जडसृष्टिरूपलाटा ६ चैतन्य सागर

व्रजपति[1]-यश-गंगे न्हाणिलें त्या सदैवें ।
स्वमन तरि शिवों ही दीधलें त्यांस देवें ॥
ह्मणुनि सकळ गोपी-वृंद तो गीत गाय ।
मिळति शुक-मुखें ते भक्ति लोकीं न माय ॥ १४० ॥
परि जया यमुना-पुलिनीं[2] हरी । करुनि गुप्त तनू मद संहरी ॥
धरुनि तोचि तटीं मृदुल क्षिती । हरिस गाति तदन्य न लक्षिती ॥ १४१ ॥
ज्या भूमिके श्री नव-मेघ-नीळ । गमाविला सुंदर इंद्रनीळ ॥
त्या भूमिके वांचुनि सांपडेना । अन्यत्र ठायीं पदरीं पडेना ॥ १४२ ॥
अद्वैत-भूमीवरि गर्व झाला । गमाविले त्या गद पूर्वजाला ॥
तरी प्रसन्न प्रभु तोचि केला । धरूनियां त्याचि सुभूमिकेला ॥ १४३ ॥
पुन्हा या अद्वैत-क्षितिवरि हरी तो न गवसे ।
जया दिव्या हेमीं[3] स्थिरचरपणीं तो नग[4] वसे ॥
विटाळें सर्वांच्या अशुचि मन तें पात्र सहसा[5] ।
नव्हे त्या ज्ञानातें भ्रमविति जया शत्रु सह सा ॥ १४४ ॥
ज्या भूमिकेसि असतां मनिं गर्व जाला ।
तेथें अदृश्य मनिं मानियलें अजाला ॥
आल्या तयाच पुलिनाप्रति तें शुकानें ।
कीं बोलिलें मनिं रहस्य धरा सु-कानें ॥ १४५ ॥
म्हणवुनि पुलिना त्या मागुती गोप-जाया ।
अनुसरति तथापि मागुती कोप जाया ॥
करिति हरि-गुणांचें कीर्तन सु-स्वभावें ।
वसति सकळ तीर्थें[6] ज्या कथेंत स्वभावें ॥ १४६ ॥
ह्मणोनि गाती गुण माधवाचे । ते कीर्ति-गंगाच अगाध वाचे ॥
येती मनें शुद्ध करोनि दाना । जगा नगा[7] हाटक[8]-तें निदाना ॥ १४७ ॥
मनांत होतांच अगाध वाचे । विलासदेहीं प्रभु माधवाचे ॥
पावोनि गाती व्रज-गोप-दारा । न देह-गेहा स्मरती उदारा ॥ १४८ ॥

---

१ गोकुलस्वामीकृष्ण २ वाळवंटांत ३ सोन्यांत ४ दागिना ५ कामादि साहा शत्रु ६ दागिना ७ सोनें ८ आदि कारण.

अशी रासक्रीडा मदन-शर[1] अध्याय रचिली ।
प्रवृत्तीच्या लीलांहुनि बहु निवृत्तीच रुचली ॥
निवृत्ती वांचूनी न किमपि[2] हि वृत्तांत गवसे ।
दिसे ब्रह्मीं त्याला जग कनाकें जैसा नगें[3] नसे ॥ १४९ ॥

अध्याय पांच शर ही धरि पांच काम ।
प्रद्युम्न अंगज जया करी पूर्ण काम ॥
केला अनंग रतिनायक शंकरानें ।
त्याला तनू दिधालि शंकर-शेखरानें ॥ १५० ॥

असे पांच अध्याय हे व्यासदेवें ।
करूनी दिले वर्णिले हे सुदैवें ॥
सुतें[4] त्याचिया यांत अध्याय दोन ।
असे वर्णिले शब्द थोडे वदोन ॥ १५१ ॥

प्रवृत्तीची लीला निजरस निवृत्तींत मिरवी ।
प्रवृत्ती-वृत्तांत त्वरितचि निवृत्तींत फिरवी ॥
भवार्ता हे वार्ता निववुनी विवर्ता परिहरी ।
रमा-भर्ता कर्ता करुनि हि अकर्ता परि हरी ॥ १५२ ॥

इति रासोत्सवपूर्वाध्याय.

---

# वामन पंडित.

## रासक्रीडा

## उत्तराध्याय.

### पद.

गोपी ह्मणती जी गोपाळा । ऐसी न चव दे वनमाळा ॥ ध्रु० ॥
सांडूनियां सर्व विषय । तुझे धारिले चरणद्वय ॥ १ ॥
टाकुनियां हटवाद । अंग-संग दे अल्हाद ॥ १ ॥

---

१ मदन-शर = पांच २ सोन्यांत ३ दागिन्यां ४ व्यास पुत्र = शुक यानें.

जेंवि मुमुक्षु[1] यातें हरी । तेंवि आह्मां अंगीकारीं ॥ ३ ॥
पति पुत्र आणि सुहृद । आह्मी जाणो तुझें पद ॥ ४ ॥
सर्व भावें तुझें भजन । करितातो कुशल जन ॥ ५ ॥
आतां स्तनीं आणि शिरीं । कर ठेऊनी ताप हरीं ॥ ६ ॥
देखुनियां सौंदर्यासी । झालों फुका तुझ्या दासी ॥ ७ ॥
देखुनियां तुज मुरारी[2] । दासी कोण नव्हे नारी ॥ ८ ॥
ऐकुनियां शरण आला । दास दाटुनि वामन जाला ॥ ९ ॥

## अभंग.

अदृश्य हरी होतां । हरि झाल्या गोपकांता ।
भृंग पिकं[3] ध्यातां । गोपाळा ॥ १ ॥
एक होय पूतना । एक कृष्ण शोषी स्तना ।
वेधयल्या गोपांगना । गोपाळा ॥ २ ॥
यशोदा होय एक नारी । कृष्ण होय एक हरि ॥
बांधों जाई उदरीं । गोपाळा ॥ ३ ॥
एक होय कालिया । कृष्ण होय मर्दी तया ॥
ह्मणे मज सम अन्यया[4] । गोपाळा ॥ ४ ॥
गोपी गोप गाई होती । कृष्ण होय ती प्रती ॥
वृष्टि-भयें त्यांही ह्मणती । गोपाळा ॥ ५ ॥
कृष्ण होय ते वसन । धरी जाणो गोवर्धन ॥
पाहती तैसे व्रजजन । गोपाळा ॥ ६ ॥
वियोगें कृष्ण-पिसें[6] । लागे गोपींतें जैसें ॥
योगें वामनाच्या ऐसें । गोपाळा ॥ ७ ॥

## पद.

शरदिंदु यामिनी । वेणु-रवें[7] कामिनी ॥
जाति गजगामिनी । हरि कारणें ॥ १ ॥

---

१ मोक्षेच्छु. २ मुर नामक दैत्याचा शत्रु. ३ कोकिल. ४ अविनाश ५ रक्षण कर. ६ वेड. ७ ध्वनी.

कामें सर्व सोडिती । आर्य[1] मार्ग मोडिती ॥
गृहपाश तोडिती । प्रेमें हरिच्या ॥ २ ॥
दोहनें[2] वधूजनें । त्यागिलीं स-भांजनें[3] ॥
चित्त भवभंजनें[4] । वेधिलें असें ॥ ३ ॥
एकी अन्नें काढितां । स्वजनासी वाढितां ॥
वेणु कानीं पडतां । त्याही धांवल्या ॥ ४ ॥
एकी शेष जेविती । एक पती सेविती ॥
त्याहि वेगें धांवती । काम-विव्हला ॥ ५ ॥
एकी थानीं लेंकुरें । जाति लोटुनियां करें ॥
शासनें[5] भयंकरें । ते निघाली ॥ ६ ॥
विपरीत भूषणें । दिसती न दूषणें ॥
चित्तीं व्रज-भूषणें[6] । वेध लाविला ॥ ७ ॥
एकी नाकीं बाळिया । कानीं मोती ल्यालिया ॥
त्याहि वेगें आलिया । जेथें हरि तो ॥ ८ ॥
वडिलीं वर्जिलिया । पतिनीं ही गांजिलिया ॥
तरि नाहीं लाजलिया । पावल्या हरी ॥ ९ ॥
त्यागुनी मताभिमान । स्वकुल अभिमान ॥
गातो विना तान मान । वामन गुण ॥ १० ॥

## श्लोक.

* माळाकार परस्परें कर गळां घालोनि गोपांगना ।
गाती नाचति पाहती अवघिया एका जगज्जीवना ॥
सोन्याचे मणि ओंविले भुजगुणीं गोऱ्या शशांकानना ।
पांचूचे पदकस्थळीं स्मर मना श्रीदेवकी-नंदना ॥ १ ॥

---

१ श्रेष्ठ २ दूध काढण्याचें काम ३ भांडें ४ संसार नाशक कृष्णानें ५ आज्ञा ६ गोकुळास शोभा देणाऱ्या कृष्णानें ७ बाहुरूपी दोऱ्यांत ८ रत्न विशेष.

* येथ पासून पुढील भागास 'रासमंडळ' असें नांव देऊन कोणी निराळेंच प्रकरण मानितात.

कालिंदी[1]-तट-वाळुवंट गगनीं संपूर्ण तारा-पती ।
कल्हारीं कुमुदोत्पलीं अलि शरत्कालीं जलीं गुंजेती[2] ॥
वारा मंद सुगंध शीतल फुलें नाना तरू शोभती ।
ऐशा [3]यामिनि गोपिका हरिसवें रासोत्सवीं क्रीडती ॥२॥

गोपी-नायक इंद्रनील मिरवे मुक्ताफळांच्या[4] कळा ।
गोऱ्या गौळिणि रास-मंडळिं तशा मध्यें हरी सांवळा ॥
कस्तूरी निटिलीं[5] कलिंद-तनया श्रीरास-माळा गळां ।
सौभाग्य व्रजभूमिचें पदरजें त्याच्याचि आलें फळा ॥३॥

जे ते गोपिस आपणा च जवळी वाटे असावा हरी ।
जाणोनी जितुक्या स्त्रिया तितुकिया तत्काळ मूर्ती धरी ॥
सोन्याचे मणि इंद्रनीळ तितुके तो हार त्याचे परी ।
दों गोपींत मुकुंद कृष्ण-युगुलीं एकेक ते सुंदरी ॥ ४ ॥

सर्वांचे हरि-कंधरीं[6] भुज तया रासक्रिया-मंडळीं ।
कृष्णाचे सकळां गळां भुज अशी झाली अहो सांवळी ॥
एका त्या अवघ्या स्थळीं प्रकृति हो नाना दिसे वेगळी ।
गोऱ्या गौळिणि त्यांत एक मिरवे कृष्ण-प्रभा सांवळी ॥ ५ ॥

त्या गोपी जितुक्या करोनि तितुक्या मूर्ती जरी नाचला ।
ज्या त्या मानिति आपणाचि जवळी आहे हरी येकला ॥
तीची तेथुनि दृष्टि ती न विघडे जो जो जिणें देखिला ।
मेघश्याम अनेक-रूप रमतो ऐसें न भासे तिला ॥ ६ ॥

रूपें तीं स्मर-कल्प-वृक्ष हरिचीं गोपांगना त्या लता ।
कीं ते मेघ समूह त्या चमकती त्यां माजि विद्युल्लता ॥
कीं तारा युवती अनंत गगनीं मूर्ती मधें नीलता ।
जेव्हां एकचि तेधवां उडुगणीं भू चंद्रमा खालता ॥ ७ ॥

---

१ यमुना नदी। २ गुंजारव करतात ३ रात्रीं ४ मोत्यांच्या ५ कपाळीं ६ कंठ अ० गळा

गोऱ्या गौळिणि सांवळ्या हरि-तनू रासोत्सवीं नाचती ।
श्रीगंगेयमुनेमध्यें तरल[1] ते कल्लोळ[2] आंदोलती ॥
गोपी-लोचन मीन लोल मकर श्रीकुंडलें डोलती ।
गोप-स्त्री-कुच कुंभ-तारक करी पोहे रतीचा पती ॥ ८ ॥

* थै-थै-ताल समन्वयें ध्वनि उठे कीं † तं तनन्न श्रुती ।
त्या गोपी व्यतिरेक गाउनि परब्रह्मीं अहो नाचती ॥
तेथें गायक ते मुनी भ्रमर ‡ तद्वृंदां सवें गुंजती ।
आत्मा निर्गुण विश्व उद्धरितसे श्री योग-माया-पती ॥ ९ ॥

कोणी लाविति नाचतां मुख मुखा तांबूल त्याचे मुखीं ।
कोणी मानवला हरी मजवरी ऐशाच भावें सुखी ॥
त्यांच्या देखुनियां कळा स्तुति करी त्या त्या गुणासारखी ।
जे ते आवडती ह्मणे मज अशी नाहीं दुजी आणखी ॥ १० ॥

कोणी श्री भुज-दंड हुंगिति गळां जे आपुल्या घातले ।
जे स्वाभाविक ही सुगंध अगरू-श्रीचंदनें चर्चिले ॥
कोणी श्रांत कुचावरी करतल श्री मूर्तिचें ठेविलें ।
कोणी ओष्ठ हि नाचतां मुख मुखीं घालुनि आस्वादिले ॥ ११ ॥

ऐशा कृष्ण-समागमें स्मर[4]-भरें गोपांगना नाचल्या ।
गाती चित्र विचित्र नृत्य करितां कामातुरा भागल्या ॥
मूर्त श्री-पतिच्या समीपचि गळां तींहीं मिठ्या घातल्या ।
लक्ष्मी वांचुनियां अलभ्य रति ते गोपांगना लाधल्या ॥ १२ ॥

नाना भिन्न उपाधि घेउनि लयीं माया निघे केवळी ।
श्री-मूर्ती युवती मिळोनि घडली होती अशी सांखळी ॥
तें ब्रह्म प्रतिबिंबलें बहु घटीं जे एक एके जळीं । §
गोपी एकचि कृष्ण एक रमती द्वंद्वें अशीं वेगळीं ॥ १३ ॥

---

१ चंचळ २ लाटा ३ हत्ती * 'तत्तत्ताळ' असाही पाठ आहे. † 'तन्न तन्न' असाही पाठ आहे ‡ 'तद्गंधासवें' असाही पाठ आहे, ४ मदन.
§ "आत्मा तो प्रतिबिंबला प्रकृतिच्या नाना घटांच्या जळीं" असाही पाठ आहे.

गोपींचे मुख-इंदु बिंदु वरते नृत्य-श्रमें निर्मिले ।
नाना-रूप-धरें करें सुख-करें पीतांबरें[1] पूशिले ॥
कस्तूरी विण निष्कलंक बरवे ऐणांक[2] ते शोभले ।
काम- व्याधि अनादि आधि[4] जितुके ते सर्व ही नासले ॥ १४ ॥

गांठी कंचुकिच्या जगद्गुरु-करें गोपींचिया सूटल्या ।
ग्रंथी चिज्जड त्या अनादि रचिल्या त्या ही अहो तूटल्या ॥
कृष्णाच्या अधरामृतें अमरता तात्काळ त्या पावल्या ।
नीवी-मोक्ष मुकुंद-हस्त-कमळें तो मोक्ष त्या लाधल्या ॥ १५ ॥

नेले राजस-राग ते अधरिंचे श्री-वल्लभें चुंबनें ।
दृष्टींतील निरंजनें हरपलीं जीं तामसें अंजनें[5] ॥
जें कां चंदन सत्व ही हरि हरी त्यांचें निजालिंगनें ।
केल्या निर्गुण त्या रतान्त-समयीं गोपी जगज्जीवनें ॥ १६ ॥

जाल्या निर्गुण त्या परंतु सगुण-प्रेमेंचि जें राहिलें ।
कांहीं चंदन शुभ्रता उरवुनी तें सत्व तों शोभलें ॥
स्वानंदांत बुडी रतान्त-समयीं देऊनि तें ठेविलें ।
जीवन्मुक्तपणें हरीस सकळी तेणें चि आलिंगिलें ॥ १७ ॥

ब्रह्मीं नित्य-सुखानुभूति-रस त्या रंगेंचि जें रेखिलें ।
कीं पुण्यार्णव देवकी-जठर जें त्याही मिषें ओतिलें ॥
गोपींच्या कुच-कुंकुमें करुनियां माळा गळां माखिली ।
क्रीडान्तीं हरि-मुर्ति सावधपणें ती एकली देखिली ॥ १८ ॥

गोपींच्या स्थिर-जंगमा सहित जो त्यांच्या पतींचा हरी ।
आत्मा कारण संत-दृष्टिस दिसे जो तंतु सर्वांवरीं ॥
त्याशीं सर्व निशा निशा-पति-मुखी ज्या क्रीडती सुंदरी ।
त्यांला धन्य किती म्हणों त्रिभुवना ज्यांची कथा उद्धरी ॥ १९ ॥

कामी लोक तयांस ही निज-कथा प्रीतिप्रद श्रीहरी ।

---

१ पीतवस्त्र परिधान करणाऱ्या कृष्णानें २ चंद्र ३ रोग ४ मनोव्यथा ५ काजळ ६ पुण्य-सागर ७ चंद्रवदना.

विश्वोद्धारनिमित्त गोप-ललना-क्रीडा विचित्रा करी ॥
ऐसें आपण ही करूं ह्मणउनी जो कां अपेक्षा धरी ।
थोडेसें विष तो गळां न मिरवी कांहो शिवाचे परी ॥ २० ॥

गोपींतें रति-लाभ देउनि सदां जो ऊर्ध्वरेता[1] हरी ।
तेव्हां तत्पति मानिती निजभुजीं आलिंगिल्या सुंदरी ॥
जो लक्ष्मी-पति नित्य मुक्त करिती जे मूढ त्याची सरी ।
ते तोंडें वणवा पिऊं न ह्मणती कां हो तयाचे परी ॥ २१ ॥

गोपींच्या नटन[2]-श्रमें करूनि जो आला उबारा हरी ।
कालिंदी-सलिला[4]-मधें गजगतीं[5] +संगेंचि लीला करी ॥
संगें गौळणि मागुती[3] उपवनीं[6] त्यांशीं रमे श्रीहरी ॥
भाग्यें गोप-वधूंचिया क्रमिलिया ऐशा बहू शर्वरी[7] ॥ २२ ॥

गोपी-नाथ-कथा-रूची सुजन हो ध्या आपुलाल्या मना ।
श्रृंगारामृत हेंचि ध्या त्यजुनियां दुर्वासना कामना ।
गोपींतें अधरामृतें कलियुगीं नामामृतें वामना ।
केलें धन्य तया तुह्मी फुकट कां नेघा जगज्जीवना ॥ २३ ॥

जो नेणे विषयाविणें रुचि तया आह्मा तुह्मां कारणें ।
केला गोप-वधू विलास रस हा विख्यात नारायणें ॥
त्याही ऊपरि काव्य नाटक मिषें श्रृंगार जो पाहणें ।
या श्री-कृष्ण-कथामृतीं न रमणें धिग् धिक् तयाचें जिणें ॥ २४ ॥

गाईंचे शिशु ते पशू परि सुधा ते तों श्रवे त्या मिसें ।
कर्में आचरती समस्त हि ऋषी वेदोदितें त्या रसें ॥
लोकोद्धार-निमित्त गोप-ललना-संगें मुकुंदें असें ।
केलें त्या चरितामृता शुक-मुखें राजर्षि प्यालें तसे ॥ २५ ॥

---

१ ब्रह्मचारी. २ नाचणें. ३ पुनः ४ पाणी. ५ गजगामिनी स्त्रिया. ६ बाग. ७ रात्रि

+ " गजगती उज्जाति क्रीडाकरी " असें पाठांदर आहे.

देतां ही विष पावली अमृतता ते राक्षसी पूतना ।
नीवी-मोक्ष अपेक्षितां चि चढल्या वैकुंठ गोपांगना ॥
द्वेषें दानव शत्रु दैत्य तरले ऐशा जगज्जीवना ।
ध्या प्रेमें श्रवणें करूनि हृदयीं हे वामन-प्रार्थना ॥ २६ ॥

---

१ अमरत्व.

समाप्त.

# वामनपंडित-कृत.

## कात्यायनी—व्रत.

जग-पट-व्यतिरेक-मुखें हरी । तदपि अन्वय दाउनि दे हरी ॥
कथिन त्याचि सुधारस-सारसा । नमुनियां हरिच्या पद सारसा[1] ॥१॥
तनू गोकुळीं गोपिका-सत्व-वृत्ती । हरीवीण अन्यत्र ज्यांला निवृत्ती ॥
तयाशींच त्या तन्मयत्वें रमाया । व्रजीं पूजिली ब्रह्मविद्यादिमाया ॥ २ ॥
अशा दिव्य अध्यात्म-रूपें हरी तो । करूनी कथा ते अविद्या[2] हरीतो ॥
करी भक्तिची यावरी सूचना ही । विना भक्ति विज्ञान कांहींच नाहीं ॥ ३ ॥
मतींचे पती जे अहं-गोप होते । हरी देखतां होति निःसार हो ते ॥
दिसे ज्यांस आत्मा स्वयें कंस-हंता । तयां कां रुचे कांत-रूपें अहंता ॥ ४ ॥
परब्रह्म-विद्येसिं[3] जेव्हां भजावें । तयीं द्वैत-संस्कार-रूपा त्यजावें ॥
विसंबों नये सर्वथा ब्रह्म-विद्या[3] । तरी बोध बिंबोनि नासे अविद्या[2] ॥५॥
आत्मता गुरु-मुखें समजावी । बोध-रीति हि अशी समजावी ॥
चित्त चिन्मय करी आशि विद्या । सेवितांचि वितुळेचि अविद्या ॥६॥
असा देखुनि कृष्ण आत्मा वधूंनीं[4] । रमायासि त्याशीं अविद्या वधूंनी[5] ॥
तयाची तिहीं सेविली सर्व माया । तदैक्यें तया श्रीहरीशीं रमाया ॥ ७ ॥
विद्या हरी-प्राप्तिस हेतु वाटे । ते सेवितां ताप तयां न वाटे ॥
न द्वैत जाळी मग काळजाला । हेमंत तो यास्तव काळ जाला ॥ ८ ॥

कृष्णा निमित्त भजतां हरिची सुविद्या[2] ।
तो काळ होउनि हरी[6] च हरी[7] आविद्या[2] ॥
"मी मार्गशीर्ष" ह्मणुनी स्वमुखें वदे तो ।
जो या कथा-रसिं असे रिति भाव देतो ॥ ९ ॥
गीतेमधें पुरुष तोच्चि सहस्रशीर्षा ।
मासास आत्म-पण दे प्रभु मार्गशीर्षा ॥
कीं हा फुटे विरह-भेद तया च मासीं ।

---

१ कमळें २ अज्ञान ३ ज्ञान ४ स्त्रिया ५ नाश करून, ६ कृष्ण ७ हरण करी ८ "मासानां मार्गशीर्षोऽहम्" भगवद्गीता.

द्वैतत्त्व दे पद तया पुरुषोत्तमासी ॥ १० ॥
शुक्तीमधें [1] रजत [2] योग्य दिसे भजाया ।
मायेसि पूजिति हरींतचि गोप-जाया ॥
कीं मार्गशीर्ष हरिरूप तया चि मासीं ।
पूजूनि तीस रमल्या पुरुषोत्तमाशीं ॥ ११ ॥
एवं हरीची हरिमाजि माया । त्या पूजिती या हरिशीं रमाया ॥
चिदंश तो वस्त्र जड-भ्रमाचें । हरूनि दे तें सुख मध्यमाचें ॥ १२ ॥
अध्यात्म-रीती च कथा वदावी । ह्मणोनि तो कृष्णचि भाव दावी ॥
परंतु साधारण माधवाची । वाचा मुखें हो महिमा नवा ची ॥ १३ ॥
यालागिं सर्वांस कथा कळाया । श्रीव्यास विख्यात करी कळा या ॥
ह्मणोनि दाऊनि रवी रसाचा । बोले सुधा-स्वाद सुधारसाचा ॥ १४ ॥
हेमंत शीतल ऋतू सकळां जनांसी ।
श्रीमार्गशीर्ष पहिला हरिरूप मासीं ॥
मासांत त्यांत फळ दे प्रभुशक्ति माया ।
पूजूनि तीस चि तदैक्य-पणें रमाया ॥ १५ ॥
ह्मणोनि गोपी हरिशीं रमाया । आराधिती सर्व मिळोनि माया ॥
हेमंत काळीं प्रथमींच मासीं । क्रीडावया श्रीपुरुषोतमाशीं ॥ १६ ॥
त्यजूनि अन्न हविष्य चि भक्षिती । निजति गोमय-लिप्त शुभाक्षिती ॥
नियम आणिक सर्व हि राक्षिती । फळपणें हृदयीं हरि लक्षिती ॥ १७ ॥
उषःकाळीं स्नानें करिति यजिती श्रीभगवती ।
नदी-तीरीं जेव्हां किरण अरुणाचे उगवती ॥
करूनी देवीची सुतनु सिकता [3] मूर्ति जपती ।
तिच्या मंत्रातें कीं व्रजप-सुत हा हो निजपती ॥ १८ ॥
तटीं कालिंदीच्या प्रति दिवस मास-व्रत-धरा ।
करीती श्रीपूजा स्मरति फळ-रूपें गिरि-धरा ॥
पहातां ही माया फळ परम चिद्रूप गवसे ।
अलंकारीं नाना निज धनपणें हेम चि वसे ॥ १९ ॥

---

१ शिंपी २ रूपें ३ वाळू.

फळाचे आशेनें स्मरत असतो तेंवि भलता ।
अनायासें कृष्ण-स्मृति पसरली ते शुभ लता ॥
हरी ध्याती गाती स्मराति युवती त्यास सकळा ।
स्त्रियांचे या लागीं व्रत सफळ झालें अविकळा ॥ २० ॥

सफळ कर्म करी हरिची स्मृती[1] । हरि हरी ह्मणतां ह्मणते स्मृती[2] ॥
परि तयास हि सद्य नमो हरी । जरि ह्मणे हरिचें मन मोहरी ॥ २१ ॥
स्मृति मनीं हरि-नाम मुखीं परी । नमन सद्य घडे न तदूपरी ॥
ह्मणुनि वंदुनि घेउनि अंबरें[3] । हरुनि ही दिधलीं कनकांबरें[4] ॥ २२ ॥
कर्मार्पणाचा क्रम सांग जाला । तें लाधल्या त्या पशुपांगजाला[5] ॥
अध्यात्म-रीती हरि पावला हो । ध्यावा असा यावरि भाव-लाहो ॥२३॥
अन्य-देव तनु ही जरि पूजी । सर्व ही सुर सुरारि-रिपू[6] जी ॥
कीं समस्त नग[7] ही कनकाचे । देव-देह विधिच्या[8] जनकाचे[9] ॥२४॥
परंतु जीं जीं अवतार-सत्वें । देती फळे स्वात्म सुधारसत्वें[10] ॥
ब्रह्मादि ही या सुर-राज साचा । विलास जो राजस-तामसाचा ॥२५॥

ह्मणउनि पद गा ते मस्तकाईत्व नाहीं ।
श्रुति शिर सुख कैंचें श्रीमुकुंदा विना हीं ।
जरि सकळ फळें तो देव गीतेंत वर्णी ।
परि पद नग[11] साजे जेंवि शोभा सुवर्णीं[12] ॥ २६ ॥

जो सर्व-रूप हरि आपण पूज्य झाला ।
लागे समस्त फळदत्व हि त्या अजाला ॥
शोभे जसें चरण-भूषण हि सुवर्णें[13] ।
ते शोभतें कनक[12] आपुलिया सुवर्णें[13] ॥ २७ ॥

परि पदीं पदमात्रचि शोभवी । कनक येरिति कामुक जे भवी[14] ॥
इतर आप्त फळें इतरा कृती । हरिस सेवुनि घेति न जे कृती ॥ २८ ॥

एवं हरी इतर-दैवत-कल्पकांहीं ।
देतो फळें तदनुरूप चि अल्प कांहीं ॥

---

१ स्मरण २ मन्वादिकानीं केलेलें शास्त्र ३ वस्त्रें ४ कृष्ण ५ कृष्ण ६ दैत्यारि, विष्णु ७ अलंकार ८ ब्रम्हदेव ९ बाप १० अमृत ११ भूषण १२ सोनें १३ रंग १४ संसारी.

तो गोपिका फळ हि मानुनि देव-राया ।
भाग्योदयें भजति त्या प्रभुतें वराया ॥ ॥ २९ ॥
फळ-मिसें चि असा करि जो पण । प्रभुचि तो फळ केवळ आपण ॥
ह्मणवुनी स्वतनू फळ-रूपिणी । स्व वर दे मति ही स्व-निरूपणीं ॥ ३० ॥
कात्यायनी-पूजन बायकांचें । तें अर्चन श्रीव्रज-नायकाचें ॥
तत्रापि त्यांचें फळ हाचि जाला । जपोनियां मागति त्या अजाला ॥ ३१ ॥
ज्यांचा असे विदित अंतर भाव याला ।
आला स्वयें वरद तो वर द्यावयाला ॥
जों मज्जनें[1] करिति त्या यमुनेंत नारी ।
तों ये कित्येक गडि घेउनि पूतनारी ॥ ३२ ॥
प्रतिदिनीं उदकांत दिगंबेरा[2] । निघति पोंहति ठेवुनि अंबरा ॥
हरि अशा समयीं च रमे दिनीं । करित ये पद-पावन मेदिनी[3] ॥ ३३ ॥
हरी आला ऐशी खुण विदित नाहीं निपट ते ।
अशा काळीं तीरीं प्रभु उचलि येऊनि पट[4] ते ॥
कदंबाच्या स्कंधीं कपट[5] पट-तंतूचि हरि तो ।
चढे तो मिथ्यत्वें प्रथम जड वस्त्रें चि हरितो ॥ ३४ ॥
अनात्मत्व वस्त्रें पहिलें हरीतो । दावूनि चित्तंतुस दे हरि तो ॥
ह्मणोनि शाखेवरि आपणांतें । दावूनि त्यांसी करि या पणातें ॥ ३५ ॥
देखोनि हांसति गडी प्रभु-माधवाचे ।
त्यांतें वदे हरि स-हास्य अगाध[6] वाचे ॥
कीं अंबरें तरि च देइन गोप-दारा ।
तीरीं जरि ह्मणति कीं "अजि दे उदारा"॥ ३६ ॥
जळीं खेळतां पोंहतां बायकांनीं । असा शद्ब हा ऐकिलासे स्व-कानीं ॥
फिरोनी पहातां चि त्या स्त्री-कदंबीं[7] । हरी देखिला वक्र-दृष्टी कदंबीं[8] ॥३७॥
प्रपंच-द्रुमाची[9] च शाखा अहंता । चिदात्मा दिसे ये रिती कंस-हंता ॥
फिरोनी द्रुमीं लक्षितां दृष्टि-वृत्ती । जड-त्याग तो होय शाखा-निवृत्ती ॥३८॥
जड पट निरसीतो श्रीगुरू श्रीहरी तो ।

---

१ स्नान. २ नग्न ३ पृथ्वी ४ वस्त्र ५ माया ६ गंभीर ७ समूह ८ वृक्षविशेष ९ वृक्ष.

उघड[3]चि मंग तंतू जो अवि[1]द्या हरीतो ॥
हरि-[2]तनु हरिवस्त्रें ज्ञान-तंतू प्रभा ते ।
निरखित उफराटे दृष्टिनें सुप्रभांते ॥ ३९ ॥
स्व-हृदयांत अखंडचि रेखिला । स्व-पट-[4]हार कसा हरिं देखिला ॥
बसति येउनियां उथळा जळीं । विनविती प्रभुलागिं कृतांज[5]ळी ॥४०॥
बैसोनियां कंठ-जळांत नारी । त्या कांपती प्रार्थिति पूतनारी ॥
सामोपचारें व्रज-गोप-दारा । आधीं असें बोलति त्या उदारा ॥ ४१ ॥
कीं श्लाघ्य[6]तां ज्याकरितां [7]व्रजाला । जाणों तया तूज [8]अधोक्षजाला ॥
भला कसा सत्वर अं[9]बरांतें । द्याजी दया-सिं[10]धु दिगं[11]बरांतें ॥ ४२ ॥
भला नंद हा कीर्ति लोकांत साची । भला पुत्र त्याचा तूं ही तसाची*॥
जळीं बैसलों तीव्र दे शीत कंपा । तयां अंबरें दे अजी सानु[12]कंपा॥४३॥
गोष्टीस प्रत्युत्तर ही वदेना । [13]सामें स्व वस्त्रें [14]व्रजराज देना ॥
तों दा[3]नें आरंभिति गोप-जाया । मिसें तया [15]मन्मथ-कोप जाया ॥ ४४ ॥
करिशिल जशि आज्ञा तूं तसें अंग नाचे ।
करूं तुज वश ऐसे देह हे अंग[16]नांचे ॥
गरति हि परि होऊं सुंदरा क्षिप्र दासी ।
तुज तनु हि समर्पूं सर्व-सौख्य-प्रदासी ॥ ४५ ॥
मदन-पाश-बळें हि न आंवळे । हरि न दान परी वचना वळे ॥
निमिष[17] विस्मित होउनि राहती । मतिस[18]भेद करूं मग पाहती ॥४६॥
ह्मणति धर्म समस्त हि जाणतां । न करि येरिति पाप सुजाणता ॥
करुनि सार विचार करीं बरा । त्वरित दे व[19]सनें क[20]नकांबरा ॥ ४७ ॥
मतिस भेद करोनि हि पाहिला । घन मणे न उगा हरि राहिला ॥
मग च[21]तुर्थ उपाय हि दाविती । भिउनि देइल हें मनिं भाविती ॥४८॥
चारी उपाय कथिले कथिले चि सारे ।
आत्मार्पणाविण वळेल हरी कसा रे ॥

---

१ अज्ञान २ शरीर ३ प्रातःकाळीं ४ हरणकर्ता ५ हातजोडून ६ योग्यता ७ गोकुळ ८ कृष्ण ९ वस्त्रें. १० सागर. ११ नग्न. १२ हे सकृपा. १३ साम, दान, भेद व दंड यांपैकीं एक. १४ गोकुळस्वामी. १५प्रीतिक्रोध(?)१६स्त्रियांचें. १७अत्यल्पकाली. १८ सामादिकांपैकींएक (फितुरी) १९ वस्त्रें, २० हे पीतांबरधारी कृष्णा, २१ चवथा उपाय, दंड.

* " तयाचा भला पुत्र तूंही तसाची " असें असतें तर छंदोभंग झाला नसता.

दानांत ते घडतसे तनु-संपदा ते ।
अर्पू ह्मणोनि ह्मणती हरिच्या पदातें ॥ ४९ ॥
अंबरें[1] अजि न कां पर देशी । काय तूज गमतो पैरदेशी[2] ॥
हा तुझा विनवुं दंडें[3] कराया । जो समर्थ खळ-दंडें[4] कराया ॥ ५० ॥
आत्मार्पणें चि हरिचे फळतील पाय ।
कीं भक्ति हे परि तिहीं गणिला उपाय ॥
अंगीकरी प्रभु न यास्तव त्या क्रमानें ।
जोडे कधीं न हरि अन्य पराक्रमानें ॥ ५१ ॥
परंतु त्यांची कैनकांग-दानें[5] । न मान्य केलीं कैनकांगदानें[6] ॥
वाटे हरी फार उदार त्यांला । हें दुःख जाणे बहुधा सैंत्यांला[7] ॥ ५२ ॥
रति-सुख-विषयीं त्या सर्व जाल्या निरास[8] ।
व्रत फळ पण नाहीं वाटला तो निरासें[9] ॥
ह्मणुनि च हरि योजी त्यांस त्या चि प्रसंगीं ।
निज-सुख-अभिलाषीं[10] घातल्या क्षिप्रं[11] संगीं ॥ ५३ ॥
ह्मणे दासी होतां वचन जरि माझें करितसा ।
करा जो मी स्वामी विधि[12] वदतसें लोकारि तसा ॥
न बैसावें नीरीं[13] मजजवळि येऊनि बरवें ।
म्हणावें "दे वस्त्रें" निज हसित-वर्क्त्रे[14] शुभ-[15]रवें ॥५४॥
हरि-वचन असें जों त्यांचिया जाय कानीं ।
व्रत स-फळ तिहीं तें मानिलें वायकांनीं ॥
ह्मणति भलतसें हो वोळला अंग-दानें ॥
तदुचित रचिला हो यत्न रत्नांगदानें[16] ॥ ५५ ॥
निघाल्या कोलिंदी[17] मधुनि सकळा इंदु[18] वदना ।
कर-द्वंद्वें गोपी लपवुनि उभ्या कोम[19]-सदना ॥
पुढें एकी एकी प्रति ढकलिती आणि लपती ।
नदी-तीरीं ऐशा तेरुं[20]वारि उभा गोकुळ-पती ॥ ५६ ॥

१ वस्त्रें २ निराश्रित ३ बाहु ४ शिक्षा ५ सुवर्णांग-अर्पण ६ सुवर्णाचीं बाहुभूषणं धारण करणाऱ्यानें ७ स्त्रियास ८ आशारहित. ९ नाश. १० इच्छा ११ सत्वर १२ प्रकार, १३ पाण्यांत १४ हास्ययुक्त-मुख १५ शब्द १६ रत्नाचीं अंगदें धारण करणाऱ्यानें १७ यमुना नदी १८ चंद्रमुखी १९ योनि २० वृक्ष.

तरु-स्कंधीं[1] वस्त्रें सितें[2] हरितें[3] आरक्तें[4] असितें[5] ॥
अनेकां रंगांचीं परि सकळ तंतू चि असितें ॥
कदंबाचे शाखेवरि नव-घन[6]-श्यामल[7] हरी ॥
वधू-वृंदीं[8] दृष्टी पसरि करुणा-सिंधु[9]-लहरी[10] ॥ ५७ ॥
कृपापांगें[11] प्रीत प्रभु बहुत जाला परि हरी ॥
स्थळें जीं कामाचीं कर युगुळ देखे तदुपरी ॥
क्रिया काम-स्थानीं भजन-विषयीं लाज दवडी ॥
जसा कामी भक्त प्रभुवर तसें त्यास निवडी ॥ ५८ ॥
क्रिया सर्व हातें असे दोनि हात । स्व-काम-स्थळीं हें असे तो पहात ॥
स-कामा जरी सेवितां लाज नाहीं । नसे वश्य ऐशा स्व-भक्ता जना ही ॥५९॥
द्यावा निजांग-सुख-लाभ वधू जनातें । ऐशी कृपा उपजली भव भंजनातें[12]॥
तों आड काम सदनावरि दोनि पाणी । ते काढिल्याविण न दे वर चक्रपाणी ६०
परंतु गीतेंत रथांगपाणी[13] । करि प्रतिज्ञा उचलोनि पाणी[14] ॥
कीं भक्त माझा न वर्जायें[15] वांयां । हें सत्य पार्था वद मानवा या॥ ६१ ॥
दुराचारी भारी भजन जरि माझें करितसे ।
कृपेनें तो माझ्या त्यजित गुण ही लौकरि तसे ॥
स्ववाणी गीता हे निजबिरिद सांभाळित असे ।
न झांकावें हस्तीं स्मर[16]-गृह वदे शद्वचि असे ॥ ६२ ॥
कामालया वरुनि काढुनि दोन्हि पाणी[17] ।
कृष्णा कडे करिति कीं अजि चक्रपाणी ॥
दे अंबरें[18] ह्मणुनि मागति गोप-दारा[19]
हें युक्तिनें चि करणें पडिलें उदारा ॥६३ ॥
ह्मणे केलें देवी-व्रत तुह्मि विचारोनि[20] च परी ।
विवस्त्रें[21] स्नानें या मलिन-पण जालें तदुपरी ॥
तया प्रक्षाळाया मज निज कर-द्वंद्व-नमनें ॥
करा ऐशा शद्वीं हरि[22] हारि[23] जगन्मोहन मनें ॥ ६४ ॥
व्रताच्या फळीं टेविला प्राण सारा । जयां इच्छिती मुक्ति[24] ही सर्व-सौरी[25] ॥
स्वयें तो चि हे गोष्टि ही बोलताहे । गमे निष्फळा सत्क्रियेची लता हे॥६५॥

---

१ फांदी २ पांढरें ३ पिवळें ४ तांबडे ५ काळें ६ मेघ ७ सांवळा ८ स्त्री-समूह ९ समुद्र १० लाटा ११ दयायुक्त कटाक्ष ( अपांग ) १२ संसारांतक ( कृष्ण ) १३ चक्र १४ हात १५ जाणें १६ मदन. १७ हात १८ वस्त्रें १९ स्त्रिया २० विचारपूर्वक २१ नग्न २२ कृष्ण २३ हरणकरी २४ मोक्षास गेलेले. २५ कृष्ण ( ईश्वर )

अंग हीन ह्मणतां चि निरास । भाव हा धरूनियां करि आस ॥
प्राण न त्यजुनि मानव देहा । तो कृपाब्धि निज मान वदे हा ॥ ६६ ॥
अशा शद्ब बाणे निघों प्राण पाहे । परी स्तंभनीं हेतु जाली कृपा हे ॥
ह्मणे शीघ्र वंदा मला या वरूनी । फळाशा त्वळें राहिल्या सांवरूनी ॥६७॥
केले नमस्कार परंतु कांहीं । लज्जा तिहीं रक्षिलि वायकांहीं ॥
कीं काम-गेहावरि एक पाणी । एका करें वंदिति चक्र-पाणी ॥६८॥
एके करें वंदिति त्या अंजाला । काम-स्थळें काम हि वास जाला ॥
परंतु कामावरि एक हात । हा ही हरी तो चि असे पहात ॥ ६९ ॥
त्यजुनि हि फळ-वांछा काम्य कर्म करीती ।
प्रिय हरिस नव्हे ते सर्वथा लोक-रीती ॥
सकळ-फळद-कर्म-त्याग संन्यास साचा ।
ह्मणुनि उमज होतो या कथेच्या रसाचा ॥ ७० ॥
कामालया उपरि ठेउनि एक पाणी ।
एका त्यजूनि नमिला प्रभु चक्र-पाणी ॥
जो काम्य कर्म करि आणि मनीं अकाम ॥
मानी तसे व्रज-वधू-जन पूर्णकाम ॥ ७१ ॥
असोनि ही काम्य नदी-तटाकीं । त्या कामना जो निज भक्त टाकी ॥
तो अर्ध संन्यास हरि च सारा । करी हरी काम्य पंथा असारा ॥ ७२ ॥
कर्म स्व-सक्त करितो परि काम नाहीं ।
ते टाकवे हरि नसे जरि कामना ही ॥
या लागिं काम-सदनावरि एक पाणी ॥
तो ही तयां कडुनि काढवि चक्रपाणी ॥ ७३ ॥
ह्मणे प्रायश्चित्त स्वविहित विचारें न घडलें ।
दुजें या दोषाचें परिहरण ही आड पडलें ॥
गुरूतें देवातें नमन करि एका जरि करें ।
तयाचा छेदावा कर ह्मणति धर्मज्ञ निकरें ॥ ७४ ॥
परी प्रायश्चित्तें स्व-पद नमनीं सर्व घडती ।
फळ-प्राप्ति-द्वारें त्वरित अवघीं ही न घडती ॥
ह्मणे श्रीकांता त्या मज कर-युगें वंदन करा ।
मग प्रेमें मागा वदति च खुणा वस्त्र-निकरा ॥ ७५ ॥

---

१ प्रतिबंध २ ईश्वर (कृष्ण) ३ हात ४ मार्ग ५ निःसार ६ इच्छ ७ लक्ष्मीपाते ८ समूह

स्वहित मानुनियां व्रज-भामिनी[1] । कर-युगें नमिती गजगामिनी[2] ॥
उचलुनी भुज मागति अंबरा[3] । पसरुनी कर-युग्म दिगंबरा[4] ॥ ७६ ॥
एकि येउनि पुढें स्व-दुकूलों[5] । मागती जसि महा अनुकूला ॥
जें तितें इतर अंबर दावी । गोष्टि ते सरसीं[6] काय वदावी ॥७७॥
वनीं गोपिकांतें हरी चाळवीतो । तिचें वस्त्र नेदी दुजें दाखवीतो ॥
हरीतें ह्मणे गोपिका सारसाक्षी[7] । तुझे हातिचें पैळ तें सर्व-साक्षी[8] ॥७८॥
कौतुकें अशिंच सर्व करीतो । जो मुकुंद भव-बंध हरीतो ॥
गोपिकांस दिधलें वसनातें । हर्षयुक्त करितो वश नातें ॥७९॥
नेसोनि वस्त्रें मग गोप-दारा । तिरीं उभ्या पाहति त्या उदारा ॥
तेव्हां च त्या श्री-पतिशीं रमाया । त्या दाविती नेत्रें[9]-विकारमाया ॥८०
इतुकियांत रवी तिहिं देखिला । उगवतां निज शत्रु च लेखिलें[10] ॥
करुनि अंगुलि[11]-भंग तयास त्या । अति निखंदिति[12] त्या समयीं सत्या ॥८१॥
जो वियोग हरिशीं करि मित्रें[13] । त्यासि ते ह्मणति सर्व अमित्र[14] ॥
तत्व यांत इतुकें अवलोकी । धन्य तोचि [तरि ?] मानव लोकीं ॥८२॥
रति न लाधलिया कुमुदेक्षणी[15] । उगवला रवि ज्यास्तव ते क्षणीं ॥
ह्मणति मागति योग कधीं घडे । स्व-सुख दारवंटा[16] कइं ऊघडे ॥८३॥
कइं घडेल अशी परमा गती । ह्मणुनि ये विषयीं वर मागती ॥
परि मनांत चि तो हरि जाणतो । सकळ-साक्षि दयाळु सुजाण तो ॥८४
भाव ही समजला च हरी तो । जो मुकुंद भव-बंध हरीतो ॥
धन्य त्यांसि करितो वर-दानें । तैं अता वर दिला वरदानें ॥८५॥
भोगाल वेगें मज देव-राया । गोपींस दामोदर दे वरा या ॥
दामोदरार्थी शुक-भाव दावी । ते व्यास-वाणी रचना वदावी ॥८६॥
दामोदरार्थी शुक-भाव देतो । कीं नावडे त्यासि मनें वदे तो ॥
कीं गोष्टि जेव्हां न रुचे मला हो । तनूंत दामोदर नाम लाहो ॥८७॥
व्रज-प्रेम-बद्ध स्व-पोटीं सदा मी । यशोदा करी बद्ध ऐशास दामीं[17] ॥
व्रजीं याचिया गोपिका स्त्री-स्वभावें । रतिप्रीतीनें रंगल्या स्व स्वभावें ॥८८॥
नेदूं कसा यांस हि मी वरातें । ह्मणोनि वाटे कमळा[18]-वरातें ॥
आतां चि भोगूं तरि हे पहांट । ग्रामस्थ येतांचि भरेल हाट[19] ॥८९॥

---

१ स्त्रिया २ गजगती ३ वस्त्र ४ नग्न ५ वस्त्र ६ गोड ७ कमळनेत्रा ८ सर्वद्रष्टा (ईश्वर कृष्ण) ९ नेत्रकटाक्ष १० मानिला ११ बोटें मोडणें १२ निंदिती १३ सूर्य १४ शत्रु १५ कमलाक्षी १६ दरवाजा. १७ दावें १८ लक्ष्मी १९ बाजार

ह्मणोनियां लावुनि सद्य वांटे । पुढें रमावें मनिं हेंचि वाटे ॥
या लागिं दामोदर हेचि वाणी । बोले फळाची न करोनि वाणी ॥९०॥

व्रजा जा ये वेळे तुह्मि सकळ सिद्धाच अबळा ॥
व्रजाची हे चर्चा त्वरित* देईल सकळां ॥
शरद्रात्री येतो तरु फळति नाशी शशि तमा ।
रमाल श्यामीं हो तुह्मि मजसिं तेंव्हां प्रियतमा ॥९१॥
प्रकाशी तो तीतें तरि तसि हि ते होय सबळा ।
निजानंद प्राप्ती पद निज-वरें दे. निजबळा ॥
नव्हे माया वस्तु प्रकृति पुरुषावीण अबळा ।
व्रजस्त्रीतें तेथें ह्मणुनि ह्मणतो देव अबळा ॥९२॥

वृत्ती तुह्मी हरि ह्मणे अबळा असिद्धा ।
सिद्धा तथापि मज आत्मपणें प्रसिद्धा ॥
सिद्धांत कीं अनुभवाल तुह्मी सुजाणा ।
जाणा मला भजति संत जया सुजाणा ॥९३॥

प्रवृति प्रसंगांत दावी निवृत्ती । तया माधवीं तें समर्पूनि वृत्ती ॥
कथा वर्णिली वामनें केशवाची । जगीं धन्य तो यांत जो लेश वाची ॥९४॥

---

१ मार्ग २ उर्णाव ३ षोडशवार्षिकी स्त्रिया ( तरुणी )
* काळोखी, वगैरे या अर्थाचा कांहीं तरी शब्द येथें असावासें वाटतें.

## राज-योग.

सफळ सकळ योग **श्रीहरी**च्याच पायीं ।
श्रम मग करणें कां आणिकांही उपायीं ॥
करुनि नमन त्यातें ज्या यमादीक[1] रीती ।
कथिन अजड[2] भावें भक्त जैसें करीती ॥ १ ॥

मृषा[3] बाले बाला करुनि म्हणवी मी सुतवती[4] ।
स्व-संतानें नांदे तसिच पति भोगून युवती[5] ॥
जडत्वें जे अंगें इतर समजे योग भजनीं ।
चिदात्मत्वें तेचि स्थिति धरिति **मां-वल्लभ**[6] जनीं ॥ २ ॥

विषय टाकुनि बैसाति बापुडे । ध्वनि उगाच तरी श्रवणीं पडे ॥
नयनिं देखति रूप तया यमीं । **हरि**-जनां वश तो यमसंयमी ॥ ३ ॥

विषय इंद्रिय-बुद्बुद[7] तोय[8] मी । म्हणुनि जो स्व-सुखें स्थिर तो यमी ॥
न उदकीं उदकाकांति कामना । इतर ही यम यावरि कां मना ॥ ४ ॥

ऐकुनि हा योग अगाध[9] कानीं । अभ्यास आरंभुनि साधकांनीं[10] ॥
भक्ति-प्रतापें करितां यमांतें[11] । भिऊं नये दंड-धरा **यमातें**[12] ॥ ५ ॥

जडत्वें नानात्वें त्रि-गुण-यम जो जो स्मरतसे ।
**कृतांता**[12]च्या दंडें श्रुति म्हणति तो तो मरतसे ॥
जडे जी योगांगें गमनिं भय दे केवि नियमा ।
प्रतापें भक्तीच्या अजड चिन्मात्र नियमा ॥ ६ ॥

नियम शौच जपादिक मांडणें । नियम लौकिक-संग्रह सोडणें ॥
त्यजुनि सर्व जडत्व अमंगळा । स्व-सुख लक्षिति भक्ति-सुमंगळा ॥ ७ ॥

जड-नगीं[13] जडता कनकाकृति[14] । त्यजुनि लक्षिति चित्कनका कृती[15] ॥
नियम जो अवलोकुनि नेम हा । जितचि मुक्ति-पदाप्रति ने महा ॥ ८ ॥

कनक कामिनि आकृति सांपडे । नियम दृष्टिसि हाचि ठसा पडे ॥
नगें[13] दिसोनि नसे मग आकृती । जग पहाति अशा नियमें कृती ॥ ९ ॥

असे चित्सर्वत्वें स्थिर-चर अळंकार उघडे ।
पहातां अद्वैत-स्थिति-पद महा-द्वार उघडे ॥

---

१ आत्मसंयमनादिक. २ सुज्ञ. ३ व्यर्थ ४ पुत्रवती. ५ स्त्री. ६ लक्ष्मी-पति. ७ बुडबुडा. ८ उदक. ९ गहन. १० साधन करणारे. ११ आत्मसंयमन. १२ यमधर्म. १३ अलंकार. १४ सुवर्ण. १५ धन्य

जरी त्याज्यांशाचा अवसर[1] न देखे सुघड तो ।
तशालाही ऐशा परम नियमें त्याग घडतो ॥ १० ॥
तृषित उदक देखे दृष्टि धांवे तरंगीं[2] ।
परि न धरिच ऊर्मी[2] प्रत्यया अंतरंगीं ॥
जड जग दिसतांही वेध सच्छिद्र साचा ।
घडवि जड–पणाचा त्याग सच्चिद्रसाचा ॥ ११ ॥
न देखिला साच तरंग[2] वाटे । लावी जड–प्रत्यय मात्र वांटे[3] ॥
प्रेमा जसा केवळ चिद्रसाचा । साधी जड–त्याग सुभद्र साचा ॥ १२ ॥
जडोर्मींत घेतां चिदात्मांबु भागा । जडत्वा नुरे ठाव होतां विभागा ॥
न होते चि जे लागले ते चि वांटे[3] । अहो त्याग आश्चर्य–रूपीच वाटे॥१३॥
जड–त्यागीं ऐसा म्हणुनि अजड–त्याग नुमजे ।
सुवर्ण–स्वीकारें त्यजिति नग हे योगि नुमजे ॥
अलंकार स्वर्णी सहित दिधले टाकुनि परी ।
अनेकीं प्रारब्धीं करुनि धरिले ते तदुपरी ॥ १४ ॥
स्वधर्मे *येती भोगिती पूर्व दारा । न ते बोधकें योगिया त्या उदारा ॥
जयीं कर्म योजी स्वभार्या रतीतें । न योगींद्र भी भीय ती फार तीतें ॥१५॥
नद्या प्रावृट्काळीं गडगडुन येतां न फुगल्या ।
न त्या तैशा ग्रीष्मीं म्हणउनि नसे साधु उगला ॥
गळे जें भोगांतीं तरु–फळ पिके आपण गळे ।
न इच्छी उत्पत्ती न धरि गळतां ही द्रुम गळे॥१६॥
जडीं चित्स्वीकारें त्यजिति जन जें दुर्लभ जनीं ।
जया ग्राह्या त्याज्य स्मृति हि न अशेषात्म[4]–भजनीं ॥
नव्हे सर्वात्मज्ञाविण विषय हा त्याग सहसा ।
गृह–त्यागी ज्ञानी अबुध हि जया शत्रु सह सो[5] ॥ १७ ॥
सर्प प्रतीति प्रतिकूळ जावी । ते त्यागितां माळ कशी त्यजावी ॥
एवंच सारें अनुकूल वाटे । लागे जड–प्रत्यय मात्र वाटे ॥ १८ ॥
टाकणें नियम हा प्रतिकूळ । स्वीकरोनि असणें अनुकूळ ॥
त्याग ही नियम जो बुध–रीती । मौन यावरि असेंचि धरीती ॥ १९ ॥

---

१ प्रसंग. २ लाट ( पाण्याची ). ३ मार्ग. ४ सर्वात्मा ( ईश्वर ). ५ कामक्रोधादिक साहा शत्रु.

* 'ये' हें अक्षर छंदासाठीं ऱ्हस्व म्हणावें म्हणून त्याजवर ' अशी खूण केली आहे.

न बोले तो मौनी दृढ अचळ ओष्ठ-द्वय-पुटीं ।
स्थिरा वाणी स्थूळीं धरुनि करि पोटीं पुटपुटी ॥
उठे जे संकल्पें करुनि हृदयीं शब्द-रचना ।
करें नेत्रें दावी दपटुनि मुखामाजि वचना ॥ २० ॥
अशब्दीं शब्दाचे उठति फुटती ही बुडबुडे ।
तया सांगातें तें उदक न तरे आणि न बुडे ॥
प्रतीतीनें ऐशा वदत असतां ही घडि घडी ।
स्व-मौनातें पाहे इतर बक-मुद्राचि उघडी ॥ २१ ॥

तनु-वनीं परिचीत असे जनीं । मनन आवडि घे भव-भंजनीं[1] ॥
वसति दांभिक जेंवि जनीं असे । विजनें[2]-वास जनीं विजनीं असे ॥ २२ ॥

न आद्यंतीं ब्रह्मीं जन तरि मधें ही विजन कीं ।
न मध्यें ही ऐसा नग निज उपादान[3] कनकीं ॥
अशा ब्रह्मीं चित्तें करुनि असती ते चि वसती ।
जनीं ही ते योगी स्थळ विजन ऐशा विलसती ॥ २३ ॥

अधिष्टान सिद्धासनीं क्षिप्र सिद्धी । जगद्रूप मी ब्रह्म ऐशी प्रसिद्धी ॥
शरीरीं फिरावें उठावें बसावें । तरी नित्य योगासनीं त्या असावें ॥ २४ ॥

शुभांगें दुष्टांगें त्यजुनि अवघी ही विषमता ।
स्वयें अंगें होणें स्थिर चर जगीं आंग समता ॥
अतर्क्यें या साम्यें जनिं विजनिं सिद्धासनिं वसे ।
दुजा जाणों खुंटा-सम तनु समस्तांसि गवसे ॥ २५ ॥

प्रत्यक्ष जे जड शिळाचि कठोर साची ।
ते गार होय रसनेसि मऊ रसाची ॥
ते दृष्टि कीं जिस जडीं अजडत्व सारें ।
नासाग्र-दृष्टि किति काय तिची कथा रे ॥ २६ ॥
कोणी अखंड अति सादर मूळ बंधीं ।
ते बद्ध मागुति गुण-त्रय-मूळ-बंधीं ॥
चित्तास बांधिति विचारुनि चित्त मूळ
होवोनि ते सकळ मूळ सदा अमूळ ॥ २७ ॥

मनोवृत्ति जातां जडीं बाह्य रूपीं । फिराऊनि तैं शीघ्र योजी स्वरूपीं ॥
धरोनी स्थिरत्वें अशी शीघ्र सोडी । पहाया जडीं अंबरीं देह सोडी ॥ २८ ॥

---

१ संसार-नाशक (ईश्वर). २ एकांत. ३ ज्या द्रव्याची कोणतीही वस्तु बनवितात त्या द्रव्यास त्या वस्तूचें उपादान कारण म्हणतात; जसें लिहावयाच्या लेखणीचें उपादान बोरू.

जसा प्राणायामीं त्वरित उदरीं वायु भरणें ।
तशी प्रत्यावृत्ती स्थिर मग पहा प्राण धरणें ॥
पुनः तो सोडावा हळु हळु तशी वृत्ति बरवी ।
जगीं योगी आत्मा प्रकट तिस दावी तमिं रवी ॥ २९ ॥

ध्यातां स्वयें ध्येय चि आन नाहीं । कैचें मग ध्यान तयाविना ही ॥
प्रतीति ऐशी असतां अखंड । ध्यानास त्याच्या न दिसेचि खंड ॥ ३० ॥

जडोर्मी[1] नव्हे ज्ञान हें चिद्रसाचें । पुन्हा पाहतां त्यांत तें नीरें[2] साचें ।
चिदाब्धीमध्यें[3] ठाव कैंचा तरंगा[1] । अशी धारणा बाणली अंतरंगा ॥ ३१ ॥

स्वसंस्कारें चित्तीं विषय मन चित्सिंधु[3]-लहरी ।
तरी सर्वात्मत्वें इतर-पण योगी परिहरी ॥
स्वयें जे जे जेथें विविध जड ऊर्मी[1] बुडबुडे ।
तरी प्रत्याहारा विण मन चिदब्धींत चि बुडे ॥ ३२ ॥

चिन्मात्र मी सर्व अशी समाधी । योगांगमात्रांत तया समा[4]धी ॥
चित्पार्थिवाची पृथिवी पुरावा । जिताचि पाहो न पुरी पुरा या ॥ ३३ ॥

जया चित्सिंधूचे[5] शत शत युगांचे बुडबुडे ।
प्रतीती[6] ही येतां तरति बुडती ते चि न बुडे ॥
तदात्मत्वें काळ त्रिगुण-वश सिंचोनि सकळा ।
स्वयें योगी काळ-त्रिगुण-मय नांदे अविकळा ॥ ३४ ॥

या राजयोग-विभवानुभवा मनातें ।
देतील ते वळखती मज **वामनातें** ॥
सार्द्ध त्रिहस्त जरि **वामन** दीसतो तें ।
**विष्णु** स्वयें तनु हि देवें-नदी[7]-सतीतें ॥ ३५ ॥

## समाप्त.

---

१ लाट (पाण्याची). २ उदक. ३ सागर. ४ बुद्धि. ५ चित्समुद्राचे. ६ अनुभव. ७ गंगा.

# सुदाम-चरित्र.

श्री सद्गुरूच्या पद-सारसातें[१] । वंदोनियां या कविता-रसातें ॥
बोलेन जी भागवतीं **शुकानें** । जें वर्णिलें आयकिजे सुकानें ॥ १ ॥
**सुदामाच्या** धामीं[२] किमपि हि नसे अर्थ[३] भलता ।
पहातां वायूची सदनिं दिसते कीं प्रबळता ॥
तृणें पर्णें जीर्णें करूनि शत छिद्रें मिरवलें ।
जणो गंधर्वाचें नगर नभिं जैसें उगवलें ॥ २ ॥
लागे त्या रजनीस विप्र-सदनीं कांजू[४]-कृमीचा दिवा ।
जैसा तंतु पट श्वभादिक गमे कीं वांधला चांदवा[५] ॥
पृथ्वी-पीठ पलंग विस्तृत दिसे निद्रा करी त्या वरी ।
कांतालिंगन मंद दे द्विज-वरा तो इंद्रियें आंवरी ॥ ३ ॥
जन्मादारभ्य नेणे द्विज-वर-वनिता[६] एक ही जीर्ण [७]चोळी ॥
त्या रागें ते स्थळीं ते नकळत पतिला जें कर-द्वंद्व चोळी ।
दस्रा येतां दिवाळी किमपि हि न मिळे गोडशी पूर्ण-पोळी ।
दोषें दारिद्र्य-तापें-करूनि निजमनीं आपुलें चित्त पोळी ॥ ४ ॥
वस्त्रें जशीं केवळ मीन-जाळीं । वदे कधीं पावक[८] ही न जाळी ॥
जें धुंडितां ही नव खंड खंडें । अप्राप्य कीं जर्जर खंडखंडें ॥ ५ ॥
नसे अन्न भक्षावया मंदिरीं हो । ह्मणोनी क्षया[९] वर्जिलें उंदिरीं हो ॥
न ज्या आंगणीं त्या विहंगादि जाती । गृहा त्याचिया कोण भिक्षेसि जाती ॥
तो द्विजोत्तम तसा वन-वासी । सौख्य-लेश न कधींच जिवासी ॥
दंपती कृश शरीर गती नें । वागती परम मंद गतीनें ॥ ७ ॥
खाती कंद मुळें पिती मधु जळें जे नेणती ओंवळें ।
दंपत्यें अंमळें[१०] स्व-साधन बळें ज्यांचें सदां सोंवळें ॥
नेसाया धवळें[११] न वस्त्र पिंवळें [१२]शीतें सदां व्याकुळें ।
पृथ्वी पाद-तळें फिरे हळहळें प्रारब्ध दैवागळें ॥ ८ ॥
शिर्षीं बाल-तृणांकुरें पसरलीं जातो न आच्छादिलीं ।
कौपीनांबर-छिद्रतोन्मुख सदा निर्लज्ज संपादिली ॥
काखे पुष्कळ दों भुजीं अणिक ही संपूर्ण विस्तारलीं ।
नाहीं नापिकें[१३] नापिका ह्मणुनियां स्व स्व स्थळीं थारलीं ॥ ९ ॥

---

१ कमलातें. २ घरीं. ३ द्रव्य. ४ काजवा नामक कीटक. ५ छत. ६ स्त्री. ७ कंचुकी.
८ आग्नि. ९ घराला. १० स्वच्छ. ११ शुभ्र. १२ थंडीनें. १३ न्हावी.

दाढी मिशा बाबर भूत ज्याच्या । अश्लाघ्य तेणें मुखपंक जाचा ॥
दिसो न येती समजा मनीं रे । सळे पळे देखुनि कामिनी रे ॥ १० ।
नासा-पुटीं[1] तों भ.णी[2] जयांची[3] । अन्यत्र नाहीं गणना तयांची ॥
ज्या मस्तकींच्या कबरी[4]-भरानें । सभोंवतां दंग भुजंग-रानें[5] ॥ ११ ॥
सर्वत्र मंदादर[6] कीं जयाला । वंबू[7] न ते बोलविती जयाला ॥
कांता सती होउनियां जयाची । संतोष-वार्ता नकरी जयाची ॥१२॥
तो काळ कंठी जंव ये रितीनें । तों बोधिला ब्राह्मण कीं सतीनें ॥
**द्वारावती**चा पति मित्र लोकीं । तूं आपुला बोलसि कीं विलोकीं ॥१३।
तडतडां मज तोडिति बाळकें । न मिळती उदरास हि बाळकें[8] ॥
बहुत हे समजा शिशु-जाचणी[9] । मन असे पडिलें अति कांचणीं ॥१४।
हीं सोकलीं दूध दहीं तुपासीं । सांगों किती दुःखहि तूजपाशीं ॥
बाळें आम्हां कां दिधलीं सुदैवें । न जाणतां **श्री-पति-वासुदेवें** ॥१५।
जे मागती त्यांस **हरी** न देतो । न मागती त्यांस बळेंचि देतो ॥
जो कामुकाची[10] समजे अपेक्षा[11] । म्हणोनि तोकीं करितो उपेक्षा[12] ॥ १६ ।

दुर्गंधि तों कधिंचही न चुके मुखाची ।
शय्यासनीं किमपि गोष्टि नसे सुखाची ॥
तांबूल-हीन-वदनाधर-पान-काळीं ।
स्वप्नीं परंतु हि कधीं न पडे सुकाळीं ॥ १७ ॥

खदिर[13]-पर्ण-रसें दशनांवरें[14] । वदन देखियलें न कधीं बरें ॥
परम शुष्क तुझ्या अधरासि[15] या । रस-विहीन अपेक्षित कासया ॥१८॥
जालिया वमन ही न मिळे कीं । तूज तें क्रमुक[16]-फोडि फळे कीं ॥
कोण सौख्य म्हणवूनि क्रमावें । जें परस्पर मिळोनि रमावें ॥ १९ ॥
स्नेह[17]-शून्य वरि भार जटांचे । व्यर्थ हे वहानि पाय भटांचे[18] ॥
दैव-हीन अम्हि काय करावें । जाण या अजि वयांत मरावें ॥ २०॥
मरण कां मज नयेचि कळेना । पावकीं[19] पडुनि देह जळेना ॥
व्यर्थ जन्म धरिला नर-लोकीं । कीं आम्ही उभयतां श्रमलों कीं ॥२१॥
अहा पाप म्यां काय केलें कळेना । पहा सौख्य स्वप्नांतहि आढळेना ॥
वृथा जन्म घेवोनियां या नृ-लोकीं । किती यावनी दंपती शीणलों कीं ॥२२॥

---

१ नाक पुडांत. २ अतिशय. ३ ज्या केसांची. ४ केश. ५ सर्पांचीं रानें. ६ आदराची कमताई. ७ एक प्रकारची कांकडी. ८ मुलें. ९ जाच. १० ज्यास इच्छा आहे त्याची. ११ इच्छा. १२ दुर्लक्ष्य. १३ कात. १४ ओंठ. १५ खालचा ओंठ. १६ सुपारी. १७ तेल. १८ भिक्षुकाचे. १९ अग्नींत.

त्वां हा मनीं खेद न तो करावा । यां नंतरें यत्न मनीं धरावा ॥
**श्रीकृष्ण**जीच्या चरणां भजावें । भेटावया शीघ्र निघोनि जावें ॥२३॥

**सुदामा** बोले कीं "जरि वदसि जा तूं मज सती ।
अहो तेथें गेल्या सकळ जन देखोनि हंसती ॥
तयीं चित्तीं दुःखें परम उपजेती न धरवे ।
क्षमा पाहों जातां तदुपरि हि आम्हां न करवे ॥ २४॥

अद्यासनें करूनि हीन हि दीन लोकां ।
कां बोध नाद पुसती जगती भुलोका ॥
आम्ही अकिंचन सकिंचनता जयासी ।
जागे समान प्रतिपाद्य न हो तयासी ॥ २५ ॥

ऐश्वर्यें भ्रमले जगीं मिरवले थेंडे भले देखिले ।
नाहीं पारखिले तुवां वळखिले गर्वेंचि जे आंखिले ॥
तारुण्यें पाहिले भरें दडपले सौख्यें सदां मातले ।
दुष्पंकीं रुतले बळेंचि उतले कामीं सदां रंतले ॥ २६ ॥

पर-धन पर-दारा सर्व-दोषापहारी ।
अनुदिन प्रिय-कांता-काम-संगीं विहारी ॥
किमपि हि न करी जो सज्जनासी प्रवृत्ती ।
अति कठिण घडेना साधु-निंदा-निवृत्ती ॥ २७ ॥

देखतां ऋषि तयासि न पूजी । वाटतो द्विज तयास रिपू जी ॥
भोंवयी करुनि वक्र पहातो । मित्र भिक्षुक अमान्य अहा तो ॥२८॥
न तो हालवी मस्तकातें कदापी । दुरूनीच तो शुष्क शब्देंचि दापी ॥
तयीं बोबडी ते वळे भिक्षुकाची । न ते गोष्टि ही गोड बोले फुकाची ॥२९॥
अलक्ष्मीस लक्ष्मीस तो वैर-भाव । स्त्रियांचाच नैसर्गि कीं तो स्वभाव ॥
म्हणूनीच शत्रुत्व या संततीतें । विचारूनि पाहें सती तूं मतीतें" ॥३०॥

प्रतिष्ठा लज्जाही धरुनि बसतां काय न घडे ।
प्रयत्ना वांचूनी समज सहसा दैव नुघडे ॥
दिनानाथा ! कांता मजवरि करावी बहु दया ।
विचारें आणावें वचन वरवें स्वात्म-हृदया ॥ ३१ ॥

करूं नये स्त्रीवचना अमान्य । समस्त लोकांत तुम्हीच मान्य ॥
दारिद्र्य-दोषास त्वरें हरावें । प्रस्थान येथूनि उद्यां करावें ॥ ३२ ॥

---

१ भिकारी. २ श्रीमंतपणा. ३ म.जले. ४ रममाण झाले. ५ पराङ्मुखता ६ स्वाभाविक.

**द्वारावती**चा पति आजि मान । देतो जना अन्य न तो समान ॥
अज्ञान हे दांभिक भाग्यवंत । तूं **कृष्ण** तो जाणसि ज्ञानवंत ॥३३॥
त्याची तुह्मां कीर्ति असोनि ठावी । कां कल्पना व्यर्थ मनीं उठावी ॥
देवोनियां राज्य बळी स-दारा । राहे उभा जो समजा उदारा ॥३४॥
उचलुनि तळ-हातें जो धरी पर्वतातें ।
वसु दिनकत संख्या जाणसी **मार-तातें** ॥
कशि करिल उपेक्षा आपुली या जनातें ।
द्विज-वरिं समजावें तत्व हें कीं मनातें ॥ ३५ ॥
उच्छिष्ट **धर्मा** घरिंचें स्वहातें । काढीतसे हें जनही पहातें ॥
ऐश्वर्यतेचा वेडिवार नाहीं । हें जाणशी तूं तंव सज्जना हि ॥३६॥
देतां उरीं तो **भृगु** लात सोशी । सुब्राह्मणाचीच तया असोशी ॥
जाणोनि हें जा अजि दर्शनासीं । दारिद्र्य हें तत्क्षणि देव नाशी" ॥३७॥
हे आयकोनि वचनोक्ति-सुधा सतीची ।
मालिन्यता परिहरी अपुल्या मतीची ॥
त्यानंतरें करितसे स्वमनीं विचार ।
सांडोनि दे मग समस्त हि पूर्व चार ॥ ३८ ॥
" रित्या हातें जावें स्वमनिं समजावें गुणवती " ।
उभी मुष्टी पोहे धरुनि पतिसन्मूख युवती ॥
ह्मणे "शाकेंचें घे दळ अशन मानी बहु चंवी " ।
ह्मणोनी भर्तारा त्वरित गमनोद्देश सुचवी ॥ ३९ ॥
घेवोनियां पृथुक ते मग चालिला हो ।
वाचेसि सेवित असे प्रभु-नाम-लाहो ॥
तों देखिली दुरुनियां नगरी **हरी**ची ।
चित्रें विचित्र दिसताति परोपरीचीं ॥ ४० ॥
[11] नौरत्नें खचितें करूनि बरवें मंदीर तें देखिलें ।
सेजे सुंदर माळिया तदुपरी त्या त्या स्थळीं रेखिलें ॥
पाहे पावठणीं हिरे जडियले **द्वारावती**चे पुरीं ।
खिल्लोरांगण त्या घरांत हि धरे सौंदर्य तें नूपुरीं ॥ ४१ ॥

---

१ स-स्त्रीका. २ आठ. ३ मदनपिता, कृष्ण. ४ डौल ५ अति आवड ६ अमृत. ७ भार्जेचें. ८ पान. ९ भक्षण १० गोडी. ११ नऊ रत्नांचीं नांवें :—१ हिरा. २ माणीक. ३ मोत्यें ४ गोमेद. ५ इंद्रनील ६ पाच. ७ प्रवाळ. (पोंवळें) ८ पुष्कराज. ९ वैडूर्य. ( अथवा तोरमल्ली ) १२ पैंजण.

नक्षत्र शोभा **प्रभु**-अंगणीरे । बिंबे तयां कोण असा गणीरे ॥
देखानियां ते द्विज हंस जाती । मुक्ता-भ्रमें सर्व भुलोनि जाती ॥४२॥

प्रत्यक्ष मानस सरोवर त्या द्विजासी ।
भासोनियां ह्मणति······*ज्या द्विजासी ॥
आश्चर्य होउनि तटस्थ उगाच राहे ।
मिथ्या भ्रमे मतिंत ते गति कीं नरा हे ॥ ४३ ॥
जीवेश्वरीं जरि असा भ्रम-भेद जाला ।
या लागिं नेणति तया पुरुषा अजाला ॥
**कृष्णा** ! तुझी प्रकृति काय अशी कुडी रे ।
जे राजहंस परि घालिति फूगडीरे ॥ ४४ ॥
तो बैसला दिसतसे **हरि** चित्र-शाळे ।
सोपे समस्त चहुंफेर महा विशाळे ॥
ज्याच्या अमीत फिरती वदनेंदु जाया ।
सिंहासना समिप तो भयभीत जाया ॥ ४५ ॥
तो आंगणीं···तटस्थ असे उभारे ।
विद्युल्लता सम दिसे वनिता-प्रभारे ॥
देखोनि भ्रांत मग तो द्विज पूर्ण झाला ।
पाहों कसा विसरला च **अधोक्षजाला** ॥ ४६ ॥

तों देखे **हरि** अंगणीं द्विजवरा कीं हा **सुदामा** खरा ।
कोठें ये क्षणिं पातला ह्मणुनियां देवांचिया शेखरा ॥
वाटे अद्भुत अंतरीं म्हणुनि ये सिंहासना खालता ।
धांवूनी पद वंदुनी करिं धरी जाला मुखें बोलता ॥ ४७ ॥
सिंहासनीं बैसवुनी तयासी । सांगे **हरी** मित्र असें स्त्रियांसी ॥
चंद्रानना विस्मित होति भारी । कीं कौतुकाचीच गुढी उभारी ॥ ४८ ॥
**सुदाम्या**च्या पायां पडति सकळा इंदु-वदना ।
खुणावूनी सांगे त्वरित अणवी पुत्र **मदना** ॥
**हरी**च्या आज्ञेने द्विज-पद सत्या त्याच नमिती ।
अनेका **कृष्णा**च्या समज गणितां त्यांस न मिती ॥ ४९ ॥

बोले अनंतर तयां प्रति पात्र पाणी ।
आणा असें त्वरित कीं **प्रभु** चक्रपाणी ॥

---

१ पक्षी. २ मोत्यांच्या भास होऊन. ३ कपटी. ४ स्त्रिया. ५ स्त्री-शोभा. ६ श्रेष्ठास. ७ चंद्रमुखी. ८ मर्यादा, गणती. * या अक्षराच्या पूर्वींचीं कांहीं अक्षरें मूळ प्रतींत नाहींत सबब तेथें...असे ठिबके दिले आहेत.

प्रक्षाळणार्थ चरणा शरणागतीनें ।
पूजावया परम योग्य हि दंपतीनें ॥ ५० ॥
कुच-कलश-सुवर्णें कांचनी घे घटातें ।
अभिनव सति शोभे पूजितां हो भटातें ॥
सजल-भरित पूर्णा **श्री** स्वयें **श्रीकरानें**[3] ।
धरुनि लवुनि ओती पाय धूतां करानें ॥ ५१ ॥

**कृष्ण** आणिखिहि **रुक्मिणी** सती । पूजितां स्त्रिजन-वृंदें हांसती ॥
हें समस्त जरि यांस साजलें । किन्निमित्त मग भाग्य लाजलें ॥ ५२ ॥

कैंचा पूजिति जांबवंत वदतां ते [6]**जांबवंती** रडे ।
तों तों हांसति गोपिका खदखदां डोळे न कीं कोरडे ॥
हास्यानंद हि बिंदु लोचानिं भरे हेमांबरें वारिती ।
नाटोपूनि कृशोदरें धरिति कीं देहीं करें ये रिती ॥ ५३ ॥

जों हांसती तों तंव अंग नाचे । सभोंवते वृंद हि अंगनांचे ॥
चर्चा द्विजाची बहुधा करीती । असो स्त्रियांची असि हेचि रीती ॥ ५४ ॥

ज्याचें पायवणी शिरीं धरि धणी जो **शूळपाणी** क्षणीं ।
तो हा षड्विध-लक्षणी द्विज-पदें प्रक्षालितो जे क्षणीं ॥
वामांगीं [9]रमणी **रमापति** गुणी त्रैलोक्य-[10]चूडा-मणी ।
सेवे तत्पर [11]भूसुरा प्रति गमे चातुर्य-चिंतामणी ॥ ५५ ॥

आतिथ्य सर्व तदनंतर त्या **हरीनें** ।
केलें द्विजासि विधियुक्त परोपरीनें ॥
तांबूल देउनि पुसे "कुशळें मुलें कीं ।
स्त्री एक आणिक तुला किति लेंक लेंकी" ॥ ५६ ॥

"**कृष्णा** ! तुझें जाण दये करूनी । आह्मी असों जीव तनू धरूनी ॥
**विश्वंभरा** जें तुज नाठवावें । तें सौख्य कैंचें मनि सांठवावें" ॥ ५७ ॥

लज्जे करूनि द्विज तो [12]पृथुकां न दे हो ।
तो **रुक्मिणी-पति** तया प्रति कीं वदे हो ॥
भेटीस भेटि बहुतां दिवसां जपे हे ।
तो दे **हरीस** मगतो द्विज मुष्टि पोहे ॥ ५८ ॥
तों भोंवत्या सकळ ही मिळती [13]सती हो ।

---

१ जोडप्यानें. २ सोन्याच्या. ३ लक्ष्मीपति कृष्णानें. ४ समूह. ५ ह्मातारा आस्वल. ६ कृष्णस्त्री विशेष. ७ सोनसळ्यानें. ८ घटा. ९ स्त्री. १० शिरोभूषण. ११ पृथ्वी देव-ब्राम्हण. १२ पोह्यांस. १३ स्त्रिया.

20358

देखोनि मुष्टि पृथुकां मग हांसती हो ॥
श्रीकृष्णजी परम आदरतेकरूनी ।
बांधीतसे अपुलिया पदरीं धरूनी ॥ ५९ ॥
झोंबी पडे त्यावरि बायकांची । लीला अहो हे यदु-नायकाची ॥
विप्र-प्रसादासि अयोग्य नारी । म्हणे तयांला मग पूतनारी[1] ॥ ६० ॥
ह्मणे "तुह्मां भक्ति नसे द्विजाची । कशी घडे प्राप्ति पृथू-रजाची" ॥
काकूलती येउनि त्यास दारा । पोहे स्वयें मागति त्या उदारा ॥ ६१ ॥
नेदीच पोहे मग तो कदापी । नेत्रें हरी त्या सकळांस दापी[2] ॥
स्थळीं स्थळीं स्तब्ध थवे[3] तयांचे । गळोनि जाती मद ही स्त्रियांचे ॥ ६२ ॥
तयानंतरें श्रीहरी त्या द्विजातें । पुसे पूर्व वृत्तांत ठेवा गुजातें ॥
"कसे त्या गुरूचे गृहीं वर्तलों कीं । तुतें ठाउकें काय आहे विलोकीं॥ ६३ ॥
नये वर्ण उच्चार जैं अक्षरांचा । तयीं क्रोध दावीतसे कीं क्षरांचा ॥
जसें बागुलाच्या भयें बाळकाशीं । तसा सद्गुरू अंतरी तो द्विजाशी ॥ ६४ ॥
माता मृषा[4] क्रोध शिशूस दावी । तशीच शिष्या गुरु रीति दावी ॥
घेवोनियां प्रज्वळ जाण भीतें । देखोनियां बालक जेविं भीतें ॥ ६५ ॥
हरोनियां सर्व पहा अविद्या[5] । बोधीतसे जाण कसी सुविद्या ॥
गुरूविणें थोर न तो दिसेरे । आम्ही तुम्ही वर्ततसों कसेरे ॥ ६६ ॥
क्षुधेनें बहू पीडिलें जे दिनींरे । कळे त्यास कैसें पहा तूं मनींरे ॥
दयालुत्व तो सद्गुरूचे चि पायीं । पडों नेदिती सर्वथा ते अपायीं ॥ ६७ ॥
वेंचूं शुभा जाउनि दूरि रानीं । आह्मी तुम्ही या आपुले करांनीं ॥
परस्परें वाहुनियां शिरीं रे । न वाटत क्लेशाहि अंतरींरे ॥ ६८ ॥
गंगोदका घेउनि घागरीला । राहों न देतां स्वसुखें गरीला ॥
जातां पहा अध्ययनीं रतींरे[6] । वाटे तुझी जाण सुसंगतीरे ॥ ६९ ॥
एके दिनीं श्रीगुरुचे सतीनें[7] । सांगितलें कार्य आह्मास तीनें ॥
माते ! करूं वो ह्मणवोनि वाचे । बोलोनि गेलों शिशु मानवाचे ॥ ७० ॥
जावें म्हणे आजिच इंधनातें । .................................. ॥
काष्ठा निमित्तें मग पर्वतातें । येतें वदाकीं तुमच्या मतातें ॥ ७१ ॥
त्यानंतरें जात असों वनाला । शंका न वाटे पहतां मनाला ॥
भारे[8] बहू बांधुनि इंधनाचे । घेतां शिरीं मोर समोर नाचे ॥ ७२ ॥
तों श्रांत[9] जालों मग क्षुत्पिपासीं[10] । वनामधें त्या पडलों उपाशी ॥

१ पूतनेचा शत्रु कृष्ण. २ दाबी, रागें भरे. ३ समूह. ४ खोटा ५ अज्ञान. ६ प्रीति. ७ स्त्रीनें. ८ लांकडांतें. ९ दमलेले, १० भूक व तहान यांनीं.

तूं भक्षिसी चोरुनियां शिदोरी । शिंकीं वृथा दाविसि दीर्घ दोरी ॥ ७३ ॥
जलद[1] गर्जत ये जंव अंबरीं[2] । झळकते अणि वीज न ते बरी ॥
सुभय ते स्थळिं वाटतसे मनीं । फिरुनि येत असों जंव नेमुनी ॥ ७४ ॥
कडकडुनि तयीं तो वर्षला मेघ भारी ॥
तनुवरि मग जो कां रोम[3]राजी उभारी ॥
अशन[4]-वसन[5]-हीनें आननें[6] म्लान दीनें ।
करुनि जंव बसों तों वेष्टिलें त्या नदीनें ॥ ७५ ॥
पहा रवीचा मग अस्त जाला । घडे तयीं व्याकुळता द्विजाला ॥
कांहीं तरी ठाउक कीं सुजाणा । पुसे **सुदाम्या** प्रति **देव** जाणा ॥७६॥
केला कोप सतीवरी तदुपरी धांउनि ये लौकरी ।
पायीं नम्र शिरीं खडे क्षितिवरी प्रेमा अह्मा किंकरीं[7] ॥
हाका मारुनि अंबरीं मुखभरी रे रे **सुदाम्या हरी** ।
तों आह्मां वदनावरी मिठि पडे शीतें अहाहा करी ॥ ७७ ॥
मौनें सन्मुख जातसों श्रमतसों कंपीत कीं होतसों ।
ओझें मस्तकिं घेतसों हळुहळू पाऊल टाकीतसों ।
विप्राला न दिसों उठों अणि वसों हुंकार ही देतसों ।
पश्चाद् भेटतसों पुसे तंव हंसों संतोष मानीतसों ॥ ७८ ॥
तों तो ह्मणे श्रम तुम्हा दिधले सतीनें ।
संपादिला परम दोष अगत्य तीनें ॥
बाळें पहा बहुत हीं असती भुकेलीं ।
कष्टी उगेंचि वनिं धाडुनि फार केलीं ॥ ७९ ॥
वृत्तांत ऐसाच **सुदामया**तें । पुसे **हरी** होंचि पहा तयातें ॥
कांहीं तरी आठवतें जिवीं रे । दिलें न त्वां यासहि सूचवीरे ॥ ८० ॥
तों तो **सुदामा** मनिं खोंचला हो । **कृष्णास** या ग्रास न अर्पिला हो ॥
ह्मणोनियां प्राप्त दरिद्र झालें । अद्यापि संतप्त न तें विझालें ॥ ८१ ॥
कृष्णार्पणाविण कसें फळ प्राप्त होतें ।
केल्या च सर्व हि समर्पण यास हो तें ॥
भक्तीस वश्य अणिखी निज मुक्ति देतो ।
ऐसें मनींच अपुले द्विज कीं वदे तो ॥ ८२ ॥
पश्चात्तापें म्लानता आननाला । आली वाटे त्याचिया त्या मनाला ॥
अंतर्यामीं **कृष्ण** साक्षी तयाचा । जाणे ऐसें नाश-कर्ता भयाचा ॥ ८३ ॥

---

१ मेघ. २ आकाशांत. ३ रोमांच. ४ भक्ष्य. ५ वस्त्र. ६ मुख ७ सेवक.

**श्रीकृष्ण** पोहे मग तो स्वहातें । घेवोनियां तो करितो स्वहा ते ॥
तोषावया चित्त **सुदाम**याचें । धरूनियां प्रेम महा तयाचें ॥ ८४ ॥

जो नित्य तृप्त अनपेक्षित **देव** जाणा ।
रक्षि मनोगत असेंचि हि कां न जाणा ॥
कीं दीनबंधु परि तो न अनाथ-बंधू ।
तोडी अनादि भव-पाश-अघोर-बंधू ॥ ८५ ॥

तों त्या घरोघरिंच वाट पहाति नारी ।
रात्रींच येइल जपोनि हि **पूतनारी** ॥
लक्षोनि मार्ग क्रमिति जंव जागृतीनें ।
तों पाहती ह्मणति कीं द्विज-संगतीनें ॥ ८६ ॥

तों पाहती अययये! ह्मणती अगाई! ।
रानासि जाति जंव [येथ] मिळोनि गाई ॥
तों बोलणें किति असे अजुनी सरेना ।
या ब्राह्मणास हि मनांत कसें स्मरेना ॥ ८७ ॥

याचें असो परि तयास न नीज लागे ।
आश्चर्य वाटत असे मनिं हें मला गे ॥
सर्वांहुनीं **हरिस** आवड या द्विजांची ।
चारी प्रहार परि झोंप सतीस जाची ॥ ८८ ॥

देखोनियां द्विज तयां मग वायकांसीं ।
जाऊं पुसे त्वरित कीं **यदु-नायका**सी ॥
जाऊनि या ह्मणउनी **हरि** बोलिला हो ।
**श्रीकृष्ण**-वंदन विलोकुनि चालिला हो ॥ ८९ ॥

तो बोळवीत **हरि** जात असे पहा हो ।
तों त्या द्विजासि ह्मणताति सभाग्य हा हो ॥
**ब्रह्मादि** इच्छिति तयांस हि संग नाहीं ।
मार्गीं असेंचि मग बोलति अंगना ही ॥ ९० ॥

**द्वारावती**-नगर-लोक मिळोनि सारे ।
"हा ब्राह्मणोत्तम सभाग्य पहा कसारे" ॥
ऐसेचि शब्द उठती सकळां मुखींरे ।
**श्रीकृष्ण** हो म्हणतसे च तसे सुखीरे ॥ ९१ ॥

---

१ भक्षण. २ भयंकर. ३ बंधन. ४ ब्राह्मणाची. ५ स्त्रीस. ६ स्त्रिया.

आतिथ्य तें पूर्ण करोनि सीमा । राहे उभा क्षेत्र धरोनि सीमा ॥
पुन: पुन्हा वंदुनियां द्विजासी । आतां म्हणे काय घरासि जासी ॥९२॥
माझा नमस्कारहि वैहिनीला । सांगा ह्मणे देव तया मुनीला ॥
प्रार्थूनियां वंदन जेंचि केलें । त्या वर्णनीं चित्त असो भुकेलें ॥९३॥
प्रयाण तेथूनि सुदाम-देवें । केलें असें देखुनि वासुदेवें ॥
फिरे समस्तां सहवर्तमानें । पाहे सुरांचींच नभीं विमानें ॥ ९४ ॥
प्रवेशला कीं सदनीं हरी तो । लीला जसे लोक तशी करीतो ॥
त्यानंतरें त्याच सुदामयाचें । जालें कसें आइकिजे तयाचें ॥ ९५ ॥
द्विज मनीं मग होय विचारिता । हलवुनी कर जात असे रिता ॥
किमपि नेदुंनि शीघ्रचि धाडिलें । मज पुढें किति दु:खहि काढिलें ॥९६॥

पोटांत क्रोध असतां हरि काय देतो ।
नाहीं तयासि दिधलें मज केंवि देतो ॥
"नादैत्तमुपतिष्ठति" असे रिति वेद-वाणी ।
ते केंवि होइल कदापि असत्य-वाणी ॥ ९७ ॥
नाहीं तयासि दिधलें चि पहा वदे तो ।
त्याला अशी सर्य असे कधिंचें वदे तो ॥
माझे मनीं कृपणता नसती जरी हो ।
देता मला करुनि पूर्ण कृपा हरी हो ॥ ९८ ॥
स्वभार्येतें पूर्वीं वदत असतां तीस न कळे ।
दरिद्राच्या द्रोहास्तव परम हें चित्त विकळे ॥
पहा काळें कैसें करुनि घडला भ्रंश मतिचा ।
न मानूनी राहे अजि घरिं नये शब्दहि तिचा ॥ ९९ ॥

अप्रार्थितां प्राप्तहि दु:ख होतें । तैसेंचि तेंही सुख कीं अहो तें ॥
असोनिही निश्चय ये रितीचा । प्रसाद हा केवळ त्या सतीचा ॥१००॥
नसे भ्रांक्तनीं तें कधीं देव देना । फुकाचा कधीं शब्द कोणी वदेना ॥
भला कीं हरी सद्य आतिथ्य दावी । उदासीनता सर्वथा तो न दावी ॥१०१॥
मान्यताच धन थोर जयाशी । मेरु पर्वतहि तुच्छ तयासी ॥
ज्यां वरेंचिहि न मागुनि केलें । चित्त मुख्य हरिलागिं भुकेलें ॥१०२॥

मागे हरीस नर तो बरवा न वाटे ।
मी बोलिलों स्वसुखरूप पहा सुवाटे ॥

---

१ भ्रातृपत्नी. २ न देऊन ३ न अदत्तं उपतिष्ठति="जर कांहीं देवाळा दिलें नाहीं तर आपणास कांहीं प्राप्त व्हावयाचें नाहीं." ४ आठवण. ५ स्त्रीचा ६ देवां.

ऐसें मनीं वदत येत असे स्थळासी ।
तों देखिलें नगर रम्य महा विलासी ॥ १०३ ॥

ह्मणे मार्ग मी चूकलों स्वस्थळाचा । कसा भोग कीं पाश हा दुर्बळाचा ॥
पुन्हा **द्वारका** देखिली संभ्रमानें । पहा पाठि हे घेतली कां भ्रमानें ॥१०४॥

आतां **कृष्ण** म्हणेल आणिक घरा आला **सुदामा** खास ।
मागायास मनीं तयासहि गमे देवांचिया शेखरा ॥
मोठा भोग पहा अहा पिडितसे आतां करावें कसें ।
येती लोक तयांसही पुसतसे गांवासमीपीं असें ॥ १०५ ॥

"कोणाची नगरी दिसे महिवरी **द्वारावती**चे परी ।
सज्जे आणिक माडिया तदुपरी विस्तीर्ण ते ऊपरीं ॥
**कृष्णा**नें रचिली नसेल हि पहा किंवा स्वयें दूसरी ।
**इंद्राची अमरावती** मज गमे पाहू न ते कूसरी" ॥ १०६ ॥

तों ते तयास वदती जन लोक सारे ।
"हा मूर्ख केवळ असें पुसतो कसा रे ॥
अद्यापि काय न कळे चि **सुदाम**याची ।
नौ-रत्न-शोभित अशी नगरी जयाची" ॥ १०७ ॥

आश्चर्य मानित असे मग तो मनांत ।
"**कृष्णा**! दरिद्र हरिलें अमुचें जनांत ॥
कोणास ही **हरि** तुझी करणी कळेना ।
माझें मला सुकृत तों तंव ओंकळेना ॥ १०८ ॥

विनापराधी जरि मी म्हणू रे । घडे मनीं दोष किती गणू रे ॥
परंतु तूं दीन-दयाळु साचा । न आंवरे पूर कृपा-रसाचा ॥ १०९॥
ज्यां दीधले मुष्टि भरूनि पोहे । तुझा कृपाब्धी नर कोण पोहे ॥
उत्पत्तिचें स्थान **रमापती**चें । केलें तुवां आपुलिया रितीचें" ॥११०॥
ऐसा पहा प्रेम-भरें करूनी । सुखाश्रु-बिंदू वदना वरूनी ॥
ते चालती नावरती तयाला । सभोंवते हांसति कीं जयाला ॥ १११ ॥

नेणोनि हांसति तया जन-वृंद सारे ।
"वेडा पहा द्विज अहा रडतो कसा रे ॥
ऐश्वर्य येउनि हि कां सुख-लेश नाहीं" ।
आश्चर्य वाटत असे सकळां जनां हो ॥ ११२ ॥

मराठी ग्रंथ
काव्य

---

१ श्वास. २ कौशल्य. ३ पुण्य. ४ कळेना ५ दया सागर. ६ समूह.

वाद्यें अश्व गजादियानें सह ते सन्मूख येती प्रजा ॥
**श्रीकृष्णें** करुणार्णवें निज दया केली असे कीं द्विजा ॥
गाती भाट अचाट घोष करिती थाटीं पुढें चालती ।
छत्रें चामर-युक्त मंडित दिसे सर्वत्र ही बोलती ॥ ११३ ॥

जो पावला तो गजरें करूनी । गृहासि दारिद्र्य पहा हरूनी ॥
सालंकृता स्त्रीसह लेंकरांसी । दृष्टीस देखे धन-धान्य-राशी ॥ ११४॥

जें पाहिजे तें परिपूर्ण देखे । दारिद्र्य स्वप्नांत हि जो न देखे ॥
स्त्री पाहतो तों [जणु] उर्वशी हो । तात्काळ जाली म्हणतो कशी हो ॥ ११५॥

जो षड्गुणैश्वर्य दया तयाची । दारिद्र्य-चिंता च **सुदाम**याची ॥
**हरी** हरी ये रितिनें सुकानें । सांगीत भूपा प्रति कौतुकानें ॥ ११६॥

सम्राज्य **वामन** तयास हि **वामना**नें ।
केली कृपा अनुभवोनि हि या मनानें ॥
ऐश्वर्य सा-सहित देह-पुरींत ठेवी ।
ज्याची जनास न कळे अनुभूति-ठेवी ॥ ११७ ॥

**श्री सद्गुरूच्या** पद-सारसा रे । अर्पूनियां काव्य-महा-रसारे ॥
सांम्राज्य जाला कृतकृत्य लोकीं । तेणें स्वसौख्यास हि पावलों कीं ॥ ११८

---

१ वाहन. २ अनुभव. ३ कमळातें.

**समाप्त.**

# योगवासिष्ठ.

स्मरोनी मनीं श्रीसरोजेक्षणातें । जितां मुक्त त्यांच्या वदों लक्षणांतें ॥
पुसे राम बोले वसिष्ठ स्ववाचा । प्रसंगांत त्या प्रश्न हा राघवाचा ॥१॥

" असा देहीं मुक्त स्थिर चर जगीं निर्विषयता ।
सदा पाहे त्याची कशि अजि अपूर्वातिशयता ॥
न पूर्वी साधेसा अतिशय तुम्हां जो समजला ।
तयाचा तो सांगा गुरुजि ! निज शिष्यास मजला ॥ २ ॥

विना ज्ञान ही होति सिद्धि प्रसिद्धा । अपूर्वा न त्या ज्ञानियां ज्ञानसिद्धा ॥
स्वबोधें च जे सिद्धता ते वदावी । वसिष्ठा प्रती राम हा भाव दावी." ॥३॥
असा प्रश्न ऐकोनियां राघवाचा । वदे उत्तर श्रीवसिष्ठ स्ववाचा ॥
वदों भाव त्याचा महाराष्ट्र-वाणी । जरी शब्द थोडे न अर्थास वाणी ॥४॥

गुरू बोले ज्ञानी स्थिर निज सुखीं गा रघुपती ! ।
न मानी तो कोणी अतिशय जयां अज्ञ जपती ॥
निजात्मत्वीं तृप्त प्रिय पण असे हे त्रिजगती ।
दुजे ठायीं वाटे तरि च विसरे ते निज गती ॥ ५ ॥

अतिशय रघुराजा ! त्यास वाटे न कांहीं ।
न गणि विभव नाहीं जें विरिंच्यादिकां[1] ही ॥
स्वरस पिउनि धाली बुद्धि धीरा जयाची ।
निज वसति निजांगीं त्या महाराजयाची ॥ ६ ॥

आकाश-मार्ग-गमनादि जगीं प्रसिद्धा ।
सिद्धी उदंड दिसती तप-मंत्र सिद्धा ॥
ज्ञानोदयाहुनि हि साधति पूर्व काळीं ।
कैंचें अपूर्वपण त्यांस अशा सुकाळीं ॥ ७ ॥

मंत्रादि सिद्धि हि तशा अणिमादि[2]-सिद्धी ।
साधूनि यत्न निकरें करिती प्रसिद्धी ॥
सिद्धी अशा इतरही जन अज्ञ साधूं ।
पाहे न त्यास निज[3]-बोध-निमग्न साधू ॥ ८ ॥

मनीं जड प्रीतिस वास नाहीं । न लिंग-देहंकृत वासनाही ॥
सर्वत्र सत्ताच समान साची । देखोनि कुंठे गति मानसाची ॥ ९ ॥

---

१ ब्रह्मादिकांस २ सूक्ष्मतादिक. ३ आत्मज्ञान.

वसे सुधा-सागर अंतरंगीं । आस्था तया काय मृषा तरंगीं ॥
सर्वत्र आस्था त्यजणें विशेषें । विशेष तो एक महाविशेषें ॥ १० ॥
विशेषांत ज्या मूढ होतील बुद्धी । म्हणावें विशेषें तयां मूढ-बुद्धी ॥
नव्हे ज्ञानियांचा तसा हा विशेष । जयामाजि ते तुच्छ होती विशेष ॥ ११॥
नव्हे मूढ तो मूढ बुद्धी समान । दुजा अर्थ हा केवळ त्यास मान ॥
असा भाव कीं त्यास नाहीं अविद्या । गळे वासना विंबतां आत्म-विद्या ॥१२॥

अशी आस्था कांहीं अजि जरि मनामाजि न वसे ।
कसें प्रारब्धाचें विविध फळ भोक्तृत्व गवसे ॥
अशा ही संदेहा धरूनि विधिचा नंदन मुनी ।
वदे श्रीरामातें करुं विशद दोघांस नमुनी ॥ १३ ॥

जितां मुक्त जो त्याचिया लक्षणातें । वदे श्री वसिष्ठ सरोजेक्षणातें ॥
असे कीं दिसंदीस ही वेगळाले । स्व-अज्ञान-संस्कार ज्यांचे गळाले ॥१४॥
अलिंग जें निर्गुण तत्स्वरूप । स्वलिंग जें आपण तेंचि रूप ॥
त्याचें अगा आइक चिन्ह रामा । गोष्टी जयाच्या ह्रदयाभिरामा ॥१५॥

संशांति संसृति चिर भ्रम तो असा रे ! ।
कीं जो भव-भ्रम अनादि अशांत सारे ॥
ते पावले परम शांति अपूर्व रामा ! ।
गोष्टी तयांत स्वसुखें ह्रदया भिरामा ॥ १६ ॥

कुलालाचें राहे भ्रमक तरि चक्र भ्रमतसे ।
अविद्या गेल्या ही भ्रम उरति कामादिक तसे ॥
परी ब्रह्मात्मत्व स्मरण-बळ त्याचें घडिघडि ।
उणें पाडी मुक्त-स्थिति पुससि ते हे चि उघडी ॥ १७ ॥

जरी राहे वारा तरु रघुविरा हालत असे ।
अविद्या गेल्या ही भ्रम उरति कामादिक तसे ॥
परंतु क्षीणत्वें चलन पहिल्याहूनि दुसरें ।
उणें पाडी ऐसें बळ धरिति जे आत्मविसरें ॥ १८ ॥

नव्हे वेग क्षीण क्षितिरुहें यथापूर्व चळतो ।
असे तेथें वारा जन ह्मणति तर्क प्रबळ तो ॥
वदे ब्रम्ह-ज्ञान क्षय अवगुणाचे न दिसती ।
अविद्येची तेथें अधिक-बळ-संयुक्त वसती ॥ १९ ॥

---

१ लाटें. २ लाट. ३ अज्ञान. ४ आत्मज्ञान ५ स्पष्ट. ६ मनोहर. ७ संसार ८ कुंभाराचें. ९ वृक्ष.

जसा आत्म-ज्ञानें क्षय अवगुणांचा दिसतसे ।
अशक्तत्वें रोगें कृश गमति कामादिक तसे ॥
परि **श्रीरामा** ! त्या अकुशल कुशत्वीं कृपणता ।
स्वबोधें क्षीणत्व प्रतिदिवस तेथें निपुणता ॥ २० ॥
अगा आत्म-ज्ञानें उरति जनकादीक सगळे ।
परंतु प्रारब्ध-द्रुम[1]-फळ विनाभोग न गळे ॥
म्हणूनि **श्रीरामा** ! चरम[2] तनु हे जो जित असे ।
कृशत्वातें कामादिक अनुदिनीं पावति असे ॥ २१ ॥
कुशलमति नरांतें बोधितां ये रितीनें ।
धरिति मनिं सुयत्नें बोलिलें जें यतीनें ॥
गुरु-पद-भजना हीहूनि कांहीं दिसेना ।
तृण सम विभवातें मानिती भूत-सेना ॥ २२ ॥
ज्ञानाहुनी थोर दिसे न कांहीं । समान जे संत **शुकादिकां** ही ॥
ऐशा सुखा देखुनि **रामराया** जगद्गुरू **वामन** दे वराया ॥ २३ ॥

॥ **समाप्त** ॥

## पार्थभाग्य.

कुचयुगुलिं **रमेच्या** जो रतीं हस्त नाचे ।
परिहरि नख-चंद्रीं कामदाह स्तनाचे ॥
हय निववि **हरी** तो त्या करें स्यंदनाचे ।
जळ पिति समरीं त्या **पांडुच्या** नंदनाचे ॥ १ ॥
**श्री-रमा**-कुच-युगीं कर ज्याचे । बाळ चंद्र करिती कैरजांचे ॥
त्या करें करुनि **अर्जुन**-वाजी । खाजवी करुनि नित्य नवाजी ॥२॥
शास्ता **हरी** जो जैलजासनाचा । तो **अर्जुनाच्या** हयशासनाचा ॥
चाबूक माथां च तुरा करीतो । धूतां हयां चौं चैतुरां करीं तो ॥ ३ ॥
स्तति दंत रतीं कैमळाधरीं । तुरग-रश्मि तया दशनीं धरी ॥
चहुं हयांसि धुतां स्व चहूं करीं । परम कौतुक हें समरीं करी ॥ ४ ॥
जो जीव योजी जड जंगमातें । जो निर्मितो चिज्जड-संगमातें ॥
अर्पी **रमा** ज्यास सुरंग माळा । तो जुंपितो **पार्थ**-तुरंगमाला ॥५॥

---

१ वृक्ष. २ शेवटचा. । १ रथाचे. २ अर्जुनाचे. ३ नखांचे. ४ स्तुतें. ५ ब्रह्मदेवाचा. ६ अश्वशिक्षेचा. ७ चोहों. ८ लक्ष्मीच्या अधरोष्ठावर. ९ दोरे १० दांतांनीं.

योजितो हय-गळां गळ-सूत्रें । जो **रमे**मि वरि मंगळ-सूत्रें ॥
त्या करें करुनि **माधव** दोरे । **पार्थ**-भाग्य किति काय वदों रे ॥६॥
**रमे**च्या रतीं स्वेद शिंपूनि पाणी । जळीं क्रीडती तो **हरी** चक्र-पाणी ॥
हयांचे मुखीं लाळ हाणोनि वारी । रणीं सारथी **अर्जुना**चा निवारी ॥७॥
तपें **विधीला** उपदेश हो हो । परंतु जो **पार्थ**-हयांस हो! हो! ॥
म्हणे मुखीं त्या **मधुकैटभारी** । आश्चर्य हें मानिति **देव** भारी ॥ ८ ॥
शिरीं **हरी**चा पद-रेणु ज्याच्या । न संपदा तो गणि **अब्जजा**च्या ॥
देतां धुरीं अश्व-खुरीं उडावी । ते धूलि माथांवरि हो पडावी ॥ ९ ॥
धरी हातें दोरे कर ललित चाबूक दस रे ।
मुखें होरे! होरे! म्हणुनि हय ते नाचवि बरे ॥
पहारे पाहारे म्हणति जिकडे तो रथ फिरे ।
न कोणी सामोरे त्वरित मनिं **दुर्योधन** झुरे ॥ १० ॥

॥ **समाप्त** ॥

## दशअवतार.

**मीन** मी **हरि** नमीन मनानें । जो सुरीं विनविला नमनानें ॥
**वेद** घेउनि जळींच पळाला । **शंख** दैत्य वधि त्या चपळाला ॥ १ ॥
**कांसवें** धरुनि **मंदर** साचा । मंथिला जळधि मंद रसाचा ॥
**देव** हो अमृत-पान करा या । दानवांवरि कृपा न कराया ॥ २ ॥
जो हुताशन खरा हवनाचा । तोचि होउनि **वराह** वनाचा ॥
उद्धरी क्षिति रसातळ-गामी । तोचि हो तुरगसा चल गामी ॥ ३ ॥
लांकडामधुनि देव निघाला । घातला दितिसुतावरि घाला ॥
दुर्जं **नारसिंह** [ ? ] तीं दमनाचीं । जे न राखतील साधुमनाची ॥४॥
याचिला **बळि** स्वभू-पद-मानें । स्थापिला बळि सभूप दमानें ॥
थोर लाभ मर्ले आचरणाचा । लाभ जो **हरि**चिया चरणांचा ॥ ५ ॥
जें प्रयुक्ततम **भार्गव** हातें । तें रिपूवरिच शस्त्र वहातें ॥
त्या भयें युवति बाळक रानीं । धांवती धरुनि वाले करांनीं ॥ ६ ॥
मेळवोनि रिस वानर जाती । त्यांत दोघजणही नर जाती ॥
राक्षसाधिप वधूनि करानें । आणिली निज वधू निकरानें ॥ ७ ॥

१ ब्रह्मदेवाळा. २ धूळि ३ ब्रम्हदेवाच्या. ४ सुंदर. । १ मत्स्य. २ दैत्यावर. ३ मापानें. ४ यज्ञ. ५ केश.

देवकी उदरिंचा सुत आठवा । तो तुम्ही पळ पळांतरिं आठवा ॥
[१]आगमानिगम जो ऋषि देवां । लाधला सरे[२]सिजानन देवा ॥ ८ ॥
देखतां बहुत चोजे[३] लपाला । सेविताति मुनि हो जळ पाला ॥
बुद्धिगोचर तरी गवसेना । एक ठाव तरि योग वसेना ॥ ९ ॥
काळ जो **कलियुगीं** यवनांचा । रक्षिता सकळही भुवनांचा ॥
होउनी विविध या अवतारीं । कीर्तनें करुनि **वामन** तारी ॥ १० ॥

॥ **समाप्त** ॥

# अपरोक्षानुभूतीची

## मराठी समश्लोकी टीका (भाषांतर).

वंदूनि **श्रीमुकुंदातें** । अ[१]परोक्षानुभूतिची ॥
सम-श्लोकी करितसें । **टीका** मूळाचि सारिखी ॥ १ ॥
**श्रीराम** परमानंद । **श्रीगुरु श्रीश** जो तया ॥
वंदितों सर्व लोकांच्या । कारणा व्यापकास मी ॥ २ ॥
अपरोक्षानुभूतीतें । मोक्ष-सिध्यर्थ बोलतों ॥
वारंवारं पहावी जे । संतीं यत्नें अशीच हे ॥ ३ ॥
**स्ववर्णाश्रम-धर्मातें** । अर्पितां हरि तोषतो ॥
त्या तपें साधती चारी । वैराग्यादिक साधनें ॥ ४ ॥
**ब्रह्मादिक** पदें तुच्छें । दुःख-दोषानुदर्शनें ॥
वाटती काक-विष्टाशीं । तेंचि **वैराग्य** निर्मळ ॥ ५ ॥
आत्म-स्वरूपची नित्य । **दृश्य** सर्व अनित्य हें ॥
जो निश्चय बरा ऐसा । नित्यानित्य **विवेक** तो ॥ ६ ॥
यत्नें जो वासना-त्याग । सदा तो **शम** बोलिजे ॥
बाह्य-वृत्ती इंद्रियांच्या । कोंडणें **दम** बोलिजे ॥ ७ ॥
विषयापासूनि मन । परतावें **निवृत्ति** ते ॥
सोसणें सर्व दुःखांचें । **तितिक्षा** बोलिजे तसें ॥ ८ ॥
**श्रद्धा** ते कीं मनीं भक्ति । श्रुतीची **गुरु**-उक्तिची ॥
एकाग्र चित्त लक्षावें । तें **समाधान** बोलिलें ॥ ९ ॥
संसार-बंधा-पासूनी । सुटें देवा कसा कधीं ॥

---

१ वेदशास्त्र. २ कमळमुख. ३ नवल. । १ साक्षादनुभव.

दृढ बुद्धि अशी तीव्र । मुमुक्षा[१] तोचि बोलिली ॥१०॥
या उक्त साधनीं युक्त । होउनीयां विचार हा ॥
करावा ज्ञान-सिद्ध्यर्थ । ज्यास कल्याण पाहिजे ॥१०॥
विचारा वांचुनि ज्ञान । घडेना अन्य साधनीं ॥
पदार्थाचें भान जैसें । प्रकाशा वांचुनी नव्हे ॥ ११ ॥
मी कोण हें कसें झालें । कर्ता कवण या जगा ॥
याचें उपादान[२] काय । हें जाणावें विचार हा ॥ १२ ॥
न मी देव न मी भूतें । नव्हें मी सर्व इंद्रियें ॥
एतद्विलक्षण[३] असें । कोणी एक विचार हा ॥ १३ ॥
अज्ञानें रचलें सर्व । ज्ञानें हें लय पावलें ॥
कर्ता विविध संकल्प । मिथ्या दोन्ही विचार हा ॥१४॥
या दोंचें हें उपादान । एक सूक्ष्म सदव्यय[४] ॥
ते घटीं मृत्तिका जेवी । शास्त्र-दृष्टी विचार हा ॥१५॥
स्वयें सन्मात्रही शुद्ध । ज्ञाता साक्षी सदव्यय ॥
तोही मीच न संदेह । कीं मी सर्व विचार हा ॥१६॥
आत्मा निष्कळ हा एक । बहुतीं देह उद्भवे ॥
मानिती ऐक्य त्या दोतें । कोण अज्ञान याहुनी ॥१७॥
आत्मा देहीं देह चाळी । त्यानें बाह्य चळे तनू ॥
त्या दोंस पाहती ऐक्यें । काय अज्ञान याहुनी ॥१८॥
आत्मा ज्ञान स्वयें शुद्ध । अशुचो मांस देह हा ॥
पहाती ऐक्य त्या दोतें । काय अज्ञान याहुनी ॥१९॥
निर्मळ स्वप्रकाशात्मा । देह तामस बोलिला ॥
त्या दोतें पाहती ऐक्यें । काय अज्ञान याहुनी ॥ २० ॥
आत्मत्व नित्य सद्रूप । असद्देह अनित्य हा ॥
त्या दोतें पाहती ऐक्यें । कोण अज्ञान याहुनी ॥ २१ ॥
सर्वत्र स्वप्रकाशात्मा । भासणें सर्व ज्यास्तव ॥
दीपादि-भा एक देशीं । तदन्यत्र निशांधता ॥ २२ ॥
देह हा मी ह्मणवुनी । असतो मूढ मानुनी ॥
घट माझा तसा माझा । देह ऐसें कळोनिही ॥ २३ ॥
आत्मा च मी शांत सम । सच्चिदानंद-लक्षण ॥

---

१ मोक्षेच्छा. २ कारण; जसें घटाचें मृत्तिका व पटाचें तंतु. ३ याहून भिन्न. ४ सत्य व अविनाशी.

मी नव्हे हा मृषा देह । ज्ञानी हें ज्ञान बोलती ॥ २४ ॥
निर्विकार निराकार । मी निर्दोष सदव्यय ॥
नव्हें मी हा मृषा देह । ज्ञानी हें ज्ञान जाणती ॥ २५ ॥
मी निर्मळ निराभास । कल्पनाभास व्यापक ॥
नव्हें मी देह हा मिथ्या । ज्ञानी हें ज्ञान पाहती ॥ २६ ॥
नव्हे अनित्य मी नित्य । अगुणाच्युत अक्रिय ॥
नव्हे हा मी मृषा देह । ज्ञानी हें तत्त्व जाणती ॥ २७ ॥
अनंत शुद्ध अचल । अजरामर निर्मळ ॥
नव्हें मी हा मृषा देह । ज्ञानी हें तत्त्व जाणती ॥ २८ ॥
ह्मणे देहात्म-वादी कीं । चांगला देह टाकुनी ॥
कैंचा आत्मा शून्य तो मी । मूर्खा तूं काय मानिसी ॥ २९ ॥
ह्मणावें त्यास कीं मूर्खा । श्रुति-युक्ति-करूनियां ॥
एक देहातीत[1] आत्मा । जो अतर्क्य तुह्मां अशा ॥ ३० ॥
मी द्रष्टा[2] देह हा दृश्य[3] । देह माझा ह्मणूनियां ॥
जो प्रसिद्ध असे सिद्ध । देह आत्मा घडे कसा ॥ ३१ ॥
विकार-हीन मी आत्मा । विकारी देह हा सदा ॥
साक्षात्प्रत्यय हा आतां । देह आत्मा घडे कसा ॥ ३२ ॥
'यस्मात्परं' हें श्रुतिनें । बोलिलें आत्म-लक्षण ॥
वाखाणिलें सुजाणीं तो । आत्मा देह घडे कसा ॥ ३३ ॥
ह्मणे 'पुरुष एवेदं । सर्व' पुरुष-सूक्त ही ॥
श्रुति ऐसें च वदतां । देह आत्मा घडे कसा ॥ ३४ ॥
ह्मणे 'असंग पुरुष' । बृहदारण्यकीं श्रुती ॥
अनंत मळ ज्याला तो । देह आत्मा घडे कसा ॥ ३५ ॥
तेथें चि बोलिला आत्मा । स्वयं ज्योति ह्मणोनियां ॥
पर-प्रकाश जड तो । देह आत्मा घडे कसा ॥ ३६ ॥
बोलिला कर्म कांडीं ही । आत्मा देहें-विलक्षण[4] ॥
नित्य कर्म-फळें भोगी । देह नैश्वर[5] मेलिया ॥ ३७ ॥
[6]लिंग-देहहि ऐसाची । विकारी दृश्य चंचल ॥
अव्यापक असद्रूप । तोहि आत्मा घडे कसा ॥ ३८ ॥
देह-द्वयातीत ऐसा । आत्मा पुरुष ईश्वर ॥

---

१ देहरहित. २ पाहणारा. ३ पहाण्याचा विषय. ४ देहाहून भिन्न. ५ नाशवंत ६ सूक्ष्मदेह.

सर्वात्मा सर्व जो तो मी । सर्वातीत सदव्यय ॥ ३९ ॥
परि देहात्म-भागें या । प्रपंचाचीच सत्यता ॥
हें तों तार्किकही[1] बोले । पुरुषार्थ न यांतही ॥ ४० ॥
रज्जू[2]-सर्पैक्य लटिकें । मिथ्या भेदहि यास्तव ॥
वारूनि देहात्म-ऐक्य । आतां भेदहि वारितों ॥ ४१ ॥
चैतन्य एक नानात्वीं । त्याचा भेद घडेचि ना ॥
जीवित्वहि तसें मिथ्या । दोरीं सर्प भ्रमें जसा ॥ ४२ ॥
नेणतां तत्क्षणीं रज्जू । वसे सर्पी यथास्थित ॥
विश्वाकारीं वसे तैसें । चैतन्य न कळे तया ॥ ४३ ॥
प्रपंचाचें उपादान । विना ब्रह्म दिसेच ना ॥
कार्य ब्रह्मचि कीं तेव्हां । दुजें कांहीं न बोलवे ॥ ४४ ॥
व्याप्य व्यापक हें मिथ्या । सर्व आत्मा अशा श्रुती ॥
तत्व ऐसें समजतां । जड-भेदा नुरे उरी ॥ ४५ ॥
नेह नानास्ति ह्मणुनी । स्व-मुखें श्रुति बोलतां ॥
अद्वैत कारणीं कार्य । त्याशीं भाग घडे कसा ॥ ४६ ॥
दोषहि श्रुति बोले कीं । मृत्यु पासूनि तो मरे ॥
जडीं नानात्व जो पाहे । मायेनें वंचिला नर ॥ ४७ ॥
**परमात्मा परब्रह्म** । त्या पासोनि जडोद्भव ॥
**ब्रह्मचि** यालागीं भूतें । जाणावें युक्तिनें असे ॥ ४८ ॥
सर्व नामें सर्व रूपें । विविधें विविधा क्रिया ॥
**ब्रह्म** तें धरितें तेंची । सर्व **ब्रह्म** वदे श्रुती ॥ ४९ ॥
हेमा[3] पासूनि जे होती । नगें[4] ते हेम शाश्वत ॥
**ब्रह्मा** पासूनि होतें तें । **ब्रह्म** जें **ब्रम्ह** शाश्वत ॥ ५० ॥
स्वल्पही भेद धरितां । जीव **ईश्वर** यां मधें ॥
भय तो पावतो मूढ । ऐसेंहि श्रुति बोलते ॥ ५१ ॥
रज्जू न कळतां सर्प । आत्मा नेणे तया जड ॥
दिसे तो पाहतां आत्मा । अणुही न दिसे दुजें ॥ ५२ ॥
जाणतो सर्व भूतांतें । जो आत्मत्वें करूनियां ॥
त्याला नसे शोक मोह । सर्व एक म्हणूनियां ॥ ५३ ॥
आत्मा च आपला **ब्रह्म** । तो सर्वात्म-पणें असे ॥
निर्धारिलें हे श्रुतिनें । **बृहदारण्यका** मधें ॥ ५४ ॥

---

१ तर्कशास्त्रज्ञ. २ दोरी. ३ सोनें. ४ दागिने.

विश्व आलें अनुभवा । व्यवहारें जरी खरें ॥
तरी मिथ्या जसें स्वप्न । न दिसे उत्तर[1] क्षणीं ॥ ५५ ॥
स्वप्नांत जागृति[2] नसे । नसे स्वप्न हि जागरीं ॥
सुषुप्तांत[3] न हे[4] दोनी । न त्या दोंत सुषुप्ति हो ॥ ५६ ॥
तिन्हि मिथ्या अशीं होतीं । जीं गुण-त्रय-निर्मितें ॥
यांचा द्रष्टा गुणातीत । चिदात्मा त्रिगुणीं सम ॥ ५७ ॥
माती मधें घट-भ्रांती । शुक्तींत[5] रजत[6]-भ्रम ॥
ब्रह्मीं जीवित्व हें ऐसें । पाहों जातां च नाशतें ॥ ५८ ॥
मातींत नाम चि घट । हेमीं नाम चि कुंडल ॥
शब्द चि शुक्तींत रुपें । ब्रह्मीं जीवित्व ये रिती ॥ ५९ ॥
आकाशीं नीलिमा जैशी किरणीं जल[7] जे रिती ॥
स्थाणुत्वीं[8] पुरुषाकार । चित्स्वरूपीं तसें जग ॥ ६० ॥
बागुल[9] लटिका जैसा । गंधर्वांचें मृषा पुर ॥
द्विचंद्रत्व नभीं जैसें । सद्गुणीं जग हें तसें ॥ ६१ ॥
तरंगांच्या आकातिनें ॥ पाणी च स्फुरते जसें॥
पात्र रूपें स्फुरे तांबें । ब्रह्मांडीं आत्मता तशी ॥ ६२ ॥
घट-नामें जशी पृथ्वी । पट-नामें चि तंतु ही ॥
जग-नामें तसा आत्मा । असे आत्मा नसे जग ॥ ६३ ॥
ब्रह्म प्रकाशे चि ज्ञानें । वर्तती सर्व ही जरी ॥
अज्ञानें न कळे मती । देखोनी घट मानिती ॥ ६४ ॥
कार्य-कारणता ऐक्य । घट-मातीस जे रिती ॥
प्रपंच ब्रह्म दोहींस । श्रुतिनें युक्तिनें तसें ॥ ६५ ॥
पाहतां घट दृष्टीनें । बळें माती च दीसते ॥
प्रपंच पाहतां ब्रह्म । चित्प्रकाश दिसे बळें ॥ ६६ ॥
सदा शुद्ध निराकार । सदा साकार हा दिसे ॥
सुज्ञातें सर्वदा दोर । अज्ञातें सर्प सर्वदा ॥ ६७ ॥
मृन्मात्र चि जसा कुंभ । तैसा चिन्मात्र देह हा ॥
आत्मा अनात्मा हा भेद । व्यर्थ ची करिती बुध[10] ॥ ६८ ॥
सर्प-रूपें जसा रज्जू । रूपें म्हणुनि शुक्तिका ॥
मानिजे या रूपीं मूढीं । आत्मा हा देह मानिला ॥ ६९ ॥

---

१ पुढील. २ जाणें असणें, ३ झोंप. ४ स्वप्न व जागर. ५ शिंप. ६ रुपें. ७ मृगजळ. ८ खुंटा. ९ बागुल बावा. १० काट.

घटत्वें मानिजे पृथ्वी । पटत्वें तंतु मानिजे ॥
मानिली ये रीती मूढीं । देह-रूपें चिदात्मता ॥ ७० ॥
कुंडलत्वें जसें सोनें । तरंगत्वे जसें जळ ॥
मानिजे ये रिती मूढीं । आत्मा देह चि मानिला ॥ ७१ ॥
मानिजे स्थाणु पुरुष । उष्णातें मानिजे जल ॥
शरीराकृति हे मूढीं । चिदात्मत्वें चि मानिली ॥ ७२ ॥
गृहत्वें मानिलीं काष्ठें । खड्गत्वें लोह मानिलें ॥
नेणोनि आत्मा मूढांनीं । देहाकारें चि मानिला ॥ ७३ ॥
वृक्षाचें विपरीतत्व ॥ कोणा एका जळें जसें ॥
अज्ञानें आत्मया मध्यें । देह मूढा दिसे असा ॥ ७४ ॥
नावेंत नाव-चांचल्यें । सर्व चंचल दीसतें ॥
आत्मा अकर्त्ता तो कर्ता । अज्ञाने देहसा दिसे ॥ ७५ ॥
पींवळेंसें दिसे शुभ्र । नेत्र-रोगें करूनियां ॥
मूढ-दृष्टी तसा आत्मा । देह-रूपें चि भासतो ॥ ७६ ॥
भोंवडी असतां नेत्रीं । सर्व ही भ्रमतें दिसे ॥
मूढ-बुद्धी तसा आत्मा । कर्ता देह चि भासतो ॥ ७७ ॥
भोंवंडीतां कोलितातें । वाटोळा सूर्यसा दिसे ॥
मूढ दृष्टी तसा आत्मा । देह-रूपें चि भासतो ॥ ७८ ॥
तें दिसे स्थूळ जें सूक्ष्म । उप-नेत्रें करूनियां ॥
मूढ दृष्टी तसा आत्मा । देह-रूपें चि भासतो ॥ ७९ ॥
पदार्थ मोठ-मोठे ही । दुरूनी सूक्ष्म दीसती ॥
मूढ-दृष्टी तसा आत्मा । देह-रूपें चि भासतो ॥ ८० ॥
काच-भूमी दिसे पाणी । काचा-सम दिसे जळ ॥
मूढ बुद्धी तसा आत्मा । देह रूपें चि भासतो ॥ ८१ ॥
रत्ना सम दिसे अग्नि । रत्न ही अग्निसें दिसे ॥
मूढ-बुद्धी तसा आत्मा । देह-रूपें चि भासतो ॥ ८२ ॥
न जाणतां पूर्व दिशा । वाटे पश्चिम ज्या रिती ॥
मूढ-बुद्धी तसा आत्मा । नेणतां देह भासतो ॥ ८३ ॥
पूर्वेस धांवतां मेघ । चंद्र ही धांवतो तसा ॥
वाटे तैसा मूढ-दृष्टी । देह आत्मा च वाटतो ॥ ८४ ॥
जळीं चळे जसा चंद्र । चंचळत्वें जळाचिया ॥
मूढ-दृष्टी तसा आत्मा । देह चंचळ वाटतो ॥ ८५ ॥

ऐसा आत्मा न कळतां । शरीराध्यास[1] होतसे ॥
आत्मयांत चि तो लीनें[2] । होतो आत्मा कळे जयीं ॥ ८६ ॥
आत्मत्वें सर्व जाणावें । विश्व स्थावर जंगम ॥
नसतां सर्व ही भावें[3] । देहातें आत्मता कशी ॥ ८७ ॥
जाणोनि आत्मा कंठावा । काळ आत्मानुभूतिनें ॥
भोगें प्रारब्ध सारावें । चिंता कांहीं करूं नये ॥ ८८ ॥
झाला जरी आत्म-बोध । न प्रारब्ध तरी सुटे ॥
श्रुति ऐसें बोलताहे । तें ही आतां निषेधितों ॥ ८९ ॥
ब्रह्मात्म तत्त्व कळतां । भोग त्या आत्मया नसे ॥
तेथें देहादि मिथ्यत्व । जागरीं स्वप्न जे रिती ॥ ९० ॥
जें जन्मांतरिंचें कर्म । तेंचि प्रारब्ध बोलिजे ॥
जन्मांतर अभावें तें । विबात्म पुरुषा नसे ॥ ९१ ॥
स्वप्न-देह जसा मिथ्या । तसा हा देह जो सुखी ॥
तेथें कैंचें जन्म-कर्म । ब्रह्मत्वीं भोग ही नसे ॥ ९२ ॥
उपादान प्रपंचाचें । पाहे माती घटीं जशी ॥
अज्ञान जातां वेदांतें । विश्व नाहीं न कर्म ही ॥ ९३ ॥
सोडूनि ज्ञान रज्जूचें । सर्प घेतां[4] जसा भ्रमें ॥
तैसें असत्यांत सत्य । नेणतां जग पाहणें ॥ ९४ ॥
जाणतां रज्जु-रूपातें । सर्प नाहीं च जे रिती ॥
अधिष्ठान कळे तेव्हां । प्रपंच न असे पग ॥ ९५ ॥
देह प्रपंच ची तेव्हां । कोठें प्रारब्ध राहिलें ॥
अज्ञ-दृष्टि दिसे देह । तें प्रारब्ध ह्मणे श्रुती ॥ ९६ ॥
"क्षीयंते चास्य कर्माणि" । साक्षात्कारीं ह्मणे श्रुती ॥
बहुत्वें बोलतां कर्म । प्रारब्ध हि निषेधिलें ॥ ९७ ॥
हें नेणतां वदे अज्ञ । अनर्थ-द्वय तेधवां ॥
हानि वेदांत-शास्त्राची । त्याणें अज्ञान बोलिलें ॥ ९८ ॥
पूर्वोक्त ज्ञान-सिध्द्यर्थ । आंगें सांगेन पंधरा ॥
या प्रकारें सदा कीजे । निदिध्यासन उत्तम ॥ ९९ ॥
नित्याभ्यासाविणें बुद्धि । न पावे सच्चिदात्मता ॥
निदिध्यासें च जिज्ञासु । आत्मत्वीं स्थैर्य पावतो ॥ १०० ॥
**यम नेम** तिजा **त्याग** । **मौन** ही **देश काळ** ही ॥

---

१ मिथ्या आरोप (अध्यास) २ नष्ट ३ पदार्थ ४ समजतो. ५ आधार, उपाधि.

आसनें मुक्तिचा बंध । देह-साम्य स्वदृक्स्थिति ॥ १०१ ॥
प्राणायामांग दशम । प्रत्याहारण धारणा ॥
आत्मज्ञान समाधी हीं । क्रमें अंगें निरूपिलीं ॥ १०२ ॥
सर्व ही ब्रह्म या ज्ञानें । इंद्रियें ब्रह्म दीसती ॥
पुनः पुन्हा हा अभ्यास । तो चि इंद्रिय संयम ॥ १०३ ॥
चैतन्य-हेम पाहावें । जडत्व-नग टाकुनी ॥
पाहाती नियमें ज्ञानी । स्वानंद-प्रद नेम हा ॥ १०४ ॥
प्रपंच-जडता त्याग । आत्मा सर्वत्र पाहतां ॥
पूज्य हा त्याग थोराचा । या त्यागें मोक्ष रोकडा ॥ १०५ ॥
जेथूनि वाचा परते । न पावोन मनासह ॥
जें मौन जाणती योगी । ज्ञानी मौन चि होय तें ॥ १०६ ॥
जेथूनि वाचा परते । तें तों वाचे अगोचर ॥
प्रपंच ही तें चि तेव्हां । वाचा[१] हा ते चि निश्चित ॥ १०७ ॥
सतांतें मौन सहज । बोलण्यांत हि होय तें ॥
वैखरी-मौन मूढांतें । पोटीं शब्द अनावर ॥ १०८ ॥
देश निर्जन तो जेथें । आदि अंतीं नसे जन ॥
ब्रह्म चि मध्यें जन हें । कीं मध्यें जन हेम ची ॥ १०९ ॥
ब्रह्मादि भूतें चळती । निमिषादि हि ज्यास्तव ॥
ब्रह्म चि काळ-शब्दें तें । अखंडानंद अद्वय ॥ ११० ॥
असतां ज्या प्रकारांत । सुखें ब्रह्म स्फुरे सदा ॥
तें चि आसन जाणावें । अन्य तें सुख-नाशन ॥ १११ ॥
जें भूतादि स्वतः सिद्ध । विश्वाधिष्ठान अव्यय[२] ॥
त्या च सिद्धासनीं सिद्धी । सिद्ध ज्ञाते प्रवेशले ॥ ११२ ॥
माया विश्वाश्वत्थ[३]-मूळ । तिचें ही ब्रह्म मूळ जें ॥
तेथें चि तें मूळ-बंध । सर्वदा राज-योगियां ॥ ११३ ॥
लय अंगा तरंगाचा । समीं चित्सागरीं स्फुरे ॥
तें अंग सांग इतर । व्यर्थ जें शुष्क काष्टवत् ॥ ११४ ॥
कारणीं ठेउनी दृष्टी । कार्य ब्रह्म चि पाहणें ॥
तें स्थैर्य दिव्य दृष्टी चें । तुच्छ नासाग्र-लक्षणें ॥ ११५ ॥
द्रष्टा दर्शन ही दृष्टी । मुरे चिद्रूप या स्फुरे ॥
तेथें चि दृष्टि योजावी । काय नासाग्र पाहणें ॥ ११६ ॥

१ वाचा. २ अविनाशी. ३ पिंपळ.

चित्तादि सर्व वृत्तींतें । ब्रह्मात्मत्वें चि पाहणें ॥
निरोधे सर्व वृत्तींचा । तो **प्राणायाम** बोलिजे ॥ ११७॥
प्रत्यग्वृत्ति चिदात्मत्वीं । तो अंतर्मुख **पूरक** ॥
सुटे प्रपंच-जडता । तो **रेचक** हळु हळू ॥ ११८ ॥
वृत्ति-स्थैर्य सदा द्वैतीं । तो प्राण स्थैर्थ **कुंभक** ॥
**प्राणायाम** प्रबुद्धां हा । अज्ञ ते घ्राण चोळिती ॥ ११९ ॥
विषयांत स्फुरे स्वात्मा । चित्स्वरूपीं बुडे मन ॥
**प्रत्याहार** मुमुक्षूनें । शिकावा हा पुनः पुन्हा ॥ १२० ॥
जेथें जेथें जाय मन । स्फुरे ब्रह्म चि त्यास तें ॥
मनाचें धरणें ऐसें । **धारणा** हे चि उत्तम ॥ १२१ ॥
ब्रह्मात्म-भावें सद्वृत्ति । निरालंबपणें स्थिर ॥
**ध्यान**-शद्बें बोलिली ते । परमानंद-दायिनी ॥ १२२ ॥
वृत्ति टाकोनि आकार । ब्रह्माकारपणें मुरे ॥
ते **समाधि** दुजावृत्ति । विस्मृति ब्रह्म लक्षितां ॥ १२३ ॥
आनंद आवृत्ति तें हा । आभ्यासावा पुनः पुनः ॥
योजितां तत्क्षणीं चित्त । जो समाधि-सुखीं बुडे ॥ १२४ ॥
साधनें मग कां सिद्धां । योगि-राजा तयास हें ॥
न वियोगसा स्वरूपाचा । मना वाचेस हीं जयीं ॥ १२५ ॥
समाधि साधितां विघ्नें । बळें येताति साधकां ॥
अनुसंधान तुटणें । भोगेच्छा आणि आळस ॥ १२६ ॥
भय निद्रा कल्पना ही । तेज चांचल्य शून्यता ॥
ब्रह्मत्वें विघ्न-बाहुल्य । त्यजावें हें हळुहळू ॥ १२७ ॥
कल्पितां कल्पना होते । निजतां शून्य होतसे ॥
ब्रह्मीं तें वृत्ति ही ब्रह्म । साधावी पूर्णता तिनें ॥ १२८ ॥
ब्रह्मात्म-वृत्ति ऐशी । सोडिती अति पावनी ॥
जाणोनि ते जिती व्यर्थ । ते मानव पशू सम ॥ १२९
जे जाणतो ते वृत्तीतें । वाढवीते कळोनि ही ॥
ते सत्पुरुष ते धन्य । ते वंद्य भुवन-त्रयीं ॥ १३० ॥
ब्रह्मात्म-स्फूर्ति हे वृत्ति । वाढली पाक पावली ॥
ज्यांची ते पावले ब्रह्म । शद्ब-ज्ञानी च अन्य ते ॥ १३१ ॥
ब्रह्म बोलोनि कुशल । कामीं सद्वृत्ति-वर्जित ॥

---

१ कोंडणें. २ नाक. ३ मोक्षेच्छु. ४ निराधारपणें. ५ जगती. ६ पक्वता.

आत्मज्ञ ते हि अज्ञान । येति जाति पुनः पुन्हा ॥ १३२ ॥
ब्रह्म-स्फुर्ति-विना चित्त । निमिषार्द्ध न ठेविती ॥
ज्ञानी जैसे विरिंचादि । सनकादि शुकादिक ॥ १३३ ॥
कार्य कारणता गेली । नसतां कार्य कारणीं ॥
कार्य मिथ्या नसे तेंव्हां । न कारण हि त्याविणें ॥ १३४ ॥
एवं अनिर्वाच्य शुद्ध । जड वाच्य हि तें स्वयें ॥
पहावें मृद्-घट-न्यायें । कीं कारण चि कार्य हीं ॥ १३५ ॥
अभ्यासितां हा प्रकार । वृत्ति ब्रह्मत्व पावते ॥
वृत्ति हीं ज्ञान हीं बाणे । शुद्ध चित्तास त्या वरी ॥ १३६ ॥
जें कार्य वेगळें तें ची । आधीं कारण पाहणें ॥
अन्वयें व्यतिरेकें तें । कार्यांत मग पाहणें ॥ १३७ ॥
पाहे कारण कार्यांत । अभावें कार्य तें त्यजी ॥
कारणत्व हि तें जातां । शुद्ध जें शेष जे मुनी ॥ १३८ ॥
जें जें निश्चय बुद्धीनें । तीव्र भावील होय तें ॥
भृंगी-कीटक-दृष्टांतें । होतो ज्ञानी स्वयें चि कीं ॥ १३९ ॥
चित्तादि न दिसे आणी । दिसे तें हीं चिदात्मक ॥
निजात्मयातें सर्वस्वें । ध्यावें राहोनि सावध ॥ १४० ॥
पहावें दृश्य हीं ब्रह्म । चिद्रतान्वित बुद्धिनें ॥
दृष्टी कठिण हीं गार । रसनें जळ तें मृदु ॥ १४१ ॥
आंगें हीं पंधरा ज्यांत । बोलिलों राज-योग हा ॥
हट-युक्त तयां ज्यांचे । जळाले न वरे मळ ॥ १४२ ॥
मन पक्व तयां हा च । राज-योग चि सिद्धि दे ॥
गुरु-भक्तां ईश-भक्तां । सर्वां सुलभ शीघ्र हा ॥ १४३ ॥

### उपसंहार.

सम-श्लोकी टिका ऐशी । अपरोक्षानुभूतिची ॥
वामनें अर्पिली पायीं । शेष-शायी गुरूचिया ॥ १ ॥

### समाप्त.

---

१ ब्रह्मदेवादि. २ वर्णन करण्यास अशक्य. ३ पाण्याची गार. ४ जीभ.

## हनुमंत-स्तव.

जो ध्यातसे पवन-पुत्र **रघूत्तमातें**।
तो प्राण मुख्य तरि त्या कपि-सत्तमातें ॥
जे सेविती प्रकट **राघव** त्यास होतो।
चित्तीं स्मरा ह्मणवुनीं **हनुमंत** होतो ॥ १ ॥
वेध **राघव**-विलास-कळांचा। प्राण मुख्य कपि तो सकळांचा ॥
**राम**-भक्ति हृदयीं च निघाली। त्यासि जो स्वमनिं आणुनि घाली ॥२॥
जेथें विलास **रघुनंदन**-गायनाचे।
तेथें समीर-सुत आपण गाय नाचे ॥
जोडूनि अंजलि-पुट स्वशिरावरी तो।
ऐके स्मरोनि **रघुवंश** वरावरी तो ॥ ३ ॥
एक्या उडाणें चि उडे समुद्रा। दे **राघवाची** क्षितिजेस मुद्रा ॥
जो **जानकी** वृत्त **रघूत्तमातें**। सांगे स्मरा त्या कपि-सत्तमातें ॥ ४ ॥
**राघवाविण** रुचे न मनातें। धन्य ज्यासि करितो नमनातें ॥
वायु-पुत्र सुचरित्र चि साचा। **वामनीं** तरिच आदर साचा ॥ ५ ॥

**समाप्त.**

## राम-स्तव.

मुनि-मनें रमती **रघु**-नंदना। तुज मधें दश-कंधर-सूदना ! ॥
ह्मणुनि निर्गुण **जानकि-नायका**। ह्मणति **राम** तुतें गति-दायका ॥ १
करुनि दिव्य अलोलिक सुव्रतें। रमविशी मन तूं सगुण व्रतें ॥
सगुण संत असे रिति **राम** तूं। सुजन-हृत्कमळीं अभिराम तूं ॥ २ ॥
**सूर्य**-वंश-अमृतांबुधि-सोमा। **रामचंद्र** म्हणती तुज **रामा** ! ॥
पाप ताप हरि नाम जिवाचे। दाह शांत करणार **शिवाचे** ॥ ३ ॥
**चंद्र** आणि धरिली शिरिं **गंगा**। जाय ना तरि विषानळ भंगा ॥
**राम** नाम जपतां मग वाचे। दाह शांत करणार **शिवाचे** ॥ ४ ॥
**राम** हृत्कमळिं आतळवेना। **राम** नाम वदनीं पळवेना ॥

१ मारुति. २ वायुपुत्र मारुति. ३ सीतेला. ४ आंगठी. ५ दशमुख रावण याच्या हनन कर्त्या. ६ अपूर्व. ७ सूर्यवंशरूपी सागरापासून उत्पन्न झालेल्या चंद्रा. ८ विषाग्नी.

काळ्कूट मग **शंकर**-कंठीं । काळ **राघव** भयास्तव कंठीं ॥ ५ ॥
शर्व[1]-कंठ-विष-गर्व हराया । शक्त नामचि तुझें **रघु-राया** ॥
सेतु सागर कपी उतराया । नाम-सेतु भव[2] सिंधु तराया ॥ ६ ॥
नाम **राममय राम** चि लोकीं । हे न जाणत वृथा शिणलों कीं ॥
**राम**-नाम धरिलें जयिं वाचे । तुटले तयिंच पाश भवाचे ॥ ७ ॥
सिंधु सेतु रचिला **रघु-रामें** । नाशिला भव-समुद्र चि नामें ॥
तारिली **स्वनगरी** अवतारीं । **राम**-नाम भुवन-त्रय तारी ॥ ८ ॥
**मूर्ति** ते प्रकटली घन-वर्णी । जो दिवाकर-कुळीं[3] नृप वर्णी ॥
तो चि हे गुण हि **वामन** वर्णी । मूर्ति आदिकवि **वाल्मिकि** वर्णी ॥९॥

समाप्त.

---

# भगवद्गीता[4].

—:o:—

**श्रीमद्वामन**-पाद-पद्मं[5]-युगुलीं अर्पूं मना षट्पदा[6] ।
स्वात्मा जो जगिं सत्पद स्मरतसे दावी स्वयें चित्पदा ॥
आनंदात्मक तो चि **श्रीहरी** गुरू आत्मा नसे वेगळा ।
ऐसा **श्रीभगवान्** तया नमितसें प्रेमें जगन्मंगला ॥ १ ॥
तो **श्रीहरी** सारथि **वामनाचा** । होवोनियां प्रेरक जो मनाचा ॥
अध्याय-अंतीं कथि एक श्लोका । म्हणोनि दावी स्व कृपावलोका ॥२॥
अध्यायीं प्रथमांत **पार्थ** स्वजना देखोनियां मोहला ।
कीं हे गोत्रज सोयरे कुल-गुरू मारीं च ना मी मला ॥
लागे पाप ह्मणोनि "युद्ध न करीं" **कृष्णा** असें बोलिला ।
बाणेशीं धनु टाकुनी मग रथीं तो ऊगला बैसला ॥३ ॥
सांख्यें आत्म अनात्मता निवडुनी योगें चि स्वात्मैक्यता ।
पाहे हा न मरे न मारित असे आत्मा असें तत्वतां ॥
अध्यायीं दुसऱ्या परेश वदला तो **श्रीगुरू वामनें** ।
टीका हे सम-पद्य-रूप रचिली संतीं पहावी मनें ॥ ४ ॥

---

१ शिव. २ संसाराचे ३ सूर्यवंशीं. ४ समश्लोकी म्हणून जें भगवद्गीचें भाषांतर वामन पंडितानें केलें आहे त्या भाषांतराचे प्रत्येक अध्यायांचे अखेरीस मोठया वृत्तानें रचलल। एक श्लोक असावयाचा. परंतु "गीतार्थ बोधिनी" नामक पुस्तकांत छापिलेल्या समश्लोकीचे प्रत्येक अध्यायाचे शेवटीं या श्लोकां पैकीं एकेक श्लोक आढळत नाहीं. म्हणून हे येथें छापिले आहेत. वस्तुत हे सर्व श्लोक समश्लोकीचाच एक भाग होत. ५ कमल. ६ भ्रमर

अध्याय हा तृतिय नामक कर्म योग ।
कर्मांग ब्रह्ममय जाणुनि स्वात्मयोग ॥
नित्या अनित्य अवघीं हरिच्या चि पायीं ।
अर्पा असें वदतसे निजसौख्य-दायी ॥ ५ ॥
चतुर्थी अध्यायीं गुरुवर वदे ज्ञान-पथ हा ।
तयाची हे टीका करि बहु सुखाचा सुपथ हा ॥
बरा हा जाणोनी सुजन समजोनी तुह्मि पहा ।
सम-श्लोकीचा हो निशि दिनिं करावा च जप हा ॥ ६ ॥
अध्याय हा पंचम स्वात्मयोगी । जो कर्मसंन्यास करी सुयोगी ॥
तो श्रेष्ठ संन्यास ह्मणे हरी तो । जो पार्थ-मोहास हि संहरीतो ॥ ७ ॥
षष्ठाध्यायीं योग अध्यास नामा । बोधी पार्था श्रीहरी तो अनामा ॥
अभ्यासीतां तत्व-बोधावलोका । दे सौख्यातें क्षिप्र हा संत लोकां ॥ ८ ॥
अध्याय हा सप्तम योग नाम । विज्ञान विख्यात स्वयें अनाम ॥
आध्यास अभ्यास करी महात्मा । चतुर्विधा माजि हि भक्ति-वेर्त्मा ॥ ९ ॥
अध्याय हा अक्षर-योगनामा । जो आठवा आठवितां अनामा ॥
पावाल हो सद्य चि स्वात्म-ठेवा । अविस्मरें हें चि मनांत ठेवा ॥ १० ॥
नवमाध्यायीं नवविध भक्ती । अनुभवणें या नव नव युक्ती ॥
विज्ञानासह ज्ञान हि एथें । सेवा नव नव रस हो स्वार्थें ॥ ११ ॥
दशमाध्यायीं हरी विभूती- । योगा सांगे सकळां भूतीं ॥
त्यातें जें... मुख्यत्वें नामें । अनुभवरसिका निज सुखधामें ॥ १२ ॥
अध्याय एकादश विश्वरूपी । अयोग्य ऐश्वर्य निजस्वरूपीं ॥
दावीतसे ध्यान करा विशेषीं । अहर्निशी कीटक भृंगि जैशी ॥ १३ ॥
अध्याय हा द्वादश भक्ति-योग । सप्रेम जे वाचिति स्वात्मयोग ॥
ने प्रीति ते भक्ति असो जयाला । कळे तया तारक देव जाला ॥ १४ ॥
अध्याय तो हा चि त्रयोदशावा । निरीक्षिती संत मनांत ठेवा ॥
क्षेतज्ञ हा चिद्गुण सर्व क्षेत्रीं । व्यापीतसे तो चि हि भूतमात्रीं ॥ १५
अध्यायीं चवदावियांत वदला श्रीकृष्णजी अर्जुना ।
श्रोत्रादी गुण या विभाग वदतो ऐकें ह्मणे सज्जना ॥
तीन्ही हे गुण लंघुनी निजसुखा जाणोनि जे वर्तती ।
ते योगी निजभक्त ते गुणत्रयातीतात्मता पावती ॥ १६ ॥
अध्याय हा पंचदशाख्य नामें । जे वाचिती ऐकति अर्थ प्रेमें ॥

---

१ सत्वर. २ मार्ग. ३ सत्व, रज, तम या तीन गुणांनीं व्याकुळ न होण्याची स्थिति

ते जाणती श्रीपुरुषोत्तमातें । क्षरक्षरा होउनि उत्तमा ते ॥ १७ ॥
अध्याय हा षोडश निर्णयाचा । कीं दैव ही आणिक आसुरीचा ॥
विभाग एथें विषयार्थ वाणी । बोले हरीची न सुखासि वाणी ॥ १८ ॥
अध्याय हा सप्त दशाख्य योग । श्रद्धा त्रिधा तीं गुणिचा विभाग ॥
जें कर्म तें ब्रह्ममय स्वरूपीं । पाहे वदे हा हरि विश्वरूपी ॥ १९ ॥
अध्याय अष्टादश सौख्य-धामा । हा मोक्षसंन्यास चि मोक्षनामा ॥
वाचाळ भावें जायें सर्वदा हो । तयीं नुरे लेश प्रपंच-दाहो ॥ २० ॥
अध्यायांतीं एक हा श्लोक जाणा । पुष्प प्राय श्रीगुरूतें सुजाणा ॥
पायीं त्याच्या लेहुनी अर्पिला हो । मागें हा ची सर्वदा स्वात्मलाहो ॥ २१

**सम-श्लोकी** टीका प्रकटलि जगीं ज्ञान-सरिता ।
सदा स्नानें पानें करुनि करि आनंदभरिता ॥
अनंतां जन्मांच्या हरुनि सकळा साच दुरिता ।
स्वयें दे मोक्षातें श्रवण-पठणीं हे चि त्वरिता ॥ २२ ॥
सत्संगासि धरीं कुसंग न करीं आत्मैक्यता मोहरी ।
चित्तातें अवरीं कुकर्म न करीं वेदोदितें आचरीं ॥
सप्रेमें श्रवणादरीं अनुदिनी गातां सुखें अंतरीं ।
हे टीका वरदायिनी झडकरी अज्ञान हो संहरी ॥ २३ ॥

समाप्त

## विष्णुध्यान.

——:०:——

### सवाया.

पाद[१]सरोज उरोजयुगांवरि ठेवुनि सेवि सरोज-भर्वा ॥
भृंग असंग मुनींद्र मनीं रस घेति जयांतिल नित्य नवा ॥
ध्यान-परास निधान सुखप्रद विष्णुपरं पद जेथ शिवा ।
अंबुज-संभव-धौत-पदांबुजें जे चरणांबु किरीट शिवा ॥ १ ॥
दिव्य शशांक दशांगुलिकांवरि शोभति रम्य पदार्विंद-नखें ।
आठवितां मनिं संत महत्तम नासुनि उत्तम देति सुखें ॥

१ कमताई. २ नदी. ३ प्राप्त होई. ४ पदकमल. ५ स्तनयुग्म. ६ ब्रह्मदेव. ७ कमळो-द्भव ब्रह्मदेवानें धुतळे आहे पदकमळ ज्याचें असा. ८ पादोदक. ९ चंद्र. १० पदकमळ.

लेश महत्व हि वर्णु ह्मणे परि भागलि शेषॅ-अशेष-मुखें ।
ध्यान असें बहु दान-तपें जन-मानसिं होय अनेक मखें ॥ २ ॥
चित्त असें चरण-द्वय चिंतुनि चिंतितसे मन वर्तुळ घोंटे ।
हाटक-पीत-पटीं कटि त्यावरि वेष्टित पुष्ट तनू मनिं वाटे ॥
विश्व-सरोज सुनाभि-सरोवरिं ज्यांत सरोरुह-संभवें भेटे ।
पोट सुरम्य वलित्रय ज्यावरि आंत जगत्रय-कोटि न दाटे ॥ ३ ॥
**श्रीप्रियमंदिर** सुंदर तो उर शोभतसे स्वविशाळपणें ।
केवळ तो करुणा-वरुणालय तो कमलालयें या चि गुणें ॥
[6]कंबु नये सम रम्य गळा परि सिंधु-सुतां निज बंधु तिणें ।
आणुनियां समते ममतेस्तव सार्थक केलें * तयाचें जिणें ॥ ४ ॥
सायुध सुंदर बाहु-चतुष्टय पुष्ट जसे करिचे करें ते ।
जे भुज वीर-रसा अवलंबुनि लंब हि जानुवरी पुरते ॥
स्कंद सुरम्य न साम्य दिसे वृष होति पशुत्व-गुणें पर ते ।
वस्त्र अपूर्व वरी रविचे करें पूर्वगिरी-शिखरावरुते ॥ ५ ॥
श्रीमुख तें सुख नीर सरोरुह ज्या वदनीं निगमामृत-खाणी ।
[12]बिंब-फलाधर कोटि कलाधरें आणुं शके उपमेसि न वाणी ॥
सेवि **रमा** परमामृत जेथिल पाहणियाचि जियेस शिराणी ।
पाहि अनादि अनादिपणें तरि दृग्भ्रमरांची पुरे न शिराणी ॥ ६ ॥
**श्रीहरिचें** मुख पंकज त्यांत हि लोचन-पंकज-युग्म वसे ।
**श्रीहरिचा** मुख-चंद्र तयांत हि सुंदर ते द्विजें-पंक्ति दिसे ॥
प्राकृत पंकजें चंद्र न त्यासम अद्भुत हार न त्यांत असे ।
ध्यान मुनी करिती हरिचें मनिं सांपडती रस त्यांत असे ॥ ७ ॥
आस्यें-सरोरुह हास्य-लवें अति रम्य उपास्यें-मनो-भ्रमरीं ।
भ्रूयुग भूरि अनुग्रह-सूचक भूसुरें भूपऋषीं अमरीं ॥
लेश अनुग्रह घेउनि दानव मारियले अमरीं समरीं ।
भक्ति विरक्ति जनीं तरि त्यांसि च मागितली विधिच्या कुमरीं ॥ ८ ॥
नासिक तें तिलपुष्प ह्मणों तरि त्यास न ये तिल हे उपमा ।

---

१ सहस्रमुख सर्प. २ सुवर्ण. ३ ब्रम्हा. ४ कृपासागर. ५ लक्ष्मीचें स्थान. ६ शंख. ७ लक्ष्मी. ८ हत्तीचे. ९ शुंडा. १० किरण. ११ वेदामृत. १२ तोंडलें. १३ चंद्र. १४ कमताई. १५ आवड. १६ नेत्रभ्रमर. १७ दंतपंक्ति. १८ कमल. १९ मुख. २० उपासनेस योग्य २१ पुष्कळ. २२ कृपा. २३ ब्राम्हण. २४ देवांनीं. * 'लें' हें अक्षर वृत्त सुखार्थ-ह्रस्व म्हटलें पाहिजे.

प्राकृत जे शुकें-चंचु नये तिस चित्सुख-नासिकिचा महिमा ॥
भाळ विशाळ टिळा वरि सुंदर वाणि न वर्णुं शके सुषमा ।
चांगुल गाल हनू अति सुंदर विस्मित देखुनि जेथ रमा ॥ ९ ॥
दोन सहस्र-दळें चरणीं तसिं चारि करीं हरिच्या कमळें ।
लोचन-आनन-अंबुज कानन अंबुरुहें सकळें विमळें ॥
चित्सुख ज्यांत सुधारस केवळ या करितां मुनि-भृंग कुळें ।
केश-मिषें वरि केशव-मस्तकिं देखिलिं दिव्य मनें कुशळें ॥ १० ॥
रत्न-किरीट शिरीं मकराकृतिं कुंडल कौस्तुभ कंठमणी ।
श्रीवनमाळ गळां पदकावरि वेष्टित ज्यांत रमा रमणी ॥
पीत-पटीं कटिं सूत्र सुनूपुर दुःखहरें बिरुदें चरणीं ।
अंगेद-कंकण-संघ मुद्यांवरि रत्न-समूह जसे तरणी ॥ ११ ॥
वर्णिति वर्ण अनेकविध श्रुति तप्त सुवर्ण सुगौर तसा ।
सत्य-युगीं स्फुरतो स्फटिकोपम कर्म-युगीं उदयार्क जसा ॥
द्वापरिं नील सुनील सुनीरदें माधव याहि युगांत असा ।
श्यामल कोमल वामन-नानसिं सुंदर या कलिं मानि ठसा ॥ १२॥
श्रीधरणी-चरणीं मन ठेउनि सेविती ज्या विमळा दिक शक्ती ।
होउनि भाट अचाट गुण श्रुति वर्णिति शास्त्र पुराण सयुक्ती ॥
दृष्टि-लवामृत सृष्टिस लक्षुनि धावति ते स्थळिं चारि हि मुक्ती ।
अंबुज-संभव शंभु सुखीं पद पुजियले सनकादिक-भक्तीं ॥ १३
अंग पलंग करूनि भुजंग-पती सुपती स्वतनूचिच केली ।
स्तोत्र अजस्र सहस्र मुखें मति मागुति भक्ति निमित्त भुकेली ॥
वामन-वैखरि तृप्ति नव्हे परि वर्णुनियां हरि-भक्ति निवाली ।
ध्यान निदिध्यास सवाइ-चतुर्दश-रत्नकला हरि-अर्पित जाली ॥ १४॥

समाप्त.

---

१ रावूची चोंच. २ सरस्वती ३ शोभा. ४ कमळें. ५ बाहुभूषण. ६ समूह. ७ आंगठ्या. ८ सूर्य. ९ मेघ. १० स्तुतिपाठक. ११ सायुज्य, सकोलता, सरूपता, व समीपता.

मराठी ... (३७ ठाणें
ग्रंथालय स.ग्रा.
... ९८८८५
...

# स्फुट सवाया.

### बोधपर.

नीपटें हें मन लंपट होऊनि सोकविलें रतिच्या सदनीं।
दाऊनियां प्रमदा[3] नट वैभव नाचवि काम-भरें मदना ॥
शेवटिं काळ लपेटिल हें वय सोडवितां न दिसे कदना।
स्वप्न असोनि नसे सुटका घटका पळ **राम** न ये वदना ॥ १ ॥
अंबुज एक करीं अवलंबुनि भक्तिपुरःसर बोलतसे।
त्हत्कमळीं **कमळापति** चिंतुनि मंद-गिरा मग बोलतसे ॥
त्हद्गत तूं निजमूर्ति-सुखा तुजवीण दुजा मज कोण असे।
पाव अपाव निवारुनि मी मज दाउनि वारि समूळ पिसें*॥ २ ॥
भक्ति-सुखें **प्रह्लाद** तरे मुनि **नारद** भक्ति-सुखें विचरे।
भक्ति-सुखें **सनकादिक** पावन भक्तिसुखें **उपमन्यु** सरे ॥
भक्ति सुखें **ध्रुव** बाळ सुखावे **व्यास** सुखें जगताप हरे।
**वाल्मिकि अंबरुषी बलि भीष्म शुकादिक** तन्मय भक्ति-भरें ॥ ३ ॥
**उध्दव अर्जुन धर्म बिभीषण राम**-पदीं रत चित्त जयांचें।
**अक्रूर वैष्णव** भक्त कपी **हनुमंत** सभाग्य जिणें **विदुराचें** ॥
**भानु** कुळीं **रुखमांगद** भक्त सुधाकर वंशिं **परीक्षिति** साचे।
ऐक्य निरंतर चित्स्वरूपीं निज भक्त वदे श्रुति नाम तयाचें ॥ ४ ॥
उद्धरिला **अजमेळ** अहंकृति तारियली गणिका अघ-राशी।
हिंसक **व्याध** अगाध जिवांप्रति विंधुनियां शर भक्षित त्यांशीं।
चोज कसें मज सांग तयाहुनि पातक काय असे मजपाशीं।
दीन-दया-कर हे बिरुदावलि वानिति **वेद** निरंतर कैशी ॥ ५ ॥
**पांडव**-भाग्य सहस्र-मुखांसें हि वाच्य नव्हे न धरे अनुमाना।
जें अति थोर **पितामह**-वैभव त्याहुनि ही अति उत्तम माना ॥
लोक चतुर्दश निर्मुनि ही **विधि** पात्र न ज्या **पुरुषोत्तम**-माना।
तो **हरि** भाय रे भाय.ह्मणोनि हि थापटि **पार्थ**-तुरंगम माना ॥ ६ ॥
वैभव त्यांत समस्त किं मस्तकिं त्या **हरिचें** पद-रेणु जरी।
अश्व खुरींत खुरीं उठतां रज ते पडतात तयाचे शिरीं ॥

---

१ अत्यंत २ योनी ३ स्त्रिया. ४ लक्ष्मीपति. * वेड. ५ सूर्यवंशी ६ चंद्रवंशी. ७ अभिमान. ८ वेश्या ९ पापराशी. १० शेषास, ११ अश्वगाळेत

क्लेश न लेश उरे स्मरतां मुख जें सुख नित्य अशेष करी ।
त्या वदनेंदुवरि श्रमबिंदु हि दीसति पार्थ-रथीं समरीं ॥७॥
तूं अज अव्यय नित्य निरामय तूं सद चिन्मय सौख्य-निधाना ।
हें जग डंबर भासत तद्वत बोध तरंग जळावरि नाना ॥
कुंडल किंकिणि नूपुर कंकण कांचन हें बहुधा अभिधाना ।
वेद वदे जग तद्वत एक निरंतर नातळसी भव नाना ॥८॥
विश्वरूपा अरूपा अविकार अनाम असंग अनंत अपारा ।
शास्त्र पुराण विवीध विवाद सदां करिती परि नेणति निश्चित पारा ॥
विश्व तुझ्या स्वरूपीं परि कल्पिति विद्यत धानिति विश्व अधारा ।
"नेति" वदोनि सरे श्रुति वाद न वाच्य अवाच्य वृथा श्रम सारा॥९
साच नसे मृगतोय सुनिश्चित आश्रय भानु तया प्रति पाहे ।
लोह चळे परि चुंबक अक्रिय निष्क्रिय तेवि विलासत आहे ॥
साच नसे घन चिद्रुप तद्रुप तंतु पटादि-रूपें दिसताहे ।
हें निज गुह्य अलौलिक जाणति संत अनंत रूपें रमताहे ॥ १० ॥
निर्गुण जें रूप या परिचें विग भेद सगूण हि त्या वदती ।
तें सुखदायक मानुनि एक विराग धरूनि मनीं भजती ॥
भक्तिसुखें तुज अर्चिति उत्तम ते परमीत रहीत किती ।
त्या करुणाकर श्रीचरणाप्रति मी शरणागत आर्तमति ॥ ११ ॥
काळकि लाविति जे गगनास हि काळ कि लागे करीं चवरी ।
भूचर भानुवरी जरि थुंकिति थुंकि पडे वदना चि वरी ॥
कर्म करूनि अकर्म तथापि हि धर्म विरुद्ध कदां न करी ।
त्यासि च वंदिति वंद्य जगत्रय हें ह्मणे वामन त्याचि परी ॥ १२ ॥

**समाप्त.**

## स्फुट सवाया

---:o:---

### बोधपर.

वैभव हें क्षणभंगुर केवळ दों प्रहरीं जसि चंचळ छाया ।
आप्त जनें असती परि शेवटिं कोणि हि सिद्ध नव्हे सम जाया ॥

---

१ मुखचंद्रावर, २ लाटा. ३ सान ४ मृगजळ. ५ सूर्य. ६ अपूर्व. ७ बरोबर.

दुर्घट हा भवसागर दुस्तर कोण करील तयासि उपाया ।
होइं तरी शरणागत स्वागत लक्षुनियां धरि **श्रीगुरु**-पायां ॥ १ ॥
नाभि-सरोरुहिं[1] गंध असोनि न जाणुनि हिंडतसे मृग रानीं ।
कंठ-मणी निज कंठिं असोनि परा पुसतो .... डुळुनि पाणी ॥
काम-दुघो[2] निज आंगणिं नेणुनि मागतसे मज तक्र शिराणी[3] ।
तेविं सदैव न जाणति हें गुज अंतरिं **राघव** चिन्मय खाणी ॥ २ ॥
प्रार्थिलियाविण दुःख तसें सुख निश्चित ऐसें जयासि कळे ।
त्यांचेंचि एक **मुकुंद**-पदीं मन होउनि स्थीर कदां न टळे ॥
**श्रीहरि**-भक्तिच दुर्लभ आणिक होणार तें तों कदा न टळे ।
या करितां वय हें ह्मणे **वामन** वोंजळिचें जळ जेंवि गळे ॥ ३ ॥
दुःखचि तें सुख मागुनि इच्छिसि सूखचि तें अपणा न कळे ।
जों वरि तें न कळे सुख जों मन **श्रीगुरु**चे चरणीं न मिळे ॥
बाह्य सुखा धरितां हि न सांपडे दूरि जसें मृगनीर[5] पळे ।
वेंचतसे वय हें ह्मणे **वामन** चाळणिचें जळ जेंवि.... ॥ ४ ॥
दुर्लभ मानव देह तयांत हि दुर्लभ तें किति काळ जिणें ।
त्यांत हि दुर्लभ संत-समागम काय जिणें **हरि**-भक्ति-विणें ॥
ज्यांसि **हरि** प्रिय जे **हरि**चे प्रिय भेटति ते जगदात्मपणें ।
दुर्लभ दुर्लभ तें ह्मणे **वामन** जे मन शोधिति **विष्णु** गुणें ॥ ५ ॥
जेथवरी मन धांवडिशी तरि त्याहुनि ही तुं पुढें असशी ।
ऐसें असोनि हि आत्म शरीर हें आपुलें मानुनि कां बसशी ॥
दीसत सर्व अविद्य हि पूर्वक शुक्तिवरी[6] रजता भुलसी ।
नास्तिक हें सुख दुःख हि मानुनि वा कवणावरि रे रुससी ॥ ६ ॥
शिष्य गुरू बहु मेळविती परि दुर्लभ तो जगिं शिष्य करी ।
ब्रह्मचि होउनि शेष उरे तरि ते खुण शिष्यपणाचि खरी ॥
मंत्र हि देतिल जे शिकवीतिल नाटक काव्य कळा कुसरी ।
ते हि गुरूपरि **श्रीगुरु** वांचुनि शिष्यपणाचि असेचि उरी ॥ ७ ॥
नित्य अनित्य अनात्म निषेधुनि सत्य-सुखात्मपणें मिरवी ।
जो अविशेष चिदंबुधिचा रस विश्व तरंगपणें स्फुरवी ॥

---

१ नाभिकमळीं. २ कामधेनु. ३ आवड. ४ चें=चं ( जेथें दीर्घ अक्षर असून छंदाकरितां-हस्व असल्याप्रमाणें वाचावें लागतें तेथें ⌣ अशी खूण केली आहे. ) ५ मृगजळ. ६ मोत्याची शिंप.

तो सुख-कल्प-तरूचि जगद्गुरू देह विदेहपणें उरवी ।
फुंकित कान दुकान हि जै स्थळिं हे पदवी न दिसे बरवी ॥ ८ ॥
एक घटीं नभ तें सकळां घटिं तें चिमटीं नभ हें तों खरें ।
पाहसि आत्म-शरीर जसें जग पाहसि सर्व हि पाहिं बरें ॥
सर्व हि तूजमधें सकळांत तुं जाणणें तें तों नसे दुसरें ॥
तेंचि तुं जाणतसे ह्मणे **वामन** होसिल ब्रह्म तुं एकसरें ॥ ९ ॥
आंगाणीं सूर्य जळीं प्रतिबिंबित तेज घरांत तें भिंतिवरी ।
तेणें दिसे उदकांतिल भास्कर मुख्य रवी हि तया उपरी ॥
ज्यास्तव इंद्रिय-ग्राम[1] सचेतन जाणिव मीपण तें दुसरी ।
तेंचि तुं जाण तुझें ह्मणे **वामन** हे परमार्थ कळा तिसरी ॥ १० ॥
**जान्हवि**[2] सागरिं ऐक्य हि होउनि भेटि अखंड तयासि तिला ।
त्याचेंचि मेघ-मुखें जल घेउनि त्यांतचि मेळवि त्या सलिलीं[3] ॥
सर्व हि तूज मधें सकळांत तुं ये रितिनें दिसतोसि मला ।
भक्ति अशीच असो म्हणे **वामन** मुक्ति कदापि न मागुं तुला ॥ ११ ॥
एक शरीर अहंममतास्पद[4] तें विकिलें तुजलागिं हरी ।
आत्म-सुवर्ण चराचर-मुद्रित घेतलें वीतदिगांतभरी ॥
त्यांत जिणें मरणें सुख दुःख हि चिंतन कां मज या उपरी ।
आपण अश्व जसें विकिलें मग एक बसो अथ दोघ वरीं ॥ १२ ॥
सिंह जसे प्रतिपर्वतिं नाहिंत कस्तुरि-एणं[5] वनोवानिं कैंचे ।
हस्तिचे मस्तकिं मुक्त[6] असे परि ते गजराज हि प्रस्तुत कैंचे ॥
कल्पतरू अणि कामदुघा[7] बहुसाल परीस हि पट्टणिं कैंचे ।
तेंवि ते सद्गुरू सज्जन संत महा-अनुभाव घरोघरिं कैंचे ॥ १३ ॥

समाप्त.

---

१ समूह. २ गंगा. ३ उदकास. ४ अहंकारास्पद. ५ मृग. ६ मोतीं. ७ कामधेनु.

# कात्यायनी-व्रत

### सवाया

**श्रीमधुवंशपते मधुसूदन** यादव-नंदन ते[1] सुचरित्रम् ।
त्वां प्रणिपत्य **रमाधरणी**-प्रियमंबुजलोचनमंबुदगात्रम् ॥
**ब्रह्मशिवादि**सुरैर्यदि तर्क्यमहो चरितं तव **देव** ! पवित्रम् ।
त्वत्कृपया करुणांबुनिधे तव जातु वदामि चरित्रविचित्रम् ॥ १ ॥
एक दिनीं व्रज-गोप-नितंबिनि[5] जाउनियां **यमुने**प्रति तीरीं ।
ठेवुनि अंबरें[6] न्हाति दिगंबरें[7] होउनियां अति शीतळ[8] नीरीं ॥
येउनियां **हरि** तीं वसनें हरि[9] वेंघे[10] कदंबतरूवरि **शौरी** ।
देखुनि लाजलिया मनिं पाहति लोचनिं मेघ[11]-शरीरी ॥ २ ॥
जोडुनि अंजलि बोलति मंजुळ कोकिल-वैखरि[12] गोकुल-नारी ।
दे ह्मणती लुगडीं उघडीं **हरि** ! बापुडिं कांपतसों बहु नीरीं ॥
तूं व्रज-पाळक-बाळक होउनि हे अनुवाळि करीशि **मुरारी** ।
**श्रीहरि** ! चोरि हि थोरि नव्हे तुज नागविया जळिं पाहसि पोरी ३
शीत जळें बहु व्याकुळ होउनि काकुळती करि गोकुल-नारी ।
लुगडिं त्यासि घडीघडि मागति ऊघडिया उदकांत कुमारी ॥
गोप-नितंबिनिचीं वदनें जसिं पद्मवनें अति शोभति नीरीं ।
**उदक-बिंदु** मरंद[13] तयांवरि षट्पद[14] ते कुटिलालक[15] भारी ॥ ४ ॥
सूर्य-[16]समीर-जवें चढतां **हरि** ! चीर[17] दे होत उशीर **मुकुंदा** ! ।
सासुरवाशिणि आम्हि सुवासिनि **शंकर**[18]-राणि पुजूं सुख-कंदा ॥
सासु जशी घरिं वीवसि[19] दारुण त्याहुनि गांजिति लोंसि नणंदा ।
नेदिसि तूं वसनें तरि होइल या व्यसनें[20] **हरि** ! तूज हि निंदा ॥ ५ ॥
वंदुनि निंदुनि भोंदुनि यापरि या उपरी लुगडीं तुज मागों ।
देसिल तूं तरि दासि तुझ्या तुजपाशिं असों चरणासि हि लागों ॥
ऐसें परोपरि वीनवि सुंदरि त्या करुणा करि ना किति सांगों ।
आण न वाहे तुझी लटकी **हरि** जाण तुझ्या बटकीपरि वागों ॥ ६ ॥

---

१ तुझें. २ कमलनेत्रास. ३ मेघशरीरास ४ कदाचित्. ५ स्त्रिया. ६ वस्त्रें. ७ नग्न. ८ पाण्यांत. ९ हरण करी. १० चढे. ११ मेघश्याम. १२ वाणी. १३ भ्रमर. १४ पुष्परस. १५ कुरळे केश. १६ वायुवेगानें. १७ वस्त्र. १८ पार्वती. १९ जखीण. २० मांजरी. २१ कट.

ऐसें परोपरि बोलति सुंदरि एकट जाउनि तेथ **मुरारी** ।
मोहित पंचशरें[1] रोहती मग पाहति तल्लिन गोपकुमारी ॥
देखुनियां उदयाद्रिवरी शशि ऊगवलीं मुकुदें जसिं नीरीं ।
**कृष्ण** कदंबतरूवरि जीवनिं उत्पललोचनि[2] त्या व्रज-नारी ॥ ७ ॥
त्यांप्रति **कृष्ण** वदे "उदकांतुनि बाहिर या तुम्हि देइन चोरें[3]" ।
आयकुनी ह्मणती व्रजकामिनि "केलें निलाजिरें या **यदुवीरें**" ॥
जाणुनियां हटवादि **मुरारि** करें कर झांकुनि कामशरीरें ।
तीरिं निघोनि उभ्या युवती अति लाजति कांपति शीत समीरें ॥८॥
एकि करें मदनालय झांकुनि नेसुनि एकि सरोरुह-पानें ।
ऊघडि एकि बसोनि रतीपतिमंदिर त्या लपवीत उरूनें[6] ॥
एकिस एकि पुढें करूनी निजवंश शरीर त्रपा-अभिमानें ।
तीरिं उभ्या व्रज-गोप-कुमारि तरी न करी **हरि** अंबर-दानें ॥ ९ ॥
लोचन ऊर कपाळ अलौलिक आणिक सुंदर हो तनु पृष्ठी ।
**श्रीहरि**ची अति सुंदर देखुनि कामिनिंची जडली दृढ दृष्टी ॥
वाटतसे करिताति नितंबिनि त्यावरि तों नयनांबुज-वृष्टी ।
येणें मिसें तरि देइल अंबर मानुनि **सिंधुसुता-[10]पति** तुष्टी ॥१०॥
विव्हल पंचशरें तंव होउनि वीसरल्या वसनें व्रज-नारी ।
ऊर्ध्वमुखें करिं पाहति सुंदरि दृष्टि समर्पिलि **कृष्ण**-शरीरीं ॥
जेथ पडे जिचि ते नुचडे मग चित्त रमेंत जडे दृढ भारी ।
वर्ण जसे न निघेत कदापि हि पुस्तकिं जे लिहिले लिहिणारीं ॥११॥
लूगडिं ही **हरि**लागिं न मागति वीसरल्या निज सर्व हि धंदा ।
हासुनि बोले विनोद **मुकुंद** तदा व्रज-गोप- नितंबिनि-वृंदा[11] ॥
होउनि नागविया यमुना जलिं मज्जन केलें अशा तुह्मि मंदा ।
वोंजाळिया शिरिं दोहिं करें कर जोडुनि शीघ्र **दिवाकर**[12] वंदा ॥ १२॥
बोलति त्या व्रजनारि परोपरि आमुतें तूं छळितोसि **मुरारी** ।
हें हि करूं परि या उपरी तरि पोंडु नको व्रज-गोप-कुमारी ॥
जोडुनियां कर दोनि दिवाकर वंदिति सूर्य-सुता-जल-तीरीं[13] ।

---

१ मदनानें. २ कमळनेत्री. ३ वस्त्रें. ४ वायूनें. ५ कमळपत्रें. ६ मांडीनें. ७ लज्जा. ८ वस्त्र-दानें. ९ नेत्रकमल. १० लक्ष्मीपति. ११ समूह. १२ सूर्य. १३ यमुनातीरीं.

जालें सुखी निज अंतरि **श्रीहरि** देखुनि कामगृहें अति गोरीं ॥ १३ ॥
बोले **हरी** तुह्मि जोडुनि अंजलि वेगळिं वेगळिं अंबरें[1] मागा ।
येकलि येकलि या जवळी निज लुगडियाचि बरी खुण सांगा ॥
देइन मी वसनें मग सत्वर नेसुनि झांकुनि आत्म-वरांगा ।
पूजुनि **पार्वति** जा सदनाप्रति निर्भय सर्व सुखी करिं नागा ॥ १४ ॥
गोपि अनन्यगती अति होउनि जाणुनि **श्रीहरि**चा हठ भारी ।
येकलि येकलि येउनि मागति अंबर ऊर्ध्व करें व्रज-नारी ॥
पाहे न्यहाळुनि **कृष्ण** गिऱ्हाइक-वृत्ति करूनि तयांचि शरीरीं ।
हांसुनि दे वसनें **यदुनंदन** गोप नितंबिनीचा सुखकारी ॥ १५ ॥
कोणि म्हणे **हरि** दे चुनडी बरि एक ते मागतसे दुरवानें ।
सांगति गोपि कृशोदरि सुंदरि लूगडियांचि अशीं अभिधानें[2] ॥
देउनि **श्रीपति** हांसति त्यांप्रति घेउनि त्या करिती परिधानें ।
खोबज ती युवती अति लाजति जाति घरा मग सौख्यसमानें ॥ १६ ॥
ऐसें परोपरि नित्य कृशोदरि भूलवि अंतरिं मेघ-शरीरी ।
त्याच रिती श्रवणें करि **श्रीहरि** मुक्ति मुमुक्षुसि[3] काम हि तारी ॥
अंबुज-नेत्र-चरित्र विचित्र पवित्र जनासि करी सुखकारी ।
**कृष्ण मुकुंद रमाधरणी-प्रिय वामन** मानस-हंस **मुरारी** ॥ १७ ॥

समाप्त.

---

# बालक्रीडा

:o:

### सवाया

एक दिनीं व्रज-गोप-नितंबिनि बोलति **श्री-हरि**च्या जननीतें ।
**कृष्ण** घडीभर दे सदनाप्रति नेउनि खेळउं यासि सुचित्तें ॥
जाय ह्मणे व्रजपाळ-वधू निज बाळक जाणुनियां **भगवंतें** ।
मीं नैंवजाय[4] कदापि ह्मणूनि हि लोळणि घेतलि तेथ **अनंतें** ॥ १ ॥
लोळणि घेतलि देखुनि विस्मय मानुनि बोलिलि माय **यशोदा** ।
बा नवजाय ह्मणोनि तुं काय निमित्त असें वदतोसि **मुकुंदा** ॥
**कृष्ण** ह्मणे प्रमदा[5] मज नेउनि आंवळिती हृदयीं मदमंदा ।

---

१ वस्त्रें. २ नांवें. ३ मोक्षेछूस. ४ न जाईन. ५ स्त्रिया.

तीक्ष्ण कुचाग्रं मला रुततीं परि त्यांसि नसे मज वाचुनि धंदा ॥ २ ॥
शून्य घरीं मज नेउनि कोंडिति खेळण मांडिति गोपिका शौरी ।
फेडुनि लूगडें घालिति फूगडि ऊघडें काम-गृहें अति गोरीं ॥
दाखविती ह्मणऊनि करीं भयें लोचन झांकुनि दृष्टि मि चोरीं ।
गूदगुल्या करिती मजला मग दुष्ट अशा मज गोवळ-पोरी ॥ ३ ॥
खेळति शून्य व्हिऱ्हाडें वऱ्हाड करूनि मला नवरा अति आतें ।
नीजति गोरिहरा जवळी परि नीजविती स्वतनूवरि मातें ॥
तेण मुली मज पाडुनियां भुलि हालविती बुलि ही निज हातें ।
फूगलि ते काशि ऊगालि राहिल फुंकिलि आणि जशी मुखवातें ॥ ४ ॥
गोप-नितंबिनि लागिं विटंबुनि सांगे विटंबुनियां जननीतें ।
गोपि विरामति आयकितां जसिं पावकिं वीघरती नवनीतें ॥
.... .... .... .... ।
आणिक काय ह्मणेल ह्मणूनि कितेक भयें मुख झांकिति हातें ॥ ५ ॥
मंजुळ आणि सुमंगळ केवळ आयकुनी निज बाळक-वाणी ।
पातेजेतां तुह्मि बाळ ह्मणूनि तयांसि वदे व्रज-पाळक-राणी ॥
.... .... .... .... ।
लेंकरूं जाणुनि खेळवितां परि तूमचि हीं बहु थोर घराणीं ॥ ६ ॥
याहुनि ही हरि नित्य परोपरि भूलवि अंतरिं त्या व्रजनारी ।
एक त्रुटी जरि देखति हो तरि कोटि युगांहुनि मानिति भारी ॥
कामिनिचा मुख-पद्म वधू व्रज-गोप-नितंबिनिचा सुखकारी ।
कृष्ण मुकुंद रमाधरणीप्रिय वामन-मानस-हंस मुरारी ॥ ७ ॥

समाप्त.

---

१ स्तनाग्र. २ उग्र. ३ विरघळणें. ४ लोणी. ५ विश्वासणें. ६ अत्यल्प काळ.

# प्रेमसरी.

हरिस वंदुनि संत समागमीं । हरि-गुणां वरितों अनुराग मी ॥
सकळ सावध या परिसा रसा । ह्मणुनि लागतसें पॅद-सारसा ॥ १ ॥
कथा-प्रेम-रंगीं तुह्मां श्रोतयांला ! पहा मागतों हेंचि मी दातयाला ॥
अजी आजिचें चित्त सर्वोत्तमातें । समर्पाल तें दीधलें वित्त मातें ॥ २ ॥
न मुरडे जॅळ-वृंद नदीस तो । नदि दिसे च तसा जन दीसतो ॥
न परते क्षण जो पुढिल्या क्षणीं । सफळ तो क्षण जो कमलेक्षणीं ॥ ३ ॥
म्हणोनी हरीच्या कथा-प्रेम रंगीं । अजी आजि रंगा तुम्ही अंतरंगीं ॥
तुम्ही घ्याल तेंव्हां कथा-प्रेम-लाँहो । प्रसंगीं तया लाभ मोठा मला हो ॥ ४
जया गोरसें तृप्ति सर्वां सुरांला । स्रवे गाय ते देखतां वांसुराला ॥
तुह्मी वत्स हे राम-कीर्ती च गाय । द्रवे प्रेम त्यालागिं जो तीस गाय॥ ५॥
अहो वांसुरा स्वाद आधीं सदेवा । तसा प्राप्त तो होमितां होय देवा ॥
तया ऊपरी गाय ज्याची तयाला । म्हणोनी तुह्मां प्रार्थितों श्रोतयांला ॥ ६
जनाच्या मुखीं हो सुखी राम जेंवी । मुखें ब्राह्मणाच्या घनश्याम जेवी ॥
पटीं तंतु ऐसा अहो सर्व भूतीं । तुम्ही संत तों सर्व त्याच्या विभूती ॥ ७॥
तुह्मां वासुरांच्या अजी सन्निधानें । स्रवे हे कथा-कामधेनू निधानें ॥
स्वकर्में मुखें स्वाद घ्यावा रसाचा । न वाटे तथीं दुःख संसार साचा ॥ ८
अजी जें तुह्मां मागतों श्रोतयांला । न देजा तुम्ही सर्वदा दातयांला ॥
मुखीं नाम गर्जोनि हो हस्त-टाळी । बरी वाजवावी अनर्थास टाळी ॥ ९ ॥
करा दूर आलस्य पापीं जळालां । स्रवा प्रेमॅ-धारा-धराच्या जळाला ॥
जळाची तया वोल नेत्रीं जयाच्या । कळा साधल्या त्यास निद्रा जयाच्या॥ १०
करी काय नेत्रांस लावूनि पाणी । स्मरा रे घनश्याम कोदंडॅ-पाणी ॥
घनाच्या तया प्रेम नीरें न वाहे । नये झोप किंवा अविद्या नरा हे ॥ ११॥
तसें जो तुह्मां देखतां सावधानें । स्रवे कीर्ति हे प्रेम गानें निधानें ॥
सुरां तृप्ति तें इंद्रियाग्नींत होमी । तया ऊपरी कीर्तनें धन्य हो मी ॥ १२॥
अॅवस्था-त्रया जीव अज्ञान राहे । तिहींमाजि हे झोप अज्ञा नरा हे ॥
महावाद्य-घोषें वृथा नागवीते । मनीं नागिणी स्वप्निंचे नाग वीते ॥ १३ ॥
अवस्था तिन्ही मूळ अज्ञान सेना । परित्राण या जागृतीला असेना ॥
घडे नाश तीमाजि तीच्या पतीचा । ह्मणोनी न मानी च विश्वास तीचा १४

१ पदकमळ. २ मेघ. ३ लाभ. ४ ठेवा. ५ प्रेम-मेघ. ६ धनुर्धारी. ७ जागृती, सुषुप्ति, स्वप्न.

ज्ञान वीर उठतां भजनाचे । झांकती नयन झोंप जनाचे ॥
कीं हैंषीक जन जागृति सेना । एक भाव दृढ त्यांत असेना ॥ १५ ॥
कुबोधा कडे इंद्रियें भोग-काळीं । सुबोधाकडे कीर्तनाच्या सुकाळीं ॥
न निद्रा तशी स्वामि विश्वास सेना । धण्यावांचुनी इष्ट कोणी दिसेना १६
अशीं इंद्रियें जागृतीचीं डुलावीं । ह्मणोनी त्वरें झोंप नेत्रांस लावी ॥
ह्मणे इंद्रियां भक्ति हे गोड वाटे । कुबोधा तयीं मृत्यु ये त्याच वाटे ।१७।
कवाडें च नेत्रांत येऊनि घाली । अशी झोंप जे देह-दुर्गीं निघाली ॥
घडे घात हा जागृतीनें पतीचा । ह्मणोनी करी झोंप हा लोप तीचा १८
पळे झोंप हा कोट टाकोनि सारे । गडे हो करूं यत्न आतां असा रे ॥
क्षणें नाम-टाळी-ध्वनीच्या उठाणीं । पळों लागती कोट टाकूनि ठाणीं १९
निद्रा पळे जागृति सांपडे हो । सेना तिची नाम-रसीं बुडे हो ॥
अज्ञान राजा झगडां पडे हो । होती सुखी हे मग बापडे हो ॥ २० ॥
देहात्मता केवळ पारखी जे । टाकूनि चिद्रत्न चि पारखीजे ॥
हा कीर्तनाचा महिमा च जाणा । तो जागृतीमाजि घडे सुजाणा ॥ २१ ॥
तूर्या अजी केवळ बोध-सेना । तद्दृष्टिची जागृति जों दिसेना ॥
कुबोध तो दुष्ट रणीं पडेना । निद्रा बळें जे खळ सांपडेना ॥ २२ ॥
सिंह-दृष्टिस न जों दिसे करी । तों गजेंद्र-वध केंवि तो करी ॥
जागृतीस हरि नाम-गर्जना । हेंचि संहरि कुबोध दुर्जना ॥ २३ ॥
मरों न दे जागृति हे कदापी । परी स्वसैन्यास च जे न दापी ॥
फुटे जयीं इंद्रिय-वृंदें-सेना । जिणें कुबोधास तयीं दिसेना ॥ २४ ॥
ह्मणोनि द्यावा अजि लांच कांहीं । सेनेस तीच्या श्रवणादिकांहीं ॥
कर्णांत होईल अहो तनाना । तो लांच दिल्हा स्वर-गीत नाना ॥ २५ ॥
दानें न साधे धरि लोक-रीती । उपाय भेदाख्य तिजा करीती ॥
उपाय सामादिक हे प्रसिद्ध । किजे तशा ही परि कार्य सिद्ध ॥ २६ ॥
नामाविणें जे स्वर गीत नाना । अज्ञान हेतू च वृथा तनाना ॥
नामें हरीचीं जन गाय नाचे । तो मोक्ष हेतु ध्वनि गायनाचे ॥ २७ ॥
महा अपेक्षा रस संनिधानें । पथ्यें चि होतीं बरवीं निधानें ॥
एवं च नामामृत जाय कानीं । कीजे असा भेद उपासकांनीं ॥ २८ ॥
न भेदें जयीं शत्रु साधे निदानीं । वधावा अहो स्फूट साधूनि दानीं ॥
मनीं स्पष्ट एकाचिया हे निघाली । रणीं ते धण्यालागिं आणूनि घाली २९

१ इंद्रिय. २ चैतन्य-रत्न. ३ परकी. ४ चवथी अवस्था. ५ समूह. ६ फितुरी. ७ सभा, (तह) सामोपचार.

लांचावलें इंद्रिय कीर्तनासी । तें हेतु अज्ञान-विवर्त-नासी ॥
तें स्वामि घाताप्रति वाट दावी । प्रसिद्ध हे गोष्टि किती वदावी ॥ ३० ॥
रस स्वाद कर्णीं जसे गायनाचे । तसे नेत्र ही भक्त जो गाय नाचे ॥
तया पाहती लांच तो त्यांस वाटे । पुढें प्रेम भेटीस ये त्या च वाटे ॥ ३१ ॥
रडे जीव कीं प्रेम जें स्व स्वरूपीं । कुबोधें जडें घातलें देह-रूपीं ॥
मुखें गातसे जो असंगा जयाला । शरीरीं च त्या क्षेमे[2] दे गातयाला ॥ ३२ ॥

काळें बहू न वळखे स्वसुतास माय ।
पान्हा फुटे स्तन तटांत तरी न माय ॥
हा गातसे प्रियतमा निज आत्मयाला ।
हें नेणतां सहज रोदन ये तयाला ॥ ३३ ॥

बळें प्रेम ही तें कुबोधें चि बंदी । असे घातलें भोग वार्ता प्रबंदीं ॥
जयीं भेदिती इंद्रियें बोध-राया । कुबोधा न ये शक्ति त्याला धराया ॥ ३४ ॥
डोळ्या वाटे प्रेम तें बोध राया । सामोरा ये पाय त्याचे धराया ॥
जे हाडांचा पाय खोडा न सोसी । स्वात्मा भेटो हे चि त्याला असोशी ॥ ३५

रसें कीर्तनीं भक्त जो त्यास गातो ।
ह्मणे प्रेम आत्मा मला दाखवा तो ॥
द्रवोनी निघे लोचनीं जेंवि पाणी ।
ह्मणे दाखवा **राम** कोदंडपाणी ॥ ३६ ॥

करूनियां इंद्रिय-वृंद पाळी । प्रेमांबुधें हीं च कुबोध पाळी ॥
नामांबु[3] याची अति वृष्टि होते । प्रेमें तयीं पाळ फुटे अहो ते ॥ ३७ ॥
कुबोधास ऐसें जयीं प्रेम सोडी । धरी चित्त **विश्वंभराची** दसोडी ॥
प्रताप प्रभूच्या असा कीर्तनाचा । ह्मणोनी उठा आणि गा कीर्त नाचा ॥ ३८
**अशी** सिद्धि हे ज्या अवस्थेंत होते । तिला पापिणी झोंप झाकी अहो ते ॥
ह्मणोनी अहो जागृती माजि सेना । तिला फोडितां स्वामि तीचा असेना ॥ ३९
अशी फूट होतां च अज्ञान राया । धरूनी अहो राहवेना नरा या ॥
पळे कीर्तनीं दूरि चित्तीं असेना । दुरूनी च धाडी पुन्हा झोंप सेना ॥ ४० ॥
दुरूनी जया झोंप सैन्यास धाडी । गमे नाम टाळी तया राज-धाडी ॥
घडी एक ते राहतां नाम टाळी । शिरे लोचनीं इंद्रियांतें विटाळी ॥ ४१ ॥
ज्या वरी हय दळीं ढकलीते । त्यास मूर्च्छित करी ढकली ते ॥
दापिते दुरुनि जे हरि-दासां । आतळो तरि शके न उदासां ॥ ४२ ॥
देखोनि त्याला मग हाय हाय । ह्मणोनि जो धन्य करी सहाय ॥

---

१ भोंवरा. २ आलिंगन. ३ नामोदक. ४ दशी.

त्यां मूर्च्छतां डाकिनी तों दिसेना । नाशी तिला सावध संत-सेना ॥४३॥
अस्त्राय फट् ह्मणुनी वाजवितात टाळी ।
कीं बीजयुक्त अजि ते जप-विघ्न टाळी ॥
हे गोष्टि तों सकळ मंत्र[1]विदांस ठावी ।
या लागिं नामसह एकसरें उठावी ॥ ४४ ॥
असे आयका बोल ते **वामनाचे** । स्वयें तो चि रंगी जया या मनाचे ॥
जगद्धाम नाचे तयीं काम नाचे । जगीं हारती दोष जे कां मनाचे ॥४५॥
मागें तुह्मां मी रसें-वित्तमांतें । कीं चित्त तें द्या निज वित्त मातें ॥
गातों हरिचे गुण गीत नाना । जें सा[3]र्बेडे ज्यांत नसे तनाना ॥ ४६ ॥
जरी कथेचे रस रंग केले । ते ही कथे लागिं तुम्ही भुकेले ॥
**सुदाम** याच्या पृ[4]थुकांस देव । तसा भुकेला अजि **वासुदेव** ॥ ४७ ॥
असोनियां ही जलधींत शिंपी । मेघ स्वभावें जल त्यांत शिंपी ॥
जो बिंदु तो रत्न चि दिव्य होतो । र[5]त्नाकराचा महिमा अहो तो ॥ ४८॥
पिऊनि ज्याचें जल मेघ नाचे । सिंधूंत त्या बिंदु तया घनाचे ॥
पडोनि जो रत्न क[6]दंब होतो । न होय अन्यत्र विधी अहो तो ॥ ४९ ॥
**स्वाती** विना जो जल मेघ शिंपी । सरत्न तो सिंधु करी न शिंपी ॥
वृथा तुह्मां ही न रुचे तनाना । नामाविणें गीत वृथा तनाना ॥ ५० ॥
एवं तुह्मीं गोड कराल मातें । जो गातसे जी **पुरुषोत्तमातें** ॥
मनीं जयाच्या मग नाम नांदे । वाटे मला हें जग आजि ना दे ॥ ५१॥
तुम्ही सिंधु स्वामी श्रवण **हरि** नामीं पसरले ।
जशा मु[7]क्ता-शुक्ती इतर जन वार्ता विसरले ॥
तयीं नाम स्वाती उदक चि धरावें न दुसरें ।
मदुक्ती त्या मुक्ताफळ करिति जे ऐक चि सरें ॥ ५२ ॥
नेणें चि कांहीं विधि[8] गायनाचे । रंगीं असा ही हरि गाय नाचे ॥
तो मानिला सर्व चि गोड संतीं । कीं कोकिळा-शद्ब जसा वसंतीं ॥ ५३॥
गळा कोकिळेचा जसा श्रीवसंतीं । कळा गोड माझ्या तशा सर्व संतीं ॥
न गोडी वसंताविना कोकिळांला । विना संत तैशा चि माझ्या कळांला ॥५४
न जाणें स्वरा गीत तालानुरागा । अजी जाणतों गीत नामानुरागा ॥
श्रमें मात्र गातों उगें जे जपावें । अशालागिं हा तो महाराज पावे ॥ ५५ ॥
मला **राम** गातां सुख-प्राप्ति होते । गमे कीं समस्तांस होते अहो ते ॥

---

१ मंत्रज्ञ. २ उत्तम रसज्ञ. ३ साधें. ४ पोहे. ५ समुद्र. ६ समूह. ७ मोत्याची शिंप. ८ प्रकार.

नमो गोड रामास कीं गोड भक्तां । न वाटे न वाटे अभक्तां विभक्तां ॥ ९६
अजी ताल संगीत देतील दृष्टी । तयां रंजवावें न ऐसें अदृष्टीं ॥
नयां आवडी श्री-महाराज-नामीं । तयां प्रार्थितों लोक साऱ्यां जनां मी ॥ ९७
ग्रंथ हा चि प्रेम-सरी । विघ्न[2]-मातंग-केसरी ॥
जो भक्तिची गळसरी । पाहावा निशि[3]-वासरीं ॥ ९८ ॥

समाप्त.

---

## नृहरि-दर्पण.

हरि नरहरि-रूपें क्रूर दैत्यां विभक्तां ।
परम सुलभ शांत श्रीकर स्वात्म-भक्तां ॥
स्वचरण शरणातें साम्य ही शीघ्र तो कीं ।
जननि भय निमित्तें मानिजे व्याघ्र तोकीं ॥ १ ॥
नरतनू मुख उत्कट केसरी । कटि-तटीं पिंवळा पट केशरी ॥
परम सौम्य रमा-हृदयांबुजीं । मज असा वरषे स्वदयांबु जी ॥ २ ॥
विषम कारक कोप हरी समीं । करिन वंदन त्या नृहरीस मी ॥
कथिन दिव्य चरित्र-कथा रती । तरति यांत चि जे जन थारती ॥ ३ ॥
वचन अल्प कथा अधिका दिसे । धरिति संत मुखें सनकादिसे ॥
बहुत सूचउनी चिमणों[4] असे । नृहरि-दर्पण यास ह्मणा असें ॥ ४ ॥
ग्रंथ हा नृहरि-दर्पण जाणा । सूचवी बहुत अर्थ सुजाणा ॥
वामनीं त्रिभुवनीं प्रकटावें । यांत ये रिति च पुण्य लुटावें ॥ ५ ॥
जया निर्गुणत्वें स्वसंकल्प नाहीं । करी ईश्वरत्वें जगत्कल्पना ही ॥
स्थितीमाजि ही त्यामधें स्वैर भावें । जगीं त्या च नानावतारीं रमावें ॥६॥
स्वयें कल्पितो जो जगीं कल्प कांहीं । करीतो जनोद्धार-संकल्प कांहीं ॥
ह्मणे म्यां स्वदिव्यावतारीं रमावें । जळीं भूतळीं व्योमें[5] ही आक्रमावें ॥७॥
विना ज्ञान जे भक्त वैकुंठ-वासी । अमुक्त स्थळीं चिंतिलें त्या जिवासीं ॥
तयां माजि ही द्वार-पाळ-द्वयातें । स्वयें जन्म द्यावें गमे अद्वयातें ॥ ८ ॥
न कळतां निज तत्व हि सादर । स्व भजनीं द्विज दोघ सहोदर ॥
धन-निमित्त परस्पर शापिती । द्विरद[6] नक्र[7] हि एक नदीपती ॥ ९ ॥
धरी गंडिकेमाजि हस्तीस पायीं । न सोडी च तो ग्राह कोणा उपायीं ॥

---

१ नशिवीं. २ विघ्नरूप हत्तीस सिंहाप्रमाणें. ३ रात्रदिवस. ४ लहानसा. ५ आकाश. ६ हत्ती. ७ सुसर.

गजें प्रार्थितां नक्र मारोनि चक्रें । हरी सोडवी पाहती देव-चक्रें ॥ १० ॥
शिळा गंडकीच्या तदारभ्य देवें । स्वमूर्ती च केल्या तया वासुदेवें ॥
अमुक्त स्थळीं द्वार-पाळ-द्वयातें । करी कीं न ते जाणती अद्वयातें ॥ ११ ॥
न मोडी अमुक्त स्थळीं कर्म वारें । नव्हे ज्ञान तैसें चि तें दुर्निवारें ॥
तयां यास्तव क्रोध-संस्कार भारी । करी दैत्य इच्छी असें कैठभारी[1] ॥ १२ ॥

द्वारीं तिहीं च सनकादिक मानसांचा ।
केला दुरुक्ति वचनें अपमान साचा ॥
ते शापिती असुर योनिंत त्यांस जाया ।
दोनीं हरी करि च कीर्ति जगीं सजाया ॥ १३ ॥

जय विजय असे ते जावळे हो दितीचे ।
असुर इतर झाले पुत्र-पौत्रादि तीचे ॥
प्रथम उपजला जो धाकुटा बंधु होतो ।
धरणि-धर वराहें मारिला दैत्य हो तो ॥ १४ ॥

बुडे क्ष्मा[2] तयीं ऊद्धरी जो क्षेमलों । तया क्रोडॅ-रूपें हिरण्याक्ष मेला ॥
सखा दूसरा ज्येष्ठ ज्या अग्रजाला । मनीं क्रोध उत्पन्न अत्युग्र जाला ॥ १५ ॥
हिरण्याक्ष नामें वधी क्रोडॅ ज्याला । सखा बंधु साचा च जो त्या दुजाला ॥
मुनी बोलती अग्रज ज्ञान रीती । श्रुतीच्या पथें ज्येष्ठ ज्याला करीती ॥ १६ ॥
दोंत बिंदु पहिला स्थिर होतो । जन्मतो तनुज मागुति हो तो ॥
अग्र जन्म उदरांत जयाला । अग्रजत्व ऋषि देति तयाला ॥ १७ ॥

तो हिरण्यकशिपू प्रिय भावा । कारणें निज तमोगुण-भावा ॥
दाखवी त्वरित ठोकुनि मांडी । द्वेष विष्णु-चरणांप्रति मांडी ॥ १८ ॥

अजर अमर काया आपुली तो कराया ।
तप कारि वर मागे धातयाँ[6] लोकराया ॥
अमृत मज म्हणे हो वेतना चेतना ही ।
मरण हारि असे कीं दोसरातींत नाहीं ॥ १९ ॥

त्या वरें अमर मानव लोकीं । स्वामि तो चि फळ हें अवलोकीं ॥
देव-वृंद अवघा च पळाला । भी लपोनि अवघा चपळाला ॥ २० ॥
ते देव हो प्रार्थिति देवदेवा । कीं आपुले ते पद देवदेवा ॥
झाली बहू बुद्धि अधीरवाणी । तों बोलिली ते अशरीर-वाणी[7] ॥ २१ ॥
कीं हा तपें तोषुनि अब्जजाला । त्याच्या वरें सर्व अवध्य झाला ॥

---

१ सुसर. २ समूह. ३ कैठभ-शत्रू. (विष्णु) ४ पृथ्वी. ५ वराह (डुकर) ६ ब्रह्मा.
७ आकाश-वाणी.

तथापि मारीन चि दुर्धरा या । गांजील माझ्या जयिं भक्तराया ॥ २२ ॥
**प्रऱ्हाद** त्याचा सुत त्या कुमारीं । घडे तयीं द्वेष **मुकुंद** मारी ॥
केव्हां असें होइल हे असोशी[1] । दुःखें बहू तो सुर-वृंद सोशी ॥ २३ ॥
ऐशी प्रतीक्षा हृदयांत देवा । तों दैत्य त्या भागवता सदैवा ॥
पुरोहिताच्या सदनीं च ठेवी । ते शीकवितो अति नीच ठेवी[3] ॥ २४ ॥
एके दिनीं घे सुत दैत्य अंकीं । तो स्नेह त्याचा गणवे न अंकीं ॥
पुसे तया भागवतोत्तमातें । कीं " आवडे जें तुज सांग मातें " ॥ २५ ॥
**प्रऱ्हाद** बोले " सदन त्यजावें । तपोवनालागीं अगत्य जावें ॥
तेथें भजावें **हरि**च्या पदातें । जो आपदांतें हरि दे पदातें ॥ २६ ॥
**दैत्येश्वरा** ! आवडि हे चि मातें । कीं सेवणें **श्रीपुरुषोत्तमातें** ॥
त्यजूनि **विष्णू**सि भजे गृहातें । तो आपला घात करी स्वहातें ॥ २७ ॥
दुःखार्णवीं जो धरि कांस याची । चिंता तयाला मग कासयाची ॥
न वीसरावें चि कदापि त्याला " । **प्रऱ्हाद** इत्यादि वदे पित्याला ॥२८॥
परिसतां **असुरेश्वर** हांसला । मग ह्मणे " कवणें शिशु नाशिला ॥
शिकविलें कवणें अथवा जसें । वदति तें चि मुलें अशि राजसें ॥२९॥
ह्मणे हा कराग्र गुरूनें विचार । स्वयें लेंकरा ठाउका काय चार ॥
**हरी** आमुच्या वाइटाचा भुकेला । तयाचे कुळीं हा जनीं भेद केला ३०
ह्मणी देव होऊनियां भृंग पक्षी । गृहामाजि येऊनियां **विष्णु**-पक्षी " ॥
अशीं नाशिती लेंकरें हो निधानें । द्विजें राहिजे ते स्थळीं सावधानें॥३१॥
गुरूतें असें दैत्य सांगोनि धाडी । तया वाटली गोष्ट हे देव-धाडी ॥
भिऊनी मनीं तर्क नाना करीती । तया पूसती विप्र सामादि-रीती ॥३२॥

" अरे हे **प्रऱ्हादा** ! " गुरु पुसति " कोठून शिकसी ।
कशी होसी प्राज्ञा त्यजुनि तिस तूं स्वैर ठकसी ॥
स्वयें तूझ्या पोटामधिल अथवा बुद्धि उकळी ।
कळी हृत्पद्माची उगवालि कशी घेउनि कळी " ॥ ३३ ॥

ह्मणे **श्रीप्रऱ्हाद** " स्वपर ह्मणिजे भ्रांति उकली ।
केळी ईच्याभूळें असुर-अमरीं आणि सकळीं ॥
कळी हृत्पद्माची उकललि अशी मोह रजनी ।
जनीं ऐशा मूढीं मति न धरितां **विष्णु**-भजनीं ॥ ३४ ॥
स्वपर ह्मणुनि ज्याची मोहिते स्वैरैं माया ।

---

१ अत्युत्कट इच्छा. २ भगवद्भक्त. ३ रीति. ४ मांडीवर. ५ कलह. ६ स्वेच्छ.

स्ववश करि तिला जो षड्गुणत्वें[1] रमाया ॥
नमिन मि **भगवंता** जो तुम्हां आकळेना ।
स्वपर कुमति भेदें तो चि आत्मा कळेना ॥ ३५ ॥
उपाध्ये हो नेणा तुह्मि जरि तया, **श्रीकरधरा**।
धरा पोटीं हें कीं मग न करणें स्पंदें[2] अधरा ॥
धरा[3]-स्वामी चक्रें वधि मम **हिरण्याक्ष** चुलता ।
लता बुद्धीची त्या तरुवरि करी योग भलता ॥ ३६ ॥
शिळे[4] चुंबे लोह* भ्रमत तिस येतां च जवळी ।
वळी माजी तैशी मति हि हरि ते त्यास कवळी ॥
वेळी[5] पोथ्यांच्या या तुह्मि असुर-रीती शिकवितां ।
वितां[6] व्यर्थें काव्यें अलवण **हरीवीण** कविता " ॥ ३७ ॥
**प्रऱ्हाद** बोलोनि असें द्विजांला । जाला उगा ध्यात **अधोक्षजाला** ॥
पुढें न बोले च पुरोहितातें । तातें दिला धाडुनि जो हितातें ॥ ३८ ॥
तों बुद्धि कोपें खवळे द्विजाची । जाची म्हणे " टाकिं कथा अजाची[7] ॥
बाबूल हे चंदन-काननाशीं । नाशील भेटोनि निरंजनासी ॥ ३९ ॥
**प्रऱ्हाद** हा **विष्णु**-कुठार[8]-दंड । दंड प्रसंगें असुरां उदंड ॥
दैत्याचिया चंदन-काननासी । नाशील भेटोनि निरंजनासी " ॥ ४० ॥
भविष्यानुरूपें वदे विप्र वाणी । न ते तर्जना भर्जना लागिं वाणी ॥
असे दंड दुःशब्द दंडें करीती । पुन्हा शीकवीती तया लोक-रीती ॥४१॥
तो रीति ते दानव-वैभवाची । वाचा मनीं च स्मृति माधवाची ॥
बाहेर आणी न अधोक्षजाला । जाला भला हें गमलें द्विजांला ॥ ४२ ॥
बापास तो भेटविती सुतातें । तातें निजांकावरि सुव्रतातें ॥
घेतां सुखाची न दिसे चि वाणी । वाणी वदे राजस मंजुवाणी ॥ ४३ ॥
" बा ! शीकलासि गुरुपासुनि जो पसारा ।
सारा[10] असो तुज रुचे वद त्या च सारा[11]" ॥
गोष्टी वदे कुशल यावरि ज्या पित्याला ॥
त्या लागतील मधुरा न कदापि त्याला ॥ ४४ ॥
श्रवण **हरि**-कथेतें कीर्तनीं गा भजावें ।
स्मरण चरण-सेवा अर्चनीं ही भजावें ॥
नमन करुनि दास्यें सख्य आत्मार्पणातें ।

---

१ समग्र ऐश्वर्य, समग्र धर्म, समग्र यश, समग्र श्री, समग्र ज्ञान, समग्र वैराग्य. २ हलवणें. ३ पृथ्वी-पति. ४ लोहचुंबक. * 'चुंब-लोह' पाठ ५ ओळी. ६ प्रसवतां. ७ ईश्वराची. ८ चंदन-वन. ९ कुऱ्हाडीचा दांडा. १० सगळा. ११ मुख्य (उत्तमांश)

करूनि तरति वाटे सार हें आपणातें ॥ ४५ ॥
हिरण्यकशिपू स्वयें परिसतां अशी वैखरी[1] ।
म्हणे गुरु-सुता तुझी कपट मित्रता हे खरी ॥
पुरोहित वदे "नमीन जन अन्य हा भाव दे ।
अजी सहजें[2] वुद्धि कीं तव कुमार जें जें वदे" ॥ ४६ ॥

"गुरु-मुखें न अरे जरि शीकशी । कुमति उद्भवली तुज हे कशी" ॥
सुत म्हणे "विषयांत सदा पित्या! । अशि न बुद्धि नरासि कदापि त्या ॥४७॥
सार मानित असे विषयांतें । विष्णु-भक्ति गमते विष यातें ॥
न स्मरे हरि तयीं प्रिय वाटे । बोधिला हरि न ये च सुवाटे ॥ ४८ ॥
सर्व प्रयत्नें भजती गृहातें । न सेविती भागवता महातें ॥
गृहाव्रतीं[3] ते मति त्या जनाची । न गोष्टि हे घे भव-भंजनाची ॥ ४९ ॥
जे दीस नेती धन-मान-संगें । कीं रात्रि निद्रा-सुरत-प्रसंगें ॥
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची ॥ न गोष्टि ही घे भव-भंजनाची ॥ ५० ॥
चिंता मनीं नित्य असे गृहाची । त्याला गमे कीं पुरुषार्थ हा ची ॥
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची । न गोष्टि ही घे भव-भंजनाची ॥ ५१ ॥
चिंता मनीं एक वसे गृहाची । चिंतामणी प्राप्त तरी स्पृहा ची ।
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची । न गोष्टि ही घे भव-भंजनाची ॥ ५२ ॥
करोनि पापें भरती गृहातें । जे दोष आरोपिति निस्पृहातें ॥
गृहाव्रतीं ते मति त्या जनाची । न गोष्टि ही घे भव-भंजनाची ॥ ५३ ॥

हरी तंतू आड त्रिभुवन-पटाचा पदर जी ।
असे जो लोळेना नर गुरु-वराच्या पद-रजीं ॥
जडीं दावी ब्रह्म श्रुति निकर त्याच्या च करजीं ।
विदेही देही हो अमर जगदानंदकर जीं ॥ ५४ ॥

हे तों गुरू पाप-तरू ह्मणावे । अंधाहुनी अंध असे गणावे ॥
दे प्रीति कृष्णीं[4] गुरु तो च साच । श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असा च ॥५५॥
पशू जसे चाविति चाविल्यातें । पुनः पुन्हा सेविति सेविल्यातें ॥
कृष्णीं नव्हे प्रीति कदापि त्यांला" । प्रऱ्हाद इत्यादि वदे पित्याला ५६

"करी जो प्रऱ्हाद प्रिय भजन वार्ता च परमा ।
रमा-कांताच्या त्या चरणिं मन पावे उपरमा ॥
रमाया ही वृत्ती हरि च जग होऊनि पसरे ।
सरे द्वैत-भ्रांती स्व-पर-अनुसंधान विसरे" ॥ ५७ ॥

---

१ वाणी. २ स्वाभाविक. ३ गृहरूपी आवर्त म्ह० भोंवरा. ४ ईश्वराची. ५ क्ष.

असें वर्णितां वर्णितां त्या अज्ञाला । पित्याचे च अंकीं समाधिस्थ जाला ॥
अहो तो स्वमांडीवरूनी अभाग्यें । दिला लोटुनी लभ्य जो पूर्वभाग्यें॥५८॥
ताऊनि डोळे अति कोप तापें । "मारा" ह्मणे राक्षस हा प्रतापें ॥
कुपुत्र पोटांतिल रोग वाटे । छेदुनि लावा यम-लोक-वाटे ॥ ५९ ॥
"याचा वधी जो चुलता सखा रे । हा त्या रिपू जी तुह्मि यासि खा रे ॥
दांतें नखें पर्वत शस्त्र-पातें । मारा" ह्मणे राक्षस निस्त्रपातें॥ ६० ॥
"जो विष्णु माझा स्व-पितृव्य हंता । त्यातें भजों केंवि न हे अहंता ॥
वैरी महा आपुलिया पित्याचा । जाणे असें दास तथापि त्याचा ॥ ६१ ॥
मी बाप माझी नलगे च माया । तो आवडे विष्णु कुलाधमा या ॥
हें पांचवें वर्ष चि या कुमारा । तो हा असा सत्वर यास मारा" ॥६२॥
उचंबळे कोप मनीं न साचे । साचे च ते भार हि राक्षसांचे ॥
गदा-त्रिशूळें करिती क्षतातें । तातें स्वयें मारवितां सुतातें ॥ ६३ ॥
ते मारिती बाप ह्मणे चि "मारा । मारा" न लागे तरि त्या कुमारा ॥
न सोडिते खड्ग रुते न भाला । भों लागते कीं तम ही नभाला ॥ ६४ ॥

शस्त्रें क्षतें न करितां अजित-व्रतातें ।
शंका मनीं धरियली अजि तीव्र तातें ॥
तों मारणादि करवूनि अघात पातें
त्यातें वधीन चि म्हणे खळ घात पातें ॥ ६५ ॥

न अग्नि ही माजि अहो जळाला । न मग्न तो ही करवे जळाला ॥
उरावरी आदळि पर्वतातें । केलें उपायांतर सर्व तातें ॥ ६६ ॥
इत्यादि केले जरि घात नाना । तो विष्णु–नामें करितो तनाना ॥
मुखीं मनीं तोचि मनीं हरी तो । नेत्रीं हरी दिग्भ्रम जो हरी तो ॥ ६७ ॥
प्रऱ्हाद इत्यादिक भाव दावी । ती भक्ति त्याची किती हो वदावी ॥
न मृत्यु एवं च कदापि त्याला । वाटे मनीं धाक तयीं पित्याला ॥ ६८ ॥

चिंतार्णवांत बुडतां असुराधमातें ।
वाटे मनीं मरण या च निमित्त मातें ॥
तों नीतिनें करिति ते निजबोध राया ।
कीं बाळ-चेष्टित न योग्य मनीं धराया ॥ ६९ ॥

वडिल शुक्र तपाहुनि ये कवी । तरि सुबुद्धि अशास हि शीकवी ॥
जरि असा तरि बुद्ध चि तो असे । भृगु–कुमार भयें वदती असें ॥ ७० ॥

---

१ मांडी. २ निर्लज्ज. ३ चलता. ४ तेज. ५ आकाश. ६ अन्य उपाय. ७ चिंता-सागर

राजा म्हणे मग तयांच पुरोहितांतें ।
कीं " यास न्या स्वसदनीं शिकवा हितातें ॥
ऐसें करा त्वरित कीं धरि लोक-रीती " ।
नेऊनि त्या द्विजगृहास तसें करीती ॥ ७१ ॥

तेथें मुलें जीं गुरु-गेहं[1]-वासी । तीं योजिलीं सर्व जगन्निवासीं ॥
त्या दैत्य-बाळां गुरु हा चि झाला । जो दाखवीतो स्वसुखा अजाला ॥७२॥
मुलांस ही विस्मय फार वाटे । कीं लागला हाचि कसा सुवाटे ॥
ते पूसती हें तंव या द्विजांला । ठावें न तूंतें गुरु कोण जाला ॥ ७३ ।
प्रऱ्हाद सांगे " स्वपिता तपातें । जाऊनि सोशी हिमें-आतपातें ॥
इंद्रासि मागे विजयी शिराणी । धरूनि ने तो दितिजेंद्र-राणी ॥ ७४ ॥
गर्भांत मी हें भय तीस वाटे । तों भेटला तो मुनिवर्य वाटे ॥
म्हणे ' सतीची हरिसी त्रपा हे । सहस्त्र-नेत्रा ! निज नेत्र पाहें '॥७५।
म्हणे इंद्र ' पोटीं इच्या पुत्र वाटे । तया जन्मतां लावणें मृत्यु-वाटे ॥
प्रतापें दिसे अग्नि-कुंडीं विधूमीं । वधूनी तया सोडवीतों वधू मी ॥७६॥
ऋषी बोलि ' भक्त त्रिभुवन-पतीचा परम हा ।
महा योगी पैं हा धरिसि म्हणि ऐसा नियम हा ॥
महात्मा हा ज्याची अचळ हरि-सेवा-विभव-धी ।
वधी यातें कोण ? प्रभु कवच यातें निरवधी ' ॥ ७७ ॥

इंद्रें भिऊनि नमिली दितिजेंद्र-राणी ।
हो सुप्रसन्न हरि भक्ति अशा शिराणी ॥
जातां सुरेंद्र तिस सांडुनियां सुवाटे ।
केली प्रदक्षिण गुरु हरिभक्त वाटे ॥ ७८ ॥

जननिला च तयीं मुनि-शेखरें । श्रुति रहस्य निरूपियलें खरें ॥
परि मदर्थ अनुग्रह तो करी । उमजला मजला हरि लौकरी ॥ ७९ ॥
उमजला मजला हरि ज्या मुखें । गुरु च तो रुचतो हृदयीं सुखें ॥
शिकवणें कवणें मज त्याविना । निजपणीं जपणी जड दाविना ॥८० ॥
मानूनि मिथ्या न गणी भवासी । होतों बहू वत्सर गर्भ-वासी ॥
भिऊनियां या असुर-प्रसंगा । त्याच्या च या दुर्जन विप्र-संगा ॥ ८१ ॥
प्रपंच मिथ्या परि दुष्ट संगें । वाटे खरासा विषय-प्रसंगें ॥
भ्यावें कुसंगा प्रति साधकानें । न शब्द त्याचा धरिजे स्वकानें" ॥८२॥

---

१ घर. २ थंडी. ३ उष्ण. ४ दैत्यश्रेष्ठ. ५ हे इंद्रा. ६ धूमरहित. ७ ईश्वर. अविनाशी.

देवार्भकां ही हित शद्ब वाटे । समस्त ते लागति त्या च वाटे ॥
हें सर्व ही आयकतां च तातें । पाचारिलें क्रोध-वशें सुतातें ॥ ८३ ॥
गाळी-प्रदानीं न करूनि वाणी । वाणी वदे हो अपवित्र वाणी ॥
म्हणे " मरूं इच्छिसि रे ! निघातें । मारीन जो तूं न भिसी च मातें॥८४॥
मी क्रुद्ध होतां मज लोक सारे । भीती भिसी एक न तूं कसा रे ॥
या शासना लंघुनि दुर्गमातें । कोणा बळें सत्वर सांग मातें" ॥ ८५ ॥
प्रऱ्हाद बोले " जग गांजितोसी । ज्याच्या बळें आत्मपणें जितोसी ॥
रक्षी अनाथा मज ही हरी तो । ज्याला असा बाप चि संहरीतो ॥८६॥

माझें तुझें बळ चि तों इतुकें चि नाहीं ।
त्याचें च कीं बळ असे सकळा जना ही ॥
तूं शत्रु मानिसि तया असुर-स्वभावें ।
तो टाकिं देखसिल त्यास निजात्म भावें ॥ ८७ ॥

जिंकिले म्हणसि लोक हि सारे । त्यांस नागविसि तस्करसा रे ॥
तें न ज्यास वश होति मनीं च । स्वर्ग मृत्यु जित मानिति नीच ॥८८॥
शत्रु सा स्वहृदयीं च रहाती । नित्य नागविति हें न पहाती ॥
शासनें दश दिशांत करीती । देखतों अशि हि कौतुक-रीती ॥ ८९ ॥
चोर सा स्वहृदयांत रहाती । आणि मानिती चराचर हातीं ॥
श्लाघ्यता स्फुट हि ते च करीती । देखतों अशि हि कौतुक-रीती ॥९०॥
सा शत्रु कामादिक तूं निकामी । न जिंकिसी चित्त धरूनि कामीं ॥
कां श्लाघ्यता व्यर्थ तुवां वदावी ।" प्रऱ्हाद इत्यादिक भाव दावी ॥९१।
या गोष्टिनें फार चि तप्त जाला । घे खड्ग बोले मग आत्मजाला ॥
कीं " तूं मरूं इच्छिसि रे ! निपातें । स्वयें असें बोलसि सन्निपातें ॥९२।
शब्दासि या उत्तर हें चि वाटे । कीं तुज लावूं यम-लोक-वाटे ॥
जितोसि तूं हा क्षिण कोण सोसी । मी सोसितों आइक ते असोशी ॥९३
त्रिभुवनेश्वर तो मज वेगळा । तुज गमे सकळांहुनि आगळा ॥
जरि दिसेल अरे मज ये क्षणीं । वधिन त्या च पुढें तुज ये क्षणीं ॥९४
जरि समर्थ असेल तुझा धणी । तरि तुझी पुरवील चि तो धणी ॥
परि वद स्थळ कोण तया असे ,, । म्हणुनि गर्जत शब्द करीतसे ॥९
" असे कोठें तो रे ! तुज बहुत ज्याचे भरंवसे "
" वसे सर्वां ठायीं स्थिर-चर-पटीं तंतु गवसे " ॥
" दिसेना कां स्तंभीं " " मज दिसतसे तो नरहरी ॥

१ बालक. २ कमताई. ३ सदृश. ४ पुत्र.

हरीतो दुष्टांचे त्वरित मद जो एक चि **हरी** " ९६ ॥
"असे स्तंभीं " ऐसें श्रवणिं पडतां शब्द असुरा ।
सुरा-पानी मत्त स्वहित विषयीं जो निजसुरा ॥
सुराधीश-द्वेषें करुनि दृढ खड्ग क्षय-करें ।
करें हाणी मुष्टी करुनि खळ खांबासि निकरें ॥ ९७ ॥
स्तंभ तो अवचितां चि कडाडी । अब्दे झाड अवघें चि तडाडी ॥
अब्जजादि-हृदयांत धडाडी । काळ मेघ-शत-नाद घडाडी ॥ ९८ ॥
खरी कराया निज भृत्य-वाणी । आणी सर्वी व्याप्तिस ही न वाणी ॥
स्तंभीं सभे अद्भुत मूर्ति दावी । मनुष्य ना सिंह न ते वदावी ॥ ९९ ॥
मनुज-रूप नव्हे च न केसरी । सकळ सृष्टि करूं न सके सरी ॥
कनक-वर्ण कटीं पट केशरी । प्रकट होय असा **नर-केसरी** ॥ १०० ॥
पसरित मुख मोठें आंत दंष्ट्रा कराळा ।
परम चपळ जिव्हा खड्ग जैशा निराळा ॥
युगल नयन जाणों तापलें हेम पाणी ।
चहुं भुजिं नख-शस्त्रें देखिला चक्र-पाणी ॥ १०१ ॥
माना मनीं देखुनि दुष्ट भारी । कीं मूर्तिनें या मज **कैटभारी** ॥
मारील कीं जो वर घातयाचा । केला चुकावा बहुधा तयाचा ॥ १०२ ॥
सिंहावरी त्या मद-दैत्य-हस्ती । धांवे गदा घेउनि थोर हस्तीं ॥
पतंग अग्नीवरि जेंवि जातो । हाणी गदा थोर **अधोक्षजा** तो ॥ १०३ ॥
**विधि**-वर-प्रतिपालक जो **हरी** । न दिवसा न निशींत हि संहरी ॥
म्हणूनि युद्ध निशी-मुखीं तो करी । मग वधी बुडतां रवि लौकरी ॥ १०४
अमरतो मरतो अति लौकरि । चपळ तो पळतो धरितां करीं ॥
उखळला खळ लाघव-लक्षणी । विलपती लपती सुर ते क्षणीं ॥ १०५ ॥

आश्चर्य हें **नृहरि** मानुनियां महासें ।
सक्रोध हास्य करि उत्कट अट्टहास्यें ॥
तों झांकिले नयन भ्रांति मनीं निघाली ।
मांडीवरि **हरि** अशास धरूनि घाली ॥ १०६ ॥

" न धरणीवरि मृत्यु न वा नभीं " । वर असा म्हणऊनि च जो न भी ॥
निज तनूवरि त्या खळ-शेखरा । चिरि धरूनि करी वर ही खरा ॥ १०७ ॥
न गेहीं न बाहेर यालागिं दारीं । बसे उंबरा पोट त्याचें विदारी ॥
सजीवें अजीवें मरेना तसा ची । चिरोनी नखें ते करी गोष्टि साची ॥ १०८ ॥

---

१ मद्य. २ दैत्य. ३ मेघ. ४ ब्रह्मादि. ५ सेवक. ६ वाचा. ७ कमताई. ८ सिंह ९ तरवार. १० सोनें. ११ सायंकाळ. १२ श्रेष्ठ.

चळबळे निसटे करि तांतडी । असुर तो **हरि** काढुनि आंतडीं ॥
उदर फाडुनि घालितसे गळां । करि सुमंगळ देव अमंगळा ॥ १०९
चिरुनि वारुनि गंड जसा हरी[1] । असुर मारुनि शोभतसे **हरी** ॥
दितिजे[2] तो गज **केशव** केसरी[3] । इतर साम्य करूं न शके सरी ॥११०॥
दितिज यूथप तो मृति पावला । **असुर** वारण[4]-यूथपिं[5] धांवला ॥
मृतक[6] तें ढकलोनि धरा तळीं । वधि तया **हरि** लाथबुक्यां तळीं ॥१११
पदतळें किति एक नखें करें । तुडविले तनुजेंद्र[7] भयंकरें ॥
असुर-नाथ-नृपासन त्यावरी । "**हरि** बसे परि कोप न सांवरी ॥ ११२ ॥
निववि कोप असे सुर **धातया** । विनविती स्तविती बहुधा तया ॥
**विधि** ह्मणे दुरूनीं च नमो **हरि** । कवण या समयीं मन मोहरी ॥ ११३
स्तविति देव अजी **कनकांबरा** । असुर मारियला म्हणती वरा ॥
परि अनावर कोप **रमा-पती** । सभय लोक चतुर्दश कांपती ॥ ११४ ॥

**विधि** प्रार्थितो तेधवां **श्रीरमेला** ।
ह्मणे " थोर जो दुष्ट तो स्वैर मेला ॥
करीं जाइं माते ! **प्रभु**-क्रोध शांत ।
त्रिलोकी भिती हे दहा ही दिशांत " ॥ ११५ ॥

प्रार्थितां **अमृत-सागरजा** ते । सांवरोनि कनकांबर जाते ॥
जाय पाड किति एक **रमा** ते । तो गमे भय चराचरमाते ॥ ११६ ॥
परततां कच[9]-यंबर नावरे । पदर ही हृदयीं वरि बावरे ॥
स्मरण भाव न शीघ्र तिचा वळे । नयन चंचळ जीभ हि च वळे ॥११७

मग **प्रऱ्हादातें** ह्मणति अवघे भक्त परमा ।
" **रमा ब्रह्मा** कीं न स्वकृत **विभु**-कोपा उपरमा[10] ॥
**रमा-कांता** येना तुजविण दया **दैत्य-दमना** ।
मनाच्या विश्रामा त्वरित करिं गा ! क्रोध शमना " ११८ ॥

ज्याला भिती देव विरिंचि-पद्मा[11] । **प्रऱ्हाद** त्याच्या धरि पाद-पद्मा ॥
जो वंदिला वंदित सर्व भूतें । करी तया दंडवत प्रभूतें ॥ ११९ ॥
बाळकें स्वचरणांबुरुहातें[12] । वंदितां **प्रभु जगद्गुरु** हातें ॥
ऊचलोनि अवलोकुनि ठेवी । मस्तकीं अभय हस्तक ठेवी ॥१२०॥

**कर-स्पर्शें** झाले परम सुख तें दैत्य-तनया ।
न या संसाराचें स्मरण उरलें त्या सुविनया ॥

---

१ सिंह. २ दैत्य. ३ सिंह. ४ हत्ती. ५ कळपाचा स्वामी. ६ प्रेत. ७ दैत्य. ८ लक्ष्मी ९ केश व वस्त्र. १० नाश. ११ लक्ष्मी १२ कमळ.

न ये नेत्रीं दोनीं श्रवणिं न निघे शब्द सगळा ।
गळा दाटे प्रेमें त्वरित हरि जो मोह सगळा ॥ १२१ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नौपाडा ठाणे.

**प्रऱ्हाद** याउपरि होउनि सावधान ।
प्रेमें स्तवी **त्रि-भुवनेश** दया-निधान ॥
" **ब्रह्मादि** सात्विक तयां कळशी न देवा ! ।
मी तों " ह्मणे " असुर राजस **वासुदेवा** ! ॥ १२२ ॥

भक्ती करूनि तुज गाय **अधोक्षजाला** ।
झालासि तूं स्वपद-दायक त्या गजाला ॥
मारूनि नक्र गति दे द्विरदा तयाला ।
यालागिं मी स्तवितसें वर-दातयाला ॥ १२३ ॥

मुखांतूनि नक्राचिया कुंजरासी । जसें सोडवीलें कृपा-पुंज-रासी ॥
तसें सोडवीलें मला देव-देवा । पित्याच्या करापासुनीं **वासुदेवा**" ॥ १२४ ॥

**प्रऱ्हाद** इत्यादि करी स्तुतीतें । अर्पी **नृसिंहासि सरस्वतीतें** ॥
कृपा तया ऊपरि देव दावी । यानंतरें ते चि गमे वदावी ॥ १२५ ॥

ऐशा स्तुतीनें **हरि** तुष्ट झाला । बोले कृपेनें असुरात्मजाला ॥
कीं " वर्णितां या निगमागमातें । संतोषलों मी, वर माग मातें " ॥ १२६ ॥

ह्मणे **श्रीप्रऱ्हाद** " त्रिभुवन चि हें लोभकर जी ।
रजीं मातें घाली ह्मणि म्हणुनि हा शब्द वरजी ॥
रजीं या पायाच्या सुख कवण नाहीं मज **हरी** ! ।
हरी दुःखें सारीं तव गुण कथा **श्रीनरहरी** ॥ १२७ ॥

अंतरीं धरूनि पूर्ण रिरिक्षा । पाहतोसि निज *भक्त परीक्षा ॥
अन्यथा **स्वभजन** भाव न नासी । कां वदे करूण त्या वचनासी ॥ १२८ ॥

स्वामीस जो वेंचिल काम्य वाणी । वाणीज ते भक्ति हि दीनवाणी ॥
वाणी च कां सेवक वेतनाचा । निष्काम तो पंथ पुरातनाचा ॥ १२९ ॥

जशी लौकिकी भक्ति भृत्याजनाची । तशी क्षुद्र देवांस हो पूजनाची ॥
न तूं स्वामि तैसा नव्हे भृत्य कामी । वरा अल्प यालागिं मागें न कामी ॥ १३० ॥

म्हणसि माग चि जी **कमळाधरा** ! । त्वरित दे तरि या अमळा वरा ॥
किमपि ही उपजे च न कामना । करिं असें **विधिच्या** जनका ! मना ॥ १३१ ॥

मनीं उद्भवे जेधवां काम कांहीं । तयातें करीं तेज लज्जादिकांहीं ॥
तनू प्राण सर्वेंद्रियां कष्ट भारी । जळाला करीं काम हा **कैटभारी** ! ॥ १३२ ॥

१ कृपा. २ रजोगुण. ३ पूर्ण. ४ रक्षण करण्याची इच्छा ( [illegible] ) ५ इच्छा
* ' भृत्य ' पा० भे०.

सकळ काम मनामधुनी च जी । सुख अपार तयास चि सत्य जी ॥
वर चि देशिल जी तरि लौकरी । न उपजे मनिं काम असें करीं॥१३३॥
**प्रऱ्हाद**-शब्दें **हरि** तुष्टला हो । ध्यावा ह्मणे हा चि यथेष्ट लाहो ॥
**लक्ष्मी**-पतीचें मन जो हरीतो । बोले असा त्यास वदे **हरी** तो॥१३४॥
"कीं बोल हे सत्य न अन्यथा रे ! । मद्भक्ति चित्तांत न अन्य थोरे ॥
ज्याला असें कांहिं न पाहिजे तें । त्याचें असें मी मनिं पाहिजे तें॥१३५॥

ऐसें तथापि जिस सिंधुचिया च पौळीं[3] ।
पौळी स्वभूमि फळ हें तुझिया कपाळीं ॥
पाळीं तुझी ह्मणुनि सर्व वसुंधरा या ।
राया ! तुतें इतर योग्य न तें धराया ॥ १३६ ॥

एकाहात्तर चौकड्या कलि-कृत-त्रेता-युगीं द्वापरीं ।
हें **मन्वंतर** काळ एक इतुका जो होय या ऊपरी ॥
**प्रऱ्हादा** ! इतुकीं युग अधिक ही कांहीं तुझ्या शासनीं ।
पृथ्वी सर्व असो म्हणे **नरहरी** कीं, बैस सिंहासनीं ॥१३७॥

त्या माजि माझी स्मर हे कृपा कीं । या पूर्विंच्या पातक पुण्य पाकीं ॥
उद्विग्न दुःखी न सुखी स्पृहा ही ॥ ऐसें असावें तरि निस्पृहां हीं॥१३८॥

स्पृहा-द्वेष-त्यागें अनुभोव अहो योग भलता ।
लता[9] प्रारब्धाची असि च जरि तोडी कुशलता ॥
वदे **प्रऱ्हादातें हरि** कुशल भागा समज गा ! ।
जगामध्यें ऐसे तुम्हि सकळ मद्भक्त मज गा ॥ १३९ ॥

नद्दीं ही चिद्रूपा कपट-पट तंतूस मज गा ।
जगामध्यें पाहें **हरि**-सुमन[10]-हारा न भुजगा ॥
जगाया या लोकीं भजन गुण गातो सतत रे ! ।
तरे त्याचे पायीं जन भव नदी-पार उतरे ॥ १४० ॥

प्रपंचाच्या त्रासें वनिं वसति कीं मौन धरिती ।
तरी त्यांची भेटी क्षय भव-भयाचा न करिती ॥
व्रती या गोष्टीचे बुध असति कीं विष्णु भजनीं ।
जनीं जाणावे ते रवि हरिति अज्ञान रजनी[11] ॥ १४१ ॥

घे भक्ति ही मुक्ति हि भक्त-राया । दे मुक्ति ही अन्य जना तराया " ॥
**प्रऱ्हाद** माथां धरि शासनातें । अंगीकरी तात-नृपासनातें[12] ॥ १४२ ॥

१ इच्छा. २ टिके. ३ समुद्र. ४ तीर ५ रक्षण. ६ पृथ्वी. ७ आज्ञेंत. ८ परिणाम
९ वेल. १० फूल. ११ रात्र १२ सिंहासन.

स्वपितयास न हो अधमा[1] गती । ह्मणुनियां विनवी शिशु[2] मागुती[3] ॥
हरि म्हणे " सुत ज्यांस असा असे । सुगति पावति पातकि ही असे ॥ १४३
एकवीस निज पूर्वज सारे । उद्धरी सुत होतां तुजसा रे ! ॥
सत्क्रिया करिं तथापि तयाची । ज्यां तनू चिरियली पितयाची ॥ १४४ ॥
या परी निज कृपा-अवलोका[4] । दाखवूनि अपुनर्भव लोकां ॥
तें चि हें चरित लोक तराया । ठेविलें भव-नदी उतराया ॥ १४५ ॥
भुक्ति मुक्ति अशि दाखवि भक्ता । वामनें मन तया अविभक्ता ॥
अर्पिलें करूनि अर्पण बोला । ग्रंथ हा नृहरि-दर्पण बोला ॥ १४६ ॥
नृहरि थोर लहान हि दर्पण[5] । प्रभु तयांत करी स्वसमर्पण ॥
इतुकियांत चरित्र समस्त कीं । जनिं धरू सुपुरूष हि मस्तकीं ॥ १४७
बोलतों करूनि अर्पण बोला । ग्रंथ हा नृहरि-दर्पण बोला ॥
वामनें त्रिभुवनीं प्रगटावें । यांत ये रिति च पुण्य घटावें ॥ १४८ ॥

समाप्त.

---

१. नीच. २. बालक. ३. पुनः ४. दृष्टि. ५. आरसा.

20288

# स्थालिपाक.

**पांडूचे** सुत **द्रौपदी** सहित ते होते जया काननीं ।
तेथें शिष्य दहा सहस्र सम तो **दुर्वास** आला मुनी ॥
क्रोधें तो स्फुट बोलिला निज मुखें दे अन्न ऐसें तिला ।
नेलें सत्व असें चि जाणुनि मनीं तीनें **हरी** चिंतिला ॥१॥
ये ये येइं **रमा-पती यदु-पती गोपी-पती गो-पती** ।
हे **दामोदर दैत्य**-भंजन दया प्रार्थोनि घे मत्पती ॥
ये भक्तांबुज-पद्मिनी-निशिपती विद्वत्पती वाक्पती ।
दुग्धाब्धींत हि विव्हळा सुरपती काढीं मला **श्रीपती**॥ २ ॥
ये ये ये करुणाकरा सुखकरा ये ये **कृपासागरा** ।
ये ये मन्मथसुंदरा **धरधरा विश्वंभरा भूधरा** ॥
ये गोपीजन सागरा गुणवरा ये सर्व अभ्यंतरा ।
ये माझ्या निज मंदिरा सुखकरा पाळीं मला **श्रीधरा** ॥३॥

हे द्वारकावासि सरोज-नेत्रा ! । कोठें अहेसी वद **नंद**-पुत्रा ।
ऐशी अवस्था मज प्राप्त झाली । तूं आसतां नाथ अनाथ झालीं ॥४

तेव्हां सुभाव धनुओढूनियां करानें ।
तो विंधिला श्रवणिं हो करुणा-शरानें ॥
भेदूनि तें स्थळ उरावरि जो निजेला ।
झाली बहू गमनिं तातडि त्या **अनाला** ॥ ५ ॥

गलद्वसन सांवरी पडत हो **हरी** आंवरी ।
पडे चि धरणीवरी त्यजुनि खेचरी **केसरी** ॥
कृपांबु नयनांतरीं तिलक तो हि निद्रा हरी ।
दयांबुधि तया परी त्वरित पावला **श्री हरी** ॥ ६ ॥

कृष्णे ! आजि मला क्षुधा धडधडी दे अन्न कांहीं तरी ।
बोले **द्रौपदि** नाहीं **कृष्ण** वदला पाहें स्वपात्रांतरीं ॥
तेणें निर्मित एक पत्र **हरिच्या** हस्तांबुजीं अर्पिलें ।
तेणें तृप्त समस्त विश्व अवघें होऊनियां राहिलें ॥ ७ ॥

**समाप्त.**

---

१ वन. २ चंद्र.

# राधा-भुजंग.

हरीचा वियोगाग्नि-संताप राधा । न सोसूनियां आठवी स्वापराधा ॥
सखी एक दूती प्रिया फार तीची । बहू शाहणी मूर्ति जे भारती[1]ची ॥१
करी तीस काकूळती सारसाक्षी[2] । ह्मणे भेटवीं सर्व संसार-साक्षी ॥
हरीवीण जाल्यें बहू दीन माये । त्रिलोकीं सये दुःख माझें न माये ॥ २
सदानंद जो सर्वदा मोद[3]राशी । तया भेटवीं आजि दामोदरासी ॥
त्वरें आणिं वो तो सये दैं[4]नवारी । जयावीण कोणीच खेदा न वारी ॥३
वियोगाग्नि जाळी मला केशवाचा । न बोलों शके ते सये क्लेश वाचा ॥
न तें सांगवे दुःख जें काम दे हा । त्वरें आणिं वो त्या घन-श्याम-देहा ॥३
तनू जाळितां त्रास येना शशीला । प्रभा तावि तो ये सये नाश शीला ॥
उरें वीझतां जाळ भा[5] विं[6]गळांची । फुलांची तशी माळ भावी गळ्यांची ॥५
दिशा तावितो चंद्रमा आजि दाहा । असा निर्मितो या तनूमाजि दाहा ॥
नव्हे चंद्रमा कोण कोणी वदेना । सुधा[7]-रश्मि तो या परी ताप देना ॥ ६
न ये नीरं[9]द-श्याम तो मी न जेवीं । नदी शुष्क तीमाजि तो मीन[8] जेवीं ॥
तृषा लागली नाथ-ओष्ठामृताची । शरीरासि ज्यावीण निष्ठा मृताची ॥ ७
सये कृष्ण-उत्कंठित प्राण कंठीं । धरूनी बळें काळ निर्वाण कंठीं ॥
ह्मणे भर्वशानें तुझ्या प्राण वाहें । खरें हें म्हणोनी तिची आण वाहे ॥ ८
दुजी कोण तत्पाद-रा[11]जीव दावी । वृथा अन्यथा गोष्टि कां हो वदावी ॥
वदे लोचनीं नीरें[12] सक्लेश वाहे । अवस्था ह्मणे सांग वो केशवा हे ॥ ९
अशी राधिका बोलतां दीन वा[13]णी । भरे कंठ झाली पराधीनवा[14]णी ॥
धरूनी तिला पोटिशीं दूतिका ही । रडे आणि सांगे तिला नीति कांहीं १०
ह्मणे खोडि खोटी तुम्हां मानिनींची । पुढें तूं तरी बुद्धि ही मानिं नीची ॥
हरी दुःख त्या नाग[15]-न[16]क्रोद्धरासी । नको दाखवूं साजणी क्रोध-राशी ॥११
धरी मत्स्य-कूर्मादि रूपें दहा हा । तया ही वरी कोप केला अहा हा ! ॥
धरी पाठिशीं सागरीं मंदरासी । हरी तो चि कीं हा चिदानंद-राशी १२
जगन्नाथ जो कृष्ण नानावतारी । स्वयें होउनीयां जना नाव तारी ॥
हरि काम-कोपादिकां साजणासी† । नको कोप त्या तारका साजणासी* १३

---

१ सरस्वती. २ कमलाक्षी. ३ आनंदपुंज. ४ दैत्यशत्रु. ५ शोभा. ६ निखारा. ७ अमृत. ८ किरण. ९ मेघ. १० मासा. ११ कमळ. १२ पाणी. १३ शब्द. १४ सदृश. १५ हत्ती. १६ सुसर. † सहा जणांस ( षड्रिपूंस ). * हृदयवक्रभास.

खगेंद्रा[17] अहींद्रा[18] नुरे जेथ दावा । तया दाविशी कोपरूपाग्नि-दावा ॥
वनामाजि निर्वैर त्या व्याघ्र-गाई । कसा क्रोध त्याशींच तूझा अगाई! १४
तरी क्रोध तूं टाकिं वो स्वापराधें । करीना हरी तूजशी कोप राधे ! ॥
स्वयें जातसें मीच आधीं वनातें । त्वरें आणितें त्या जगज्जीवनातें ॥१५॥
ह्मणे दूतिका टाकिं या काळजीला । त्वरे आणितें शीघ्र गोपाळजीला ॥
वदोनी असें चालिली काननातें[19] । वनीं देखिलें त्या मृगांकानना[20]तें ॥ १६ ॥
शिरीं पाय त्या गोप-कांता-पतीचे । नमूनी वदे क्लेश संताप तीचे ॥
ह्मणे चूक तीची क्षमा देवराया ! । करूनी पुन्हा पाय हे दे वराया॥१७
जरी चूक झाली तरी राधिकेला । नव्हे योग्य हा जो तुम्ही औधि[21] केला ॥
तुतें मी ह्मणों काय हो लोक-पाळा । असे बोल आह्मां स्त्रियांचे कपाळा १८
वियोगें तुझ्या वर्जिलें अन्न-पाणी । मुखातें सदा वाहते खिन्न पाणी[22] ॥
करें पूर्ण तारा[23]-पती अर्द्ध जाला । घना दाट त्या ही वरी मूर्द्ध[24] जाला ॥ १९ ॥
मुखीं सर्वदा गुंतला एक पाणी[22] । दुजा तर्जनी[25]नें हरी शोक-पाणी ॥
तरी काय सांगों तिच्या मी कराची । प्रभा जो धरी तप्त चामीकराची[26] २०
सुधे[27] तुल्य पाजोनि दंत[28]-च्छदासी । कशी आजि केली जशी तुच्छ[29] दासी॥
नसे पाड जेथें जगत्स्वामिनीचा । तया काय लेखा[30] अशा कामिनीचा॥२१
तथापि स्त्रिया भाग्य-युक्ता सदैवा । भजों तूज ज्या नित्य मुक्तास देवा ! ॥
मनीं काम या बायकांचे च पेटे । तुम्हांला न तत्सायकांचे[31] चपेटे[32] ॥ २२
जरी प्रीति हे होय देवा नराशी । तरी नाचवूं जे रिती वानरासी ॥
कुयुक्ती वृथा ये स्थळीं भामिनीची । प्रभा चंचळा जेंवि सौदामिनी[33]ची॥२३
म्हणोनी च टाकोनि सर्वा उपायां । सकामा तरी सेवितों या च पायां ॥
असे बोल बोलोनियां पाद-पद्मा[34] । धरी मस्तकीं ज्या पदीं नित्य पद्मा[35] ॥ २४
असा प्रार्थुनीयां हृषीकेश[36] वाचे । धरी पाय सप्रेम त्या केशवाचे ॥
घरा भक्ति-भावें सखा चालवीला । न अन्या नरा सारिखा चाळवीला ॥२५॥
करूनी क्षमा सर्व राधाऽघराशी* । हराया तिची काम-बाधा घरासी ॥
तिच्या चालिला दूतिका-हस्त हस्तीं । धरूनी जसा चालतो मत्त हस्ती ॥ २६
प्रतीक्षा करी मंदिरीं कंबु-कंठा[37] । त्रुटी[38] जे युगाहूनियां थोर कंठा ॥
शुभें सूचती तों अकस्मात तीला । ह्मणे दूतिका आणिते श्री-पतीला ॥ २७

---

१७ गरुड. १८ सर्पश्रेष्ठ. १९ वन. २० चंद्रमुख. २१ मनोव्यथा. २२ हात. २३ चंद्र. २४ केश. २५ आंगठ्या जवळचें बोट. २६ सोनें. २७ अमृत. २८ ओंठ २९ नीच. ३० हिशेब. ३१ बाण. ३२ तडाखा. ३३ वीज. ३४ कमळ. ३५ लक्ष्मी. ३६ हृषीक = इंद्रिय + ईश = स्वामी. = जितेंद्रिय. * पापराशि. ३७ शंख. ३८ अत्यल्प काळ.

म्हणे लोचनाचें लवे सव्य[३९] पातें । पाहायासि लोक-त्रयांच्या नृपातें ॥
खरें आजि भेटेल मांडीस मांडी । म्हणूनी स्फुरे भावि उल्हास मांडीं ॥ २८
म्हणे कृष्णजी आजि दृष्टी पडावा । भुजांमाजि माझ्या हरी सांपडावा ॥
हरीचा रती-संग तो ही घडावा । शुभीं सूचकीं अर्थ हा ऊघडावा ॥२९
असा हर्ष मानूनियां गोपदारा । उठे जाय बाहेर तत्काल दारा ।
पहाते बहू दूर न्याळूनि दृष्टी । ह्मणे लाभ आहे मला हा अदृष्टीं[४०] ॥ ३०
अकस्मात तों मूर्ति **गोविंदजीची** । दिसे पुत्रता मानि जो **नंदजीची** ॥
पहाते प्रिया ती प्रियाचे मुखासी । त्रि-लोक मधें दाटि जाली सुखासी ॥३१
भुजीं कंचुकी फाटताहे तडाडां । करीं कंकणें फूटती ही कडाडां ॥
पुढें होउनी तत्करांभोरुहातें[४१] । उरोजीं धरी गाढ रंभोरु हातें ॥ ३२ ॥
धरामाजि नेऊनियां ये रितीनें । **मुकुंदा**सि आलिंगिलें गाढ तीनें ॥
वियोगें तुझ्या दीन मी **चक्र-पाणी**[४२] । म्हणे तों भरे लोचना माजि पाणी[४३] ॥ ३३
पुशी **चक्र-पाणी** करें अश्रु तीचे । जया वर्णिती वेद वृंद श्रुतिचे ॥
करी जो स्वदासाचिया ध्वस्त काळा । जळें कज्जळें तो तिच्या हस्त काळा ३४
शिरीं वंदिती वेद पादांबु ज्याचें । पुशी तो तिचे नीरें[४३] नेत्रांबुजांचे[४४] ॥
कुचाग्रा[४५] वरी बिंदु जे कां जळाचे । पुशी थेंब काळे निळे काजळाचे ॥ ३५
हराया तिचे सर्व ते कष्ट भारी । करी मुक्त-नीवी तिला **कैटभारी**[४६] ॥
धरी सर्व जानूवरी भार तीचा । समारंभ ऐशा रिती त्या रतीचा ॥ ३६
स्वयें फेडुनी शीघ्र चोळीस तीच्या । कुचाग्रां करें शीघ्र चोळी सतीच्या ॥
उरोजीं रतीं सर्वदा हस्त नाचे । तिचे नीववी सर्व दाह स्तनाचे ॥ ३७ ॥
कुचाग्रां वरी हार मुक्ताफळांचा ॥ रतीं शोभतो **श्रीहरीच्या** गळांचा ॥
शिळा गंडकी मूर्ति पुष्पायुधाची । वरी माळ ते शंख-धारा दुधाची ॥ ३८
रति-स्वेद शुद्धाभिषेकासि पाणी । करी तेथ निर्माण शंखाब्ज[४७] पाणी ॥
यजी कृष्ण मूर्ती तशी चूचुकांची । रती माजि ही भक्ति दावीत साची ३९
जया अंबरीं स्पर्श भूतां बराचा । न मूर्तीस या स्पर्श दंतांबराचा ॥
कटी सूक्ष्म **राधा** वयें धाकुटी ते । शिळा-भार वाहे उरीं संकटीं ते ४०
जगद्व्यापका मन्मथा काय जी तो । स्तन-द्वंद्व-रूपें हरी तो यजीतो ॥
जगीं जे स्थळीं द्वंद्व संपुष्ठ होतो । पहा देव तो ते स्थळीं स्पष्ट हो तो॥४१
करी गोपिका-संग-लीला **हरी** तो । जिणें विश्व-पापावलीला हरीतो ॥
पदें पावती वर्णितां उंच देही । रते तो व्रज-स्त्री-सरोमांच-देहीं ॥ ४२ ॥

---

३९ डावा. ४० नशीब. ४१ कमळ. ४२ हात. ४३ जल. ४४ नेत्रकमल. ४५ स्तन. ४६ कैटभ=शत्रु. ४७ कमल.

रती काम देहीं समारंभ भारी । रती-नाथ रोमा गुढ्या हो उभारी ॥
स्मरें क्रीडतां ये रिती संग जाला । गमे तो चि अष्टादिकां अंगजाला ४३
नगांचे पदीं घोष एके चि काळीं । सुवाद्यें च कीं त्या सुखाचे सुकाळीं ॥
ध्वनी ते सुरांच्या चि वाजंतरांचे । न त्या उत्सवीं नाद वाद्यांतरांचे ॥४४
नर श्रांत देखोनि पुंभाव-रीती । रतज्ञ स्त्रिया भोग-काळीं करीती ॥
ह्मणोनी प्रिया आपणा सांवरूनी । करी त्या रतीच्या विलासा वरूनी॥४५
जसें वर्णिती काम-शास्त्रीं निबंधीं । यथापूर्व बाधा न सोडूनि बंधीं ॥
अकस्मात घाली तळीं श्री-पतीतें । वरूनी करी ऊफराटे रतीतें ॥ ४६॥
स्थिर ब्रह्म तेथें चल स्वैर माया । तिहीं घेतलीं दोन रूपें रमाया ॥
न हाले हरी त्यावरी गोप-दारा । करी रम्य चांचल्य-लीला उदारा ॥४७
उठे ऊफराट्या विलासा चि माजी । असे घोष तो मेखळांचा समाजीं ॥
तिच्या उत्तमांगाहुनी उत्तमांगीं । फुलें वर्षती आणि सर्वोत्तमांगीं ॥ ४८ ॥
उभारी हरी छत्र मीन-ध्वजाचें । हराचे भयें राज्य विध्वंस्त ज्याचें ॥
बहू वर्षले देव देखोनि दृष्टी । पडे ब्रह्म-लोकाहुनी पुष्प-वृष्टी ॥ ४९ ॥
स्मराचा रथ स्वामि गोपाळ साजे । ध्वजीं राधिका मीन-नेत्री विराजे ॥
पताकांसि दृष्टांत तीच्या कुचांचे । वरी बांधिले गुच्छ भारी कचांचे ॥५०
हरी ऊर्ध्व-रेता द्रवे गोप-जाया । रमे जो तिचा शोकसंताप जाया ॥
जयाला न ये भोगआल्हाद-वार्ता । निवे ते च कामाग्निनें जे दवार्ता ॥५१
रतांतीं तिच्या त्या सुखाच्या समुद्रा । पडे वर्णितां मौन्य वाचेस मुद्रा ॥
सुखीं मग्न होतां चि आत्मा सतीचा । नुरे स्फूर्ति राती मध्यें ती सतीच्या५२
निजानंद-सिंधूमधें जेंवि योगी । सुखें मज्जती कल्पनेच्या वियोगीं ॥
गळां हस्त वक्ष-स्थळीं कृष्णजीचा । रतांतीं दडे काम तो पूर्ण जीचा५३
जरी टाळिल्या कामना वामनानें । कथा वर्णिल्या विश्व-नावा मनानें ॥
जरी निर्गुणात्मत्व दे देव तारी । मना आवडे कृष्ण लीलाऽवतारी ॥ ५४
न या तों कथा मन्मथानायकांच्या । जगोद्धारका द्वारका-नायकाच्या ॥
सकामां जरी श्रोतयां काम वाटे । तरी चित्त लागे घन-श्याम-वाटे ॥५५
ह्मणोनी च वर्णीतसे वामनाची । अशी वैखरी हे चि सेवा मनाची ॥
अहो चाळितो जो हृषीकेश वाचा । असा निर्मिला ग्रंथ या केशवाचा॥५६
कथा वर्णिली हे भुजंगप्रयातें । असे वर्णिलें जेथं राधाप्रियातें ॥
असें नांव राधा-भुजंग प्रबंधीं । हरी कीर्तनें वर्णनें क्षिप्र बंधा ॥ ५७ ॥

समाप्त.

---

३८ आठ सात्विक भाव (शरीरज) ४१ दागिना. ५० मस्तक. ५१ कृष्ण-शरीर. ५२ नष्ट. ५३ ब्रह्मचारी. ५४ प्रकरण. ५५ सत्वर.

# सत्यभामा-विनोद.

अंगुल्या कः कपाटं प्रहरति ? कुटिले ! माधवः किं वसंतो ? ।
नो चक्री किं कुलालो[1] ? न हि धरणिधरः किं द्विजिव्हः फणींद्रः ॥
नाहं घोराहिमर्दी किमपि खगपति[2] ? नो हरिः किं कपींद्रो ?
इत्येवं सत्यभामाप्रतिवचनजितः पातु वः पद्मनाभः ॥ १ ॥
येतां देखोनी सद्मा[3] यदु-कुल-तिलका सत्यभामा विनोदें ।
दे[4]वोनी द्वार तेव्हां समरसलिलया लागि ठाके प्रमोदें ॥
कृष्णें बोटें कपाट[5]-प्रहरण करितां बोलिली सानुरागें ।
द्वारातें अंगुलीनें प्रहरण करिशी कोण तूं सत्य सांगे ॥ २ ॥

हरि म्हण कपटी हो ऐक तूं सत्यभामे ।
भ्रम तुज बहु आहे भूलशी देह धर्मे ॥
अभिनव अभिमानें नेणशी कोण मातें ।
भव-नट नटला जो माधवो नाम ज्यातें ॥ ३ ॥

बाला सत्रा[6]जिताची पुनरपि पुसते माधवो कोणता तूं ।
कंद[7]र्पाचा सखा जो कुसुमनिधि कृती क्षांतिला कीं वसंतू ॥
हा काळो शार[8]देचा सुख करि सकळां नाहिं गेला हिमंतू[9] ।
येथें येणें अकाळीं अवचित घडलें सांग पां कोण हेतू ॥ ४ ॥
ऐसें प्राण-प्रियेचें वचन परिसतां बोलिला कृष्णनाथ ।
जो कां लीलाविलासी निज-जन सुख दे इंदिरा[10]-प्राणकांत ॥
मुग्धे वैदग्ध्य[11] सोडीं म्हणसि मज झणीं पुष्प-छंदें वसंत ।
जोकां प्रख्यात चक्री खल-दळ समरीं जाणिजे तो चि कांत ॥ ५ ॥

श्रवण करुनि सत्या वाक्य विश्वंभराचें ।
म्हणसि कवण चक्री होसि गा कोण मातें ॥
घडिशी बहु घटातें काय होशी कुलाल[12] ।
मज तंव तुजशीं गा कार्य नाहीं च चाल ॥ ६ ॥
अमृत मधुर तीचें वाक्य कृष्णासि वाटे ।
पुनरपि वदताहे बोलसी कंवि खोटें ॥

---

१. कुंभार. २. गरुड. ३. गृह. ४. लावून. ५. दार. ६. सत्यभामेच्या बापाचें नांव ७. मदन. ८. शरदृतु. ९. हेमंतऋतु. १०. लक्ष्मी. ११. शहाणपण. १२. कुंभार.

म्हणि ह्मणति कुलाला रूसणें कोण कैसें ।
धरणिधर असा जो जाण मी तो चि ऐसें ॥ ७ ॥
यदुपति वचनांतीं बोलिली सत्यभामा ।
धरणिधर असा जो सांग तूं कोण आम्हां ॥
अगुण सगुण बोलीं पावला द्वैत जिव्हा ।
फणिधरवर शेषो येथ आलासि केव्हां ॥ ८ ॥
लक्ष्मी-कांत वदे तियेसि पुढती नोहे प्रिये मी फणी ।
चातुर्यो बहु वाटतें ह्मणउनी हे आमची साजणी ॥
आह्मी घोर-फणींद्र-मर्दन नगीं प्रख्यात हें बोलणें ।
जिव्हा एक चि आमुतें शरण जो आला तया पाळणें ॥ ९ ॥
यदुपति-मुख-चंद्रीं चांद्रिका वाक्य पाहे ।
श्रवणपुट-चकोरां सेवितां तृप्ति नोहे ॥
म्हणउनि पुसताहे कोण तूं सर्प-हंता ।
खगपति विनतेचा[1] पुत्र पीयूषहर्ता[2] ॥ १० ॥
गोपी-वल्लभ मागुती रमणितें बोले प्रिये ! धन्य तूं ।
जो कां सौभाग्य-वैभवो (?) मज सवें नाना परी हास्य तूं ॥
नोहें मी खगराज[3] गे भव हरी जाणें प्रिये ! सत्य तूं ।
ऐसें देवकि-नंदनू सुवचनीं सत्येप्रती बोल तूं ॥ ११
पद्माक्षी पुसती हरी कवण तूं त्वद्दास वृक्षावरी ।
होसी वानर तूं तरी झडकरी जाईं वनाभीतरीं ॥
जो देवां श्रुति-स्मृतींस न कळे जो योगियां नातळे ।
फीटे जेथ परात्परा वृति तया लक्षासि जो नातळे !! १२ ॥
पद्माक्षी हरिपाद-सेवन करी श्रीशंभु-तीर्थावरी ।
त्या मागें हरिशीं विलास करितां तो हासत श्रीहरी ॥
श्रीकृष्णा-मुकुंद-पाद-रज हे देखावया उत्सुक ।
उद्घाटोनि कपाट कृष्ण-चरणीं ठेवीतसे मस्तक* ॥ १३ ॥

समाप्त.

---

१. गरुडमाता. २. अमृत. ३. गरुड. * हें प्रकरण वामनपंडिताच्या नावावर आमचे॰ कडे आलें आहे, परंतु हें वामनकृत नव्हे असें आम्हांस वाटतें.

# द्वितीय सुदाम चरित्र.

मंगल-प्रद समस्त मंगला । कीर्ति-हार हरिचा धरूं गळां ॥
जो कृपा-घन सुदाम-चातका । वर्षला हरि दरिद्र चातका ॥ १ ॥
वृथा गोष्टि ही बोलतां काय वाचा । पुराण-श्रुतींची अभिप्राय-वाचा ॥
वदा वाग्मनें कृष्ण सर्वार्थ थोरे । तरी भक्ति-संपन्न सर्वार्थ तारे ॥ २
परीस चिंतामणि सिंधु काचा । कोल्यावधी कोठडिया फुकाच्या ॥
हा त्या तरी तो हरि-नाम बा गा । कल्प-द्रुमाचा[1] जरि होय बागा ३
अद्यासिनें वर्जित जो सुदामा । दृष्टी न पाहे परि एक दामा ॥
चित्तीं हरीचीं दृढ पाद-पद्में । धरी बरीं मानुनि सौख्य-सद्में[2] ॥ ४ ॥
जाया सुशीला पति मानसाची । पतिव्रता केवळ शुद्ध साची ॥
उपाय नाहीं जरि जीवनासी । तरी न वांचे पति-सेवनासी ॥ ५
ह्मणे जाया जाया उशिर ह्मणि जाया तुह्मि करा ।
ह्मणी लाजा लाजा तुज न हरिला गात चि भजा ॥
ह्मणा दाता त्राता तुज विण अनाथास न दुजा ।
चला मागा भागा मग हि हरिला जाउनि भजा ॥ ६
हरि-जना उदरार्थिक कामना । परि न वाटतसे बरवी मना ॥
गृहिणि आग्रह फार करीतसे । द्विज ह्मणोनि हरि प्रति जातसे ॥ ७
स्वभार्ये पुढें विप्र बोले सुवाणी । ह्मणे त्यास भेटूं कसा रिक्त-पाणी[3] ॥
फिरे चार-पांचा गृहीं होय कष्टी । मिळाले प्रयत्नें फवे चार मुष्टी ॥ ८
बांधावया स्वपदरीं जंव विप्र पाहे । तों ठाव देखत स्वर्वांस[4] सछिद्र पाहे ॥
तों चौघडी करूनि बांधियले स्त्रियेनें । जातो हरीजवळि पाहि न तो दयेनें ॥९॥
धन्य आजि हरि-दर्शन-जोडी । रुक्मिणीसहित पाहिन जोडी ॥
पारणें मजकडे नयनांचें । हे चि चिंतनि निरामय नाचे ॥ १०
तो मोक्षदायक पुरी द्विजवर्य पाहे ।
शोभे सुरेंद्र-नगरी प्रति- इंद्र पाहे ॥
वैकुंठ-नाथ हरि आपण नांदताहे ।
ध्यानीं द्विजेंद्र सुख मानुनि नांदताहे ॥ ११ ॥

---

१. वृक्ष २. गृह. ३. रिकाम्या हातीं. ४. वस्त्र.

दोविलें हरिचिया सदनासी । पाहतां परम सौख्य मनासी ॥
स्वस्थ चालत निवारण नाहीं । भाग्य हें न करवे गणना ही ॥ १२ ॥

दृरूनि देखत असे हरि तो सुदामा ।
आत्मा च कीं ह्मणतसे प्रिय हा चि आह्मां ॥
धांवोनियां झडकरी हृदयीं धरूनी ।
प्रेमाश्रु-बिंदु गळती उभयां वरूनी ॥ १३

वंद्य जो सनकादिक नंदना । तो निघे द्विज-पदाब्ज-वंदना ॥
हस्तकें धरूनि आदरें वरी । बैसवी द्विज निजासनावरी ॥ १४ ॥
दिव्य हंस[१]-तुलिका मृदु भारी । बैसवूनि निज भक्त उभारी ॥
आणवूनि बहु शीतल वोरी[२] । क्षालुनी पद पथ-श्रम वारी ॥ १५ ॥
दिव्य चंदन तनूसि चार्चिलें । आदरें द्विजवरासि अर्चिलें ॥
हार कल्प-तरूच्या सुमनांचे । अर्पि जेंवि निज सौख्य मनाचे ॥ १६ ॥
अन्न षड्रस सुधेहुनि गोडी । ब्राम्हणा प्रथम हे बहु गोडी ॥
रुक्मिणी परम सावध वाडी । दाखवी पतिस आदर-वाडी ॥ १७ ॥
बैसका द्विजवरासि पलंगीं । वीटिका[३] सहित कात-लवंगी ॥
श्रीहरी परम सादर देतो । सज्जनासि पदवी निज दे तो ॥ १ ॥
भेटि हे परम दुर्लभ तूझी। सांग कीं कुशल होइ न माझी ॥
अंतरीं च नमिलें मज जीणें । भेटि काय दिधलें मज तीणें ॥ १९ ॥
लज्जा-डोहीं विप्र चित्तांत पोहे । कैसे देऊं भाग्यवंतास पोहे ॥
तों देखीलें ग्रंथिसी कृष्णनाथें । भावार्थे घे दीधले जें अनाथें ॥ २० ॥
धाडिलें ह्मणुनि वाट पाहतों । अर्पिशी ह्मणउनी च राहतों ॥
विप्र तो निज कुचेल ओढतो । श्रीपती त्वरित गांठ सोडतो ॥ २१ ॥
पत्र पुष्प फल तोय भक्तिनें । अर्पितां परम तृप्ति भक्ति ने ॥
ते फके त्रिभुवनेश्वरें मुखीं । घालितां निज कुचेल तो सुखी ॥ २२ ॥
एकदा स्वमुखिं मुष्टि हि ओतिली । मागुती मुष्टि हि भरोनि घेतली ॥
रुक्मिणीनि मग हात हि घातला । आपुला मग विभाग हि घेतला ॥ २३

कृष्णाची वनिता पयोनिधि-सुता सादृश्य सालंकृता ।
विद्युत्सन्निभ अंबरीं परिवृता चंद्रानना सस्मिता ॥
आश्चर्याम्बुनिधींत पोहति मुनी कीं पाहती ब्राह्मण ।
यांचे भाग्य अगम्य ज्यास भजतो सर्वेश नारायण ॥ २४ ॥

---

५. हंसाचे पराची गादी. २. उदक. ३. विडा ( पट्टी ). ४. विड्याचे पानांची. ५. फाटकें ( चांदट ) वस्त्र. ६ सदृश. ७. वस्त्र.

## द्वितीय सुदामचरित्र.

सत्य हंस-तुलिका सुकुमारा । ठाव तेथ न दिसे सकुमारा ॥
ब्राह्मणा निजसुखासन देतो । बाळ-मित्र कथनें हि वदे तो ॥ २५ ॥
म्हणे आम्ही तुम्ही गुरु-सदनिं अभ्यास करितां ।
कथा झाली कैशी वनिं उपवनामाजि फिरतां ॥
तुम्हां आम्हां धाडी गुरु-गृहिणि काष्ठांस्तव वनीं ॥
निशा झाली तेथें तम निबिड अदृश्य अवनी ॥ २६ ॥
पर्जन्य वृष्टि अति घोर तया च काळीं ।
दिङ् मोह नेत्र-युगलीं अतिरात्रिकाळीं ॥
[3]शीतें प्रकंप सुटला परिहार नाहीं ।
कें निस्तरेल भय वाटतसे मना ही ॥ २७ ॥
उभय-वर्ग-मनीं गुरु हीमनी । परम संकट पावतसे तिन्ही ॥
करिल संकट मित्र निवारण । म्हणुनि पाहतसों तम दारुण ॥ २८ ॥
झाला म्हणे गुरु अकल्पित घात मोठा ।
झाल्या जडा अपयशें अपकीर्ति-मोटा ॥
प्राणाहुनी मदिय आवडता मनासी ।
कां धाडिलें तयांस मूर्खपणें वनासी ॥ २९ ॥
सांदीपनी गुरु विचारुनियां मनासी ।
घेवोनि शिष्य-समुदाय निघे वनासी ॥
तों भेटलों उभय अंतरिं हर्ष मोठा ।
झाला; हळू उतरल्या अपकीर्ति-मोटा ॥ ३० ॥
जावोनि धर्म-सदनीं गुरु-पुत्र मागें ।
होता त्रुडोनि मृत जो बहु काळ मागें ॥
आणूनि देउनि मनोरथ पूर्ण केला ।
जो मानसीं बहुत काळ असे भुकेला ॥ ३१ ॥
हे च म्यां उचित काळ दक्षिणा । कल्पुनी मग करुनि प्रदक्षिणा ॥
वंदुनी मग गृहासि पातलों । त्यावरी स्वसदनीं च राहिलों ॥ ३२ ॥
रातलों पर बहू दिवसांचा । होतसे स्वमनिं आठव साचा ॥
हें अपूर्व न गमे मुनिवर्या । कृष्ण पाद-रज-तत्पर आर्या ॥ ३३ ॥
कर्में अनंत दृढ बद्ध अनंत जाती ।
कर्मानुरूप नियमी जन रे थ जाती ॥

१. गुरुपत्नी, २ भ्रम. ३ थंडी. ४ पाण्याचा माट. ५ कृष्णाच्या गुरुचें नांव.
६ यम-गृह.

ते काळिंच्या हरि वदे न अपूर्व गोष्टी ।
हो त्या मुखीं प्रकट त्या सहजें चि ओष्टीं ॥ ३४ ॥
ह्मणे हरी जें कथिलें तुला म्यां । ठाऊक आहे तुजला सुदाम्या ॥
कुटुंब माझें तुजलागिं ठावें । यांतून कैसें मन हें उठावें ॥ ३५
यांच्या पोषण तोषणाविण दुजा धंदा नसे या मला ।
जें उत्पन्न सवे च तें न असतें हें ही कळावें तुला ॥
जें जें कृत्य तयासि आपण विणें नाहीं दुजा सोयरा ।
मी जाणें दुसरा हि जो अनुभवी तो शद्ब मानीं खरा ॥३६॥
मागेल तें हि कळलें धन धान्य कांहीं ।
देईन दुर्लभ सुरेंद्र अजादिकां ही ॥
या कारणें द्विजवरा पुसिलें च नाहीं ।
देणार वैभव[1] अगोचर जें मना ही ॥ ३७
सुदामयाच्या हरि आशयाला । जाणोनि कांहीं न वदे तयाला ॥
हरी च या तो वचनामृतानें । झाला जसा स्तन्य पिऊन तानें ॥ ३८ ॥
गोमतीस करि मज्जन संध्या । आपुल्या चि मग घेउनि विंध्या ॥
श्रीपती प्रति निरोप चि घेतो । श्रीपती मग निरोप हि दे तो ॥ ३९ ॥
सुदामा स्वचित्तीं विचारूनि पाहे । ह्मणे रिक्तें[2] हस्तें चि जातों त्रपा[3] हे ॥
परी श्रीहरीची दया पूर्ण मातें । न शीवों दिलें द्रव्यलोभा तमातें ॥ ४०
बोलाविला जवळि तो मग विश्वकर्मा ।
आज्ञा करी हरि ह्मणे निज शिल्पकर्मा ॥
वेगीं उभारूनि बरी नगरी करावी ।
संपत्तिनें परम दुर्लभ ती भरावी । ४१
होतां आज्ञा हरीची अभिनव नगरी निर्मिली भासमान[4] ।
नाहीं जोडी त्रिलोकीं अणु भरि न पवे स्वर्ग-शोभा समान ॥
ऐशीं चित्रें विचित्रें मणिमय विविधें हाट[5] भांडारें[6] नाना ।
लोकां आनंद मोठा हरि-गुण नटती गायकांच्या तनाना ॥ ४२ ॥
त्यामाजि एक गृह थोर सुदामयाचें ।
जें राज-मंदिर निरूपम भाग्य याचें ॥
रत्नें अमूल्य बहु हाटकसांडे तेजें ॥
दूरूनि त्या लकलकी रवि-रश्मि[7]-तेजें ४३ ॥

---

१ अतर्क्य. २ रिकामा. ३ लज्जा. ४ शोभायमान. ५ बाजार. ६ द्रव्यकोश. ७ किरण.

अनंत देणें कमला-पतीचें । तेथें किती वर्णन संपदेचें ॥
सुदामया जात असे अगारा । झाला पुढें एकसरें नगारा ॥ ४४ ॥
तों देखिली एकसरें पुरी ते । आश्चर्य वाटे मन जें करीतें ॥
तों देखिले लोक हि पूर-वासी । आले पुढें ते नृप-आर्जवासी ॥ ४५ ॥
जी ही कोण पुरी सुदाम-नगरी राजा सुदामा भला ।
होता भिक्षुक हें खरें पर तया श्रीकृष्णजी तुष्टला ॥
त्याला काय दिलें मुठी न पृथुका ब्रम्हण्य-भावें तया ।
अर्पा अल्प हि आदरें तरि करी संपूर्ण भावें तया ॥ ४६ ॥
आमात्य मंगल-तुरें सह सर्व येती । राजा अलंकृत सुखासनीं बैसविती ॥
आरूढतां नृपति आसनिं त्या करीती । केलें तसें च अभिवंदन राजनीती ४७
कोशादि वास हय-वारण-रत्नशाला । पाकालयादि विविधा अठरा विशाला ॥
सौभाग्य-पूर्ण परिचारक दास दासी । न्यूनत्व एकाचि उणें अमित-प्रदासी ४८
येऊनि त्या स्वभवनीं द्विजराज पाहे । आश्चर्य मानुनि म्हणे हरिची कृपा हे ।
नीराजना करि मुख स्मित-युक्त राणी । स्वामीस वंदन म्हणे मधुर स्ववाणी ४९
हा कृपाघन हरी अवधारा । वर्षला निज कृपा-रस-धारा ॥
तो म्हणे द्विज खरें च बरा हा । भाव तच्चरणिं ठेवुनि राहा ॥ ५० ॥
भक्ती न मुक्ति अशि भक्ति सुदामयाची ।
पाहा विचित्र करणी करुणालयाची ॥
वर्णून आदर बरा बरवा मनाचा ।
हा विश्वनाथ निज किंकर वामनाचा ॥ ५१ ॥

**समाप्त.**

---

## जल-क्रीडा.

नमन करुनि आधीं सद्गुरु श्रीहरीतें ॥
कथिन चरित गोपी-गर्व-चोरी हरी तें ॥
कळवि भजन ऐसें तें भवाब्धींत तारी ।
पशुप-वधु-जनातें त्या कलिंदींत तारी ॥ १ ॥

---

१ कृष्ण. २ गृह. ३ वाद्यें. ४ सेवक. ५ आरती. ६ हास्यमुख. ७ करुणागृह. ८ सेवक. ९ उदक. १० यमुना नदी.

स्वजन ही जरि गर्व मनीं धरी । तरिच मित्रपणें हरि तो हरी ॥
उचलितां गिरि गोप बळें बळें । कळवि त्यांस हरी च बळें बळें ॥ २ ॥
वधू नीरा जातां हरि तिस हरी जाणुनि मनीं ।
पहातां गर्वातें सकळ त्यजिला खेळ तमनी ॥
नदीमध्यें नौकेवरि निज कुळीं स्वामि सरिता ।
निगर्वा ह्या सख्या करुनि मग तो तारि वनिता ॥ ३ ॥
नीरानिमित्त यमुनेप्रति गोप-नारी । जातां सवें काडिस घेउनि पूतनारी ॥
नेला तिहीं न कळतां जननीस जेव्हां । केलें विचित्र हरिनें यमुनेंत तेव्हां ॥४
पावल्या जंव वधू यमुना-तिरीं । नाव देखिलि तिहीं बरवी निरीं ॥
इच्छिती वरि बसोनि फिरावया । यत्न कांहिं न चले चि धरावया ॥५॥
सांपडेल कसि नाव वसावया । यत्न त्या पुसति विश्व-विसावया ॥
कृष्ण बोलत असें कि मूढ हो । अर्भकासि प्रउढा पुसतां हो ॥ ६ ॥
आज्ञानत्व वधूंस दावि पर तो सर्वज्ञ त्याच्या मनीं ।
आहे तें करणें परंतु वर तो बालत्व भावी जनीं ॥
चित्तीं तैसें चि तो ही धरुनि मग तो कृष्ण नावेस लक्षी ।
ऐसें देखोनि तेव्हां स्वमनिं सकळा हर्षल्या त्या मृगाक्षी ॥७॥
कळुनि व्रज वधूंसी स्वामिचा स्नेह भारी ।
त्वरित मरुत-नेटें चालवी नाव तीरीं ॥
चढति उडति नौके माजि घेऊनि कृष्णा ।
न कळत जल मध्यें न्यावया फार तृष्णा ॥ ८ ॥
नेती नाव पुढां पुढां जरी हरी वारी जळा भीउनी ।
जाणों कीं फिरावावयास म्हणती आणूं तिरीं नेउनी ॥
आज्ञा-भंग वधूंसि संग करितां तेणें हरी कोपला ।
क्रीडे माजि अनर्थ थोर यमुने माझारि आरंभिला ॥ ९ ॥
सच्छिद्र नौका जळ आंत चाले । प्रचंड वातें बुडवूं सकेलें ॥
तों त्या जळा हाणिति पाद-घातें । आणूं पहाती तिरिं नाव हातें ॥ १० ॥
निघत सलिलें नौके माजि अर्द्धास आलें ।
वधुंसि कटिसि कृष्णा कंठपर्यंत झालें ॥
ह्मणति वधु बरें कीं आधिं गे आह्मि मेल्या ।
सगुण मरण भेणें स्कांधिं वाहूं निमाल्या ॥ ११ ॥

१ स्त्रिया. २ उदक. ३ कृष्ण. ४ बालक. ५ मृगनयना ६ वायु. ७ इच्छा ८ नि-वारी. ९ आंत. १० पाणी.

वधूंस ही कंठ पर्यंत आलें। तें देखुनी कृष्ण वधूंस बोले ॥
कां आणिलें गे मज एथ मारूं। या संकटीं कोण शकेल तारूं ॥ १२ ॥
एक मी तुह्मिं उदंड धरावया। बांधल्या च न सुटो चपळा या ॥
मारि त्या जरि थडीस चि मातें। सांग त्या कवण जाऊनि माते ॥ १३ ॥
जळतयावरि तेल पडे जसें। परम दुःख वधूंस घडे तसें ॥
न वदवे परि प्रार्थिति बायका। ह्मणति राखिं वधू यदु-नायका ! ॥ १४ ॥
नौका जुनी नदि हि पूर्ण जल-प्रवाहीं। आह्मी मुढा सकळ व्यर्थ अनर्थ पाहीं ॥
विश्वास मूळ इतुकाचि व्रजांगनासी। कीं कर्णधार[1] दुसरा हरि तूं च होसी॥ १५॥

केल्या ही अपराध थोर न मनी तूं तों जगाचा धनी।
नोपेक्षीं शरणागता समुळ तो सांगे उपाया धनी ॥
लावा कंचुकि नावरे तरि चिरे[2] फेडूनि वस्त्रें भरा।
तों त्या लाजति हांसती ह्मणति गे हा जार पूरा खरा ॥ १६ ॥

परंतु त्यांच्या मनिं साच वाटे। लाऊं सखी कंचुकि नीर-वाटे ॥
त्या उत्तरीं बोलति, या उपायें। आहे उरीं अंचल[3] लाज कायें ॥ १७ ॥
मग उरीं दृढ अंचल ओढुनी। त्वरित लाविति कंचुकिं सोडुनी ॥
नावरे च जल आंवरत्यास त्या। प्रार्थिती शरण येउनि त्या सत्या॥ १८ ॥
अशा जरी प्रार्थिति गोप-नारी। वस्त्रें हि सोडा ह्मणतो मुरारी ॥
त्या लावुनी राहति जों फिरोनी। तों दाटली नाव जळें भरोनी ॥ १९ ॥
बोलती सकळ नंद-नंदना। या नदींत जरि तारिसि अंगना ॥
मोल पांच कवड्या अथवा सा। सोडवीसिल कसा वपु[4]-वासा ॥ २० ॥
विद्युल्लता तडतडी घन वर्षताहे। आंधार थोर रजनी सम भासताहे ॥
नौका हि ते डळमळी पवन-प्रचंडे। एकीस एक वधु आंवळि बाहु दंडे॥२१॥
असा मांडला थोर आकांत जेव्हां। तशा लाविती वस्त्र सोडूनि तेव्हां॥
सखी वांचल्या लाज लौकीक वाहूं। जिवें वेंचल्या कृष्ण कोठूनि पाहूं ॥२२॥
नाव-रंध्रिं[6] शिरूनी मग अंबरा[7]। राहिल्या वधु निरांत दिगंबरा ॥
हरिस तारिल आस सत्यांस ते। टाकिली तनु समधिक आस ते ॥२३॥

प्रकृति पर पहातां योनि आहे मतीनें।
वसनरहित कांता कां करी हेमतीनें॥
हरि-भजनिं मनींची टाकिजे लाज लोकीं।
तरि हरि-पादें जाती धन्य ते या त्रिलोकीं॥ २४ ॥

आपापुला देव स्मरों चि सांगे। वाटे तयां कीं हरि हीत सांगे ॥

---

१ सुकाण्या. २ भेग. ३ पदर. ४ आंग. ५ वस्त्र. ६ भेग. ७ वस्त्र.

तो जाणवी कीं घाणि ज्यासि मारी । त्यातें बळें किंकर काय तारी ॥ २५ ॥
न कळतां हरि-ईर्द सख्या सख्या । चिंतिती स्वकुल- दैवतास त्या ॥
भाव आधिं च तया वरि ज्यांचा। त्यांत सत्य ह्मणती हरि-वाचा ॥२६॥
न पवती सुर कोण हि तेधवां । पुढति पाहाति सुंदरि माधवा ॥
मग तया सकळां कळलें असें । चरित हें अवघें हरिचें असे ॥२७॥

नियंता विश्वाचा हरि च मति यां सत्य कळलें ।
कळों आलें ऐसें स्वसुर सुर-सामर्थ्य न चले ॥
पिता माता भ्राता हरि च अवघा सर्व कळुनी ।
तया लागीं आल्या शरण सकळा गर्व गळुनी ॥२८॥

जननिसीं धरि बाळ दटाविल्या। वधु तशा हरिनें मग मानिऱ्या ॥
नयन झांकवि त्यां करवीं च त्यां । करुनि कौतुक दाखवि त्या सख्यां ॥२९॥
नसे नांव वारा न पर्जन्य-धारा । नसे नीर तीरीं उभ्या सर्व दारा ॥
तशीं दीधलीं शुष्क वस्त्रें अनंतें । जशीं घेतलीं नाव-रंध्रें अनंतें ॥३०॥

पहाती जों तीरीं वधु उघडुनी नेत्र सकळा ।
दिसे त्यां स्वप्नाचे परि मनिं सुविस्मीत विकळा ॥
कळों आलें कीं हा हरि च करितो खेळ अवघे ।
ह्मणूनी कृष्णाचीं नमिति पद-पद्में चि निरघें ॥३१॥
ह्मणाति सकळ माया हे तुझी देवराया ।
न कळत नर नूतें मानितों मंद जाया ॥
तरति भव-समुद्रीं चिंतिल्या भक्त तूतें ।
निज-जन-वधु-रक्षीं हे नदी काय तूतें ॥ ३२ ॥

कळोनियां ब्रह्म असें स्वभावें । आलिंगिती मोहुनियां स्वभावें ॥
नाना परी खेळतसे स्वभावें । ध्यातो मनीं वामन त्यास भावें ॥ ३३ ॥

**समाप्त.**

# उपदेश-माला.

**अभंग**

वंदुनियां आत्माराम रमापती । उपदेश-रीती वदों कांहीं ॥ १ ॥
गुरू पद्मनाभा अरे! शिष्यराया ! । भवाब्धि तराया शरण रिघ ॥२॥
पद्मनाभ नाभी-पद्मीं निर्मी ब्रह्मा । त्यासि स्वमहिमा उपदेशिला ॥३॥

८ हद्गत. ९ देव. १० कृष्ण. ११ अनेक. १२ निष्पाप.

पूर्वे कल्पीं ज्ञानी सर्व मुक्त झाले । आतां जन्मा आले सर्व अज्ञ ॥४॥
सर्व माया स्वप्न दुःखातें भोगिती । कोणासि जागृती कोणें द्यावी ॥५॥
नित्य जागा एक **सर्वेश्वर हरी** । आधीं जागें करी **ब्रह्मायासी** ॥६॥
त्यानें जागे केले पुत्र **सनकादी** । विद्या हे अनादी प्रकटली ॥७॥
तें चि आलें जगीं संताचिया मुखा । संत निज सुखा दाखविती ॥८॥
नित्य जागृताची **हरीची** हे विद्या[1] । संहरी अविद्या[2] संत-मुखें ॥९॥
नित्य जागृताची प्रतिमा श्रीगुरू । सुख कल्पतरू तो चि जाण ॥१०॥
ह्मणोनि **ब्रह्मया** विद्या दिली ज्यानें । श्रीगुरू सुजाण जाणें तो चि ॥११॥
तो चि कीं हा ऐसा भावें ये शरण । वंदुनी चरण मोक्ष मागें ॥१२॥
शिष्य आइकतों ऐसा संप्रदाय । ह्मणे जय जय गुरूनाथा ॥१३॥
**ब्रह्मयाचा** बाप गुरू विद्याप्रद । तोचि तूं सांप्रद भेटलासी ॥१४॥
स्मरोनी संसार-दुःख कोटी कोटी । शरण ये पोटीं एक भावें ॥१५॥
स्वयें विश्वरूप ऐशा अनुभवें । गुरू स्ववैभवें पाहे शिष्या ॥१६॥
ठेवी त्याच्या माथां सव्य पद्मकर । कृपेचा सागर बोध करी॥१७॥
ज्ञाता जो मी तो चि ज्ञेय ऐशी खूण । श्रीगुरू निपुण सांगे तया ॥१८॥
स्पष्ट अविद्येचें रूप त्याच्या मुखें । करवूनि सूखें सांगे विद्या ॥१९॥
ह्मणे शिष्या आधीं कोण तूं हे सांग । तों तो दावी आंग सांगे नांव॥२०॥
ह्मणे गुरू स्वप्नीं देह तूं ऐसाची । देखतोसी साची कोण तनू ॥२१॥
स्वप्नीं तो चि खरा एथें हा चि साच । देहत्व आहाच झालें ऐसें ॥२२॥
आतां देह देहा[3] बापा जरी जाणे । तरी कां रे ! नेणे आपणासी ॥२३॥
एवं नव्हे देह ऐसा झाला शोध । परी गेला बोध प्राणावरी ॥२४॥
कीं प्राण न असे मृत कलेवरीं । देह द्रष्टा[4] तरी प्राण होय ॥२५॥
प्राण आत्मा नव्हे स्वप्न अनुभवें । मनाच्या वैभवें स्वप्न झालें ॥२६॥
स्वप्न देह तेथ आत्मत्व प्रत्यय[5] । तो तों मनोमय कल्पनेचा ॥२७॥
आतां मन आत्मा ह्मणतांचि ऊडे । सुषुप्तींत[6] बुडे तमीं जेव्हां ॥२८॥
नव्हे मन परी वळखावा मनें । बोलावा जिव्हेनें जिव्हातीत ॥२९॥
वळखावा मनें त्या चि मना आंत । आत्मत्व अत्यंत जेथें वाटे ॥३०॥
चित्त बुद्धि मन आणि अहंकार । हे चारी प्रकार मनाचे ची ॥३१॥
आत्मत्व-प्रत्यय चहूं माजी जेथें । वाटे तुज तेथें दाऊं आत्मा ॥३२
आत्मत्व-प्रत्यय जे ठायीं अचल । तो सर्प चंचल रज्जु[7] आत्मा ॥३३॥
होऊनियां द्रष्टा त्याचा त्यास पाहे । तों तो सर्प आहे हा चि रज्जु ॥३४॥

---

१ ज्ञान. २ अज्ञान. ३ शरीर. ४ पाहणारा. ५ खात्री. ६ झोंप. ७ दोरी.

आतां सत्य ज्ञान अनंत हो तो चो । सत्य प्रपंचाची मिथ्या गोष्टी ॥३५॥
वारुळींचा सर्प प्रकाशे आपणा । मिथ्या सर्प-खूणा दावी रज्जू ॥ ३६ ॥
स्वयें दिसे सोनें सोन्याच्या आधारें । मिथ्या अलंकारें मिरवावें ॥ ३७ ॥
काल-त्रयीं हेम एके काळीं नग । तैसें ब्रह्मीं जग मिथ्या पाहे ॥ ३८ ॥
मिथ्या चराचर या दों चि लक्षणीं । त्यांच्या विलक्षणीं ब्रह्म सत्य ॥३९॥
स्व प्रकाश हेम काल-त्रयीं असे । नग त्यानें दिसे एके काळीं ॥ ४० ॥
सत्य ज्ञान आणि अनंत त्रिपद । ब्रह्म मुक्तिप्रद ओळखावें ॥ ४१ ॥
सत्यत्वाच्या त्यांत ऐशा दोनी रीती । त्याच्या विपरीतीं मिथ्यत्व हो ॥४२॥
आत्मा ब्रह्म ऐसा सत्य जड जग । तया हेमीं नग मिथ्या जाण ॥४३॥
सत्य-पदें ऐसा आत्मा ओळखावा । मग समजावा ज्ञान-पदें ॥ ४४ ॥
जड जग त्याच्या विपरीतें ज्ञान । करावें हें ध्यान ज्ञान-पदें ॥ ४५ ॥
आतां अनंतत्व पाहें बापा याचें । ज्ञाता तो तूं साचें तत्व कीं रे ॥४६॥
तें तों जैसें देहीं तैसें ची बाहेरी । ब्रम्हांड उदरीं तुझ्या मातें ॥ ४७ ॥
अंतवंत जग अनंत तो तूं ची । हे तों गोष्टि साची पाहें बरी ॥ ४८ ॥
तया अनंतत्वीं अंतवंत जग । सुवर्ण तूं नग विश्व कीं हें ॥ ४९ ॥
तेव्हां तूं चि जग खूण हे अंतरीं । धरूनियां बरी ध्यान करीं ॥ ५० ॥
पाहें आत्मा-सोनें विश्व-अलंकारीं । ध्यान या प्रकारीं सविशेष ॥ ५१ ॥
ह्मणिजे तो कोश हा विज्ञानमय । सर्व ही अद्वय ब्रह्म जेथ ॥५२॥
आनंदमय तो कोश निजतत्व । लक्षी शुद्ध सत्व उन्मनी तें ॥५३॥
चित्त थोर तेव्हां उन्मनी समाधी । न थारतां साधीं अभ्यासानें ॥५४॥
येऊं देऊं नये तेथें निद्रा-लेश । लय तो प्रवेश तमीं चित्ता ॥५५॥
युक्ताऽऽहार- निद्रा करूनी जो ध्याय । त्यासी निद्रा-लय बाधीना हा ॥५६॥
लय-परिहार याचा हा संक्षेप । दुसरा विक्षेप विघ्नरूप ॥५७॥
विक्षेप ह्मणिजे उठे जी कल्पना । तेथें द्यावी मना तत्त्व स्मृती ॥५८॥
अलंकार सोन्याविणें तो न दिसे । तेव्हां तत्व असे कल्पना ही ॥५९॥
कल्पनेचा माग ये रीती मोडावा । यत्न न सोडावा अभ्यासाचा ॥६०॥
आनंदमय हा कोश सिद्ध तेव्हां । कल्पनेचा जेव्हां माग मोडे ॥६१॥
उपदेश-माला सुता देवराया । नृसिंहें विनाया करविली ॥६२॥
ते चि सर्व शिष्यां उपयोगा आली । कंधरीं घातली ज्यानें त्यानें ॥६३॥
वामनें अर्पिली श्रीगुरुचरणीं । सकळ करणी तयाची च ॥ ६४ ॥

**समाप्त.**

---

८ दागिना. १ बेताचा आहार.

# गोपी-गीत.

प्रकटलासि तूं नंद -गोकुळीं । ह्मणुनि इंदिरा[1]-वास हे स्थळीं ॥
सकळ ही सुखी याव्रजीं[2] हरी! । विरह-दुःखिता गोप-सुंदरी ॥ १ ॥
प्रकट होइं तूं विश्व-भूषणा ! । प्रियतमा! त्वरें दावि आपणा ॥
हुडकितों तुतें गोप-कामिनी । तुजवरी हरी प्राण ठेउनी ॥ २ ॥
कमळ-गर्भिंचे श्रीस[3] जें हरी । करिं कृपा तये दृष्टिनें हरी ॥
सुरत-नाथ तूं शुल्क[4]-दासिका । बटकि गोपिका त्या तुझ्या फुका ॥३॥
वर हि देउनी आस लावुनी । विरह-कूपिं या माजि घालुनी ॥
तदुपरी हरी दोर कापणें । तरि मृतासही काय मारणें ॥ ४ ॥
विगत - दर्प तो सर्प कालिया । करुनि रक्षिलें गोकुळास या ॥
विष-जलाचिया नाशुनी भया । विरह-सागरीं घातलें प्रिया ॥ ५ ॥
व्रज गिळूं ह्मणे त्या अघासुरा । अजगरासि कौरुण्य-सागरा ॥
वधुनि रक्षिलें त्या तुला हरी । व्रज-वधूं वरी कोप कां परी ॥ ६ ॥
प्रळय-मेघ हा वर्षतां वरी । गिरि[6] धरूनियां रक्षिल्या हरी ॥
प्रळय तो स्वयें त्यां वरी करी । कठिण चित्त हें आजि कां परी ॥७॥
पिउनि अग्नि तूं ज्यांस रक्षिसी । विरह-अग्निनें आजि जाळिसी ॥
हरुनि सर्व ही आमुचीं भयें । विरह-संकटीं घालिशी स्वयें ॥ ८ ॥
नव्हसि गोपिका-पुत्र निश्चयें । सकळ-अंतरीं साक्षि तूं स्वयें ॥
यदु-कुळीं विधि[7]-प्रार्थना-मिषें । भुवन तारिशी या कथा-रसें ॥ ९ ॥
ह्मणुनियां तुतें प्रार्थितों हरी । सफळ आमुची प्रार्थना करीं ॥
प्रकट शीघ्र तूं होउनि प्रिया । अभय देउनीं छेदिं या भया ॥ १० ॥
भव-भयास हा दूरि जो करी । निवति लागतां गोप-सुंदरी ॥
अभय-हस्त तो आमुच्या शिरीं । करुनिया कृपा ठेविं गा ! हरी॥ ११॥
प्रकटतां रमा क्षीर-सागरीं । धरिशि तूं तिचा हात ज्या करीं ॥
अभय-हस्त तो मस्तकावरी । निववि ठेउनी गोप-सुंदरी ॥ १२ ॥
व्रज-जनाचिया दुःख-नाशका । मदन-दावि[8] कां गोप-नायिका ॥
बटाकि आपुल्या ज्या तयांवरी । हृदयिं एवढा कोप कां हरी ॥ १३ ॥
सहज दाउनी भाव हांससी । तरि तुं आमुचे गर्व नाशिशी ॥

---

१ लक्ष्मी. २ गोकूळ. ३ शोभा. ४ "भोगदायका" असाही पाठ आहे. ५ "कापट्य सागरा" असाही पाठ आहे. ६ पर्वत. ७ ब्रह्मा. ८ "वदन दावि," असाही पाठ आहे.

नख न लावितां छेदिजे जया । हारि कुऱ्हाडि कां हाणणें तया ॥ १४ ॥
अशुभ शीघ्र जो वंदनें हरी । कमलजा[9] वसे ज्यांत सुंदरी ॥
तृणचरां सवें हिंडतो वनीं । चरण ठेविं तो अमुचे स्तनीं ॥ १५ ॥
निज सुखामृता लुब्ध होउनी । भ्रमरि ज्यामधें सिंधु-नंदिनी[10] ॥
पद-सरोज[11] तें या कुचांवरी । करुनियां दया ठेविं गा हरी ॥ १६ ॥
रगडुनी फणा कालिया फणी । दवडिलें खळा चिच्छिरोमणी ॥
मदन दुष्ट हा आमुचे उरीं । पद-तळें तसा मर्दि कीं हरी! ॥ १७ ॥
हरुनि दर्प कंदर्प[12] हा हरी । दवडिं काळियाचे परी अरी[13] ॥
रवि-सुता[14]-हृदीं[15] कालिया जसा । हृदयिं आमुच्या काम हा तसा ॥ १८ ॥
मधुर वैखरी[16] बोल आमुशीं । निगम[17]-रूप जें संत-मानसीं ॥
विरह-मूर्च्छिता या स्वकिंकरी । स्वाधरामृतें जीववीं हरी ॥ १९ ॥
तुझि कथा सुधा[18] तापल्या जना । निववि अंतरीं विश्वजीवना ॥
अमृत निंदिती स्वर्गिचें मुनी । तव कथामृता वंदिती जनीं ॥ २० ॥
अमृत मातवी स्वर्गिचें हरी । तुझि कथा सुधा बंध संहरी ॥
अमृत जे पिती त्यांचिया शिरीं । चरण ठेउनी नेक थावरी ॥ २१ ॥
अमृत गोड तें जों जिभेवरी । तुझि कथा-सुधा गोड हे हरी ॥
श्रवणिं[19] आननीं[20] बाह्य अंतरीं । मधुर सर्वथा[21] जे परोपरी ॥ २२ ॥
कनक आणि ते गुंज जोखणें । तशि कथा सुधेतुल्य लेखणें ॥
सुलभ जे सदा सर्व ही स्थळीं । अमृत तुच्छ[22] तें देवता-कुळीं ॥ २३ ॥
त्रिभुवनेश तूं त्या तुळा जशी । करिति तुल्यता ऊर्ण-नाभिशीं[23] ॥
अमृत-साम्य ही श्रीकथामृता । वदति तेथ हा भाव तत्त्वतां ॥ २४ ॥
सवत लक्षुमी ती तुझ्या उरीं । तसि च मुक्ति ते श्रीकथेवरी ॥
बहु उदार जे जे अशी कथा । श्रवण याचकां देति सर्वथा ॥ २५ ॥
सुजन याचकां अर्पिती धनें । परि मदांसि[24] तीं होति साधनें ॥
हरि कथा तुझी विश्वपावनी । बहु उदार जे वर्णिती जनीं ॥ २६ ॥
विरहें[25] जरी प्राण टाकिती[26] । तरि कथामृतें गोपिका जिती ॥
परि हरी तुझे संगतीविणें । मरण तें बरें काय हें जिणें ॥ २७ ॥
सरस हास्य सप्रेम पाहणें[27] । विहरणें चिदानंद-लक्षणें ॥

---

९ लक्ष्मी. १० लक्ष्मी. ११ कमल. १२ मदन. १३ शत्रु. १४ यमुना. १५ डोह. १६ वाणी. १७ "सुगम जें रुचे सत्य मानसीं" असाही पाठ आहे. १८ अमृत. १९ कान. २० तोंड. २१ 'सर्वदां' असाही पाठ आहे. २२ क्षुल्लक. २३ कोळी. २४ गर्व. २५ विरहानें. २६ 'कंठिती' असाही पाठ आहे. २७ 'बोलणें,' असाही पाठ आहे.

करिति अंतरीं ध्यान जे मुनी । विसरती कशा गोप कामिनी ॥२८॥
स्मर- विलास एकांतिंचे वनीं । बहु रुतोनि जे राहिले मनीं ॥
करिति आमुच्या क्षोभ मानसीं । कपटिया! कसा गुप्त [28]ओर्मुशीं॥२९॥
फिरसि गोधनें चारितां वनीं । पद तुझें व्रजीं आठऊं मनीं ॥
दुखवतील कीं ते तृणांकुरीं । ह्मणानि बूडतों दुःख-सागरीं ॥ ३० ॥
दिवस मावळे येसि तूं व्रजा । नयनिं दाविशी श्रीमुखांबुजा ॥
कुरळ केश जे भृंग ते जसे । वरि पराग ते धूलि ही दिसे ॥३१॥
परतसी वनीं दैत्य मारुनी । दिससि थोर तूं वीर- लोचनीं ॥
वदन--चंद्रें[29] सांजेस दाउनी । मदन सोडिसी आमुचे मनीं ॥ ३२ ॥
पुरविं वंदनें सर्व कामना । चरण तो तुझा नंद–नंदना ॥
त्वरित टेउनी आमुचे कुचीं । पुरविं ईतुकी आस आमुची ॥ ३३ ॥
सतत पूजिला जो चतुर्मुखें[30] । वसति ज्यामध्यें सर्व ही सुखें ॥
धरणिला अलंकार या वनीं । चरण ठेविं तो आमुचे स्तनीं ॥३४॥
सकळ संकटीं ध्येय अंतरीं । स्मरति त्यांचिया आपदा हरी ॥
त्वरित गोपिकांच्या पयोधरीं । चरण आपुला ठेविं तूं हरी ॥३५ ॥
सुरत वाढवी शोक जो हरी । स्वैरित[31] वेणुनें चुंबिलाऽधरीं ॥
विसरवी[32] जनां सर्व रक्तता । त्वरित पाजिं त्यां स्वाधरामृता ॥ ३६ ॥
सुरत-तृप्ति हो झालियावरी । अधर जो तुझा चुंबितां हरी ॥
सुरत–वासना होय मागुतीं । अमृत तेथिंचे दे रमा–पती! ॥३७ ॥
ढकलुनी युगासारिख्या त्रुटी[33] । दिवस कंठुनी थोर संकटीं ॥
नयनिं पाहतां श्रीमुखाप्रती । लवति पापण्या त्या न सोसती ॥ ३८ ॥
नयनिं पाहतां तूज माधवा । करिति पापण्या विघ्न जेधवां ॥
करुनि अंगुली-भंग तेधवां । बहुत निंदिती पद्म[34]–संभवा ॥ ३९ ॥
न पुरती मुखा पाहतां धणी । करिति पापण्या विघ्न पापिणी ॥
कपटिया अशा ज्या विलासिनी । त्यजिल कोण त्यां तूज वांचुनी॥४० ॥
कुलें[35]-पती-सुत-भ्रातृ-बंधुतें । त्यजुनियां शठा पावलों तुतें॥
त्वरित मोहिल्या गोप-सुंदरी । त्यजिल कोण रात्रीं वनांतरीं ॥ ४१ ॥

---

२८ 'मानसीं' असाही पाठ आहे. २९ 'इंदु' असाही पाठ आहे. ३० ब्रह्मा. ३१ 'त्वरित' असाही पाठ आहे. ३२ "विसरली जनीं सर्व शूचिता असाही पाठ आहे. ३३ निमेषाचा ३०००(तीन हजारावा) हिस्सा निमेष—डोळ्याचें पातें एकदां लवण्यास लागणारा काळ. ३४ ब्रह्मदेव. ३५ "पति–सुतान्वयीं बंधु बंधुता । त्यजुनी पातलों तूज अच्युता ॥ मुरलिच्या रवें मोहिलों मनीं । कपटि कोणसा टाकि यामिनी" असाही पाठ आहे.

पूर्व सूचना कळति आमुतें । तरि न धांवतों काननीं तुतें ॥
कशि निराश विश्वास- घातका । करुनि मारिल्या दासि गोपिका ॥ ४२ ॥
वदन लोचनीं पाहतां हरी । [36]ओंजे विशाळता देखतां उरीं ॥
उपजती मनीं काम-कामना । घडि घडी स्पृहा वाढते मना ॥ ४३ ॥
विविध शब्द एकांतिचे तुझे । श्रवणिं ऐकतां मदन ऊपजे ॥
तुजविणें हरी प्राण जातसे । करिं कृपाळु! वा वाचती असें ॥ ४४ ॥
भुवन मंगळें मूर्ति जे करी । व्रज जनास ते फावली हरी ॥
त्यजुनि कोप या गोप-सुंदरी । निवारिं दाउनी काम-[37]कूंसरी ॥ ४५ ॥
चरण ठेवितां कर्कश स्तनीं । बहु भितों मनीं गोप-कामिनी ॥
फिरसि त्या पदीं तूं चहूंकडे । म्हणि तयासि ही रुतती खडे ॥ ४६ ॥
सकळ ही अशा गोप-सुंदरी । करिति गायनें त्या परोपरी॥
रडति सुस्वरें अश्रु लोचनीं । धरुनि [38]लौलसा कृष्ण-दर्शनीं ॥ ४७ ॥
रडति तों तयां माजि ये हरी । प्रकट आपुलें रूप तो करी ॥
मदन-मोहन श्रीपति स्वयें । पुसतसे तयांलागिं विस्मयें॥ ४८ ॥
वसन पींवळें हार [39]कंधरीं । नयनिं देखुनी गोप-सुंदरी ॥
उठलिया जशा प्राण आलिया । सकळ शक्ति त्या येति इंद्रियां॥ ४९ ॥
धरिति धांउनी एकि त्या करीं । धरिति एकि त्या पीत [40]अंबरीं ॥
भुज धरीति त्या एकि [41]अंगदीं*। कितिकिनीं मिठया घातल्या पदीं॥ ५० ॥
हरि-पदीं तया नित्य वामनें । त्रिभुवनीं मिठी घातली मनें ॥
अमन या मनें वृत्ति गोपिका । सकळ झालिया चित्सुखात्मिका ॥ ५१ ॥

समाप्त.

---

३६ आज. ३७ कौशल्य ३८ इच्छा. ३९ कंठ. ४० वस्त्र. ४१ बाहुभूषण.

* " × × × × × × × अंगठीं कितिक त्या गळां घालितीं मिठी " ॥ असाही पाठ आहे.

# भक्ति-महिमा.*

भातें न सेवी जन जो सुटेना ॥ संसारबेडी सहसा तुटेना ॥
सेवा करावी तरी पूर्णकाम ॥ मी काय माझें करणार काम ॥ १ ॥
खरारा खेगेन्द्रास माझ्या कराया ॥ न कोणी मला पाहिजे लोकराया ॥
न लागे तया घांस दाणा न पाणी ॥ उभा जो पुढें नित्य जोडोनि पाणी ॥ २ ॥
लगामाविना माझिया जो लैगामीं ॥ जिनावीण वाहे मला व्योमगामी ॥
अशा वाहनालागिं ते माणसाची ॥ अपेक्षा नसे गोष्टि हे जाण साची ॥ ३ ॥
मी नित्य तृप्त मज रांधिल अन्न काय ॥ मर्दील काय तरि केवळमी अकाय ॥
जो मी अनंत मज रक्षिल तो कसारे ॥ व्यापूनियां उरतसे जनलोक सारे ॥ ४ ॥
ज्ञानांबरें स्वसुखकंचुकि जी सतीची ॥ वस्त्रें कशीं धुइल कोण रमेश तीचीं ॥
कीं खेळवील उचलोनि मुला विधीतें ॥ माझा करील जन हा कवण्या विधीतें ॥ ५ ॥
धरूनि मोहारितुल्य असे जगा ॥ दशशतानन तो मज शेज गा ॥
नर तयावरी अस्तरणा रची ॥ इतर काय असें करणार ची ॥ ६ ॥
सेविल्याविण नसे सुटका ही ॥ सेवणें तरि घडे न च कांहीं ॥
जोडती सहज हे तुज पाय ॥ अर्जुना परिस तो चि उपाय ॥ ७ ॥
सुकृत वैदिक लौकिक पांडवा! ॥ मज समर्पुनियां करिं तांडवा ॥-
करिसि भक्षिसि होमिसि देसिरे ॥ मज मधें च समर्पित तें शिरे ॥ ८ ॥

समाप्त.

# लघुचेंडूफळी.*

नीविबंधविधूननोद्यतकरारुध्द्या रतेरिछया
कृष्णस्तत्क्षणमागतामभिमुखीं दृष्ट्वा यशोदां रुदन् ॥

* या प्रकरणाचे शेवटीं वामनाचें नांव नाहीं, तरी शेवटचे पद्याचे शैलीवरून हें पंडितांचें असावें असें वाटतें. वास्तव हे "अनेक कवि" या सदराखालीं न घालतां पंडितांचे ग्रंथांत घालावें कदाचित् हें त्रुटित असेल.

१ मदन. २ गरुड. ३ तृण. ४ हस्त. ५ स्वाधीन. ६ निराकार. ७ ज्ञान वस्त्र. ८ रमा-पति. ९ ब्रह्मा. १० शेष. ११ नृत्य.

* कवि—नाम अखेरीस नाहीं तरी पंडितांचेंच हें प्रकरण असावें असें वाटतें.

१ वस्त्र-ग्रंथी.

मातः पश्य जुगोप[2] गोपवनिता[3] मत्कंदुकं[4] वाससी
त्येवं वाचमुदीरयन् दहतु वः पापानि पूतो हरिः ॥ १ ॥

॥ टीका ॥

रागेजली माय तया हरीतें ॥ चरित्र ज्याचें दुरितें[5] हरीतें ॥
मारावया धांवलि कृष्णजीतें ॥ तो भासला व्राथ्य अचाट जीतें ॥१॥
पुरुषयुवति ऐसी दाटली लोकराशी[6] ॥
अनिमिष नयनानें पाहती श्रीधराशी ॥
मग हळु जननीतें फुंदफुंदोनि सांगे ॥
अभय निरखिली म्यां चोरटी चौदिसां गे ॥२॥
आह्मीं सर्व मुलें बिदींतें[9] अमये चेंडूफळी खेळतां ॥
अभ्रीं उंच उफाळला क्षितितळीं तो येथ आंदोळतां ॥
तो आला इचिया घरा मग इनें चोरोनिया ठेविला ॥
नेदी मागतमागतां पदर म्यां यालागिं गे गोंविला ॥३॥
माता ह्मणे सुंदर कृष्णजीसी ॥ बोले च ना काय वदेल त्यासी ॥
मारावया घे मग फोक[10] हातीं ॥ समस्त ही लोक तदा पहाती ॥४॥
हरि ह्मणे जरि सोडिल कंचुकी ॥ रित[11] धरीसे पडे न चुके च कीं
व्रजवधू[12] उकली मग ते घडी ॥ कुचपटांतर चंचल ऊघडी ॥ ५ ॥
वक्षोज गोल अलुमोळ[13] तमाल नील ॥ देखोनि मंद रुदना करि जे सुशील
माता ह्मणे रडसि कां लटके वदोनी ॥ चेंडू कुठें निसटला न कळे उडोनी ॥६
हरि ह्मणे अमये कमलेक्षणा[14] ॥ जरि निरी उकलील सुलक्षणा ॥
लपविला ह्मणि कंदुक सांपडे ॥ अनृत मी न वदें धरणी पडे ॥७॥
तैं ते गोपवधू वधूतवसना[15] सोडी निरीग्रंथिका ॥
झाडी वस्त्र पुनः पुन्हा गमतसे आश्चर्य त्या पांथिका ॥
चेंडू दिव्यपदाहुनी क्षितितळीं आंदोळितां कौतुकें ॥
देखोनी जन हांसती खदखदां आले तदां जीतुके ॥ ८ ॥

॥ समाप्त. ॥

---

२ लपविला. ३ स्त्री. ४ चेंडू. ५ पाप. ६ समुह. ७ तटस्थ. ८ आई. ९ रस्ता. १० काठी. ११ पृथ्वी. १२ गोपी (राधा) १३ किंचित (अणुमात्र) १४ पंकज नेत्री. १५ वस्त्र.

# मनाचे श्लोक.

———oxo———

मना आइचा बोध मानी अनंदें ॥ कसें त्यागिलें राज्य त्या गोपिचंदें ॥
धनैश्वर्यकांतादि सर्वत्र त्यागी ॥ म्हणे वामना तो जिता मुक्ति भोगी ॥१॥
मना बोध रे भर्तरी लागिं जाला ॥ निवाला स्वयें वैभवा वीट आला ॥
चिरंजीव अद्यापि तो पूर्ण भोगी ॥ ह्मणे वामना तो जिता मुक्ति भोगी॥२॥
मना वैभवा भूलला व्यर्थ प्राणी ॥ सखे सोयरे दीसतां सौख्य मानी ॥
जिवाचा सखा तूं विचारूनि पाहें ॥ ह्मणे वामना मुक्ति सन्नीध आहे ॥३॥
नको आस रे कामिनीकांचनाची ॥ तयाच्या मुळें हांव ते मीपणाची ॥
मनीं मींपणें मानवी देह जातो ॥ ह्मणे वामना व्यर्थ चिंता वहातो॥४॥
मना जन्मजन्मांतरीं पुण्य ठेवा ॥ नसे संचिल्या मागसी कां तुं देवा ॥
कदां दीधल्यावीण तें पाविजेना ॥ ह्मणे वामना मूर्ख तें ऊमजेना ॥५॥
मना व्यर्थ संसार येथेंचि पाहीं ॥ पुढें मागुती मानवी देह नाहीं ॥
करीं हीत तूं चूकवीं जन्मखेपा ॥ ह्मणे वामना जाणिजे पुण्यपापा ॥६॥
मना वासना कल्पना टाकिं वेगीं ॥ निजेच्छासुखें अक्षयी मुक्ति भोगीं ॥
किती शीकवूं तूजला पापरूपा ॥ ह्मणे वामना जाणिजे पुण्यपापा ॥७॥
मना सज्जनासारिखा काय होसी ॥ विचारिं मना पाहिं तूं आदरेंसी ॥
मला दीसतो हा चि ऊपाय सोपा ॥ ह्मणे वामना जाणिजे पुण्यपापा ॥८॥
मना वासना शुद्ध तूला असावी ॥ दया सर्व भूतांदिकीं ही बसावी ॥
असावें तुवां सात्विकें सांडिं कोपा ॥ ह्मणे वामना जाणिजे पुण्यपापा ॥९॥
मना कर्मठा ऐकरे ऐक माझें ॥ नको घोर संसार हा व्यर्थ ओझें ॥
बुडाला वृथा मानवी देह तापें ॥ ह्मणे वामना जाणिजे पुण्यपापें ॥ १०॥
मना रे तुला सत्य संसार भासे ॥ नव्हे सत्य संसार हा व्यर्थ नासे ॥
असें जाणुनी बूडसी अंधकूपा ॥ ह्मणे वामना जाणिजे पुण्यपापा ॥११॥
मना बोलण्याचें नको दुःख मानूं ॥ जनीं निंद्य तें व्यर्थ वाचेस आणूं ॥
दिसंदीस तूं मूर्ख होशील बापा ॥ म्हणे वामना जाणिजे पुण्यपापा ॥१२॥
मना वासना सत्य जीवीं धरावी[२] ॥ पराशा तुला स्वल्प ते ही नसावी ॥
विवेकें सदा लेश तो आंवरावा ॥ ह्मणे वामना पुण्यठेवा करावा ॥१३॥
मना मानसीं सांगतों हीत तूझें ॥ तुटे सर्व अज्ञान हें भ्रांति ओझें ॥
तुझा हेत तो रामरूपीं भरावा ॥ ह्मणे वामना पुण्यठेवा करावा ॥१४॥

---

१ कांचन=सोनें. २ "धरावी" याबद्दल "असावी" असाही पाठ आहे

मना वीषयीं गुंतसी कोण काजें ॥ तुला ज्ञान वैराग्य हें सर्व साजे ॥
बहूतां परी बोध जीवीं धरावा ॥ ह्मणे **वामना** पुण्यठेव करावा ॥१५॥
मना बोध जीवीं धरी हीतद्वारी ॥ नव्हे व्यर्थ हा पाहिं तूं कां विचारीं ॥
तुझे अंतरीं संशयेतो नुरावा ॥ ह्मणे **वामना** पुण्यठेवा करावा ॥१६॥
मना रे तुला सांगतों गर्वराशी ॥ धरीं भाव तूझा असे तूज पाशीं ॥
किती शीकवूं तूजला ज्ञानमूढा ॥ ह्मणे **वामना** सांडिं तूं भाव कूडा[३] ॥१७॥
मना लौकिकीं जें दिसे गोड गावें ॥ तुवां तें चि कीजे महा शुद्ध भावें ॥
परी अंतरीं बुद्धि तैसी करावी ॥ ह्मणे **वामना** वासना ही मरावी ॥१८॥
मना वासनेचे मुळें जीव जाती ॥ मना वासनेचे मुळें जन्म घेती ॥
अशी वासना टाकिं तूं पापरूपी ॥ ह्मणे **वामना** तूजला मुक्ति सोपी ॥१९॥
मना वासनेचे मुळें क्रोध झाला ॥ मना वासनेचे मुळें सर्व घाला ॥
मना वासना तूजला काळ मोठा ॥ ह्मणे **वामना** वासनासंग खोटा ॥२०॥
मना वासनेचे मुळें कष्ट होती ॥ मना वासनेचे मुळें नर्कप्राप्ती ॥
मना वासनेचे मुळें दुःख भोगी ॥ ह्मणे **वामना** वासना टाकिं वेगीं ॥ २१ ॥
मना वासना स्पष्ट रे संग ज्यासी ॥ सदा सर्वदां तो जिता नर्कवासी॥
तयाला नसे धर्मकामार्थमोक्ष ॥ म्हणे **वामना** तो अघोरी प्रत्यक्ष ॥२२॥
मना वासनेचेमुळें निंदिताती ॥ जगीं वासनेचेमुळें हीन होती ॥
अशी वासना तोडिं तूं सर्व बापा ॥ ह्मणे **वामना** ऐकरे ज्ञानरूपा ॥२३॥
मना वासना तृप्तहोतां दिसेना ॥ तया भ्रांतिचें चित्त कोठें वसेना ॥
तयाचे मुळें क्रोध संपूर्ण आंगीं ॥ म्हणे **वामना** चित्त दे साधुसंगीं ॥२४॥
मना वासना टाकिं रे टाकिं आतां ॥ मना सज्जना सांडिं संसारचिंता ॥
मना चिंत रे ज्यासि से ना रूपरेखा॥ म्हणे **वामना** तें चि कैवल्य देखा॥२५॥
मना ज्यासि आकार तें पाहि नासे ॥ कळेना तुला मोह माया विकासे ॥
जसें स्वप्न जागृत झाल्या दिसेना ॥ म्हणे **वामना** तेंवि संसार जाणा ॥२६॥
मना टाकरे भोगिल्या दुःखकोटी ॥ मना कल्पना वीषयीं फार मोठी ॥
परी भोगिल्यावीण ते कोण सोडी ॥ म्हणे **वामना** साधुचा संग जोडीं ॥२७॥
मना पाहिं तूं व्यर्थ हा जन्म गेला ॥ नसे साधिला मुक्तिचा यत्नकिल्ला ॥
तुला लागली वीषयीं फार गोडी ॥ म्हणे **वामना** साधुचा संग जोडीं ॥२८॥
मना त्वां दया सर्व भूतीं धरावी ॥ जितामुक्ति सायुज्यता आंवरावी ॥
जगीं निंद्य तें कर्म तूं सर्व सोडीं ॥ म्हणे **वामना** साधुचा संग जोडीं ॥२९॥

---

३ कुडा=कपटाचा. ४ मोक्ष. ५ चतुर्विध मुक्तिः—सरूपता, सलोकता, सायुज्यता, समीपता.

मना कां सर्या व्यर्थ चिंता वहासी ॥ दिसे तें नसे काय अज्ञान होसी ॥
नको रे मनाया जिवा कर्मबेडी ॥ म्हणे **वामना** साधुचा संग जोडीं ॥३०॥
मना चंद्रसूर्यादि आकाश वारा ॥ भुमी अग्नि पाषाण हे सर्व तारा ॥
महाकल्प काळीं तो सर्वांसि जोडी ॥ ह्मणे **वामना** साधुचा संग जोडीं॥३१॥
मना साधुसंगे महादुःख भंगे ॥ बहू सार हें साधिं तूं प्रेमसंगे ॥
हरी वा अँघा सर्व अज्ञान तोडीं ॥ ह्मणे वामना साधुचा संग जोडीं ॥३२॥
मना कीर्ति ज्याची सदां वाणिजेती ॥ बहूतांपरी आणिकां सूख देती ॥
जगीं वर्तती नेणती काम क्रोधू ॥ ह्मणे **वामना** जाणिजे ते चि साधू॥३३॥
मना बुद्धि ज्याची सदा स्थीर राहे ॥ चळेना कदा नित्य आनित्य पाहे ॥
जयाचे मुखें बोलणें ब्रह्मबोधू ॥ ह्मणे **वामना** जाण रे तो चि साधू॥ ३४ ॥
मना सर्वदां चित्त ज्याचें चळेना ॥ महासंकटीं निंद्य कर्मं वदेना ॥
विचारीं सदालोकरी आत्मबोधू ॥ म्हणे **वामना** जाण रे तो चि साधू॥३५॥
मना जाणसी सर्वदा काळ ग्रासी ॥ असें जाणुनी काय पां भूललासी ॥
पतंगा दिपा देखिल्या सूख वाटे ॥ ह्मणे **वामना** हें चि आश्चर्य मोठें॥३६॥
मना सूख रे दुःख तें फार होतें ॥ घडे कर्म तें पूर्व संचीत होतें ॥
तयाचा नको खेद मानु तूं वायां ॥ तरी **वामना** लागती येम पायां ॥ ३७ ॥
मना पाहिं रे काय सांगूं जनाला ॥ वळेना कदा भूलला मीपणाला ॥
मना मीपणें व्यर्थ आयुष्य गेलें ॥ म्हणे **वामना** हीत त्वां काय केलें ॥३८॥
मना मीपणें व्यर्थ **दूर्योधनासी** ॥ मदें मातला आवरेना मनासी ॥
तयाचेमुळें गोत्रसंहार झाला ॥ ह्मणे वामना टाकिं तूं मीपणाला ॥ ३९ ॥
मना मीपणें व्यर्थ तो मूर्ख जाणा ॥ मना मीपणें त्यासि रे नर्क नाना ॥
मना मीपणें पाहिं पर्मार्थ गेला ॥ म्हणे **वामना** थोर अन्याय केला ॥४०॥
मना मीपणें यासि रे गर्व मोठा ॥ मना नीच तूं अंतरीं भाव खोटा ॥
पडे जें मना मीपणें या भ्रमाला ॥ म्हणे **वामना** थोर अन्याय केला ॥४१॥
मना मीपणें शीर्वतो जीव होय ॥ मना मीपणें लोपली ज्ञानसोय ॥
मना मीपणें सर्वथा हा बुडाला ॥ म्हणे **वामना** थोर अन्याय केला ॥४२॥
मना सज्जना टाकिसी मीपणासी ॥ स्वभावें जगामाजि तूं धन्य होसी ॥
तपोनी धन्या मीपणाशा जयाला ॥ म्हणे **वामना** थोर अन्याय केला ॥४३॥
मना मीपणें यासि रे गर्व झाला ॥ तयामाजि तो कामक्रोधू निघाला ॥
घृतें शिंपिला मातला अग्नि जैसा ॥ म्हणे **वामना** मीपणें होय तैसा ॥४४॥
मना सर्वथा शोक चिंता नसावा ॥ सदोदीत तो हेत ब्रह्मीं असावा ॥

---

६ सर्या. ७ अघ=पाप. ८ परमात्मा.

उदासी मनीं द्रव्यकांता न मानीं ॥ म्हणे **वामना** मीपणा होय हानी ॥४५॥
मना तूं करीं हीत सर्वां भुतांचें ॥ जनीं जाणतें मुक्तिचें गेह साचें ॥
न बोलें कदां अल्प तूं दुष्ट वाणी ॥ ह्मणे **वामना** मी पणें होय हानी ॥४६॥
मना घोर वाहे सदा सर्व काळीं ॥ मिळाला स्वयें कल्पनेचे निमेळीं ॥
बळें गुंतला मोहपाशीं अभागी ॥ ह्मणे **वामना** तो जिता नर्क भोगी ॥४७॥
मना निंद्य कर्मीं सदा चित्त ज्याचें ॥ न बोले कदा सत्य तें नित्य कांचे ॥
कुसंगीं अति प्रीत ज्यातें कुसंगी ॥ ह्मणे **वामना** तो जिता नर्क भोगी ॥४८॥
मना हीत ज्याचेमुळें जाण होय ॥ करीं तें चि तूं वा धरीं ज्ञानसोय ॥
कळेना तरी सर्व शोधोनी पाहें ॥ ह्मणे **वामना** काळ सन्नीध आहे ॥४९॥
मना जाणुनी कर्म त्वां आचरावें ॥ जनाला रुचे तें च बापा करावें ॥
परी अंतरीं शुद्ध होऊनी पाहें ॥ ह्मणे **वामना** काळ सन्नीध आहे ॥५०॥
मना देहयाचा नको गर्व मानूं ॥ मुखें आपल्या वैभवालागिं वर्णूं ॥
अकस्मात जाईल कांहीं उरेना ॥ ह्मणे **वामना** हेत तूझा पुरेना ॥५१॥
मना द्रव्यदारादिसर्वत्र पाहीं ॥ तुला वाटतें यापरी कांहिं नाहीं ॥
गुरुअंजनावीण माया विरेना ॥ ह्मणे **वामना** हेत तूझा पुरेना ॥५२॥
मना ज्ञानवैराग्य रे तें चि जाणें ॥ असावी दया सर्व भूतीं समानें ॥
अनाथा दिना लागीं तूं पाळि बापा ॥ ह्मणे **वामना** चुकवीं जन्मखेपा ॥५३॥
मना वादसंवाद बापा नसावा ॥ सदोदीत सद्भाव चित्तीं वसावा ॥
करीं कर्म ना पाहिं तूं आत्मरूपा ॥ ह्मणे **वामना** चुकवीं जन्मखेपा ॥५४॥
मना पाहिं रे सोस तो फोल होतो ॥ असे संचितीं तें चि तो देव देतो ॥
मतीहीन तो कां सदां घोर वाहे ॥ ह्मणे **वामना** हेंचि आश्चर्य आहे ॥५५॥
मना सज्जना जन्मांतरीं पुण्यठेवा ॥ नसे संचिल्या मागसी काय देवा ॥
नसे दीधल्यावीण तें प्राप्त कांहीं ॥ ह्मणे वामना तूं विचोरूनि पाहीं ॥५६
मना हिंडसी स्वर्ग मृत्यू वलोकूं ॥ वृथा भ्रामसी कोण तूझा विवेकू ॥
असंख्यात ब्रह्मांड शोधूनि पाहीं ॥ म्हणे **वामना** दीधल्यावीण नाहीं ॥५७
मना पाहिंरे कोण कोठोनि आला ॥ कसा भूलला वीषयीं लुब्ध झाला ॥
प्रपंचीं जया लागली फार गोडी ॥ म्हणे **वामना** बंधनें कोण तोडी ॥५८
मना देखतां देखतां मूर्ख होसी ॥ अहंता जयाला गिळी काळराशी ॥
तयाचे मुळें क्रोध निर्माण देहीं॥ ह्मणे **वामना** नाठवे त्यासि कांहीं ॥५९॥
मना शुद्ध जें ब्रह्म तें व्यक्त झालें ॥ अहंतेमुळें त्यासि अज्ञान आलें ॥
आशा लागली द्रव्यकांतादिकीं ही ॥ह्मणे **वामना** यामुळें मुक्ति नाहीं ॥६०॥

---

९ दारा=स्त्री. १० अंजन=काजळ. ११ विचारून=विचारकरून.

मना बाल्य तारूण्य वृद्धत्व गेलें ॥ विचारी च ना हीत त्यां काय केलें ॥
अहंता तुला काळ आवर्तमोठें[12] ॥ म्हणे **वामना** बांधि तूं ज्ञानपेटें[13] ॥ ६१ ॥
मना रे तुला ज्ञान होईल जेव्हां ॥ अहंता तुझी पालटे सर्व तेव्हां ॥
गुरूअंजनावीण कांहीं न भासे[14] ॥ म्हणे **वामना** पाहिं तूं सावकाशें ॥६२॥
मना धर्म सोडूं नको पाप जोडूं ॥ यदर्थी असे कायपां तूज कोडूं ॥
जलाचे परी लिप्त आलिप्त व्हावें ॥ म्हणे **वामना** ब्रह्म होसी स्वभावें ॥६३॥
मना रचना सर्व कोठूनि झाली ॥ विचारीं च ना तूज कां भूल आली ॥
चराचर ह्या निर्मिल्या चारि खाणी ॥ म्हणे **वामना** देव तो साच मानीं ॥६४॥
मना बोलती सृष्टिकर्ता **विधाता** ॥ प्रतीपाळिता **विष्णु** तो अन्नदाता ॥
**महारुद्र** संहारितां सर्व कांहीं ॥ म्हणे **वामना** सत्य आत्मतत्व पाहीं ॥ ६५ ॥
मना कर्मकर्ता असेची निराळा ॥ तया पासुनी जाण हे सृष्टि-लीला ॥
जशा बाहुल्या नाचवी खांबसूत्रीं ॥ म्हणे **वामना** पाहिं तू ज्ञाननेत्रीं ॥६६॥
मना पिंड ब्रम्हांड आनंत कोटी ॥ कसा चालवी लाघवी शक्ति मोठी ॥
न दीसे कदां कोंदली सर्व सृष्टी ॥ म्हणे **वामना** पाहिं तूं ज्ञानदृष्टी ॥६७॥
मना कर्म सोडोनियां एक देती ॥ स्वयें ब्रह्म ऐसें मुखें बोलताती ॥
परी संपती नासतां खेद पावे ॥ म्हणे **वामना** ब्रह्म कैसें म्हणावें ॥ ६८ ॥
मना तृप्ति नाहीं जया अंतरामीं ॥ करी कर्म तें हेत संकल्प कामीं ॥
नसे बुद्धि निष्काम देहांतकाळीं ॥ म्हणे **वामना** गुंतला मोहजाळीं ॥ ६९॥
मना मी असें पाहिं तें कोण काय ॥ कुठें जन्मले कोण तें बापमाय ॥
विचारूनियां मीपणा ठेविं ठाईं ॥ ह्मणे **वामना** यापुढें ज्ञान नाहीं ॥ ७० ॥
मना वेद शास्त्रार्थ धुंडीं पुराणीं ॥ नसे देखिला थोरला देव कोणी ॥
तिन्ही देव नीर्माण केले जयानें ॥ ह्मणे **वामना** पाहिं तूं आत्मज्ञानें ॥७१॥
मना आपल्यातें विचारूनि पाहें ॥ न गुंते कदां देह आनित्य[15] आहे ॥
शिवाला जिवा लोभ तो या प्रसंगीं ॥ म्हणे **वामना** लाविलें कर्म अंगीं ॥७२॥
मना जें घडे कर्म प्रीक्तनानुयोगें[16] ॥ नको लिप्त होऊं अणूमात्र भंगे ॥
अहंता तुझी तूजला बाध झाली ॥ म्हणे **वामना** पाहि पर्मार्थ बोली ॥७३॥
मना देह तूझा नव्हे सत्य मानीं ॥ वृथा भूलसी कोण वाटे शिराणी[17] ॥
अनित्यासि आत्मा कसा युक्त होय ॥ ह्मणे **वामना** तूं धरीं ज्ञानसोय ॥७४॥
मना जाण रे देह तो नाशवंत ॥ निराकार आत्मा असे आदिअंत ॥

---

१२ आवर्त=पाण्यांतला भोंवरा. ( आवर्तोऽम्भसां भ्रमः ) १३ पेटा=पोंहते समयीं कमरेस भोंपळा इत्यादि बांधताता १४भासें=दिसे. १५ अशाश्वत. १६पूर्वकर्मानुरूप. १७आवड.

इति
२८३

घटीं सूर्य बिंबा जसा लेप नाहीं ॥ ह्मणे **वामना** तूं विचारूनि पाहीं ॥७५॥
मना जोण आत्मा असे ब्रम्हरूप ॥ अविद्यादेह तो चि हा अंधकूप ॥
जया ज्ञान हें तो चि सज्ञान मानीं ॥ म्हणे **वामना** तोचि कैवल्यदानीं ॥७६॥
मना ब्रह्मकर्मासि कोण्या प्रकारीं देहसंभ्रमें जेंवि कां [१८]पद्म [१९]वारी ॥
देहातीत तो कर्म कां सत्य मानी ॥ ह्मणे **वामना** थोर वाटे शिराणी ॥७७
मना पद्म जें जन्मलें वारियोगें ॥ परी लिप्त नाहीं अणूमात्र भोगें ॥
असें जाणुनी भूलती आत्मज्ञानी ह्मणे **वामना** थोर वाटे शिराणी ॥ ७८
मना ज्ञानचर्चा करीं दीनरातीं ॥ जया शीकवी जाणतो बोध पाती ॥
मना निश्चयें वीषयीं लुब्ध प्राणी म्हणे वामना थोर वाटे शिराणी ॥७९
मनारे जळीं आलिप्तत्व पाहें ॥ देहातीत आत्मा निराकार आहे ॥
देह नासितां मानिती मूर्ख हानी ॥ म्हणे **वामना** थोर वाटे शिराणी ॥८०॥
मना आपला भाव तो देव जाणें ॥ नसे भाव ते भक्ति लाजीरवाणे ॥
धरी भाव ना एक सर्वत्र पाहीं ॥ ह्मणे **वामना** देहवेगळा देव नाहीं ॥८१॥
मना ज्ञान रे तें चि तूं ध्यान मानीं ॥ मना भाव रे देव हा सत्य वानीं ॥
मना देव हा संदेह तूं जाण बापा ॥ ह्मणे **वामना** यामुळें जन्मखेपा ॥८२॥
मना देव आकारिला भक्तराजें ॥ तया लाविलें ध्यानभावार्थओझें ॥
कसा देतसे चिंतिलें सर्व कांहीं ॥ ह्मणे **वामना** भाव तो देव पाहीं ॥८३॥
मना भाव देहीं असे शुद्ध ज्याचा ॥ जनीं जाण रे तो असे भक्त साचा ॥
तयाकारणें देव आकारिलासे ॥ ह्मणे **वामना** चर्मचक्षू न भासे ॥८४॥
मना मानवी देह पां थोर आहे ॥ बहू संचितें जोडला तूज पाहें ॥
करीं ज्ञानचर्चा सदा सर्व कर्मी ॥ पुरा **वामना** वर्ततूं कां स्वधर्मी ॥८५॥
मना सज्जना ज्ञानचर्चा करावी ॥ तरी अंतरीं शुद्ध कीर्ति धरावी ॥
विवेकें बहू अंतरा आंवरावें ॥ह्मणे **वामना** हें चि जीवीं धरावें ॥८६॥
मना मान्य ते त्यांसि तो मान व्हावा ॥ सदा अंतरीं सद्गुरू तो भजावा ॥
जयानें तुला लाविली ब्रह्मगोडी ॥ ह्मणे **वामना** पाय त्याचे न सोडीं ॥८७॥
मना सद्गुरू तो चि देवाधिदेव ॥ तयापासुनी ब्रह्मविद्या उपाव ॥
भवीं सागरीं तूज तारील साचा ॥ ह्मणे **वामना** तोडि संशयो जिवाचा ॥८८॥
मना रे गुरूवीण तें काय जीणें ॥ गुरूवीण तो दीन आत्मार्थ नेणें ॥
जगीं मोक्षदाता गुरू सत्यमानीं ॥ ह्मणे **वामना** पाहिं वेदीं पुराणीं ॥ ८९ ॥
मना जाण तो सद्गुरू मोक्षदारीं ॥ दया अंतरीं त्याचि आम्हां शिराणी ॥
नको चाट वाचाट गर्विष्ठ कोपी ॥ ह्मणे **वामना** तो गुरू पापरूपी ॥९०॥

---

१८ कमल. १९ पाणी.

मना ज्या गुरूलागिं कामार्थ गोडी ॥ स्वयें तो दुजाची कशी भ्रांति फेडी ॥
कटीं बांधिल्या जेंवि पाषाण थोर ॥ कसा वामना होय तो पैल पार॥९१॥
मना रे गुरूशिष्य कोट्यानुकोटी ॥ नसे साध्यसाधन त्या हेत पोटीं ॥
गुरुद्रव्यें काजा करी शिष्य मोठा ॥ ह्मणे वामना तो गुरू ची करंटा॥९२॥
मना रे गुरू जाण मोह प्रपंचीं ॥ अतीआदरें पूर्ण भावार्थ संची ॥
दया सांगतो तो पिता आणि माय ॥ह्मणे वामना त्या गुरू शर्ण जाय॥९३॥
मना रे गुरू तो अती जो निगर्वी ॥ करी तो तुझें चिंतिलें अर्थ पूर्वी ॥
तुला सांगतो ज्ञानमूर्तीउपाय ॥ ह्मणे वामना त्या गुरू शर्ण जाय ॥ ९४ ॥
मना जो गुरू रंकराजा समान ॥ करी कर्म निष्कामबुद्धी विधान ॥
जयाचे कळीकाळ वंदीति पाय ॥ ह्मणे वामना त्या गुरू शर्ण जाय॥९५॥
मना तीर्थ पाणी तोय पाषाण देव ॥ बरा धुंडुनी पाहिं सर्वत्र ठाव ॥
असे तो [च] पाषाण सर्वत्र पाहीं ॥ गुरूवांचुनी वामना मुक्ति नाहीं॥९६॥
मना देव पाषाण रे तीर्थ पाणी ॥ तिथें गेलिया काय फीटे शिराणी ॥
गुरू बोलता चालता देव तीर्थी ॥ ह्मणे वामना चिंतिलें दे समर्थी ॥९७॥
मना तीर्थ वाराणशी मोक्षराज ॥ तिथें गेलिया चिंतिलें होय काज ॥
परी तोय पाषाण तीजें दिसेना ॥ ह्मणे वामना मूर्ख तें ऊमजेना ॥ ९८ ॥
मना तूज विश्वास कोठें च नाहीं ॥ तयालागिं ऊपासना सर्व पाहीं ॥
दिसे एक आनेक कोठें दिसेना ॥ ह्मणे वामना मूर्ख तें ऊमजेना ॥९९ ॥
मना देश दीवाकरो देशद्रष्टा ॥ तुझी मावळे त्रीपुटी[२०] सर्व चेष्टा ॥
तेव्हां अंतरीं होतसे ऐक्य भावें ॥ ह्मणे वामना चिंतिली मुक्ति पावे॥१००॥
मना मुक्ति चत्वारि[२१] होतील दासी ॥ तुझ्या दग्ध होतील रे पापराशी ॥
अखंडीत स्वयंभू ब्रह्मवैभवीं ॥ ह्मणे वामना कल्पना पालटावी ॥१०१॥
मना पा[illegible] कोट्यानुकोटी ॥ जयामाजि रे कोणती भक्ति मोठी ॥
नि[illegible] मूर्खचाळा ॥ ह्मणे वामना देव आहे निराळा॥१०२॥
मन[illegible] व्यक्त नाहीं ॥ दिसे व्यक्त तो जीवप्रपंच पाहीं ॥
निराभास निवर जें ध्यान ज्याचें ॥ ह्मणे वामना तें च कैवल्य साचें॥१०३॥
मना बोलतां खुंटल्या चार[२२] वाणी ॥ असा देव तो कोण ध्यानास आणी ॥
न दीसे तया ठाव ना कूळ नांव ॥ ह्मणे वामना सांपडे एक भाव॥१०४॥
मना एक जाणूनि ऊगाच राहें ॥ तरी देव कां तूज सन्नीध आहे ॥
कदा नापडे ठाउका द्वैतभावा ॥ ह्मणे वामना अंतरीं ओळखावा ॥१०५॥

---

२० त्रिपुटी = ज्ञान, ज्ञेय, ज्ञाता. २१ चत्वारि = चार ( मुक्ति-मार्गें टीप ५वी पहा ). २२ चार वाणी = परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी.

मना अंतरीं राहे अव्यक्त देव ॥ तयावीण तो कोणता रिक्त[२३] ठाव ॥
जयाकारणें तीर्थयात्रेसि जासी ॥ ह्मणे **वामना** देव तो तूजपाशीं ॥१०६॥
मना तीर्थयात्रेसि जाऊनि काय ॥ कदा हि तुझी भ्रांति कोठें न जाय ॥
अहा अक्षरा जाळुनी टाकिं वेगीं ॥ ह्मणे **वामना** मुक्ति सत्वेंर भोगीं॥१०७॥
मना जें निराकार कैसें नि ध्यासी ॥ अरूपासि कां रूप तूं लावितोसी ॥
असे देव तो पंचें[२४] तत्वांनिराळा ॥ ह्मणे **वामना** सांडिं तूं मूर्खचाळा ॥१०८॥
मना देव डोळां दिसेना कदाही ॥ जंवें तूजला अंतरीं ज्ञान नाहीं ॥
नये दावितां भावितां रूप ज्याचें ॥ ह्मणे **वामना** तेंचि कैवल्य[२५] साचें॥१०९॥
मना शीणले देव तीन्ही कळेना ॥ पहा वेदशास्त्रीं कदा आढळेना ॥
तुझा दग्ध तो होय प्रपंचमेळा ॥ दिसे **वामना** देव प्रत्यक्ष डोळां ॥११०॥
मना जाण माया अकारे प्रपंच ॥ तया माजि रे एक [ से ] उंच नीच ॥
तिन्ही देव इंद्रादि सर्वांस जाणा ॥ नव्हे **वामना** मुख्य तो देवराणा॥१११॥
मना रे तिन्ही देव ते आदि माया ॥ तयांला असे लागली जीवकाया ॥
जरा मृत्यु इत्यादिकें त्यांस पाहें ॥ ह्मणे **वामना** देव कैसेनि होय ॥११२॥
मना रे तिन्ही देव निर्माण होती ॥ महा कल्पकाळीं क्षया पावताती ॥
नसे थोरला देव तो जन्मनासे ॥ ह्मणे **वामना** दृश्य माया विकासे ॥११३॥
मना दृश्य ते जीव प्रपंचमेळा ॥ तया बोलिजे जाण हे सृष्टिलीला ॥
ह्मणी मानिसी त्यांसि देवत्वभावें ॥ ह्मणे **वामना** अंतरीं ऊमजावें ॥११४॥
मना रे जळीं होय जैसा तरंग[२६] ॥ दिसे पां तया माजि नाना सुरंग ॥
तया जाण आकार ब्रह्म नयासीं ॥ म्हणे **वामना** पाहिं कां भूललासी ॥११५॥
मना रे तुवां देहभाव त्यजावा ॥ देहातीत आत्मा मनीं ऊमजावा ॥
देहा भास हा जें निवारी तरंग ॥ तसा **वामना** देह आत्म्यास संग॥११६॥
मना देहोपर्णी पाहसी आत्मरूपा ॥ तसें ज्ञानयोगें दिसे ब्रह्म बापा ॥
देहातीत होऊनियां शुद्ध भावें । ह्मणे **वामना** ब्रह्म तें ऊमजावें॥ ११७॥

---

२३ रिक्त = रिकामा. २४ पंच तत्वें = पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश. अर्वाचीन रसायन-शास्त्रज्ञांच्या मतें या पांचांतून एक ही तत्व नाहीं. कारण पृथ्वी सुवर्णादि अनेक तत्व घटित आहे. आप हें प्राण वायु व जलोद्भव या वायूंनीं बनलें आहे. वायु ( हवा ) हा प्राणवायु, तार्क्ष्योद्भव = ( नैत्रोजन ), व अंगाराम्ल वायु (कार्बोनिक आसिड ग्यास) व इतर कांहीं पदार्थांचें मिश्रण आहे. तेजाचें स्वरूप अद्यापि रोबर समजलें नाहीं आकाश ह्मणजे कवळ पोकळी अर्वाचीन मताप्रमाणें आजपर्यंत ६५ तत्वें सांपडलीं आहेत. पैकीं सुमारें 13 अधातु व बाकींचीं धातुरूप आहेत २५ कैवल्य = मोक्ष. २६ तरंग = लाटा.

मना मानवी दानवी देवयोनी ॥ असंख्यात ज्या वर्णिल्या कां पुराणीं ॥
तयावेगळा तोचि सर्वांसि मूळ ॥ ह्मणे **वामना** त्यासि ना नाव कुळ ॥११८॥
॥ इति **श्रीवामनकृत मनाचे श्लोक संपूर्ण.** ॥

मराठी ... नौपाडा शाखा ... न. क्र. ... विभाग

---

# सिद्धांतसवाई.

प्रार्थिलियाविण दुःख तसें सुख निश्चय हाचि जयासि कळे ।
एक तदीय **मुकुंद**पदीं स्थिर होउनि चित्त कधीं न ढळे ॥
**श्रीहरि**भक्ति च दुर्लभ आणिक होणार तें न कदापि टळे ।
यत्न तयासि वृथा करितां वय चाळणिचें जळ जेंवि गळे ॥१॥
दुःख चि तें सुख मानुनि इच्छिति तें सुख आपण हें न कळे ।
तोंवरि तें न कळे सुख जों मन श्रीगुरुचे चरणीं न मिळे ॥
बाह्य सुखें धरितां हि न सांपड दूर जसें मृगनीर[1] पळे ।
याकरितां वय हें म्हण **वामन** ओंजळिचें जळ जेंवि गळे ॥२॥
चित्त जगांत अहंममते करि मालक सर्व जनाच असे ।
**श्रीहरि** तूं धन ज्यांस तयांस हि आतळतील मनें हि कसे ॥
मागितल्याविण भीड न मानुनि देतिल सत्वगुणासरिसे ।
तें तरि दान तुझें जगदात्मक तूं तुज वांचुनि कोण असे ॥३॥
एक शरीर अहंममतास्पद तें विकिलें तुजलागिं **हरी** ।
आत्मसुवर्ण चराचर मुद्रित घेतलें वीतदिगांतभरी ॥
त्यास जिणें सुख दुःख हि चिंतन × × × का मज या उपरी ।
आपण अश्व जसे विकिले मग एक बसोत हि दोघ वरी ॥४॥
कोठवरी मन धावडसी तरि त्याहुनि तूंच पुढें असती ।
ऐसें असूनि हि एक शरीर तुं आपुलें मानुनियां बससी ॥
सर्व हि तुज मधें सकळांत तुं येरिति तूज चि तूं दिससी ।
मागुति जीव मिं बद्ध मिं मानुनि बा कवणा वरि तूं रुससी ॥५॥
एक घटीं नभ तें सकळां घटिं तें चि मठीं न हि तो चि खरें ।
जाणसि आत्मशरीर जसें तसें जाणुनि सर्व हि पाहि बरें ॥
भेद हि मीतुंपणें अभिमान चि जाणसि तें किं नसे दुसरें ।
तें चि तुं जाण ह्मणे कवि **वामन** होसिल ब्रह्म चि एक खरें ॥६॥

---

१ मृग-नीर = मृग-जल.

भास असत्य चि सत्य तुं मानुनि दीसत सत्य असोनि पहाना ।
टाकुनि सर्प भयास मनांतुनि निर्भय दोर धरूनि रहाना ॥
जाणलियाविण तो न कळे जडरज्जु भुजंग असा समजाना ।
श्रीगुरुचे चरणीं ह्मण वामन ठेउनियां मन कां उमजाना ॥७॥
आंगाणें सूर्य जळीं प्रतिबिंबत तेज घरांत तसं भिंतिवरी ।
तेणं न दिसे उदकांतिल भास्कर मुख्य कळे रवि त्याउदरी
जीस्तव इंद्रिय देह सचेतन जाणिव मीपण ते दुसरी
श्रीगुरूवाक्य कळे ह्मण वामन ते परमार्थ कळा तिसरी ॥८॥
विश्व समस्त हि हें सचराचर ब्रह्म चि उघड दीसतसे ।
दृष्टिस गोचर दोर असोनि हि त्यावरि पन्नग[२] भासतसे ॥
आपण रज्जु चराचर त्यावरि सर्प असत्य विराजतसे
या चि निजानुभवें करि वामन श्रीचरणीं जग मोहितसे ॥९॥
स्वप्न जनांसि रचोनि मनें करि त्यास सचेतन तो चि करी ।
एक तनू अभिमान तयास चि मानुनि भेद अनेक परी ॥
ऐस च जागृत विश्व हें जाणुनि कोठ हि भाव दुजा न धरी ।
जागृत तो चि जगीं ह्मणं वामन त्यासि च सांपडला हि हरी॥१०॥
विश्व समस्त दिसे तुज अंतरिं आरसिया जशि[ती] नगरी ।
कांहिं च जें न दिसे तुज वांचुनि भासवितोसि तुं तूजवरी ॥
बिंबविणें प्रतिबिंब चराचर मूर्ति परोपरिच्या कुसरी ।
चित्सुखपूर्ण सदोदित दर्पण तूजहि काय अशक्य हरी ॥११॥
शिष्य बहू गुरु मेळविती परि दुर्लभ तो चि जो शिष्य करी ।
ब्रह्म चि होउनि शेष उरे तरि ते खुण शिष्यपणाचि खरी ॥
मंत्र हि देतिल जे शिकवीतिल नाटक काव्य कला कुसरी ॥
ते हि गुरू परि सद्गुरुवांचुनि शिष्यपणा चि असे उरी ॥१२॥
दुःख असत्य अनात्मक शोधुनि सत्य सुखात्मपणें उरवी ।
दुःख असत्य अनात्म मृगांबुहि तो करि सत्य सुखात्म रवी ॥
तो सुख कल्पतरू हि गुरू जगिं देह विदेहपणें मिरवी ।
फुंकिति कान दुकान तये स्थळीं हे पदवी न दिसे बरवी ॥१३॥
नाठवितां हि परोक्ष नसे परि आठवितां अपरोक्ष दिसे ।
आठव नाठव दोन्हि हि मोडुनि आत्मसमाधि सुखांत वसे ॥

२ पन्नग = सर्प.

देह विलक्षण आपलें लक्षण हें स्मरतां हृदयीं गवसे ।
व्यर्थ कळा सकळां ह्मण वामन ते गुरुच्या भजनीं च वसे ॥१४॥

**समाप्त.**

---

## करुणाष्टक.

॥ लोपोनि भास्कर जयद्रथ मारियेला । लज्जानळांतुनि धनंजय वांचवीला ॥
॥ लाक्षागृहीं विवरिं पांडव रक्षियेले । माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥१॥
॥ दुग्धामिषें द्विजसुतें स्तविला मुरारी । दुग्धार्णवीं अचल ठेविसि पूतनारी ॥
॥ कुब्जेचि भक्ति तरि देखुनि क्षेम दील्हें । माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥२॥
॥ आणोनि राजतनयां अधमें सभेला । दुष्टोत्तरें करवि नग्न करीं सभेला ॥
॥ ती कारणें स्वकरिं अंबर नेसवीलें । माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥ ३ ॥
॥ उत्तानपाद[6] नृप केवळ पुण्यराशी । तत्सूत तो ध्रुव तपोधन-योग-राशी ॥
॥ त्याकारणें अचळ धाम करोनि दिल्हें । माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥४॥
॥ नक्रें जळांत चरणीं धरिले गजेंद्रा ॥ ग्लानोत्तरें करुनियां स्तवि देवइंद्रा ॥
॥ तैं दीनबंधु ब्रिद सत्वर रक्षियेलें ॥ माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥ ५ ॥
॥ वृत्रारि कोपुनि शिळाघन वर्षवीला ॥ तेव्हां भयप्रळय कंप गमे जनाला ॥
॥ घेवोनियां गिरि करीं व्रज रक्षियेलें ॥ माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥ ६ ॥
॥ सिंधूजळांत कनकापुर दूर गावें[9] ॥ तेथोनि शीघ्रगति मोक्षपुरीस यावें ॥
॥ काष्टाग्नि घे भरत दर्शन त्यास दिल्हें । माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥७॥
॥ जे शापदग्ध पडली बहुतां दिसांची ॥ लावूनि पाय हरली जडता तयेची ॥
॥ त्या भक्तवत्सलपणा प्रति काय झालें । माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥८॥
॥ दुर्योधनें ऋषिस धाडियलें वनातें ॥ धर्मा छळूनि मुनि मागति भोजनातें ॥
॥ त्याकारणें परम अन्न निशींत दिल्हें । माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥९॥
॥ द्विजवर हि दरिद्रें पीडिला तो सुदामा ॥ पृथुक भरुनि मुष्टी पातला कृष्णधामा ॥
॥ देऊनि कांचनपुरी द्विजराज केलें ॥ माझे विशीं च मन निष्ठुर कोंवि केलें ॥१०॥
॥ त्रिकाळीं करा घोष या अष्टकाचा ॥ मनींचा पुरे अर्थ तेव्हां च साचा ॥
॥ विनंती असे भक्त हो वामनाची ॥ उपेक्षा न कीजे यया अष्टकाची ॥११॥

---

१ अर्णव = सागर २ पूतनारि = पूतनेचा-शत्रु ३ क्षेम = आलिंगन ४ राजतनया = राजकन्या (द्रौपदी). ५ अंबर = वस्त्र. ६ उत्तानपाद = ध्रुवाचा बाप. ७ धाम = स्थान. ८ वृत्रारि = इंद्र. ९ गावें = योजनें. १० पृथुक = पोहे.

# अथ चतुःश्लोकी भागवत.

हा तो मी च उगाच विश्व नव्हतें कांहीं अरे धातया ॥
कैचें हे सदसत् प्रधान पर जें मद्भाव नाहीं तया ॥
आतां त्यावरि विश्व मी च गुज हें अद्वैत पाहें बरें ॥
आहे तेंच विरे हि विश्व सकळीं अद्वैत पाहें खरें ॥ १ ॥
साची वस्तु नसे नसोनि गंवसे हे ज्यांत माया असे ॥
तैसाची न दिसे दिसोनि हि असे जीवात्ममाया असे ॥
मिथ्या सर्व शरीर ज्या चरित तो रज्जू कळोनी कळे ॥
आधारी स्वतनु प्रतीति असतां दृष्टीस जी नाकळे ॥ २ ॥
भूतें या च निघोनियां प्रति तनू आहेतशीं भासतीं ॥
भूतांवांचुनि अन्य देह नसतां भूतींच भूतस्थिती ॥
भूतें ते मज माजि ये रिति तयांमध्यें निघालों दिसे ॥
अन्योन्यें ह्मणुनी तयांत न निघे आहें तसा मी असें ॥ ३ ॥
जो जाणोनि ह्मणूनि यत्न करितां जिज्ञासु सत्यात्मता ॥
जाणावें इतुकें चि त्या सुपुरुषें रे ब्रह्म या तत्वता ॥
सर्वत्र व्यतिरेक अन्वयपणें जें नित्य तें जाणणें ॥
जाणोनि त्रिगुणीं जडीं जडपटीं चित्तंतुतें पाहणें ॥ ४ ॥

समाप्त.

---

## स्फुट श्लोक.

( १ )

उर्ष्टीं धुतां काय न अन्न सांचे ॥ गर्ताजळीं त्या मग वायसांचे[1] ॥
समूह वाती न कदापि जाती ॥ त्या काकतीर्थाप्रति हंस जाती ॥१॥
केलें मऊ न गिळिजेच कठोर कांहीं ॥ तो उष्ट्र खाय वदनीं वनकंटकां ही ॥
तो तो स्वसूकरें[2] खरोष्ट्र[3] समान होतो ॥ वाहे वृथा नरपणें अभिमान हो तो ॥२॥
जें जाणणें जाणतसे जगातें ॥ नव्हे तमोज्योतिहि तेज गा तें ॥
चिदंबुधी[4] साच जडा न गारा ॥ हें ब्रम्ह जाणा पिटितों नगारा ॥३॥

---

१ वायस = कावळा. २ सूकर = डुक्कर. ३ खर = गाढव. ४ चिदंबुधि = चित्सागर.

जरि हरि गुण आली गुंफिली होय वाणी[5] ॥
तरि परम सुखाला काय हो त्यास वाणी[6] ॥
स्तवि इतर नरांतें जीभ ते दैन्यवाणी ॥
मुठिहि भरि न देती पुष्ट संतुष्ट वाणी[7] ॥ ४ ॥
रघुपतिभजना जो सर्व ही काळ सारी ॥
न वधि भवतमा तो जन्म पावे असारी ॥
ह्मणुनि जन तुह्मी गा गातसां राघवातें ॥
ऋषिवर गुण गाती नीरसाया भवातें ॥ ५ ॥
ज्या मांडिया खगभुजावरि[8] वर्तमाना ॥
ज्या सावळ्या अतसिका[9] कुसुमासमाना ॥
पीतांबरा वरि कटी अति रम्य कांची[10] ॥
पंक्ती जिला मणिमया सह मुद्रिकांची ॥ ६ ॥
वर्णरीति यमकीं समजाते । ते चि कीं विषय कीं समजाते ॥
वामनें हरिगुणीं रसनेला[11] । अर्पुनी अनुभवें रस नेला ॥ ७ ॥

( २ )

अरे ग्रासोग्रासीं रघुपतिसि कैसा विसरसी ॥
जयाचीं हें नामें वदनि वदतां भ्रांत सरसी ॥
मुकुंदा गोविंदा म्हणत मनिं जिव्हेसि सुचवीं ॥
बरीं ध्यावीं ऐसीं जन सकळिकां राम सुचवी ॥ १ ॥
माय ते सदय लेंकुरवाळी । बालकाप्रति जशी कुरवाळी ॥
राम ते द्रुम भवांकुर[12] वाळी । तारिला शतमखांकुर[13] वाळी ॥ २ ॥
दास्य दे हरि तुझ्या चरणाचें । कीर्तन श्रवण आचरणाचें ॥
दे अनन्य हृदयीं स्मरणाचें । हें न देशि तरि दे मरणाचें ॥ ३ ॥
जाणेल जो गुरुकृपेस्तव आपणातें ।
तो कां स्मरेल नसत्या पहिले पणातें ॥
तो तूं च कीं ह्मणुनि पूसति लोक सारे
हा देह सात विति होइल तो कसारे ॥ ४ ॥

( ३ )

मुनिमनें रमती रघुनंदना । तुजमधें दशकंधरसूदना[14] ॥

---

५ वाणी = वाचा. ६ वाणी = कमताई. ७ वाणी = दुकानदार ८ खग = गरुड ९ अतसिका = पुष्पविशेष १० कांची = कमरपट्टा ११ रसना = जीभ १२ भव = संसार १३ शतमखांकुर = इंद्रपुत्र १४ सूदना = नाशका

म्हणुनि निर्गुण **जानकिनायका** । म्हणति **राम** तुतें गतिदायका ॥१॥
करुनि दिव्य अलौकिक सुव्रतें । रमविशी मन तूं सगुणामृतें ॥
सगुणतंतु असे रिति **राम** तूं । स्वजन हृत्कमलीं अभिराम[15] तूं ॥ २ ॥
**सूर्य**वंश-अमृतांबुधिसोम[16] । **रामचंद्र** म्हणती तुज **रामा** ॥
पाप-ताप हरि नाम जिवाचे । दाह शांत करणार शिवाचे ॥ ३ ॥
चंद्र आणिक धरी शिरिं **गंगा** । जाय ना तरि विषानल[17] भंगा ॥
**रामचंद्र** ह्मणतां मग वाचे । दाह शांत अवघे च शिवाचे ॥ ४ ॥
**राम** हृत्कमळिं अंत लवेना । **राम** नाम वदनीं पळवेना ॥
काळकूट-विष **शंकर** कंठीं । काल **राघव**-भयास्तव कंठीं ॥ ५ ॥
शर्व[18]कंठ-विषगर्व हराया । शक्त नाम चि तुझें **रघुराया** ॥
सेतु सागर कपी उतराया । नाम-सेतु भवसिंधु तराया ॥ ६ ॥
**राम** नाममय **राम** चि लोकीं ॥ हें न ज़ाणत वृथा शिणलों कीं ॥
**राम**नाम धरिलें जयिं वाचे ॥ तूटती तयिंच बंध भवा[19]चे ॥ ७ ॥
सिंधु-सेतु रचिला **रघुरामें** ॥ नासिला भवसमुद्र चि नामें ॥
तारिली स्वनगरी अवतारी ॥ **राम**नाम भुवनत्रय तारी ॥ ८ ॥
मूर्ति न प्रगटली घनवर्णी ॥ जो दिवाकर कुळीं नृप वर्णी ॥
तो चि हे गुण हि **वामन** वर्णी ॥ मूर्ति आदि कवि **वाल्मिक** वर्णी ॥९॥

( ४ )

जो न गाय हरिचे महिमेला[20] ॥ तो असे जित चि या महि मेला ॥
ऐसियासि **यम** केंवि न जाची ॥ मूर्ति भ्रष्ट न जयासि अजा[21]ची॥१॥
कीर्तनीं आजि पुढें वसवा हो ॥ नायके तरि दुजा वस वाहो ॥
तो बरा पशुचि यान भवाचा ॥ हा नराधम जसा विभवाचा ॥२॥
**ईश्वरें** तुज दिली नरकाया ॥ साधनें करिशि तूं नरका या ॥
भोगिशी निशिदिनीं विषयातें ॥ मानसी न मनिं तूं विष यातें ॥३॥
कृतयुगाहुनि उत्तम हा कली ॥ म्हणुनि **भागवतीं मुनि** हाकली ॥
नरतनू अति त्यांतहि जीभली ॥ अजितनाम वदे तरी जी भली॥४॥
गाऊनियां मधुर हें हरिनाम नाचा ॥पाहो मग भ्रम कसा हरिना मनाचा ॥
तत्रापि कीर्तन चि मुख्य कलौ[22] करितो॥होतो सदा प्रगटतारक लौकरी तो॥५॥
न गर्जती जे हरि गाढ वाचे ॥ ते पापरूपी नर गाढवाचे ॥

---

१५ अभिराम = शोभायमान १६ सोम = चंद्र १७ विशनल = विषाग्नि १८ शर्व = शिव १९ भव = संसार २० महिमा = मोठेपणा २१ अज = परमेश्वर २२ कलौ = कलींत

न आतळावे[23] अजि त्यांस वाटे ॥ ज्यांच्या मनीं वास न केशवा टे॥ ६॥
दाटूनि एक हरिनाम-रसास पाजी॥पाजी च जो न चवि घे न करी तपा जी ॥
हा मानवी च कृतदेह गमावितो कीं॥खेळोनि कांच मणिसी विषया पितो कीं॥७॥
जो घे विलास रघुनायक-गायनाचे ॥ तेथें समीरसुत[24] आपण गाय नाचे ॥
जोडोनि अंजुळि पुढें स्वशिरावरी तो ॥ शोभे खराच रघुवंश-वरा वरी तो॥८॥
सकळ जन्म कसा तरि मीरवा ॥ जरि खरा उतरे तरि मी रवा ॥
मम समस्त अशेचि ये महा ॥ जग तसें दिसतें निज नेम हा ॥९॥
हरिनाम माझें हरिनाम तूझें ॥ हरिरूप माझें हरिरूप तूझें ॥
हरिध्यान माझें हरिध्यान तूझें ॥ हरिज्ञान माझें हरिज्ञान तूझें ॥१०॥

( ५ )

पूर्वीं नसे शेवटिं ही नसेना ॥ तें मध्य काळीं दुसरें दिसेना ॥
दिसे असे जो नगजा वरूनी ॥ ते तें चि हें जाण मनीं धरोनी ॥१॥
ऐकें प्रसिद्धें हरिचीं सुभद्रें ॥ जीं जन्मकर्में हरिती अभद्रें ॥
नामांत त्यातें च कथाप्रसंगें ॥ ते गाय निर्लज्ज किं रे असंगें ॥२॥
हे नेम ज्याला हरिगायनाचे ॥ प्रेमें द्रवे स्वप्रिय गाय नाचे ॥
हांसे रडे गर्जतसे अहो तो ॥ दृष्टीं जनाच्या दृढ मूढ होतो ॥३॥
कैवल्यनाथा[25] वरदेश्वरातें ॥ नरा वरीना बुध नश्वरातें[26] ॥
जें भोगिती कीं नरकांत कामी ॥ मागेन तें कां नरकांतकीं[27] मी ॥४॥
तो मोक्ष ही मज नसो श्रुतिसार साचा ॥ जेथें नसे रस तुझ्या पदसाररसाचा[28] ॥
तूझें सदुक्त चरितामृत देवराया ॥ ऐके मनीं युवतकर्ण दिजे वरा या ॥५॥
वारा तुझ्या पदसरोज-सुधालवाचा ॥ जो वर्णितां निघतसे तव भक्त वाचा ॥
आघ्रांसजो श्रुतिस योगि जनास योजी ॥ त्यावेगळा वर मुखास तुझ्या न योजी॥६॥

( ६ )

ज्याच्या कदापि न निघे गुणगायकांनीं ॥गातां मुकुंद चरितामृत गायकांनीं ॥
तो तो स्वसूकरखरोष्ट्रसमान[29,30] होतो ॥ वाहे वृथा नरपणें अभिमान हो तो ॥१॥
हाडि हाडि ह्मणतां हि न राहे ॥ श्वानबुद्धि वे श यां त नरा हे ॥
ग्रामसूकर असा वळखा तो ॥ कीं अमंगळ चि केवळ खातो ॥२॥
केळें मऊ न गिळवे न कठोर कांहीं ॥ तो उष्ट्र खाय वदनें वनकंटकां ही ॥

---

२३ आतळावे = स्पर्शावें. २४ समीर-सुत = हनुमान. २५ कैवल्य = मोक्ष. २६ नश्वर = नाशवंत. २७ नरकांतक = ईश्वर (नरक-नाशक) २८ पद-सारस = पाद-कमळ. २९ सूकर = डुकर. ३० खर, उष्ट्र = गाढव, उंट.

सोपा फुका न रूचतो मधुकैटभौरी[31] ॥ घे क्लिष्ट भोग वदनें निजकैटभारी ॥३॥
लत्ता प्रहार वदनीं अति गाढवाचा ॥ हा यत्न गाढवि निमित्त चि गाढवाचा ॥
हाले निमेषं[32] इतुक्यांत चि भोग झाला ॥ ऐशा सुखें कुनर हो भजणें अजाला॥ ४॥

समाप्त.

---

# उपादान.

उपादान[1] माती च जैशी घटातें ॥ उपादान तंतू च तैसा पटातें ॥
विना ब्रह्म येना जगीं प्राणिया तें ॥ उपादान तैसें मिळे सत्य यातें ॥१॥
नगाचे[2] सबाह्यांतरीं भाव दावी ॥ नगातें उपादान सत्ता वदावी ॥
सबाह्यांतरीं ब्रह्म जैसें जगातें ॥ सबाह्यांतरीं हेमें[3] तैसें नगातें ॥२॥
नगीं दृष्टी मुष्टी कनक नुसतें सांपडतसे ॥
उपादानें येतें ह्मणवुनि च ठायीं पडतसे ॥
असे सर्वां पावीं प्रतिति[4] हि अधिष्ठान गवसे[5] ॥
ह्मणोनी ब्रह्मीं हें जग ह्मणति हेमीं नग वसे ॥३॥
स्फुरे ज्ञानें आणी स्फुरण चि जया वीण न घडे ॥
असें अंतर्बाह्य प्रगट दिसतां तत्व नुघडे ॥
जडीं आत्मा ऐसा परि विरळ ऐसा अनुभवी ॥
जडद्रष्टा मात्र स्फुट वदति भेदज्ञ हि भवी ॥४॥
दसोडी[6] जे देखे तिस च वळखे बाळक पटीं[7] ॥
कळोनी ही स्वात्मा अकळ नकळे विश्वकपटीं ॥
दसोडी पासोडी रचुनि उरली प्रौढ सम जे ॥
जडीं आत्मा ऐसा अनुभवित सर्वज्ञ समजे ॥५॥
प्रतीति अशि आपुली तनुमधें चि जैं सांपडे ॥
सचेतन अचेतनीं जरि तसा चि ऐसा पडे ॥

---

३१ मधु-कैटभारी = मधु व कैटभ या दैत्यांचा शत्रु. ३२ निमेष = डोळ्यांचें पातें.
१ उपादान = ज्याला इंग्रेजी भाषेंत Material cause ह्मणतात तें. २ नग = दागिना. ३ हेम ह्मणजे = सोनें. ४ प्रतीति = अनुभव. ५ गवसे = सांपडे.
६ दसोडी = दशी. ७ पट = वस्त्र.

जडोर्मि मग ते दिसे निजचिदांबुसत्तां खरी ॥
जडैक्य न दिसे अशी मग दिसेल कां वैखरी ॥६॥

मग व्यापकें ब्रह्म होतां चि ठावें ॥जडद्वैत येणें समूळीं उठावें ॥
दिसे सर्व पाणी असें त्या तरंगीं ॥ उरे द्वैत कैसें तरी अंतरंगी ॥७॥
जो खरें जड ह्मणेल असाधू ॥ द्वैत तो श्रुतिविरुद्ध हि साधू ॥
ब्रह्म सर्व गणोनि जडाला ॥ जो ह्मणे अमृत तो चि उडाला ॥८॥

जया सर्वत्वाचा निगम न तया स्वानुभव दे ॥
असें सर्वीं हें ही विदित असतां कल्पुनि वदे ॥
जडोर्मिव्यापी जो सकळ हि चिदंबधी च समजे ॥
स्वसर्व ब्रह्मत्वीं पुरुष मग तो कां न उमजे ॥ ९ ॥
दिवांधाचे दृष्टीं दिसति न रवि-रश्मि उघडे ॥
न सर्व ब्रह्मत्वीं तशि उघडि ही दृष्टि नुघडे ॥
अपूर्तें पूर्णत्वीं ह्मणाति सकळ ब्रह्म न घडे ॥
× × × × × × × × × × × × × ॥ १० ॥
आत्मा जडांस सकळांस अतर्क्य वाटे ॥
श्रुत्यर्थता करूनि लावित अन्य वाटे ॥
त्याचे नसे नकळते कुमताभिमानी ॥
तैसें चि हें वदति अद्वयबोध मानी ॥ ११ ॥
असें सर्वांचा मी ह्मणुनि ह्मणती सर्व हि असे ॥
जडब्रह्मद्वैत श्रुतिविहित मोडीत हि असे ॥
अशांच्या शिष्यांला कशि अजडअद्वैतरचना ॥
कळे साक्षात्काराविण विकळ तो वेदवचना ॥१२॥
नगा एकाचे ते दिसति तुटतां चार तुकडे
न भेद स्वर्णत्वीं सम चि मिरवे जे चहुंकडे ॥
न तें चारि स्वर्णें विगणविति चारीहि शकलें ॥
घडेना मोडेना कनकपण इत्यादि उकलें ॥१३॥

न सर्वत्र ठायीं न सर्वत्र ठावें ॥ जडद्वैतठाणें कसें हो उठावें ॥
जडावेगळा जो स्वदेहीं च पाहे ॥ अपूर्णा गुरूची तयातें कृपा हे॥१४॥
तरंगीं जळ व्यापकत्वें कळावें ॥ तपीं ऊर्मिमिथ्यत्व तें आकळावें ॥

---

८ जडोर्मि = जडपदार्थरूपी लाट (ऊर्मी) ९ चिदंबु = चैतन्यरूपी पाणी. १० सत्ता = अस्तित्व. ११ वैखरी = वाणी, १२ चिदब्धि = चैतन्यरूपी समुद्र. १३ रश्मि = किरण.

मग व्यापकत्वास मिथ्या ह्मणावें॥ वृथा शब्दपांडित्य तें तों गणावें॥ १५॥

" ममैवांशो जीव " प्रभु ह्मणतसे पांडुतनया ॥
चिदंशज्ञानी तो करित निज देहीं जतन या ॥
जसे नाना भानु[14] प्रति जळघटीं भिन्न दिसती ॥
अहंशब्दें तैसें प्रतितनु चिदात्मे गवसती ॥ १६ ॥
सचेतन तनूमधें वसति चित्प्रकाशद्वया ॥
स्वरूप सचराचरीं सकळ वार्जितां अद्वया ॥
तदंश चि चिदंश तो जळ तरूफळें भक्षिती ॥
तया जड निषेधुनी जन अपूर्ण ते लक्षिती ॥ १७ ॥
तया जो या देहीं जड तनुनिषेधा समजला ॥
गमे त्याला झालें अधिगतें[15] परब्रह्म मजला ॥
पुसेना कीं ब्रह्म श्रुति ह्मणति सर्वत्र वसतें ॥
मला कां हो ऐसें निज तनु च मध्यें गवसतें॥ १८॥
द्विधा चैतन्याचा अनुभव असे तो न समजे ॥
पहाती सर्वज्ञ स्थिरचरजगामाजि सम जे॥
स्वकर्माचें भोगी कृतफळ गुणी तो वरि वसे ॥
अशेषात्मा ज्ञानीं सुतरपण त्याचेंचि गवसे ॥ १९ ॥
न भोक्तृत्व ब्रह्मीं प्रकृति जड सर्वांस न घडे ॥
चिदंशातें भोक्ता ह्मणउनि ह्मणा तत्व उघडे ॥
" ममैवांशोजीव " प्रभु ह्मणतसे वेद हि असें ॥
मनातें मानावें तरि जड गुणा मोक्ष न दिसे ॥ २० ॥

जया बद्धमोक्षत्व ही त्या भवार्ता ॥ तयाची न मोक्षाचि ही लाभवार्ता ॥
जया योग्य आरोग्य त्याला प्रसिद्ध ॥ श्रुतिप्रोक्त सिद्धांत हा क्षिप्र सिद्ध॥ २१॥

ह्मणे श्रुति शरीर हें रथ चिदंश आत्मा रथी ॥
हय द्विविध[16] इंद्रियें फिरवि बुद्धि हे सारथी॥
हयांसि मन दोर ते विषय ज्यामध्यें लोळती ॥
तयासहित भोक्तृता कुशल आत्मया बोलती ॥ २२ ॥

चिदंशज्ञ सर्वत्र नेणे कदापी ॥ स्वअज्ञानशौर्यें तरी येक दापी ॥
ह्मणे इंद्रियातीत आत्मा स्वरूपी ॥ न देवो जगद्रूप कांहीं अरूपी॥ २३॥

स्वरूपीं त्या आहे जग सकळ आकाशसुमनें[17] ॥

---

१४ भानु = सूर्य. १५ अधिगत = प्राप्त. १६ द्विविध = दोनप्रकारचीं (ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें). १७ सुमन = फूल.

प्रतीतीमध्यें त्या बुडवुनि असें नित्य सुमनें ॥
अविद्या ते गेली अजड निजसत्ता च उरली ॥
वदे गोष्टी ऐशा चतुर परविद्या न कळली ॥ २४ ॥
नसोनी सर्वत्र स्वसुख जरि देहीं च असतें ॥
तुझें तें सज्ञान स्वतनुभरि बोधें निरसतें ॥
स्वदेहीं देहाचा सुकृतफलभोक्ता चि फळला ॥
अगा ब्रह्मज्ञानें द्रुम अजुनि नाहीं समजला ॥२५॥
गुरू दावी देहीं स्मरण तनुमध्यें च समजे ॥
न देखे चित्सत्ता स्थिरचरजगा माजि समजे ॥
कृतार्थी ज्ञानें त्या ह्मणवि गुरु सर्वज्ञ न करी ॥
धनाचे आशेनें अधम अधन स्थान उकरी ॥२६॥
वदे जो गायत्री प्रथम गुरु तो एक असतां ॥
नव्हे द्रोही ज्ञानें गुरु करुनि अद्वैत पुसतां ॥
अपुर्ता तो ही जो जगनग उपादान नुघडे ॥
न दावी कां तेव्हां गुरु न करणें पूर्ण सुघडे ॥२७॥

इति वामनकृत "उपादान" समाप्त.

---

# ॥ व्याधाख्यान ॥

एके दिनीं कौळिक पारधीतें ॥ गेला वना घेऊनि शस्त्र अस्त्रें ॥
फिरे वनीं लक्षितसे मृगातें ॥ उष्णीं न दीसे मृग लोचनातें ॥ १ ॥
भ्रमत भ्रमत तेव्हां पातला पर्वतातें ॥
कठिण बहु गुहा ते देखिली लोचनातें ॥
मृगवत तनु ज्याची ते तनू भासलीसे ॥
अतिशय मग व्याधू बाण योजी हि हीसे ॥ २ ॥
गुहेमाजि तो तापसी कोणि एक ॥ बहूकाळ ध्यानस्थ त्यागी स्वलोक ॥
निराहार तो निर्जळी एकचित्ती ॥ स्मरे अंतरीं तो **रमाकांत** मूर्ती ॥ ३ ॥
व्याधें लक्षुनि बाण लावुनि गुणीं संधान जों योजिलें ॥

---

१८ अविद्या = अज्ञान. १९ विद्या = ज्ञान. १ गुण = दोरी.

तों तेथें मनुजाकृती स्वनयनीं तात्काळ त्या देखिलें ॥
तेज:पुंज बहू तपोधन महा ध्यानस्थ तो देखिला ॥
शस्त्रें टाकुनि सत्वरें अतिशयें साष्टांग तो वंदिला ॥ ४ ॥
अनूतापें तेव्हां हरहर वदे जी पशुपती ॥
कसी जाली होती अनुचित × × आजि नसती ॥
महाब्रह्महत्येचें [२]दुरित घडतें हो अवचिता ॥
पुढें जन्मोजन्मीं सतत नरकीं कोण बुडता ॥५॥
त्या नंतरें व्याध पुसे मुनीतें ॥ कां सेविलें कानन सांग मातें ॥
संसारदु:खें अनुताप जाला ॥ वैराग्यभावें भजतां अजाला ॥६॥
कीं राज्य गेलें धन हारवीलें ॥ कीं शत्रुचें तें भय फार जालें ॥
कीं तस्करीं सर्व हिरोनि नेलें ॥ कीं सोयरे सर्व उदास केले ॥७॥
पत्नी नसे देइन आपुली जी ॥ अभीष्ट तें मानस कोण कीं जी ॥
जे इच्छिलें पूर्ण करीन [३]आर्तें ॥ वेगें वदावें ह्मणे सुव्रतातें ॥८॥
उपरि बोलतसे मुनिगात्र तो ॥ परियसी बरवा अभिप्राय तो ॥
पातलों मि हि या वनिं पारधी ॥ लक्षितों परि नव्हे मृगपारधी ॥ ९॥
वदत व्याध कथा मृगलक्षण ॥ अणिन मी मजला नलगे क्षणें ॥
मुनि ह्मणे परिसें अरे भाविका ॥ हें चि लक्षण मृगासिनें भावि कां॥१०॥
चहू ही हातातें [४]मृगमद तनू [५]शामळें असे ॥
गळां माळा कांसे कसुनि पिंवळें वस्त्र विलसे ॥
चहू हातीं चान्ही जडित मकराकार असती ॥
जया पायीं लेणें रुण झुण बहू नाद करिती ॥ ११ ॥
हे ऐकुनीयां मुनिची सुवाणी ॥ बोले तयातें मग व्याध वाणी ॥
करीन आज्ञा अजि सत्वरेंसी ॥ सांगा तयाचें स्थळ आदरेंसीं ॥ १२ ॥
झाडावरी कीं विवरांत राहे ॥ खातो फळें कीं तृण भक्षिताहे ॥
सांगा असा नेम कटाव त्याचा ॥ धरोनि आणीन यथार्थ वाचा ॥१३॥
मुनी बोले सर्पारि निजतसे एक दिवशीं ॥
कधीं पक्षीपाठीं बसुनि उडताहे गगनिशीं ॥
बहु स्थानें त्याचीं मज हि न कळे लोक जपती ॥
त्वरें आता जाई उशिर न लावीं गा मज प्रती ॥ १४ ॥
घेऊनि आज्ञा मुनिची त्वरेसा ॥ शोधी वनें जाउनि उत्तरेसी ॥

---

२ दुरित = पातक. ३ आर्त = आवड. ४ मृगमद = कस्तुरी.
५ शामळ = सावळी.

केला मृगाचा बहु यत्न लाहो ॥ तों अस्तमाना रवि चालला हो ॥१५॥
असाध्य देखोनि पडे विचारीं ॥ मनीं ह्मणे काय करूं मुरारी ॥
आलों द्विजा देवुनि भाकदानें ॥ न साधितां होइल अस्तमान ॥ १६ ॥
शब्दा गुंतुनि तापसा भरंवसा त्यां दीधला आसतां ॥
जावें × × घरा फिरोनि मजला मी त्यागितों जीविता ॥
सांगों काय तया तपस्वि मुनिला जाउनियां ते स्थळीं ॥
ऐसें बोलुनि शस्त्र काढुनि करें कठारि जों आकळी ॥१७॥
तदा देवा त्याचें अति निकट निर्वाण कळलें ॥
पुढें त्याच्या कैसें प्रगट करूनी रूप धरिलें ॥
चहूं हातीं चाऱ्ही अयुध असती पिच्छ मुकुटीं ॥
असे त्या व्याधानें प्रगट हरिला देखत दिठीं ॥ १८॥
व्याधें पाहुनियां हरि स्वनयनीं अन्वाध जो योजिले ॥
मांजाचे कटि बंधनें झडकरी कंठास ते घातले ॥
घेवोनी अतित्वरें तपस्विया संनीध जो पातला ॥
बोले दीर्घ स्वरें तपस्विया घे सावजा आपुल्या ॥१९॥
मुनी पाहे तेव्हां सगुण हरिचें रूप नयनां ॥
ह्मणे हे आश्चर्य त्रिभुवनपती शेषशयनीं ॥
श्रुती नेतीनेती विधिहर जयातें हुडकिती ॥
असा त्या व्याधानें प्रगट करवीला निजमती ॥२०॥
नमो विश्वोद्धारा अघमतिहरा कंजनयना ॥
क्षिराब्धीयावासी श्रुतिसि नयसो ककोटशयना ॥
स्तुती गाती योगी नमुनि हरितें नम्र वदनीं ॥
कृपासिंधू देवा स्थिर येउभया मूलि सदनी ॥२१॥
बहू योगी ध्याती हृदयकमळीं ह्याचि चरणा ॥
न लाभे हें तें ची मम दृढीकसें बंधहरणा ॥
उभा केला व्याधें त्वरित मग भावें गवसिला ॥
न लाभे वेदा हा अजि तपयज्ञीं न सिणला ॥२२॥
नमो विश्वानंदा निज प्रणवकंदा अगणिता ॥
नमो जी स्वच्छंदा मम भवबंधा उपणिता ॥
मला तूझा धंदा आणिक मतिमंदा नलगिहो ॥
नमो जी गोविंदा तव पदिं मुकुंदा जवळि हो ॥२३॥

---

६ भाकदान = वचन. ७ प्रणव = ओंकार.

कृपा आली देवा त्वरित करुनी दिव्य स्वरूपा ॥
स्वलोकीं नेऊनी दिधलि उभयां मुक्ति सरूपा ॥
ऋषी ब्रह्मादीक सुरवर मुनी स्तुति करिती ॥
बहू साधूवृंदें हरिपदयुगीं प्रेम धरिती ॥२४॥

ऐसे परी हरि हि भाविक या जिवाला ॥ दावी क्षण न लागतां पदराजिवोला ॥
हा प्रत्ययो दृढतरें बरवा मनाला ॥ आला ह्मणोनि हरिछंद हि वामनाला ॥२५॥

समाप्त.

---

# भीष्म शरपंजर.

वंदूनियां पद शिरीं प्रभु केशवाचे ॥ वर्णीन भीष्मशरपंजरलेश वाचे ॥
ज्याकारणें त्यजुनि कृष्ण निज प्रतिज्ञा ॥ घे चक्र दे यश चि या निज भक्तप्रज्ञा॥१॥

भरुनियां धनुवासर तो दहा ॥ भरितसे स्वयशें चि दिशा दहा ॥
धरि पुन्हा मरणीं निज कामना ॥ करि सुखप्रद तो यमनंदना ॥२॥

रथाखालीं गंगातनय शरतल्पावरि पडे ॥
हहाकारें दुर्योधन सकळ सेना चरफडे ॥
रणीं एकामेकां ह्मणति नृप पाहूं मुख चला ॥
नव्हे हा हो भीष्म क्षितिवरि रवी आज खचला ॥ ३ ॥

सभोंते पांडूचे तनय धृतराष्ट्रात्मज महा ॥
पहाती भीष्मातें तव जपत विश्वात्मज पहा ॥
जशी काया बाणावरि सहित बाहू पसरली ॥
झुजाया वीरांची मग सकळ बा हूप सरली ॥ ४ ॥

गुरू ज्या भीष्माशीं कदन करितां बा परतला ॥
व्रतीं जो कां राहे कृतयुवतिशीं बाप रतला ॥
शिखंडीचे बाण प्रसरति कसे यासि मरणीं ॥
नसे हो त्रैलोक्यीं सुर असुर ही यासम रणीं ॥ ५ ॥

खालीं नदीज पडतां चि जसा रथाच्या ॥ आनंद हो विजयी मग सारथ्याचा ॥
चित्तीं न होतां चि दिसे झगडावयाचा ॥ द्रोणादिकांसि गत कोप घडावयाचा॥६

---

८ सरूपा = सरूपता मुक्ति. चतुर्विधमुक्ति येणें प्रमाणें:—१ सायुज्यता, सरूपता, ३ सलोकता, ४ समीपता. ९ राजीव = कमल.

१ यमनंदन = धर्मराज. २ तल्प = बिछाना.

सहस्त्र दश मारणें नियम सैन्य भागीं रथी ॥
दिसांत ह्मणऊनियां जननि ज्यासि भागीरथी ॥
जरा भर टिकेचिना तरुणसा रणीं वावरे ॥
कसे शर शिखंडिचे तनुस भेदले वा बरे ॥ ७ ॥

शिखंडी शरें काय मारील यातें ॥ कसा भीष्म हा देह सांडील यातें ॥
पुढें अर्जुना यासि सारूं नको रे ॥ शरां हाणितां जो ह्मणे ना नको रे ॥ ८ ॥

शराची श्रीशय्या करुनि वरि गंगोद्भव निजे ॥
कदापि स्पर्शेना क्षितिवर वरांगा अवनि जे ॥
मध्यें लोंबूं लागे फळ पवन योगस्तरुतळीं ॥
विनाकाशीं जेवीं विलसत रवीबिंब चि तळीं ॥ ९ ॥

कां शरीर न शिवे धरणी तें ॥ पावला पतन शुद्ध रणीं तें ॥
बोलती क्षितिस या परदारा ॥ हा भिडे बहु परात्परदारा ॥ १० ॥

गांगेय तेथुनि कसे उघडूनि डोळे ॥ दुर्योधनासि अवलोकुनि काय बोले ॥
देशी उशी तरिच मस्तक हें न हाले ॥ राया शरीर अति भारमिसें चि लोळे ॥ ११ ॥

नृपें आणिली दिव्य उद्दाम ऊशी ॥ शिरा खालतीं देत वृद्धा मऊशी ॥
ह्मणे ये स्थळीं हे उशी काय देशी ॥ पहा हो पडे कोणत्या काय देशीं ॥ १२ ॥

बोले नदीज अवलोकुनि पांडवातें ॥ जेणें हुताशन दिल्हा वनखांडवातें ॥
पाहोनि सेज समयोचित दे उशीला ॥ कैवल्यधामपदपावनदेवशीला ॥ १३ ॥

पडे भीष्मत्राणी च कौंतेयकानीं ॥ उशी सिद्ध केली च ते सायकानीं ॥
शिराच्या तळीं लाविता ते उभारे ॥ रवीबिंब हें आननीं तेज भारे ॥ १४ ॥

ह्मणे भीष्म दुर्योधना पाजि पाणी ॥ पुरे राहिले आमुचे आजि पाणी ॥
असें ऐकतां ऊठिला लागवेगें ॥ जळा आणितां तो जळाला चि वेगें ॥ १५ ॥

बोलिला नृप तया जळ प्यावें ॥ त्वां पुन्हा मजवरी जळपावें ॥
जाळिलें मम शरीर शरांनीं ॥ कीं हुताश करि दिग्वश रानीं ॥ १६ ॥

पृथेच्या पुत्रा तूं अमल जळ तें पाज मजला ॥
नदीजाची ऐसी हृदयगत बोली समजला ॥
प्रकर्षें गांडीव प्रबळ धनु वोढी निजबळें ॥
शरा तैसें योजी तंव सकळ सेना खळबळे ॥ १७ ॥

शराच्या संधानें रणगत जनाला भय पडे ॥
न जाणों हो याची न जरि कवणाचा वध घडे

---

१ अवनि = पृथ्वी २ काय = शरीर. ३ हुताशन = अग्नि. ४ कैवल्य = मोक्ष. ५ धाम = तेज. गृह. ६ पावन = पवित्र ७ शील = स्वभाव. ८ पाणी = हात.

अशी बोली होतो तंव शर सुटे चापमुखिंचा ॥
विदारी भूमीतें गुण नव दवोत्युष्ण शिखिचा[९] ॥ १८ ॥

तळीं लागे जों जों उरगशिर[१०] तों तों वरि शिरे ॥
फणी[११] बोले त्यातें कवण कवणा तूं वधिशि रे ॥
शरस्तंबीं[१२] गंगातनय पडला भारतरणीं ॥
जसा ये अस्तातें सहित किरणा भार तरणी[१३] ॥ १९ ॥

जयाचे हो होते बहुत धृतराष्ट्रा भरंवसे ॥
तसे खालीं आले हृदयगत विश्वंभर वसे ॥
शरीरीं संतप्त प्रसर शर ज्यातें कुरुपती ॥
श्रमी केला युद्धीं द्रुपदतनयानें कुरुपती ।२० ॥

पाजें पाणि मजला वसुधेचें[१४] ॥ मानिलें वचन जेंवि सुधेचें[१५] ॥
पांडवे न धरितां अविनीतें[१६] ॥ पाठऊनि मज दे अवनीतें[१७] ॥२१॥

वदे जो शेषासी अमरसरिता[१८] वानसरसी ॥
महीवर्ती आली त्वरित सुतनिर्वाण सरसी ॥
विलोकी ते जेव्हां कठिण शरतल्पीं निजविलें ॥
शरीरातें त्याच्या नयनजळपातें भिजविलें ॥ २२ ॥

अरे बाळा माझ्या कदनसमयीं तीव्र तपनें ॥
तुवां कां बा केलें असुनि वय हें तिव्र तपणें ॥
सुनेचें म्यां नाहीं मुख निरखिलें धाकुटपणीं ॥
गुरूशीं[१९] तूं अंबेस्तंव[२०] झगडलासी दृढपणीं ॥ २३ ॥

तळीं बाणाग्नीनें वरि तपनउष्णें[२१] तळसिरे ॥
अशी माता तेव्हां विलपुनि पुन्हा भूताळें शिरे ॥

---

९ शिखि=अग्नि. १० उरग=सर्प, शेष. ११ फणी=सर्प. १२ शरस्तंब=शर-समूह. १३ तरणी=सूर्य. १४ वसुधा=पृथ्वी. १५ सुधा=अमृत. १६ अविनीत=दांडगा. १७ अवनि=पृथ्वी. १८ अमरसरिता=देव-नदी (भागीरथी). १९ गुरु=परशुराम. २० अंबा—या नांवाची कन्या भीष्मानें विचित्रवीर्या करितां जिंकून आणिली. परंतु तिचें प्रेम दुसऱ्या राजावर जडलें असल्यामुळें तिला परत पाठविलें. त्यानें परजिता असल्यामुळें तिचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां ती परत येऊन "मला वरा" असें भीष्मास म्हणूं लागली. ती गोष्ट भीष्मानें नाकबूल केली. तेव्हां तिनें परशुरामाकडून आपला अंगीकार करण्या विषयीं बोलणें लाविलें. भीष्म परशुरामाचें ऐकेना म्हणून त्या दोघांचें युद्ध झालें. त्यांत परशुरामाचा पराभव झाला. अखेरीस अंबेनें अग्निकाष्टें भक्षण करून भीष्माला मारण्या करितां शिखंडी अवतार घेतला. २१ तपन=सूर्य.

रणीं श्रीपार्थाचे शर बहुत उत्कर्ष दिसले ॥
विलोकी तो जेव्हां तंव हृदयिं दुर्योधन सले ॥ २४ ॥
चौरांत वीर हरिसारथि पार्थ हारे ॥ ज्याच्या पुढें चि अवघा पुरुषार्थ हारे ॥
जैसा वनांत हरिणीवरि सिंह घोरे ॥ तैसा रणीं प्रतिभटीं सितवाह[22] तोरे ॥२५॥
वदे श्रीभीष्मातें विगतनयनें[23]चा सुत पुसे ॥
मनीं मोठे भाती अति पार्थादि रिपु असे [?] ॥
कशी आज्ञा देशी कठिण करणें युद्ध वदसा ॥
चमूवर्ती आली वडिल पडतांना अवदसा ॥ २६ ॥
वदे ते क्षणीं भीष्म दुर्योधनातें ॥ नको तूं धरूं पांडवीं युद्धनातें ॥
सुखीं दोघ ही एक होऊनि राहा ॥ पुरे होय संग्राम माझेनि हाहा ॥२७॥
अशी भारतीं भीष्मपर्वी कथा रे ॥ तरे या चरित्रीं जरी चित्त थारे ॥
ऋषी बोलिला भूप पारिक्षितीते ॥ करी धन्य जो सर्वथा या क्षितीतें॥२८॥
काशींत नाम जननी जनकाभिधानी ॥
श्रीविश्वनाथ मम दैवत कृष्णवेणी ॥
श्रीमन्महेश अघमर्षण जो उपायीं ॥
दासानुदास चि तरे यादव तो सुपायीं[24] ॥ २९ ॥
॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

## समाप्त.

---

## राधा-विलास.

करुनि नमन देवा बाळरूपा हरीतें
सुरस[1] चरित ज्याचें जें कलीला[2] हरीतें ।
कथिन सुरत[3] राधा-कृष्ण-लीला-प्रबंध
तुटति पठण[4]-मात्रें सर्व मायीक बंध ॥ १ ॥
कोणेके दिनिं नंद-भाज[5]-सदनीं ते राधिका सुंदरी
आली सुंदर रूप पाहुनि तिचें थाया बहु घे हरी ।

---

२२ सितवाह = अर्जुन. २३ विगतनयन = अंध (धृतराष्ट्र). २४ या प्रकरणाचे शेवटीं वामन पंडिताचें नांव नाहीं. त्यामुळें हें प्रकरण त्यांचेंच की काय या विषयीं संशय येतो.

१ "सुरत" पाठान्तर. २ कलील = पातक. ३ "चरित" पाठान्तर. ४ "श्रवण" पाठान्तर. ५ भाज, भाजा = भार्या = स्त्री.

राहेना जननी कडेवरि रडे लोळे मही माधवा
कां रे वा उगला न राहसि कसा मंथूं दधी केधवां ॥ २ ॥
उचलि जननि त्यातें सर्वथा तो न थारे
निजवि फिरवि दावी पांखरांचे हि थारे ।
शुक पिक[६] आणि लावे पारवे हंस मोर
हरि-मन न रमेची चित्र-शाळे-समोर ॥ ३ ॥
तें ही तयासि न रुचे बहु कोप दावी । त्याची अगम्य करणी कवणें वदावी
क्रोधें करूनि जननी मग त्यास दापी । राहें उगा ह्मणत तें न मनीं कदापी ॥४॥
नाना प्रयत्न जननी करितां वळेना । कां आजि बाळ चळला सहसा कळेना
राधे प्रती वदतसे मग नंद-दारा । घेऊनि सात्वन करीं तरि या उदारा ॥५॥
तियेसि संतोष विशेष जाला । त्वरें करूनी मग त्या अजाला
कडेवरी घेत धरोनि पाणी[७] । राहे उगा तो मग चक्र-पाणी ॥ ६ ॥
आश्चर्य मानी मग नंद-दारा । जालें ह्मणे काय कसें उदारा
मातें बहू कष्टविलें खळानें । राधे तुवां शांतविला पळानें ॥ ७ ॥
ह्मणे राधा मातें उशिर बहु जाला चपळ हा
त्वरें घ्यावा बाई रमण घरिं पेटेल कलहा ।
वदे ऐसें ठेवी हरि जननि-अंकीं[८] अणि निघे
रडे तों आक्रोशें उचलुनि कडेला जननि घे ॥ ८ ॥
कृष्ण फार करितो रुदनानें । अंतरीं धरितसे निज नातें
मागुती जननि दे तिजपाशीं । खेळवीं ह्मणतसे व्रज[९]-वासी ॥ ९ ॥
राधा ह्मणे बहुत एथ उशीर जाला । वाटे मदीय सदनीं निज कांत आला
क्रोधें करूनि मज ताडिल तो न सोडी । तेव्हां जिणें सजणि काय तयांत गोडी ॥ १०
घेवोनियां कृष्ण घरासि जावें । राधे पतीचें भय हें त्यजावें ॥
जेव्हां तुला कांत वदेल रागें । तेव्हां तया एथिल वृत्त सांगे ॥ ११ ॥
ऐसें तिला बोधुनि पूत[१०] नारी । दे तीजपाशीं मग पूतनारी[११] ॥
मागेल तें दे न करोनि वाणी[१२] । माता अशी सांगत तीस वाणी[१३] ॥ १२ ॥
या नंतरें त्वरित घेउनियां उदारा । आली पहा स्वसदना प्रति गोपदारा ॥
आनंदला हरि मनीं बहु त्याच काळीं । राधा हि ते पडलि हर्ष-महा-सुकाळीं ॥ १३ ॥
ठेवूनी निज मंचकावरि हरी राधा उभी राहिली

---

६ पिक = कोकिळ. ७ पाणी = हात. ८ अंक = मांडी. ९ व्रज = गोकुळ. १० पूत = पवित्र. ११ पूतनारी = पुतना + अरी = पुतनेचा शत्रु ( कृष्ण ). १२ वाणी = कमताई. १३ वाणी = वाचा.

नेत्रीं ते मदनास निंदित अशी मूर्ती बरी पाहिली ।
तेव्हां ते मदविव्हला निजमनीं होऊनियां कामिनी
मानी अंतरिं खेद हा युव नसे आणि नव्हे यामिनी[14] ॥ १४ ॥
देखोनी तरि बाळ-रूप हरिचें राधे मनीं काम हा
जालासें कथिलें परंतु सकळां आश्चर्य वाटे महा ।
अद्यापी शिशु-दर्शनीं युवतिला उन्माद कामा नसे
राधे अंतरिं हो विकार घडला भावार्थ ऐसा असे ॥ १५ ॥
पूर्वी हे गणिका[15] असोनि शुचिनें कर्णाट-देशीं पहा
श्रीरंगीं तरि अर्पुनी मन सदा केलें व्रतातें महा ॥
स्नानातें करि कार्तिकीं नुगवतां मित्रीं[16] करी पूजना ।
त्याचें रूप मनांत आणित सदां नेणे दुज्या साधना ॥ १६ ॥
बहुत दिन अशी ते आचरे हो व्रतातें ।
परम सदयतेनें पाहिलें काम-तातें[17] ॥
ह्मणउनि तिस नेमी स्वर्गता ते उदारा ।
अमर-पुरित ज्ञाली श्रेष्ट ते देवदारा[18] ॥ १७ ॥
श्रीरंग-तीर्थी करि मज्जनातें[19] ॥ धरी मनीं त्या सह कामना ते ॥
यथाविधी नृत्य हि भाव नाना ॥ सप्त स्वरें गाय करी तनाना ॥ १८ ॥
पण्यांगनें[20] [बहुत] पावलि तेथ माना ॥ रंभादि ऊर्वशि तिच्या नसती समाना ॥
इंद्रादि देव गुरु यास्तव रूप लाहो ॥ घेऊनियां स्वमनिं मानवती तिला हो॥१९॥
कोणेके[21] दिनिं सत्य-नाथ-सदना येऊनि ते सुंदरी ।
वीणा वाजवि गाय नर्तन-कळा नानापरी आदरी ॥
एकोनी मग तोषला निज मनीं मागें ह्मणे हो वरा ।
तेव्हां ते विनयें वदे त्वरित दे श्रीरंग ऐशा वरा ॥ २० ॥
यानंतरें वदत तीप्रति ब्रह्मदेव ॥ द्वापार-अंत-समया प्रति वासुदेव ॥
क्रीडेल नंद-सदनीं शिशु-रुप नारी ॥ तो कीं रमेल तुजशीं प्रिय पूतनारी ॥२१॥
त्वरित वर असा ते लाधली हो सुशीला ॥ तदुपरि वृषभानू[22]-योषितेच्या कुशीला ॥
उपजलि मग राधा नाम ठेवोनि तीला॥परम पुनितें[23] हो ते रातली[24] श्रीपतीला॥२२॥

---

१४ यामिनी=रात्र. १५ गणिका=वेश्या. १६ मित्र=सूर्य. १७ काम-तात=मदन-पिता. (श्रीरंग=विष्णु) १८ देवदारा=अप्सरा. १९ मज्जन=स्नान. २० पण्यांगना=वेश्या. २१ "कोणेकेदिनि ब्रह्म-देव-सदनीं ते सुंदरी आदरें । आली गायन नृत्य तेथ करितां वेगीं अशी सादरें ॥" पाठांतर. २२ वृषभानू=गोप-विशेष (राधिका-पिता. २३ "विनित" पाठांतर. २४ "पावली" पाठांतर.

श्रीमत्केदार-खंडीं सुमुनीसि वदला सूतें[२५] जो कां महात्मा ।
पंचाध्यायीं पहावें चतुर नरवरीं कार्तिकीच्या महात्म्या ॥
ते हो जाणा कथा हे ह्मणउनि हरिला बाळ-रूपासि पाहे ।
पूर्वीच्या त्या अधारें त्वरित हरि करी तीवरी हो कृपा हे ॥ २३ ॥
या योगें करुनी च बाळ वपु हे ऐसा असोनी हरी ।
तीची सुंदर ते तनू निरखुनी कामानळें ते हरी ॥
जीचें* रूप रतीस येथ न तुळे दासी गमे मेनका ।
तीच्या वर्णानिं हो पदार्थ जितुका तो साम्य वर्णू नका ॥ २४ ॥
अधर[२६] विद्रुमें[२७] सम्यक रेखिला । दर्शन[२८] हीरे[२९]-समुच्चयें[३०] देखिला ॥
परम आतुर होउनि माधव । सुरत चुंबन इच्छि रमा-धव ॥ २५ ॥
नाकीं तिच्या मौक्तिक हो सुतेज । कैंचें तसें दैत्य-गुरूस[३१] तेज ॥
देखोनि त्यातें मग देव-देव । कामानळें व्याकुळ वासुदेव ॥ २६ ॥
जळीं मीन तैसे चि कीं नेत्र तीचे । बरे शोभले कज्जलें हो सतीचे ॥
स्मराचे च कीं बाण त्या भ्रू-कमाना । हरीच्या मनीं भेदले सत्य जाणा॥२७॥
कुच तिचे घन वर्तुळ देखिले । मृग-मदें[३२]अंकित सुंदर रेखिले ॥
निरखुनी मग पाहतसे हरी । करिं धरीन अशी मति तो धरी ॥२८॥
वदन-कमल कैसें शोभताहे सतीचें ।
विभव कवण वर्णी यामिनीच्या पतीचें[३३] ॥
नयनिं मग मुरारी पाहताहे मुखातें ।
अवनि[३४] सकळ जाली मानि ऐशा सुखातें ॥ २९ ॥

जाला हरी बहुत व्याकुल पंच-बाणें । राधा हि ते परम विव्हल त्या प्रमाणें ॥
आली ह्मणे युव जरी असता मुरारी । मी लाधतें रतिसुखास हि आजिभारी॥ ३० ॥

ऐसा वधू हेतु मनीं उभारी । हा भाव जाणोनि हि कैटभारी ॥
सर्वांतरीं साक्षि असे हरी तो । ते इच्छि लीला च तशा करीतो ॥३२॥

परस्परें हेतु हि एक जाला । या कारणें कीं नटणें अजाला ॥
सकाम[३५] जाला युव हा हरी तो । तीच्या स्वयें काम-मंदा[३६] हरीतो॥३२॥

---

२५ सूत = पुराण-वक्ता. * "जी ची नागरता रतीस न तुळे" पाठांतर. ( नागरता = शहाण-पण. ) २६ अधर = खालचा ओंठ. २७ विद्रुम = पोंवळें. २८ दशन = दांत. २९ हीर = हिरा ३० समुच्चय = समुदाय. ३१ दैत्य-गुरु = शुक्राचा तारा. ( ग्रहां मध्यें दिसण्यांत याचे इतका तेजस्वी ग्रह नाहीं. स्थिर तार्‍यांत लुब्धकाहून तेजस्वी तारा नाहीं ) ३२ मृग-मद = कस्तुरी ३३ यामिनीचा पति = रात्रीचा भ्रतार (चंद्र). ३४ अवनि = पृथ्वी. ३५ "रागोंन" पाठांतरे. ३६ "व्यथा" पाठांतर.

तों देखिलें परम सुंदर रूप तीनें । हें दाविलें ह्मणत लाघव माँपतीनें[३७]॥
सव्रीडे[३८] होउनि मनीं उगली च राहे । त्या नंतरें करित माधव तो त्वरा हे॥३३॥
तो मंचकीं धरि करीं कर सुंदरीचा । झाडी त्वरें [३९] तरि हि आदर तो हरिचा ॥
हें कायहो करितसां रवि मध्यव्योमीं[४०] ।जावें जिवें पाति गृहाप्रति आलिया मी॥४४॥
हे वागती नगरिंचे नर आणि नारि । एकांतिचें सुरत-संगरें[४१] पूतनारी ॥
हे देखती नयनिं लोक विहार जेव्हां । म्यां हारिलें हरि पहा स्वकुळासि तेव्हां॥३५॥
सांगें [४२] तयासि परि तो न उगा रहात । टाकी उरोज-युगुलावरि दोनि हात ॥
हें ऊघडें सदनद्वार दिसोनि येतें । राधा ह्मणे हरिसि झांकुनि शीघ्र येतें ॥३६॥
भरंवसा वचनीं हरिला न ये । धरुनि अंचल ती सरसाचि ये ॥
अगळ घालुनियां मग सुंदरी । हरिस घेउनि ये रति-मंदिरीं ॥ ३७ ॥
त्या नंतरें खचित[४३]-रत्न-पलंग- सेजे । नानाविधी रति-विलास करितसे जे ॥
तेव्हां तिचे अधर-चुंबन घे हरी तो । मर्दी कुचांस वसना स्वकरें हरीतो॥३८॥
कामालया युवति झांकितसे करीनें[४४] । तो काढिला कर करें कमळाकरानें ॥
त्या नंतरें सुरत-कार्य करी हरी तो । राधेचियें[४५] सकळ वृत्ति अशा हरीतो॥३९॥
पोटीं चतुर्दश हि जो भुवनां धरीतो । हा जन्मला यदु-कुलाग्र-मणी हरी तो ॥
राधेचिया[४६] चुचुक-मंडाळि हस्त ठेवी । शंभू-शिरीं कमल[४७] शोभत शुभ्र जेवी ॥४०॥
दंतांबरीं आणि उरोज-युगीं सतीच्या । दंत-क्षतें स्व-करजें[४८] समयीं रतीच्या ॥
लागोनि तप्त हृदयीं बहुसाल जाली।खालीं हरीस मग ते स्वबळें चि घाली॥४१॥
कैशी[४९] बोलिली राधिका गोप-दारा । बहु[५०] श्रांत जालेति एथें उदारा ॥
ह्मणोनी च म्यां वैपरित्यें रमावें । न लागे चि एथें तुह्मांला श्रमावें ॥ ४२ ॥
तो तिशीं रमतसे अनुरागें । राधिकेसि न वदे अणु रागें ॥
प्रेमयुक्त हरि तो अध राहे । चुंबिते तंव सखी अधरा हे ॥ ४३ ॥
ते वैपरित्य-रति-संगरिं मग्न राधा । जाली परंतु मनिं भावि[५१] निजापराधा ॥
अन्याय आपण[५२] हरि स्वबळें चि केला ।या गोष्टिचें[५३] सगुण तो नसतां[५४] भुकेला॥४४॥

---

३७ मा-पति=लक्ष्मी-भर्ता. ३८ सव्रीड=सलज्ज. ३९ "परंतु मनिं" पाठांतर. ४० व्योम=आकाश. ४१ "सुंदर" पाठांतर. ४२ "सांगे हरी प्रति बहू परि तो न राहे वक्षस्थळा वरि बळें कर ठेउं पाहे ॥" पाठांतर. ४३ "जडित" पाठांतर. ४४ "झांकीत काम-सदना वनिता" पाठांतर. ४५ "आशा मनांतील तिच्या पुरवी बरी तो" पाठांतर. ४६ "राधा अशा स्वकुच-अग्रिं धरीत साच" पाठांतर. ४७ "तुळसि पुष्प गमे तसाच" पाठांतर. ४८ करज=नख. ४९ "असा कृष्ण तो" पाठांतर. ५० "वदे" पाठांतर. ५१ "भाविल स्वापरधा" पाठांतर. ५२ "तो अघ" पाठांतर ५३ 'हेतुचा" पाठांतर ५४ "काय न तो" पाठांतर.

म्यां कासया संगरें[55] या चुकावें । कांहो तरीं आत्म-सुखा मुकावें ॥
संताप हा कीं जरि यासि जाला । वंदीन या मी पद-पंकजाला[56] ॥ ४५॥

अर्पुनी स्वमन नंद-कुमारीं । ते निमग्न वृषभानु-कुमारी ॥
माजला रस बहु उभयांत । ये तिचा पति अशा समयांत ॥ ४६ ॥

प्रवेशावें गेहीं तंव दिसतसे द्वार दिधलें ।
उभा राहे शब्दें करुनि महिलां[57]-चित्त हरिलें ॥
असे आला द्वारीं रमण हरि या काय करणें ।
मला ऐसें जालें त्वरित सखया आजि मरणें ॥ ४७ ॥

तदुपरि स्वमनीं[60] कुमुदेक्षणी[59] । परम विव्हल होउनि ते क्षणीं ॥
उठतसे मग[58] ते वरिच्या वरी । वसनें[61] कंचुकि कुंतळ[62] सांवरी ॥४८॥
निटिलिं[63] ठेवुनियां कर-पंकजा । ह्मणतसे मदना मज अंत्यजा[64] ॥
छळियलें ह्मणुनी घडिलें असें । पुढिल संकट हें निरसे[65] कसें ॥४९ ॥

ह्मणे माते अंबे शरण विनयें आजि तुजला ।
अशा या आवर्तीं[66] सदय-हृदयें राखिं मजला ॥
उपेक्षा हे माजी न करि अनुकंपा[67] करिं हरी ॥
करूनी देवेशा झडकरि भयातें परिहरी ॥ ५० ॥

अंगीं विराली बहु सारसाक्षी[68] ॥ तों आठवी अंतरिं सर्व-साक्षी ॥
होता लघू तो युव पूर्ण जाला ॥ हें काय आशक्य अधोक्षजाला ॥ ५१ ॥
त्यागी शिशुत्वा युव-रूप दावी ॥ तो काय हो पूर्व तनू न दावी ॥
या निश्चया आणुनियां मनातें ॥ प्रार्थीतसे श्रीमधु-सूदनातें ॥ ५२ ॥

राधा ह्मणे हरिस थोर अनर्थ जाला ॥ द्वारीं कृतांत[69] सम तो मम कांत आला॥
हाकाटितो उघडिं दार ह्मणोनि मातें ॥ हें काय हो श्रवण होत नसे तुह्मांतें ॥५३॥
जाला उशीर पति येईल फार रागा ॥ तूं गुंतशी भ्रमर जेंवि रमे परागा ॥
हा तों मला निधन[70]-काळ गमे उदारा ॥ येऊनियां रमण त्या रुधिलें चि दारा

कां आजि म्यां नंद-गृहीं बसावें ॥ आणोनियां आजि तुह्मां फसावें ॥
हें काय मी फार वदों कृपाळा ॥ हा बोल माझ्या चि असे कपाळा ॥ ५५ ॥

---

५५ सगर = युध्ध. ५६ पंकज = कमल. ५७ महिला = स्त्री. ५८ "मग ते" पाठांतर. ५९ कुमुदेक्षणी = कमलनयना. ६० "युवती" पाठांतर. ६१ वसन = वस्त्र. ६२ कुंतळ = केस. ६३ निटिल = कपाळ. ६४ अंत्यज = चांडाळ. ६५ निरसे = निवारे. ६६ आवत = पाण्यांतला भोंवरा ( संकट ). ६७ अनुकंपा = कृपा. ६८ तमसाक्षी = कमल-नेत्री. ६९ कृतांत = यम (कृतांत-कटका-मल-ध्वज जरा दिसों लागली —केकावली) ७० निधन = मरण.

रमण करिल तूझें काय हो देव-देवा ।
सबळ जनक[७१] नांदे नंद तो वासुदेवा ॥
झडकरि लघु व्हावें बाळ-लीला धरावी ।
मजवरि अनुकंपा हे सुजाणा करावी ॥ ५६ ॥
वदत हरि सखे तूं सांगसी हो उदारे ।
परम गहन कैसें तें घडे गोप-दारे ॥
त्यजुनि युवपणातें बाळ होणें सुजाणे ।
रचित-सकळ-सृष्टी तो हि धाता[७२] न जाणे ॥ ५७ ॥

परब्रह्म तूतें वदे लोक सारा । नसे साचें[७३] हें व्यर्थ भासे पसारा ॥
असे सूचली गोष्टि ते ही वदावी । खरें हें तरी बाळ-रूपासि दावी॥ ५८॥
ऐसें वदोनी मग पाद-पद्में[७४] । वंदी मुनी-मानस-भृंग-सद्में[७५] ॥
त्यागीन जी प्राण दया-समुद्रा । ह्मणे पडे तों वदनासि मुद्रा ॥ ५९ ॥
उर्वी[७६] पडे केळि जशी च वातें । देखोनि ऐसें मग माधवातें ॥
आली कृपा त्या मधु-कैठभारी । तो आपुली पूर्व तनू उभारी ॥ ६० ॥

[७७]त्यां नंतरें उठवि येउनि कृष्ण तीला । जाला उशीर वनिते तुझिया पतीला ॥
पाहें ह्मणे मजकडे तरिं चक्र-पाणी । आणीं स्वकांत सदनांत धरोनि पाणी॥ ६१॥
ऐकोनियां वचन हें मग गोप-दारा । उत्पाटुनी नयन पाहत त्या उदारा ॥
तों रांगतो जवळि बाळ तया चि काळीं। देखोनियां पडलि हर्ष-महा-सुकाळीं॥ ६२॥

घेउनी मग कडेसि उदारा । पातली झडकरी गृह-दारा ॥
काढुनी मग तिनें अगळासी । या ह्मणे भितरिं हो गुण-राशी ॥ ६३ ॥
उभा केधवांचा असें द्वार-देशीं । दिसाचें च तूं काय गे द्वार देशी ॥
असें क्रोध-वाणी वदे कांत तीसी । वदे आदरें सुंदरी ते पतीसी ॥ ६४ ॥
या सांगतें अर्थ तुह्मांसि सारा । सोडोनि द्या क्रोध-महा-पसारा ॥
गेलें अजी नंद-गृहा उदारा । स्नेहें मला बैसवि नंद-दारा ॥ ६५ ॥
तों ते करी मंथन नंद-राणी । राधे ह्मणे यासि तुझी शिराणी[७८] ॥
तेव्हां हरी गाढ धरी रवी तो । नाना परी बाळ विवर्तवीतो ॥ ६६ ॥
नेदी च मंथन करूं तिस अब्ज[७९]-पाणी । † तेव्हां मनीं बहुत हिंपुटि[८०] नंद-राणी

---

७१ जनक = बाप. ७२ धाता = ब्रह्मा. ७३ साच = सत्य. ७४ पद्म = कमल. ७५ सद्म = गृह. ७६ उर्वी = पृथ्वी. ७७ "लीलावतारी शिशुरूप जाला राधेचिया चुंबि मुखांनुजाळा ।" पाठांतर. ७८ शिराणी = आवड. ७९ अब्ज = कमळ; शंख
† "जाली बहुत मनिं" पाठांतर. ८० हिंपुटी = कष्टी.

आली* ह्मणे उचालें यासि कडेसि घेई। राधे† शिशू समजवीं सदनासि§ नेई ॥ ६७ ॥
त्या नंतरें घेउनि श्रीधराला । आलें च मी शीघ्र अजी घराला ॥
नाना परी खेळविला न मानी । निजें पुढें घें तइं सौख्य मानी ॥ ६८ ॥
मिथ्या नव्हे गोष्टि अशी च साची । मी ही निजें कृष्ण निजे तसाची ॥
आलेति केव्हां न मने मनासी । निद्रा अशी पापिणि कार्य-नाशी ॥ ६९ ॥
गेहीं न माणूस दुजें उदारा । या कारणें म्यां दिधलें चि दारा ॥
निद्रा भ्रमा गाढ तयीं च घाली । स्मृती शरीरांतुनि हो निघाली ॥ ७० ॥
क्रोधयुक्त रवि[81]-गर्जन कानें । ऐकतां चि उठिल्यें दचक्यानें ॥
शंकलें मनिं बहूत उदारा । ऊघडीं त्वरित येउनि दारा ॥ ७१ ॥
हा अर्थ मानूनि[82] मना चि माजी । सर्वज्ञ हे हो करणें क्षमा जी ॥
ये हास्य ऐशा वचनें पतीला । आलिंगिलें हो हृदयीं सतीला ॥ ७२ ॥
देखिलें नयनिं नंद-कुमारा । बाळ-रूप तनु सज्जित[83] मारा[84] ॥
पावला पति मनीं सुख-राशी । आणीं हो प्रतिदिनीं स्वगृहासी ॥ ७३ ॥
बरें ह्मणे भोजन शीघ्र घाली । कृष्णासि घेवोनि कडे निघाली ॥
त्या नंद-सद्मा प्रति गोप-जाया बाई ह्मणे घेइं अधोक्षजा या ॥ ७४ ॥
आश्चर्य मानी बहु नंद-राणी । राधे अशी काय तुझी शिराणी ॥
ह्मणोनि राहे उगला हरी तो । मानें छळी नष्ट परोपरी तो ॥ ७५ ॥
नेत जा प्रतिदिनीं स्वगृहातें । फावल्या घरिं ह्मणे युवती ते ॥
ठेवुनी मन हरी-पद-पद्मीं ।राधिका त्वरित ये स्व-सु-सद्मीं ॥ ७६ ॥
ऐसा हा सुरत-विलास वासुदेवें । केलासे निज-जन-तारणा सुदैवें ॥
या लागीं परम पवित्र हा सुवाचे । गाती ते प्रियकर होति वामनाचे ॥ ७७ ॥

**समाप्त.**

---

* "मातें" पाठांतर † "कृष्णास तूं" पाठांतर § "स्वगृहासि" पाठांतर. ८१ रव=ध्वनि. ८२ "आणूनि" पाठांतर. ८३ "संस्थित" पाठांतर. ८४ मार=मदन.

# राजयोग.

## ( द्वितीय. )

विरक्ति ना प्रीति जया प्रपंचीं ॥ अहर्षमर्षी[85] क्रम पंचपंचीं ॥
दया न दाक्षिण्य नसे जयाला ॥ सुचिन्ह साधू ह्मणती तयाला ॥१॥
ज्या निंदितां निंदकदोष नाहीं ॥ ज्या वंदितां तोष नसे मना ही ॥
जो निंद्यवंद्यादिरहीत जाला ॥ कां राजयोगी न वदा तयाला ॥२॥
जो उत्तमातें वचन स्तवीना ॥ नीचास नीचोत्तर सूचवीना ॥
निंदास्तुती द्वैत नसे जयाला ॥ कां राजयोगी न वदा तयाला ॥३॥
प्रपंच जे कां न दिसे चि ठावा ॥ तयीं तया भेद कळों उठावा ॥
त्यजूं भजूं द्वैत नसे जयाला ॥ कां राजयोगी न वदा तयाला ॥४॥
संसार हा चित्[86]सुख सोनियाचा ॥ आकारमात्रें अवघा तयाचा ॥
त्यागी च भोगी गुरुराज योगी ॥ अष्टांग मूढासम तो न योगी ॥५॥
चित्सागरीं जे लहरी[87] उठावी ॥ चैतन्यसी ते जरि होय ठावी ॥
हा चिज्जडैक्यानुभवो जयाला ॥ कां राजयोगी न वदा तयाला॥ ६ ॥
भासे जयाच्या जड हे मतीतें ॥ दावा नगीं[88] त्या निज हेम[89] तीतें ॥
माया स्वयें ब्रह्म असे जयाला ॥ कां राजयोगी न वदा तयाला॥ ७ ॥
जो ब्रह्म जाणे विषयादिकां ही ॥ मिथ्या भ्रमे भेद तया न कांहीं ॥
जें जें दिसे तें निजसें[90] जयाला ॥ कां राजयोगी न वदा तयाला॥८॥
दृष्टांतिया दृश्य कदां न नासे ॥ हा भेद जाणे तरि भेद नासे[91] ॥
भेदीं अभेदान्वय होय ज्याला ॥ कां राजयोगी न वदा तयाला ॥ ९ ॥
पर्जन्य पाणी जरि भेद दावी ॥ अद्वैतता रीति कशी वदावी ॥
ज्या नीरनीरीं[92] समता जयाला ॥ कां राजयोगी न वदा तयाला॥१०॥
विषय सत्य असें मनि भाविती ॥ तरि मृषा कवणें परि दाविती ॥
विषय नष्ट असें जरि मानिती ॥ विषय कां त्यजणें मग वानिती॥११॥
सर्व ब्रह्म श्रुतीस करपुनि गती व्याप्यें जगा स्थापिती ॥
मिथ्या ही वदती स्वभेद करिती ते भ्रांतिमद्या पिती ॥
युक्तीनें मग योजिती जडमती जे व्यापकें बोलती ॥
... हस्तकिं अंध जे रिति पथीं तैसे चि ते चालती ॥ १२ ॥

---

८५ अहर्षमर्षी = आनंद-क्रोध-रहित. ८६ चित् = चैतन्य. ८७ लहरी = लाटा. ८८ नग = दागिना. ८९ हेम = सोनें. ९० निजसें = आपलेंसें ९१ नासे = न असे. ९२ नीर = उदक

विषय ब्रह्म असें वदतां भिती ॥ ह्मणुनि व्यापक हें चि दिवाभिती ॥
गतिस कल्पुनियां जगिं वागती॥परि तयां न चुके चि अधोगती॥१३॥
देखेल जो विषय ब्रह्म खरें असें रे ॥ त्याच्या जिवासि मग बंध कधीं नसे रे ॥
तो वांचला जंव असे तंव मुक्त लोकीं॥अन्योन्य शून्य विषयास्तव बोलिलों, कीं॥१४॥
विनिर्वासना चिन्ह पुढें न जोरे ॥ प्रपंच हस्तीं न शके भजो रे ॥
मौनें जया देखुनियां पळावें ॥ विरक्तता चिन्ह असें कळावें ॥१५॥
कूटस्थ त्या तो च नसे प्रवृत्ती ॥ त्या निष्क्रियासी च नसे निवृत्ती ॥
वैराग्य तेथें कवणें करावें ॥ मूढें वृथा भ्रांतिभरीं भरावें ॥ १६ ॥
साम्राज्य वामन दिसे सुखरूप साधा॥त्याच्या स्थितीस जरि साधिति चारि साधा॥
नाहीं तयास करणें च दुकानदारी ॥ जो सर्वदा विचरतो गृहपुत्रदारीं ॥१७॥
साम्राज्य वामन दिसे यथार्थ वाणी ॥ जाणेल त्या अनुभवा नसे चि वाणी ॥
प्रत्यक्ष जो स्थिरचरीं निज ऐक्य दावी॥त्याची गुरुत्वमहिमा किति हो वदावी॥१८॥

समाप्त

# वामन-कृत

## अनुभूति-लेशाची महाराष्ट्र टीका

### उपोद्घात.

विष्णुं शारदचंद्रकोटिसदृशं शंखं रथांग[1] गदा-।
मंभोजं दधतं सिताब्जनिलयाकांतं जगन्मोहनम् ॥
आबद्धांगद[2]हारनूपुरलसन्मौलीप्रभं कुंडलं ।
श्रीवत्सांकमुदारकौस्तुभधरं ध्यायेन्मुनीन्द्रैः स्तुतम् ॥ १ ॥
श्रीवासुदेव वंदूनी ध्यानीं चिंतित जो सदा ॥
वक्ता अनूभूतिलेश ग्रंथ तो वामनात्मक ॥२॥
टीका त्याची स्फुरविली त्याच श्रीजगदात्मकें ॥
निमित्त मात्र मी त्यास कर्ता करविता स्वयें ॥३॥
समश्लोकी नाम परी भावार्थैं युक्त मात्र चि ॥
वंदतों पाहतां संतां व्हावा संतोष या मिसें ॥४॥
न जाणें काव्यरचना न व्याकरण पद्धति ॥
न विभक्ति हि ज्ञानातें तसे च च्छंद प्रास ही ॥५॥
लोटांगण अनन्यत्वें संतपादरजां प्रती ॥
घालूनि प्रार्थि जीतां च मुक्ति ही हरिभक्त त्यां ॥६॥
कीं मी अज्ञ असें मातें करुनी ते क्षमा तुह्मी ॥
अर्थीं देउनियां दृष्टि पहावी हे पुनः पुनः ॥७॥
संस्कृतीं अनधीकारी असें परि मुमुक्षु[3] जे ॥
बोधनार्थ तयांच्या हे होईल उपयोगिक ॥८॥
मुमुक्षुजन जे त्यांतें न लागे अन्य साधन ॥
श्रवणें होय तत्काळ ज्ञानानुभव हा तयां ॥९॥
श्लोकद्वयें करितसें मंगलाचरण त्यासि हें ॥
श्लोकैकें बोलतों शिष्यशरणागतिपद्धति ॥१०॥

### टीका.

वंदितों शेषशायी श्री सच्चिदानंद ईश्वर ॥
प्रसादें पाहतों ज्याच्या तद्रूप सचराचर[4] ॥१॥

---

१ रथांग = चक्र. २ अंगद = बाहुभूषण. ३ मुमुक्षु = मोक्षेच्छु. ४ चराचर = स्थावरजंगम.

ध्याऊनि तो गुरु आत्मा उपदेश यथाक्रम ॥
जिज्ञासु जन बोधार्थ वदतों तें सविस्तरें ॥२॥
मुमुक्षें तत्व जाणाया व्हावें शरण श्रीगुरु ॥
आधी तें वदतों भावें कीं हा च विधिचा गुरु ॥३॥
( सहा श्लोकीं वार्णितों कीं गुरु तो विधिचा कसा ॥
पूर्वे कल्पीं ज्ञान जें तें या कल्पीं वर्तलें कसें ॥ अ ॥)
ज्ञानी जे पूर्व कल्पींचे पुनर्जन्म न पावले ॥
कल्पीं या जन्मले सर्व ते अज्ञान चि यास्तव ॥४॥
विना गुरुमुखा ज्ञान न होय अपरोक्ष जें ॥
अज्ञ गुरु अज्ञबोधा निद्रिस्त निद्रिता जसा ॥५॥
जागा सदा तो चि जो हा नित्य मुक्त जगत्पति ॥
तेणें प्रबोधिला ब्रह्मा " यो ब्रह्माणमिति श्रुतिः " ॥६॥
ब्रह्में प्रबोधिलें पुत्रां मानसां त्या क्रमें जगीं ॥
ज्ञान प्रवृत्ति * यास्तौ तें गुरुत्व विधिगूरुचें ॥७॥
जशी कीं भक्ति देवाची तशीच गुरुची करी ॥
तरी प्रबोधिलें त्याणें ज्ञान याला प्रकाश तें ॥८॥
यास्तौ गुरु उपासावा जगत्कारण मानुनी ॥
तो कृपे पाहातो शिष्या जगदात्मा स्ववैभवें ॥९॥
जिज्ञासु जो ज्ञान इच्छू ज्ञेय आत्मा स्वयें असे ॥
तत्प्रतीति तदात्मत्व दाखवावें तयास तें ॥१०॥
अविद्या त्यास ची विद्या निद्रिस्ता जशि जागृति ॥
प्रतीति ज्यास देहात्मा चिदात्मा हि तयास ची ॥११॥
आतां प्रतीति अज्ञातें कीं मी देह ह्मणूनि ते ॥
गुरु निषेधिती त्याचे प्रतीतीनें च स्पष्ट ते ॥१२॥
शिष्या तूं कोण तें बोल शास्त्रें हि स्व प्रतीतिनें ॥
प्रतीतिनें देह मी च त्या अन्य शास्त्र दृष्टिनें ॥१३॥
शास्त्रदृष्टी तयाहूनी कशी अन्य तसें वद ॥
न जाणेसि तरी बोल प्रतीतीनें कसा दिसे ॥१४॥

---

५. जिज्ञासु = ज्ञानेच्छु. ६ कल्प = ब्रह्मदेवाचा एक दिवस = एक हजार चौकड्या. ७ अपरोक्ष = न दिसणारें, डोळ्या आड असणारें. ८ उपासावा = सेवावा. ९ प्रतीति = अनुभव, प्रचीत. १० अविद्या = अज्ञान. ११ विद्या = ज्ञान. १२ जागृति = जागेपणा. १३ चित् = चैतन्य.* यास्तौ = यास्तव

देह मी जाणतोसी तें श्रवणें[14] कीं प्रतीतिनें ॥
जरी प्रतीतिनें जाणे तरि तो कोण बोल तूं ॥ १५॥
जाणतों देह मी ऐसें प्रतीतीनें जगद्गुरो ॥
देहाहुनी अन्य मी हें जाणें शास्त्रावलोकनें ॥ १६ ॥
असा स्वप्नांत ही स्वप्न देह मी ह्मणतोसि तूं ॥
तेव्हां तूं हा च कीं देह कीं तूं तो स्वप्ननिर्मित ॥ १७ ॥
जरी तो हा तुझा देह निद्रिस्त असतां तयीं ।
धांवे जो अन्य स्वप्नांत मानिसी त्यास आत्मता ॥ १८ ॥
जागरीं देह हा आत्मा तरि स्वप्नांतिल कोण तूं ।
जागृत्प्रतीति न स्वप्नीं स्वप्नींची ते न जागृतीं ॥ १९ ॥
देहात्मता प्रतीती या तस्मात् मिथ्या तुझ्या असे ।
न जसा देह स्वप्नींचा जागृद्देह हि तूं नसे ॥ २० ॥
याची प्रतीति न स्वप्नीं असे प्रस्तुत ते मृषा ।
अन्यथा शास्त्रदृष्टीनें जरि तूं बोल तो कसा ॥ २१ ॥
देहाहुनी वेगळा मी प्रतीति अशि तूजला ।
तरि तूं प्रतितीरूप कीं असे अन्य त्याहुनी ॥ २२ ॥
जरि देहाहुनी अन्य मी आहें प्रतिती तुझी ।
तरी सुषुप्ति[15]काळीं ते तुजला न तशी असे ॥ २३ ॥
तेथूनि उठतां तूंचि स्वसुख तेंच आठवी ।
तेव्हां तूं प्रत्यया[16]हून कसा अन्य दिसे वद ॥ २४॥
( वर्णी एकादशश्लोकें अविद्यानाशयुक्तितें ।
घडे श्रीगुरुउक्तीनें तसें न शास्त्रदृष्टिनें ॥ आ ॥ )
न जाणें तें तरी व्यर्थ विना श्रवणदर्शन ।
शास्त्र साधन ज्ञानाचें स्वयें शास्त्र न ज्ञान तें ॥ २५ ॥
आतां बोलूं बहू काय तूं न जाणासि आपणा ।
आवरण[17] अविद्येचें हें च तूं जाण निश्चयें ॥ २६ ॥
वेदांत-पारग[18] जरी विद्याप्रद गुरू विना ।
वाक्यें वेदांतवक्त्याच्या अज्ञाना तत्र न क्षय ॥ २७ ॥
विज्ञानार्थं गुरूशींच शरणागत्व दे श्रुति ।
वेदांत जाणुनी जावें गुरु-आत्म-पदा प्रती ॥ २८ ॥

---

१४ श्रवण=शास्त्रावलोकन. १५ सुषुप्ति=निद्रा. १६ प्रत्यय=अनुभव, खातरी.
१७ आवरण=आच्छादन. १८ वेदांतपारग=वेदांतज्ञ.

शास्त्र-अध्ययनें होतें तत्त्वज्ञान जरी तरी ।
सिद्ध होतें ज्ञान झालें वेदार्थज्ञान जाणतां ॥ २९ ॥
अपरोक्ष[१९]ज्ञान वेदें करूनी होतसे जरी ।
पुनः कां वदते वेद जावें शरण श्रीगुरू ॥ ३० ॥
यास्तौ[२०] गुरूविना नोहे अपरोक्षात्मदर्शन ।
आचार्यवानें[२१]ची जाणे ऐसें श्रुति हि वर्णिते ॥ ३१ ॥
जाणता जरि वेदांत जेव्हां शरण जाइल ।
तत्त्वज्ञा तत्कृपें त्याला तत्त्वानुभव होइल ॥ ३२ ॥
आत्मा देहाहुनी अन्य ऐसें स्पष्ट जरी कळे ।
तरी तूं कोण तो आत्मा अविद्येनें न जाणसी ॥ ३३ ॥
इच्छी कोणासिं जिज्ञासु जाणाया बुद्धिनें पुनः ।
न जाणे देह देहातें असें तूं कोण जाणता ॥ ३४ ॥
स्वामिन् देहा देहिं[२२] जाणे न जाणे देह देह हा ।
न जाणत हि आत्मा तें ऐसें मी स्पष्ठ जाणतों ॥ ३५ ॥
( नव्हे आत्मा देह ऐसें कळतां प्राणसा दिसे ।
प्राणात्मता ते निरसी[२३] द्वादशश्लोकउक्तिनें ॥ इ ॥ )
मृतदेह असे पैला न जाणे परि देह मी ।
तस्माज्जाणें देहवान तो देहाहुनि वेगळा ॥ ३६ ॥
शवीं प्राण नसे यास्तौ तो देहा जाणता दिसे ।
जातां भासे देहवान गेला जो देह जाणता ॥ ३७ ॥
यास्तौ देहा प्राण जाणे हें माझी बुद्धि जाणती ।
बोले ऐकूनि भगवान् आचार्य[२४] सर्वशास्त्र[२५]वित् ॥ ३८ ॥
जाणता न दिसे देहीं देहींचा प्राण नीघतां ।
यास्तौ प्राणचि आत्मा हें वारुणी[२६] भृगु जाणता ॥ ३९ ॥
प्राण ब्रह्म भृगू जाणे पित्या जाऊनि तो वदे ।
न संभवे ब्रह्म तो कीं भगवान् सांग तें पुनः ॥ ४० ॥
जड कीं प्राण जो नेणे देहा स्वप्नसुषुप्तित ।
असें जाणुनि तो गेला पित्याप्राति पुसवाया ॥ ४१ ॥

---

१९ अपरोक्षज्ञान=डोळ्यांस न दिसणारा जो ईश्वर त्याचें ज्ञान. २० यास्तौ=यास्तव. ११ आचार्यवान=ज्याला गुरु आहे तो. २२ देही=देहधारी. २३ निरसी=नाशी. २४ आचार्य=गुरु. २५ शास्त्रवित्=शास्त्रज्ञ. २६ वारुणी=वरुण पुत्र (भृगु).

स्वप्नद्रष्टा देहिं पाहे जेव्हां स्वाप्निक देह तो ।
तेव्हां देहीं असे प्राण न देहा जाणतो जड ॥ ४२ ॥
तो प्राण जागरीं स्थूळीं देहीं या वर्ततो जसा ॥
स्वप्न-कालांत ही तैसा परि त्याला न जाणता ॥ ४३ ॥
प्राण केव्हां न निद्रिस्त यथापूर्व तसा असे ।
जाणता तरि तो देहा न जाणे निजतां कसा ॥ ४४ ॥
तसाच ही सुषुप्तींत तमोलीनें[27] नव्हे कधीं ।
पूर्ववत् असतां प्राण न जाणे देह तो कसा ॥ ४५ ॥
बहु बोलुनियां काय प्राण तेथ न जाय तो ।
जागरीं मन हें जातां जाणता दूरदेशिंचें ॥ ४६ ॥
देहातें जाणता देही न दिसे प्राण नीघतां ।
तेव्हां तो जाणता प्राण भासे तो भ्रम जाण कीं ॥ ४७ ॥
(प्राणात्मता-निरासें या गेली धांव मनाकडे ।
मनात्मता ते निरसी तो चि या श्लोक-अष्टकीं ॥ ई ॥)
यास्तौ तूं नव्हसी प्राण असे भिन्न तयाहुनी ।
देहात्मा मन हा तेव्हां होतो बुद्धिमिसें भ्रम ॥ ४८ ॥
जातां रज्ज्वीं[28] सर्प भ्रम हाराचा होतसे तव्ही ॥
तो ही निरसितां होतो दंडारोप[29] तसें च तें ॥ ४९ ॥
देहात्मता निरसितां वाटे प्राणात्मता तुला ।
निषेध करितां त्याचा वाटे कीं मन आत्मता ॥ ५० ॥
कल्पी मन स्वप्नदेह घडे त्यास तदात्मता ।
जागरीं[30] हि स्मृती तेथें मन जेथें प्रवर्ततें ॥ ५१ ॥
अंगप्रतीतितें येतें ज्या अंगा मन स्पर्शतें ।
अन्यत्र तरि तें जातां शरीरभान ही नसे ॥ ५२ ॥
मनचि तें दिसेना कीं आत्मदेहासि जाणतें ।
कां तें सुषुप्तिचे[31] ठायीं न असे तेथ यास्तव ॥ ५३ ॥
आत्मा सुषुप्तींत नाहीं सुख कोणा तदां वद ।
यास्तौ मनाहुनी आत्मा निद्रेंत वेगळा असे ॥ ५४ ॥
निद्रेंत वेगळा राहे जाणावा तो गुरूक्तिनें[32] ।
तेथें मन नसे यास्तौ भिन्न आत्मा तयाहुनी ॥ ५५ ॥

---

२७. तमोलीन = अज्ञानमग्न. २८ रज्जु = दोरी. २९ दंड = काठी. ३० जागर = जागेपण. ३१ सुषुप्ति = निद्रावस्था. ३२ गुरूक्ति = गुरु-वाक्य.

(नव्हे आत्मा मन परी जाणावा त्या मनेंच त्या ।
परि मताभिमानी ही वादी जे बोलतात कीं ॥ उ ॥
आत्मा स्वसंवेद्य[३३] स्वयें जाणतो आपआपणा ।
न मनें करुनी जाण कीं तेणें ग्राह्य तो नव्हे ॥ ऊ ॥
पक्ष हा वृत्तिव्याप्यत्व अंगीकारें करूनियां ।
खंडितो वावन श्लोकीं असे श्रुति हि संमता ॥ ऋ ॥)
आत्मा नव्हे मन परी वळखावा मनें च त्या ।
विवेक युक्त मन जें तेणें ते जाण आत्मता ॥ ५६ ॥

परमात्मस्वरूपा या तुल्य रूप दुजें नसे ।
चक्षूनें[३४] न पहावें तें जाणवेना हि इंद्रियें ॥ ५७ ॥
हृदयें प्राप्त ह्मणणें याचा अन्वय[३५] कोण तो ।
मनीषायुक्त मन हें ज्ञानें बोले श्रुती असें ॥ ५८ ॥

मनीषा प्रथमा[३६] तीतें तृतीयार्थ हि बोलती ।
यथास्थित सिद्ध अर्थ असतां व्यर्थ कल्पना ॥ ५९ ॥
मनीषायुक्त मन जें ह्मणावें मनिषा मन ।
मनीषा मन जें तेणें साक्षात्कार चिदात्मता ॥ ६० ॥
वेदांत श्रवणें बुद्धि श्रद्धा अद्वैत युक्त जे ॥
ते निश्चयात्मिका बुद्धी त्या युक्त मन त्या मनें ॥ ६१ ॥

अद्वैत निश्चयायुक्त मन जें स्पष्ट सत्व तें ॥
सत्वाऽपरोक्षें[३७] या अर्थी श्रुत्यर्थ येथ वर्णिला ॥ ६२ ॥

अपरोक्षत्वसत्वानें ते वृत्ति मन बोलती ॥
श्री उपनिषदें[३८] गीता बुद्धि तीस चि वर्णती ॥ ६३ ॥

---

३३ संवेद्य=जाणण्यास शक्य. ३४ चक्षु=डोळा. ३५ अन्वय=संबंध. ३६ प्रथमा=पहिली विभक्ति. ३७ अपरोक्ष=साक्षात्, समक्ष; परोक्ष=डोळ्यां आड, न कळत. ३८ उपनिषदें=वेदांतग्रंथ. ऋक्. साम, कृष्णयजु, शुक्लयजु, व अथर्व अशा पांच मंत्र संहिता आहेत. तसेंच ऋग्वेदास ऐतरेय व सांख्यायन अशीं दोन ब्राह्मणें. सामवेदाचीं षड्विंश, तांड्य, व छांदोग्य अशीं तीन ब्राह्मणें कृष्णयजुर्वेदाचें तैतिरीय ब्राह्मण, शुक्लयजुर्वेदाचें शतपथ ब्राह्मण, आणि अथर्ववेदाचें गोपथ ब्राह्मण अशीं एकंदर आठ ब्राह्मणें आहेत. मंत्र संहिता व ब्राह्मण या खेरीज प्रत्येक वेदाचा आरण्यक ह्मणून एक भाग असतो. त्यांतच उपनिषदांचा अंतर्भाव होतो. ह्या आरण्यकांत किंवा उपनिषदांत परमात्मस्वरूपादि अध्यात्मविषयांचें विवेचन असतें. अशा प्रकारचें विवेचन प्रत्येक वेदाच्या तिसऱ्या ह्मणजे शेवटच्या भागांत असल्यामुळें एतद्विषय विवेचक शास्त्रास " वेदांत शास्त्र " ह्मणजे

पुढें चालू.

आत्मावलोकन[39] किजे बुद्धि सूक्ष्म चि जे तिणें ॥
या श्रुती करुनी बुद्धी आत्मबोधास बोलिली ॥ ६४ ॥
हृदा मनीषा मनसा कोठें ऐसें हि ऐकिलें ॥
ज्ञाता चिदात्मतत्वज्ञेयं[40] पावतो सत्ववृत्तिनें ॥ ६५ ॥
बुद्धि शब्दें वृत्ति कोठें मनशब्दें हि वर्णिली
तिणें जाणुनि तो आत्मा करिती तिस तन्मयी ॥ ६६ ॥
बलवान् चिन्मयाभ्यासें वृत्ति जे तीस तन्मयी ॥
करिती ते धन्य योगी होती साधक सिद्ध ते ॥ ६७ ॥
वृत्ति शून्य मनाची ते ब्रह्माकार स्थिती असे ॥
गीता आणि योग शास्त्रीं बोलिलें उपनीषदीं ॥ ६८ ॥
असें अस्तां कलीं[41] कोण्ही चिदात्मज्ञानमानि जे ॥
मुक्ति आत्म श्रवणें केंवि नाअभ्यास बोलती ॥ ६९ ॥
बोलती ते च कीं आत्मा आपणातें च जाणतो ॥
न जाणतो मनीषेनें न मनें ही करूनियां ॥ ७० ॥
गुह्य हें उपदेशूनी बोलती हि परस्परें ॥
आपली ब्रह्मता तीतें कीं स्वयें ब्रह्म जाणतें ॥७१॥
ब्रह्म जाणे आपणातें जरी केवळ निर्गुणें[42] ॥
तरी ब्रह्मात्म विस्मृत्यें होतें कीं काय निर्गुण ॥७२॥
[43]अविद्या ब्रह्म जरि ते विद्या[44] ही ब्रह्म निर्गुण ॥
होतां ब्रह्म अविद्या ते विद्या ही ब्रह्म होइल ॥७३॥
माया-वृत्ति अविद्या जों विद्या ब्रह्म कसें घडे ॥
अविद्या निर्गुण न जों विद्या ब्रह्म कसें घडे ॥७४॥
आपणा ब्रह्म जाणेना होईल सिद्ध हें जरी ॥
तरि कीं बोल उचित ब्रह्म जाणे स्वब्रह्मता ॥७५॥
अविद्या वेगळी ब्रह्मा जेंव्हां निर्धर्म सर्वदा ॥

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

वैदिक ग्रंथाच्या शेवटीं वर्णिलेलें शास्त्र असें म्हणतात. एकंदर प्रसिद्ध उपनिषदें १०८ आहेत. परंतु त्यां पैकीं पुढें लिहिलेलीं दहा उपनिषदें मुख्य मानिलेलीं आहेत.

ईश केन कठ प्रश्न मुण्ड माण्डुक्य तित्तिरिः ।
ऐतरेयं च छान्दोग्यं बृहदारण्यकं तथा ॥ १ ॥

३९ आत्मावलोकन = आत्मज्ञान. ४० ज्ञेय = जाणावयाचें वस्तु ४१ कलीं = कलियुगांत. ४२ निर्गुण = सत्व- रज--तम रहित. ४३ अविद्या = अज्ञान ४४ विद्या = ज्ञान

आत्मा मायातीत[४५] जाणे अविद्या तरि अन्यथा ॥७६॥
स्वब्रह्मत्वें आपणातें जाणतें ब्रह्म तें तरी ॥
स्वब्रह्मत्वें आपणातें न जाणे सिद्ध होतसे ॥७७॥
निर्गुण ब्रह्म निर्धर्म अविद्या जरि तें असे ॥
निर्गुण ब्रह्म निर्धर्म विद्या ही तरि होइल ॥७८॥
वृत्तिवर्जित निर्गूण अविद्या वृत्ति त्याहुनी ॥
जरि अन्य तरी सिद्ध अन्य विद्या तयाहुनी ॥७९॥
विद्या अविद्या मत्तनू[४६] उद्धवा जीव जे तयां ॥
मोक्षा आद्य दुजी बंधा माझे मायेन निर्मिता ॥८०॥
श्रीमद्भागवताठायीं स्पष्ट निर्णय हा असे ॥
जसी माया वृत्ति विद्या अविद्या हि तसीच ते ॥८१॥
विद्ये अविद्येस असे जडत्व तत्प्रकाशक ॥
ब्रह्म ची निर्णयो यास्तौ बुद्धी करुनि तें दिसे ॥८२॥
"दृश्यते त्वग्र्यया बुध्द्या" ऐशी कोठें श्रुती[४७] असे ॥
"हृदामनीषा मनसा" ऐशी ही श्रुति वर्तते ॥८३॥
त्यांला या ही प्रमाणाचे ठाईं श्रद्धा[४८] न होतसे ॥
वेद बुद्धी दृश्य तरी बुद्धी तद्विषय पावले ॥८४॥
विषयत्वभयें त्यातें न श्रद्धा निगमादिकीं[४९] ॥
श्रद्धामति तसी त्यांच्या सत्यब्रह्मविकारिवान्[५०] ८५॥
निर्गुणत्वें आपणातें जाणेना ते स्वरूपता ॥
न मरे हि न ते वाढे जाणतां आपणा तसा ॥८६॥
ब्रह्मनिर्गुणि अविद्या स्वरूप जाउनी तई ॥
सिद्ध विद्या स्वरूपत्व दुग्धत्वास दधित्ववत् ॥८७॥
तंडुलांचें वोदन[५१] जें होतें पाकक्रियादिकें ॥
तसा निर्गुण जो अज्ञ तो सुज्ञ उपदेशितां ॥८८॥
निर्विकार विकारित्व सिद्ध एवंच होतसे ॥
प्रमाणाच्या विरोधें हि मत त्याचें असंमत ॥८९॥
एवं ब्रह्मीं विकारित्व प्रमाण सविरोध हा ॥
वदता तीं न पाहोनी सिद्ध हेंच पुनः पुनः ॥९०॥

---

४५ मायातीत = मायारहित. ४६ तनू = शरीर. ४७ श्रुति = वेदवचन. ४८ श्रद्धा = भाव ४९ निगम = वेद. ५० विकार = बदल, रूपांतर. ५१ वोदन = भात.

मानें बुद्धि-विषयता श्रुति-ठाईं अश्रद्धता ॥
धरणार असे त्याचें स्थूलत्व[५२] होय बुद्धिचें ॥९१॥
विषयाचें विषयत्व शब्दादिपंचकीं[५३] मधें ॥
जो ज्या ज्या इंद्रिया गम्य त्याचें त्याचें तयास चि ॥९२॥
बुद्धिचिच्छक्तिरूपा ते चित्सरूपें सचेतना ॥
इंद्रियें विषयां जाणे जाणे निर्विषय स्वयें ॥ ९३ ॥
अतींद्रिय निर्विषय ब्रह्म पाहाति तद्रुपीं ॥
तत्प्रकाशे इंद्रियांनीं जाणती विषयांस हि ॥ ९४ ॥
अगम्य[५४] इंद्रियां ब्रह्म ग्राह्य बुद्धि अतींद्रियें[५५] ॥
स्वमुखें निर्णय स्पष्ट कर्ता श्रीभगवान् स्वयें ॥९५॥
"सुखमात्यंतिकं" वाक्यें बुद्धिग्राह्य अतींद्रिय ॥
स्वमुखें निर्णयो स्पष्ट कर्ता श्रीभगवान् स्वयें ॥ ९६ ॥
इंद्रियग्राह्य विषय सत्य जें तें अतींद्रिय ॥
बुद्धिग्राह्य तथापी ही त्यास निर्विषयत्त्वता ॥ ९७ ॥
यास्तौ ग्राह्यचि तें बुद्धि अतींद्रिय हि यद्यपि ॥
बोले श्री भगवान् कीं तें बुद्धि ग्राह्य अतींद्रिय ॥९८॥
आत्मावलोकन किजे बुद्धि सूक्ष्म चि जे तिणें ॥
श्रुतिनें बोलिलें जैसें हरीनें तें चि साधिलें ॥९९॥
बुद्धिग्राह्यतया आत्म्या विषयत्व चि बुद्धि तें ॥
भासतें मतिमांद्यत्वें ज्यास्तौ बुद्धि स्वयें जड ॥१००॥
जें बुद्धिवेद्यं[५६] बोलावें तें बुद्धिग्राह्य बोलिजे ॥
आत्मा आत्मप्रकाशानें जाणें बुद्धि स्वयें जड ॥१०१
सत्यात्मतेनें च आत्मा ग्राह्य सिद्ध असे च तें ॥
परि न धर्म विहीनें[५७] वृत्तियोगें च निर्गुण ॥१०२
अग्नि येतो प्रतीतीसि[५८] काष्टादिक हि जाळितां ॥
काष्टादिकें दाह्य होय अग्नि होय प्रकाशक ॥१०३॥
अग्नि होय जसा स्पष्ट लोहवस्त्रीं शिळीं[५९] तसा ॥
प्रकाशत्वें दाहकत्वें स्वयें स्पष्ट न होय ता ॥१०४॥

---

५२ स्थूलत्व=सूक्ष्मत्वाभाव. ५३ विषयपंचक=शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध. ५४ अगम्य=जाणण्यास अशक्य. ५५ अतींद्रिय=इंद्रियांचे योगानें न समजणारे. ५६ बुद्धिवेद्य=बुद्धीस समजण्यासारखें. ५७ धर्म विहीन=धर्म रहित ५८ प्रतीति=अनुभव, साक्षात्कार. ५९ शिळीं=दगडांत ( शिळेंत ).

हो आत्मा स्वानुभव बुद्धीकरुनि तो तसा ॥ १०५ ॥
आत्मा स्वात्मत्व जाणेना बुद्धिनें च जसें तसें ॥
स्वात्मत्व बुद्धिनें जाणे दोन ही तत्प्रकाशित ॥ १०६ ॥
जाणेना मी आत्मयानें स्वप्रकाशें च हें वदे ॥
अविद्ये आत्मविस्मृती अहंता पावली जड ॥ १०७ ॥
( अथ एकादश श्लोकें करी स्वमत स्थापन ॥
पर्यायें सत्व वृत्तीच्या सज्जनानंद कारक ॥ ऋ ॥ )
आत्मा तुझा मन नव्हे अपरोक्ष मनें परी ॥
होतो तें मन सत्त्वाची वृत्ति स्पष्ट असें असे ॥१०८॥
दृश्यते त्वग्र्यया बुध्द्या तसी च मनसा श्रुति ॥
कोठें वेद बुद्धि कोठें मन तें सत्ववृत्तिस ॥१०९॥
या नंतरें चारि भेद सत्त्वाचें ममतास्पदं ॥
तथापि जेथ मी माझें न आत्मा अन्य त्याहुनी ॥११०॥
त्या भेदां ठायिं तो आत्मा वेगळा परि तद्रुप ॥
वाचांश तो तुतें भासे लक्षांश भिन्न त्याहुनी ॥१११॥
"यतो वाचो निवर्तंते आनंदो ब्रह्मणो विद्वान्" ॥
या श्रुत्यर्थ-अभिप्रायें तूं करी अवलोकन ॥११२॥
त्या चारी सत्व भेदांत आत्मा जो भेद वाटतो ॥
वाच्यांश तो त्यागितां त्या वाणीस ठाव कोठिल ॥११३॥
मनाचे भेद ते चारी नाहीं पावत त्या सुखा ॥
जेथनि परते वाणी चारी ही भेद त्या सह ॥११४॥
"यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसा सह" ॥
श्रुतिचीया विचारें या पहा आत्मा समाहित ॥ ११५ ॥
शाखेचंद्र गुरूवाक्यें पाहे उत्तम बुद्धिवान् ॥
देहीं च सच्चिदानंद प्रपंचतरु[61] छेदुनी ॥ ११६ ॥
जड प्रपंचद्रुम सूक्ष्म शाखा ते भेद चारी हि मनीं चि देखा ॥
भेदीं जया आत्म प्रतीति[62] होते तो भेद शाखातरुची पहा ते ॥११७॥
वाच्यांशशाखेस त्यजूनि द्यावें लक्षांशचंद्रा स्वसुखा पहावें ॥
तें ब्रह्म ऐसें वदताति वेद न जेथ वाचानुभवैक वेद्य[63] ॥ ११८ ॥

---

६० आस्पद=स्थान ६१ तरु=वृक्ष. ६२ प्रतीति=अनुभव. ६३ वेद्य =जाणण्यास योग्य.

(वर्णी वाच्यांशत्यागातें ब्रह्मलक्षांश जाणुनी ॥
अष्ट श्लोकेंकरूनियां बोलतो तें अतःपर ॥ ल ॥ )
जेथें न भासे रविचंद्रतारा विद्युल्लता अग्निस काय थारा ॥
त्याचे च भासेंवरि[64] सर्व भासे त्याचे च भासें सकळ प्रकाशे ॥ ११९॥
अशद्ब अस्पर्श अरूप अव्ययें[65] अनाद्यनंत महतः परं ध्रुवें[66] ॥
जाणूनि त्या मृत्युमुखा पृथग्भव * * * * ॥ १२० ॥
अशद्ब अस्पर्श असी श्रुती हे टाकूनि तूं वाच्य ब्रह्मात्म पाहें ॥
''ब्रह्माहमस्मी''ति असे प्रतीति हो श्रुत्यानुभूत्यां[67] करुनी कृतार्थहो ॥ १२१॥
तुझें अविद्यावरण[68] मज मी जोणेना च तें ॥
नाशतें व्यतिरेकें[69] च विद्येनें गुरुदत्त जें ॥ १२२ ॥
ऐसें जाणितलें ब्रह्म तेन जाणितलें परी ॥
ब्रह्माचें अद्वितीयत्व तूं अद्यापि न जाणसी ॥ १२३ ॥
अनात्मत्वनिषेधानें जडता त्यागिली तुवां ॥
यावत्ती द्वैतरूपें ची तावत् अद्वैत तूं नसे ॥ १२४ ॥
जडैक्यार्थी जडा अन्य ब्रह्म जाणति तद्विदें[70] ॥
जडब्रह्मैक्य जो बोध तो चि अद्वय संज्ञित ॥ १२५ ॥
कोण्ही वदति मिथ्यात्वाज्जड नाहीं च तें तया ॥
ब्रह्म आहे अद्वितीय त्या ऐक्यें ज्ञान काय तें ॥ १२६ ॥
(पुरे ज्ञान व्यतीरेक न प्रयोजन अन्वय ॥
वदती मत तें खंडे श्लोक सत्तावनीं यया ॥ ल्ह ॥)
न विरुद्ध चि सिद्धांता पक्ष सिद्धांत ची असा ॥
साक्षात्कार चि सत्याचा असत्यीं जरि होइल ॥ १२७ ॥
असत्य कुंडला ठायीं जो सत्य हेम पाहता ॥
त्यातें कुंडलमिथ्यत्व ऐक्यत्व दोहिंचें सदां ॥ १२८ ॥
न जाणोनि असें कोणी नाशिवंत मृषा जड ॥
बोलती शद्ब-पांडित्य त्यांचें तेथें वृथा घडे ॥ १२९ ॥
न पावे नाश कनक कुंडलें नाशलीं जरी ॥
तरंगें[71] नासेल जईं न नासे जळ जें तईं ॥ १३० ॥
बहु वादें पुरे व्याप्य जडीं जें ब्रह्म व्यापक ॥

---

६४ भास = प्रकाश. ६५ अव्यय = अविनाशी. ६६ ध्रुव = निश्चळ. ६७ श्रुत्यानुभूत्या = श्रवण व अनुभव. ६८ अविद्यावरण = अज्ञानाच्छादन. ६९ व्यतिरेक = संबंध तोडणें. ७० तद्विद = तें जाणणारे. ७१ तरंग = लाटा.

साक्षात्काराभिमानी जे जाणावें त्यांहि तें तसें ॥ १३१ ॥
व्यापक ब्रह्म जो व्यापीं पाहेना तो न तत्वंवित्[७२] ॥
व्यापीं व्यापक जो पाहे स्पष्ट त्या ऐक्य दोहिंचें ॥ १३२ ॥
यावज्जडतरंगांत न चिदंबुधि[७३] दर्शन ॥
सर्वरूपी ब्रह्म त्याचा साक्षात्कार न बोलिला ॥ १३३ ॥
नष्टप्राय संप्रदाय अल्पकाळें चि भूतळीं ।
श्री गुरू सच्चिदानंद त्याणीं तो हा प्रकाशिला ॥ १३४ ॥
वेदांत शास्त्र वक्तारे यती जे प्रत्यगात्मता ।
जाणूनि ही सर्व जग ब्रह्मत्वें च न जाणती ॥ १३५ ॥
गुरुत्वा कारणें म्यां या भूतळीं बहु सेविले ।
आत्मोपदेश समयीं आचार्यत्वें[७४] न मानिले ॥ १३६ ॥
अहं प्रत्यय[७५] ची आत्मा शुद्ध हें उपदेशिलें ।
जड मिथ्या नश्वरत्वें[७६] इत्यद्वैत निरूपिलें ॥ १३७ ॥
जेथूनि परते वाचा निषेधें जड ब्रह्म तें ।
उपदेशी जडा कुंभीं तन्मृद्दाखविता गुरू ॥ १३८ ॥
ऐसीं छांदोग्य वचनें जिज्ञासा[७७] उठली जयीं ।
तत्वज्ञ जे क्षितितळीं विख्यात सेविले तई ॥ १३९ ॥
अहंस्फूर्त्यात्ममानी जे त्यांना ही शुद्ध ब्रह्म तें ।
न ऐक्य जड ब्रह्मार्चे वाचे मिथ्या च वादित्यां ॥ १४० ॥
एवं संस्कृत-शास्त्रज्ञ प्राकृत-ग्रंथ-विस्तम ।
अद्वैत-तत्व-बोलाया सेविले म्यां बहूत ते ॥ १४१ ॥
संस्कृत-ग्रंथ-कर्ते जे भाष्यकारादि[७८] पूर्ष्वित ।
जें ज्ञान बोलिलें तें ही कोठें च नाहिं देखिलें ॥ १४२ ॥
वर्षशताचिया पूर्वी प्राकृत ग्रंथकार जे ॥
त्यक्तदेही जे यथोक्त न तैसे ज्ञानि प्रस्तुतीं ॥ १४३ ॥
होतां निराशित ज्ञानातें न च भूतळिं जाणता ॥
संगमीं सित–असितें[७९] सिद्धांत तनु त्यागणें ॥ १४४ ॥
त्यागिली तेथ तनु ज्या धीरांनीं अन्यजन्मि ते ॥
कोठें गुरुमुखें ज्ञान लाभूनी मुक्ति पावले ॥ १४५ ॥

---

७२ तत्ववित्=तत्वज्ञ. ७३ चिदंबुधि=चैतन्यसागर. ७४ आचार्यत्व=गुरुत्व. ७५ प्रत्यय=अनुभव, खातरी. ७६ नश्वरत्व=नाशिवंतत्व. ७७ जिज्ञासा=ज्ञानेछा. ७८ भाष्यकार=वेदांत शास्त्र-टीका-कर्ता ( शंकराचार्य ). ७९ सित-असित=गंगा यमुना.

"नान्यः पंथा" श्रुतीनें या ज्ञानें च मोक्षनिर्णय ॥
मुक्ति जन्मांतरीं ज्ञानें तनुत्यागें प्रयागिं हि ॥ १४६ ॥
ऐशा स्वबुद्धीकृतनिश्चयानें माल्यादिदेशीं फिरतां तनूनें ॥
श्रीशेषशायी यतिवर्यरूपें झाला च प्रत्यक्ष गुरुस्वरूपें ॥ १४७ ॥
अशब्द अस्पर्श अरूप अव्यय निषेधमात्रें तमसः परद्वय ॥
तें दाखवी ब्रह्म न जेथ वाँणी[80] आत्मानहं उक्त अबूध यांनीं ॥ १४८ ॥
जाणूनि हि असें तत्त्व न मी आनंदनिर्भर ॥
कीं अनात्मनिषेधें हीं द्वैत जों सुख कोठुनी ॥ १४९ ॥
माझें त्वद्गुत जाणोनी भगवान् यतिरूपधृक् ॥
वत्सा मी सांगतों तूतें तें अद्वैत अतःपर ॥ १५० ॥
अनात्माभिन्न आत्मत्व ऐसें जडविवेचनें ॥
द्वैतवादरती कोण्हो बोलतो पुरुषार्थ हा ॥ १५१ ॥
यावज्जडतरंगांत चित्सिंधू नाहिं पाहिला ॥
अद्वैतानुभवानंद तावत्त्या बहु दूर ची ॥ १५२ ॥
नष्टप्रायात्मबोधानें अविद्यावरणाख्य ते ॥
परि विक्षेप संज्ञीता जों असे ते हि तों असे ॥ १५३ ॥
कीं मी आत्म्यातें न जाणें चि हे आवरण-रूपिणी ॥
नष्टप्रायात्मबोधानें तावत् नष्ट न नष्ट ते ॥ १५४ ॥
चिदात्मा मीं जड नव्हें तत्त्व हें जरि पाहिलें ॥
तरि सर्व तदात्मत्वें अद्यापि न तुं जाणसी ॥ १५५ ॥
एकाच देहिं या आत्मा तुवां जाणितला जसा ॥
तसी सर्वत्र आत्मत्वें न झाली प्रतिती तुतें ॥ १५६ ॥
सत्यज्ञानानंत आत्मा अपरिच्छिन्न[81] ऐशिया ॥
जसा देहीं जगीं तैसा जाणतां सुख पावसी ॥ १५७ ॥
ऐसें जरी जाणसील व्यतिरेकाभिधान ते ॥
विद्या तेणें अविद्या हे नाशे आवरणात्मिका ॥ १५८ ॥
तथापी या जड जगीं जो सर्वत्र चि सर्वगत् ॥
होतो परोक्ष[82] तो आत्मा जो भासे पृथकत्वता ॥ १५९ ॥
आत्मबोधें नष्टप्राय अविद्यावरणाख्य ते ॥
तरी न निरसे[83] यावत् असे विक्षेप-संज्ञिता ॥ १६० ॥

---

८० वाणी=कमताई. ८१ अपरिच्छिन्न=मर्यादारहित. ८२ परोक्ष=डोळ्याआड
८३ निरसे=नष्ट होई.

आत्म्यातें जाणेना बुद्धि जे आवरणरूपिणी ॥
अविद्ये करुनी झाली अविद्याविक्षेपारूपा ॥ १६१ ॥
र्‍ज्ज्वज्ञानें सर्प होतो पूर्वीं अज्ञानें रज्जुचा ॥
निश्चयो सर्पसत्यत्व तसा आत्मा न अन्यथा ॥ १६२ ॥
तथापि रज्जुबोधानें दुःख कोठें न ऐकिलें ॥
जसें तदुत्थितात् मिथ्या सर्पास्तौ होतसे भय ॥ १६३ ॥
एवं आवरणाज्ञान न तसें दुःखदायक ॥
जडसत्यें जसें देतें चिज्जडैक्य न जाणतां ॥ १६४ ॥
होतां आधीं आवरण मग विक्षेप त्यास्तव ॥
होतो तो प्रथमाहूनी अज्ञानी बळवान् दुजा ॥ १६५ ॥
रज्वज्ञानात्समुत्पन्न सर्प दुःखद जो जसा ॥
लोहात् नद्याः खड्ग ह्रद त्याहून दुःखद तो तसा ॥ १६६ ॥
यास्तौ जरी हि आत्मत्वें जाणिलें ब्रह्म तें तरी ॥
न जों ज्ञान जड जग ब्रह्म अज्ञान तों असे ॥ १६७ ॥
"ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नं" बोले कीं भगवान् स्वयें ॥
जाणूनि ब्रह्म तें सर्व जाणावें तइं ज्ञानि तो ॥ १६८ ॥
जों आत्मयोगि ही आत्मा जाणतां जड पाहतो ॥
तो मृत्युपासुनी मृत्यु पावे ऐसें वदे श्रुति ॥ १६९ ॥
स्वभावें जन जे अज्ञ मृत्यूपासूनि मृत्युतें ॥
धावती ते चि आश्चर्य काय तें वदते श्रुति ॥ १७० ॥
स्वतां च प्राप्त जो अर्थ गौण श्रुत्युक्त त्याहुनी ॥
मुख्य न प्राप्त जो कोणा संसिद्ध तो अबाधित ॥ १७१ ॥
जडाजडविवेकज्ञ जड ब्रह्मैक्यअज्ञ जो ॥
नानात्व पूर्ववत् पाहे जों त्याला मुक्ति तों नसे ॥ १७२ ॥
विक्षेपनामकाविद्या जिणें नानात्वदर्शन ॥
तावदविद्यावरण गेलें तरि असे च त्या ॥ १७३ ॥
तस्माच्चिज्जडऐक्यत्व गुरुक्तीनें न जाणिलें ॥
तों अज्ञानजन्य सुख दुःख कोठून जाइल ॥ १७४ ॥
यास्तौ जेथोनि परते वाचा तूं जाणूनि तया ॥
मानिसी मीं अकृतार्थ यथापूर्व तसा च कीं ॥ १७५ ॥

---

८४ रज्ज्वज्ञान = रज्जु + अज्ञान = दोरी विषयीं अज्ञान. ८५ सर्पास्तौ = सर्पास्तव. ८६ आवरण = आच्छादन ८७ खड्ग = तरवार. ८८ ह्रद = डोह.

"आनंदो ब्रह्मणो विद्वान्न बिभेति" असि श्रुती ॥
अहंकारनिषेधानें बोलते निर्भयात्मता ॥ १७६ ॥
अहंस्फूर्त्या सर्व भय अभय तो निषेधिता ॥
निःशङ्कदर्शनें तो ची न भीतो श्रुति बोलते ॥ १७७ ॥
तथापि भयसद्भाव द्विविध तादृशास ची ॥
सद्य मेल्या हि बुद्धिस्थ असे विक्षेप पूर्ववत् ॥ १७८ ॥
अविद्येचें जें द्वितीय रूप विक्षेपसंज्ञित ॥
तें जों पर्यंत नाशेना तों न होणार मुक्ति ते ॥ १७९ ॥
"कल्याणमार्गि या कोणी बापा जाय न दुर्गती" ॥
ऐसें हें भगवान् बोले तें गणा शुभकारक ॥ १८० ॥
प्रारब्धशेषें धीराच्या वांचतो देह चक्षुनें ॥
नानात्व पाहतो त्यास श्रुतिनें मृत्यु बोलिला ॥ १८१ ॥
अहंकार निषेधानें आत्मा यद्यपि पाहतो ॥
आत्मा निर्भय तो त्यास्तौ भय कोण्ही न पावती ॥ १८२ ॥
आत्मबोधें निर्भय त्या न बिभेति वदे श्रुति ॥
तथापि जड जों आहे भय त्या तों वरी असे ॥ १८३ ॥
(वदे या नंतर श्लोकें एकोनच्याळिसीं यथा ॥
कैसा अन्वय तो संतीं पाहावा च पुनः पुनः ॥ ए ॥ )
गुरुरूपें यतिवेशें माधवें बोलुनी असें ॥
कृपेनें उपदेशीतो तत्त्व परमहंसगत् ॥ १८४ ॥
जडाजडोदकक्षीरें विवेकज्ञान-वित्तम ॥
ते हंस जे तदैक्यज्ञ मान्य परमहंस ते ॥ १८५ ॥
जडब्रह्मैक्य जें तत्त्व यास्तौ परमहंसग ॥
असें बोलियले साक्षात् रूपें परमहंस ज्या ॥ १८६ ॥
"सर्वं खल्विदं ब्रह्म" निगमागमें बोलते ॥
सत्या त्यासत्य न ऐक्य तरि च ऐक्य कसें वद ॥ १८७ ॥
सर्व आणी ब्रह्म दोंचें ऐक्य होईल जेधवां ॥
जेव्हां सर्व सम घडे होयील ब्रह्म सत्य तें ॥ १८८ ॥
यास्तौ मृत्कनकादीकदृष्टांतें ब्रह्मसत्यता ॥
वाचारंभणता मात्र घटादीकां निरूपिली ॥ १८९ ॥

---

८९ माधव = लक्ष्मीपति (विष्णु). ९० परमहंस = योगी. ९१ क्षीर = दूध. ९२ निगमागम = वेदशास्त्र. ९३ वाचारंभणता = वाच्यता.

मृदीं[९४] घट उपादान[९५] कनक कुंडलादिकां ॥
आत्मा जग-उपादान स्वप्रकाश अनावृत[९६] ॥ १९० ॥
" तस्य भासा सर्वमिदं विभाति" श्रुति बोलते ॥
घट भासे मृदिं जसा जग भासे चिदात्मते ॥ १९१ ॥
जें स्वप्रकाश तें सत्य असत्य तत्प्रकाशित ॥
मृत्प्रकाशघटीं सत्य चित्प्रकाश तसा जगीं ॥१९२॥
मृत्तिका सत्य ऐसें चीं यास्तौ बोलतसे श्रुती ॥
घटास मृत्प्रकाशीता वाचारंभण मात्र चि ॥१९३॥
घटातें न अपेक्षूनी मृत्तिका भासती स्वयें ॥
विना ती घट भासेना कीं न तो सत्य ती असे ॥ १९४ ॥
प्रकाशी मृत्तिका कुंभ ते असे न असे घट ॥
प्रकाशी कुंडला हेम असे हेम न कुंडल ॥१९५ ॥
पाणी प्रकाशी लहरी[९७] असे पाणी नसेच ते ॥
रज्जु प्रकाशि सर्पातें असे रज्जू न सर्प तो ॥ १९६ ॥
शुक्ति[९८] प्रकाशी रूप्यातें असे शुक्ति न रौप्य तें ॥
तांबें प्रकाशि पात्रातें असे तांबें न पात्र तें ॥ १९७ ॥
शिळीं[९९] प्रकाशिलें लिंगं[१००] असे शीळा न लिंग तें ॥
नाहीं जो भासतो तो चीं काष्ठीं च काष्ठहस्ति जो ॥ १९८ ॥
प्रकाशी स्थाणु[१] पुरुष भासे त्या स्थाणुनें च तो ॥
लोहें प्रकाशिला खड्ग भासे सत्याचिया परी ॥ १९९ ॥
द्रव्यें जीं जीं अशीं लोकीं वाचारंभणरूपक ॥
प्रकाश्यें जीं असे त्याचीं त्याणें तें तें प्रकाशतें ॥ २०० ॥
उपादान स्वप्रकाश कार्य त्याणें प्रकाशित ॥
कालत्रयीं उपादान आद्यंतीं कार्य न असत् ॥ २०१ ॥
तसें मध्यें जरी भासे कारण कार्य न पृथक् ॥
कालत्रयीं विद्यमान स्वप्रकाश चि सत्य तें ॥ २०२ ॥
वारुळींचा स्वप्रकाश दृष्टिगोचर सर्प जो ॥
सर्प मिथ्या जो प्रकाश्य रज्ज्वाश्रयें प्रतीति त्या ॥ २०३ ॥
" सदेव सौम्येदमग्र आसीदेक" असी श्रुति ॥

---

९४ मृद=माती. ९५ज्या द्रव्यानें कोणताही पदार्थ बनतो तें द्रव्य. ९६ अनावृत =अनाच्छादित. ९७ लहर=लाट. ९८ शुक्ति=शिंप. ९९ शिळा=दगड. १०० लिंग=शिवाचें. १ स्थाणु=दगड किंवा लांकडाचा तुकडा.

" नासीदासन्नो सदासीत्तदानीं" असि ही श्रुति ॥ २०४ ॥
सृष्ट्यादिप्रळया अंतीं ब्रह्म बोले हि आगम ॥
मध्यें हें जग भासे जें तेणें च न दिसे स्वता ॥ २०५ ॥
ज्याच्या भासा सर्व हें जें भासतें सचराचर ॥
मृदीं कुंभ जसा भासे उत्पत्तीलय ही मृदीं ॥ २०६ ॥
ब्रह्मीं च जग उत्पन्न लय होणार ब्रह्मि तें ॥
मध्यें हि त्याच भासानें भासे कुंभ जसा मृदीं ॥ २०७ ॥
" मृत्तिकेत्येव सत्यं च " यास्तौ श्रुति वर्णिते ॥
तसें जग असत्यास्तौ सत्य ज्ञान वदे श्रुति ॥ २०८ ॥
सच्चित् अनंत जें ब्रह्म आत्मत्वें त्रिपदें हि तें ॥
जाणावें सत्य प्राज्ञांनीं असत्य अन्य त्या जग ॥ २०९ ॥
जडा जगा अंत असे ब्रह्म ज्ञान अनंत चि ॥
त्या च मध्यपदें ब्रह्म बोलिजे सत् अनंत ही ॥ २१० ॥
सत्यमध्यपदें ही जें स्वप्रकाश ह्मणूनि सत् ॥
ह्मणसी सत्य तें कैसें मध्यज्ञानपदें चि सत् ॥ २११ ॥
स्वप्रकाशपणें सत्य यास्तव ज्ञान बोलिजे ॥
कालत्रयीं विद्यमान तेणें अनंत काळतः ॥ २१२ ॥
न होतें जग हें पूर्वीं नाहीं होणार तें पुढां ॥
ज्याचे सत्ते असी स्फूर्ती तें अनंत चि काळतः ॥ २१३ ॥
देशें हि तो मनोवृत्या कल्पूनि सकळा जगा ॥
जें स्फूर्तिनें नसे कांहीं त्यावीण तेथ जाणतें ॥ २१४ ॥
यास्तौ मध्यपदें सत्य अनंत तेणें बोलिजे ॥
कशानें सत्य तरितें ज्ञानमध्य पदें चि सत् ॥२१५॥
स्वप्रकाशक तें सत्य त्यास्तव ज्ञान तें असे ॥
तयास्तौ दोन ही मध्यें ज्ञान लक्षण बोलिजे ॥ २१६ ॥
सत्यत्व चित्स्वरूपास्तौ आनंदपद त्यास्तव ॥
दोहींचे मध्यगत तें स्पर्शलें हें पदद्वय ॥ २१७ ॥
आलिंगी द्वयभागींच्या जसा गोपीद्वया हरी ॥
कृष्णद्वया हि मध्यस्था गोपस्त्री रासमंडळीं ॥ २१८ ॥
मध्यस्थ नायकमणी पार्श्वस्थातें मणिद्वया ॥
स्पर्शे तैसें ज्ञानपद मध्य जें त्या पदद्वया ॥ २१९ ॥

---

२ आगम = शास्त्र .

तिन्ही पदें चिज्जडैक्य बोलिजे श्रुति युक्तिनें ॥
प्रथम व्यापकतया पहावें सचराचरीं ॥ २२० ॥

*        *        *        *

जडापवादें जाणूनी चिदात्म्या तें अशेषतः ॥ २२१ ॥
ज्ञानात्मता एक देहीं जसी जाणितली तसी ॥
ते काळीं सर्व देहीं ही जाणावी ते च आत्मता ॥ २२२ ॥
न जाणतां जाणिलेंसे चिदात्मत्व तदां च चित् ॥
प्रतिबिंब ज्ञानवक्ते आहेत बहु भूतळीं ॥ २२३ ॥
(चिदंशा ब्रह्म मानूनी ह्मणती भोग जे मना ॥
तें त्यांचें मत खंडाया छपन्न श्लोक वर्णितों ॥ ऐ ॥ )
देहात् चिदंश जातां जो राहे तें देह व्यापुनीं ॥
तो आत्मत्वें च जाणावा भोक्ता अंश स्वकर्म हा ॥ २२४ ॥
अहंस्फूर्ती अंश त्यातें आत्मत्वें च हि बोलतो ॥
होता हे शिष्य कंठीं तो धोंडा थोर भवांबुधीं[३] ॥ २२५ ॥
किंवा शुद्ध चिदात्मत्व ब्रह्म तें उपदेशिती ॥
तो चि भोगीतसे दुःख जो चिदाभास बोलिला ॥ २२६ ॥
माझा च प्रतिबिंबांश झाला जीव जगीं जडा ॥
इत्यादि बोले भगवान् प्रति बिंबांश जो तया ॥ २२७ ॥
तो संसारीं दुःख भोक्ता होतो बद्ध चि मुक्त ही ॥
स्वाबिंबात्मत्वबोधानें होतो बिंब चि सर्वगत् ॥ २२८ ॥
चिदात्मतेनें च एका देहीं जें ब्रह्म जाणिलें ॥
तें दुःखातें कसें भोगी दुःखभाक् न दिसे दुजा ॥ २२९ ॥
सर्वगत् ब्रह्म जो जाणे भोक्त्यातें जाणतो पुनः ॥
सर्वांगीं ठेउनी बुद्धी त्या भोक्त्यातें हि पाहतो ॥ २३० ॥
ऐसें हें भगवान् कृष्ण भोगी कैसा गुणी कसा ॥
हें न पाहाति ते मूढ पाहती ज्ञान डोळस ॥ २३१ ॥
भोक्तृत्व बोलति मना प्राकृतग्रंथवादि[४]जे ॥
वदे वेदज्ञ हि तसें कितेक सर्व ते जड ॥ २३२ ॥
अधिष्ठूनि मनातें ही सेवितो विषयांस हा ॥
श्रोत्रादि इंद्रियें जैसीं तैसें मन हरी वदे ॥ २३३ ॥
ममैवांश वदे भोक्ता चिदंश सुख दुःख तो ॥

३ भवांबुधि = संसारसागर    ४ प्राकृतग्रंथवादी = मुकुंदराजादि.

बोलती श्रुति ही तैसें कीं चिदंशास चि भोक्तृता ॥ २३४ ॥
चिदंशात्मा रथी त्यातें शरीर रथ होय तो ॥
होय सौरथि[५] तें बुद्धि वागोरे[६] मन होय त्या ॥ २३५ ॥
इंद्रियें अश्व द्विविधें[७] त्यातें विषय गोचर[८] ॥
अहंमनेंद्रिययुक्त भोक्ता मनीषि[९] बोलती ॥ २३६ ॥
ऐसी श्रुति बुद्धि मन इंद्रियगणं[१०] वेगळे ॥
स्वात्मा रथी तो चि भोक्ता मनीषी बोलती असें ॥ २३७ ॥
जडास नाहिं भोक्तृत्व न भोग सर्वगास ही ॥
चिदंशास चि भोक्तृत्व ऐसें मनीषि बोलती ॥ २३८ ॥
असें च भगवान् बोले "प्रकृतेः पुरुषः परः" ॥
पार्थातें कक्षणें त्याचीं स्वयें तीं वेगवेगळीं ॥ २३९ ॥
कर्तेपणें प्रकृती हे हेतु हे कार्यकारणीं ॥
भोक्तृत्वीं सुखदुःखाच्या हेतु हा पुरुष[११] स्वयें ॥ २४० ॥
गुण प्रकृतिचे[१२] भोगी प्रतिबिंबोनि तज्जळीं ॥
नानायोनिनिमित्ता या पुरुषा भोगवासना ॥ २४१ ॥
एवं प्रकृतिभागास भोक्तृत्व नाहिं होतसे ॥
पुरुषास चि भोक्तृत्व भोग्य प्रकृतिजा गुणा ॥ २४२ ॥
गुण प्रकृतिचे भोगी प्रतिबिंबोन तज्जळीं ॥
गुण विलक्षण[१३] ऐसा जो गुण भोक्ता तो चि बोलिजे ॥ २४३ ॥
गुण प्रकृतिचे भोगी प्रतिबिंबोनि तज्जळीं ॥
मनइंद्रियबुद्धिस्थ भोक्ता तेणें चि बोलिला ॥ २४४ ॥
मनादिप्रकृतिभागा यास्तीं भोक्तृत्वता नसे ॥
भोक्ता निर्गुण पुरुष प्रकृती गुण टाकुनी ॥ २४५ ॥
एवं च सर्व ही शास्त्रीं निषेधी भोक्तृता जडा ॥
बहु बोलों काय ज्यास भोक्तृता त्यास मुक्तता ॥ २४६ ॥
जडा भोग जरि तरी मोक्ष केवळ त्यास ची ॥
ज्याला रोगें दुःख प्राप्त आरोग्य त्यास बोलिजे ॥ २४७ ॥
मना भोग मृषा[१४] वार्ता ब्रह्माला भोग तो नसे ॥

---

५ सारथि=रथ हाकणारा. ६ वागोरे=पागा, दोऱ्या. ७ द्विविध=दोन प्रकारचीं (कर्मेंद्रियें, व ज्ञानेंद्रियें). ८ गोचर=गम्य. ९ मनीषि=ज्ञानी. १० गण=समूह. ११ पुरुष=आत्मा. १२ प्रकृति=स्वभाव. १३ गुणविलक्षण= गुणांपासून भिन्न. १४ मृषा=खोटी.

मराठी ग्रंथ संग्रहालय

भोक्ता चिदंश बोले ज्या सत्वांबु[15]ज्ञान भास्करा[16] ॥ २४८ ॥
कित्येक दुःखमिथ्यात्वात् न स्वीकारिति भोक्तृता ॥
भोगितो स्वप्नज मिथ्या मुक्ति दुःखा विना कसी ॥ २४९ ॥
भोग यावत अज्ञान वदे कोण न तें ह्मणे ॥
तावत्पर्यंत जो भोक्ता तो चिदंश चि बोलिजे ॥ २५० ॥
स्वदेहात् जाणुनीं अन्य सर्वत्रीं तें न जाणुनीं ॥
जें सर्व सर्वगत्ब्रह्म जाणिलेंसेंच बोलती ॥ २५१ ॥
असत्यत्वाज्जड जग तें चि जें सचराचर[17] ॥
सत्यज्ञानानंतकत्वें व्यापी त्या ब्रह्म सत्य जें ॥ २५२ ॥
तें व्यापकत्व आचार्या[18] पासूनि आधिं जाणतां ॥
मग अखिल[19] तें ज्ञान होतसे गुरुपासुनि ॥ २५३ ॥
तदां ज्ञान असें बोले तो गुरु शिष्य तो च कीं ॥
वदे हें भगवान् कृष्ण गीतेमध्यें स्थळोस्थळीं ॥ २५४ ॥
चराचरें आपणांत मजसीं ऐक्य देखसी ॥
उपदेशिति तें ज्ञान त्याणें च पूर्ण अन्वय ॥ २५५ ॥
अन्वयें[20] व्यतिरेकें[21] ही जें सर्वत्र चि सर्वग ॥
जाणेच्छा करितें बोले श्रीमद्भागवतीं स्फुट ॥ २५६ ॥
जिज्ञासूनें इतुकें ची जाणावें तत्व आत्मनः ॥
अन्वयें व्यतिरेकें ही तें चि सर्वत्र सर्वदा ॥ २५७ ॥
स्वदेहीं जाणिला आत्मा सर्वत्रात्मा च तो तसा ॥
न हा अनुभवो यावत् तावत्ज्ञान न होय त्या ॥ २५८ ॥
ऐसें असोनि जो देहीं चैतन्यानुभवो घडे ॥
सर्वत्रानुभवाभावें अंशानुभव बोलिजे ॥ २५९ ॥
माझा च प्रतिबिंबांश झाला जीव जगीं जडां ॥
ऐसें जें भगवान् बोले त्याचानुभव तो असा ॥ २६० ॥
जो भोक्ता देहमध्यस्थ बाहेरि अणुवत् हि न ॥
तसा देहीं चिदात्मज्ञ न जाणे ब्रह्मसर्वग ॥ २६१ ॥
चिदंशज्ञ न ब्रह्मज्ञ ब्रह्मज्ञा ब्रह्म सर्वगत् ॥
जाणती सर्व मिथ्यात्वात् जें सर्वगत सर्व तें ॥ २६२ ॥

---

१५ अंबु=उदक. १६ भास्कर=सूर्य. १७ चराचर=स्थावरजंगम. १८ आचार्य=गुरु. १९ अखिल=सर्व. २० अन्वय=संबंध. २१ व्यतिरेक=संबंधाभाव.

जडविलक्षण तें आधीं चैतन्य जाणती जडीं ॥
मग त्याचेच मिथ्यत्वें जडचैतन्य जाणती ॥ २६३ ॥
सर्वी हि ब्रह्म सर्वात्मा तद्विलक्षण जाणती ॥
बोध तो व्यतिरेकाख्य जो आवरणभंगकृत्[22] ॥ २६४ ॥
तो आत्मतत्वबोधास्तो आत्मानंत हि सर्वगत् ॥
सत्यज्ञानानंत तेणें ज्ञानें तें नाहिं आवरण ॥ २६५ ॥
जेव्हां आवरणा विद्या नष्टा जडविलक्षण[23] ॥
आत्मा साक्षात् जो कळला तो सर्वगत नाकळे ॥ २६६ ॥
सर्वव्याप्यें उरे जो त्या अनंत वेद वर्णिति ॥
सत्यज्ञानानंतत्वानें जाणा ब्रह्म इति श्रुति ॥ २६७ ॥
त्रिकाळीं विद्यमानत्वें स्वप्रकाशत्वें सत्य तें ॥
ज्ञान अन्य जडात्यास्तौ राहे व्याप्यें अनंत ची ॥ २६८ ॥
जरि आत्मा स्वदेहीं तो सर्वत्र जाणला नसे ॥
तो आत्मा प्रतिबिंबांश "यथा ह्ययं" इति श्रुती ॥ २६९* ॥
* * * * * ॥ २७० ॥
असा भासे जळीं चंद्र कंपादि जळकृद्गुणें ॥
दिसतो हि तसा आत्मा विकारी बुद्धिच्या गुणें ॥ २७१ ॥
असें भागवतीं उक्त तो बोले भगवान हि ॥
"ममैवांशो जीवलोके जीवभूत" असें स्फुट ॥ २७२ ॥
जो सचिन्मात्रदेहस्थ बाह्य तो अणु ही नसे ॥
जाणतां त्या कसा जाणे अनंत ब्रह्म सर्वगत् ॥ २७३ ॥
यावत् ब्रह्म आत्मतेनें सर्वगत् नाहिं जाणिलें ॥
तावत् नष्ट आवरण ह्मणती तें कसें घडे ॥ २७४ ॥
बोलणें बहु असो आत्मा जेव्हां सर्वत्र जाणिला ॥
तेव्हां आवरणा भंग जाणावें जाहला असें ॥ २७५ ॥
जाणतां तें सर्वगत् अविद्यावरण नाशतें ॥
तें सर्व सर्वगत जें ज्ञानविक्षेपनाशक ॥ २७६ ॥
जेव्हां जाणेल ब्रह्मत्वें विषयां आणि इंद्रियां ॥
विक्षेपाख्य अविद्या जे पूर्वोक्त नाशते तदा ॥ २७७ ॥
संस्काररूपी अविद्या अभ्यासयोगें नाशते ॥

---

२२ आवरण भंगकृत् = आच्छादनाचा नाशकरणारा. २३ जडविलक्षण = जडाहून भिन्न. * २७० वे श्लोकाची टीका आमचे जवळचे पोथीत नाहीं.

बोले अभ्यास द्विविध ब्रह्मविद्या जसी द्विधा ॥ २७८ ॥
शरीरात्मकसंस्कार चिदात्मध्यानयोगेंची ॥
नाशे हळू चिदात्मत्वें होय संस्कार तो दृढ ॥ २७९ ॥
जाणिला तो अनन्यत्वें उपदेशी जसा गुरू ॥
तसा ध्यावा सर्वगत जडादन्यांत वर्जित ॥ २८० ॥
सूर्यप्रकाश अंतातें न पावे दृष्टि गता दुरी ॥
चित्प्रकाशीं मती धांवे पुढें त्या तो तसा असे ॥ २८१ ॥
न पाउनी अंत चिदात्मईशीं तदेकरूपीं च ये प्रकाशीं ॥
एकात्मबोध प्रतितींत बुद्धि सुस्थीर यावत तावत्समाधी ॥ २८२ ॥
प्रबोधिं[24] हें विश्व चि तेथ नाहीं न स्वप्न कल्पीत प्रपंच कांहीं ॥
प्रतीति आत्मस्फुरणात्मिका या न ते सुषुप्ती[25] विमलोक्त[26] तुर्या[27] ॥२८३॥
यास्तो न विक्षेपलयो न जेथ समाधि तैं निर्गुण उक्त तेथ ॥
विक्षेप रूपा जड कल्पनादी लयो सुषुप्ती न तई समाधी ॥ २८४ ॥
त्याचा करावा च अभाव यत्नें अभ्यास वैराग्य बलायतानें ॥
अभ्यास ही शीळ जरी विरक्त न होय कैसेन विक्षिप्त चित्त ॥२८५॥
तथापि संस्कारबळेंन आधीं विक्षेप पावे जरि चित्समाधी ॥
टाकूनि ते चिन्मयता रहावें तें ची उपादान तई पहावें ॥ २८६ ॥
जें चित्र चित्रापटिं भासताहे तो तंतु तैसी जगदात्मता हे ॥
विक्षिप्त तैं ज्या विषयांत चित्त ध्याका चिदात्म्यास चि तेथ तेथ॥२८७॥
प्रत्याहारां[28] ठांइं सर्वां हा प्रत्याहार उत्तम ॥
उपादानस्मृतीं चित्त चिदात्मानिं च राहतें ॥ २८८ ॥
जरि चित्त निराकारीं निरोधीं न भवेत् स्थिर ॥
अन्वयेन चिदाकार पाहेल जग समाहितः ॥ २८९ ॥
निर्विकल्प समाधींत प्राप्त ही सविकल्पक ॥
योगअभ्यास सर्वत्र पहावें ब्रह्म केवळ ॥ २९० ॥
तरंग[29] सलिलाकार[30] तंत्वाकार जसा पट ॥
मृदाकार घट जसा चिदाकार चराचर ॥ २९१ ॥
चिदात्मस्फूर्ति टाकूनी जड जग चि ध्याइल ॥
तरि त्याचा व्यर्थ श्रम सिद्धि ते स्फुरणस्मृती ॥ २९२ ॥

---

२४ प्रबोध = जागेपणा. २५ सुषुप्ति = झोंप. २६ विमळ = स्वच्छ. २७ तुर्या = चवथी (स्थिति) जागृति, सुषुप्ति, व स्वप्न ह्या तिहींचे पलीकडची. २८ प्रत्याहार = विषयां पासून इंद्रियनिवृत्ति. २९ तरंग = लाटा. ३० सलिल = पाणी.

ब्रह्मादिस्तंभपर्यंत पूर्ण आवरणासह ॥
एक ब्रंह्मांड चि जसें असंख्य कोटि ही तसीं ॥ २९३ ॥
जशा समुद्रांबुतरंगमाला तशांडरूपाखिल जीवमाळा ॥
तें स्फुरतें तोयें[31] चि एक मात्र ध्यावें तसें तें स्वचिदेकमात्र ॥२९४॥
चिदात्महेमें[32]स्फुरणात् स्फुरेत नगांड[33] जे कोश चि सर्व तेथ ॥
प्रतीतिते स्वात्महिरण्यबुध्दी होऊनि राहे स्थिर ते समाधी ॥ २९५ ॥
चिदात्मब्रह्म अखिलत्व जैसें देशें हि काळें हि करूनि तैसें ॥
पहावें सर्वत्र चि कीं तयानें लवो निमीषें स्फुरेत ज्याणें ॥ २९६ ॥
द्रष्टा जगीं या घटिकाख्ययंत्रा कोण्ही जळीं क्षिप्त हि मग्न तत्रा ॥
निरीक्षि बाह्यांतरिं आत्मतेनें जाणीतला काळ तसा तयानें ॥२९७॥

जसीं यंत्रउपादानकार्यै त्याचीं तदैक्य ची ॥
भासताति तसा भासे आत्मा तत्कार्य काळ जो ॥
काळजो द्विपरार्धांत[34] तत्स्फूर्ति आत्मते जरी
स्वप्रकाशें ससत्यत्वें चित्स्फूर्त्या काळतो तरी[35] ॥ २९८ ॥
किरीटकटकादीकां[36] स्वतां स्फूर्ति घडे जरी ॥
सत्यत्वबोल उचित त्यांतें च स्वप्रकाशतः ॥ २९९ ॥
किरीटकटकादीकां कनकें स्फूर्ति होतसे ॥
हेमप्रकाश्य जें कार्य असत्य हेम सत्य चि ॥ ३०० ॥
सत्यें चि सत्य भासे जें नसे तें सत्य ची असे ॥
अळंकार हिरण्यैक्य काळात्मऐक्य ची तसें ॥ ३०१ ॥
त्रुट्यादिकाळावयव स्वयें न स्फुरती च ते ॥
असत्यास्तव ब्रह्में ची स्फुरती ब्रह्म ते असे ॥ ३०२ ॥
एवं स्वयं ब्रह्म तयाचे जे ची लवादि सर्वे अवयेव तो ची ॥
योगी स्वयें काळ चि काळ त्यास न देशकाळपृथगात्मतेस ॥ ३०३ ॥
तस्मात् आलिंगूनि जगत्प्रकाशा कालप्रकाशा निजचित्प्रकाशा ॥
ते देशकालखलुतत्प्रकाशात् ध्यावें तया तें अखिलात्मभावात् ॥३०४॥

---

३१ तोय = पाणी. ३२ हेम = सोनें. ३३ नग = दागिने. ३४ परा = ब्रह्मदेवाचें शतवर्षात्मक आयुष्य. त्याचें अर्ध्द = परार्ध्द. म्हणून दोन परार्ध्द = ब्रह्मदेवाचें सर्व आयुष्य. एवं तु ब्रह्मणो वर्षमेवं वर्षशतं च तत् । शतं हि तस्य वर्षाणां परमायुर्महात्मनः ॥ २४ ॥ एकमस्य व्यतीतं तु परार्ध्दं ब्रह्मणोऽनघ । तस्यान्ते ऽभून्महाकल्पः पाद्म इत्यभिविश्रुतः ॥२५॥ विष्णुपुराण अंश १ अध्याय २. ३५ मूळ २९८ वे श्लोकावरील टीकेचे मराठींत दोन श्लोक केले आहेत म्हणून दोहोंचे अखेरीस एकच अंक घातला आहे. ३६ कटक = कडें

टाकूनि स्थूलेंद्रियकर्तृतेतें जें चित्य विश्वास[37] मनें तयातें ॥
ध्यावें चिदैक्यें च चिदात्मदृष्टी मुनींद्र बोले सविकल्प गोष्टी ॥२०५॥
जगच्चिदैक्या व्यवहारकाळीं चाली हि बोलीं पहाण्यादिवेळीं ॥
प्रतीतिगम्य[38] जरि तें उदंड[39] समाधि बोले मुनि तो अखंड॥२०६॥
तो चि पक्वज्ञानी अनुभवि जिवन्मुक्त चि सदा ॥
जडं चित्तंतू च जडजगपटीं देखत तदा ॥
जनाव्यापारीं ही सकळ चिदुपादान चि जया ॥
जगा योगी भोगी अनुभवि च सर्वात्मकतया ॥ २०७ ॥
स्वचिदब्धी च बुद्बुद[40] विषय: इंद्रियें जीं सुखसिंधुसमूह ॥
वाहतो असें संयमी यमीशीं[41] यम निश्चयें राजयोगियांस ॥ २०८ ॥
चित्तंतुदृष्टी जगदंबरातें[42] पाहे यमोदग्मि[43] च शब्द त्यातें ॥
चित्सिंधुजींत[44] बुद्बुद होति नाशे तो वाग्मि[45] ऐसा यम बोलिलासे ॥२०९॥
चिदंबुपांना[46] तृषित त्वरेतें जडा तरंगांसह[47] ऊदकातें ॥
पाहे न ते ऊर्मि[48] प्रतीत त्यास तसा जडत्याग स्वयें च त्यास॥२१०॥
चिद्दर्शनाचा अभिलाष वाहे विश्वास ही त्या जडरूप पाहे ॥
विश्वात्मयोगी न जडत्व पाहे त्यागी असा त्याग न जाणताहे ॥२११॥
नि:शब्द आत्मा च अशेष शब्दीं स्मरेत बोले तरि नित्य मौनी ॥
बुद्बुद होतां च हि नाशतां ते ही न जाय नानाशत चित्समुद्र ही ॥२१२॥
न आद्यंती ब्रह्मीं जग वदतसे वेद चि असें
न मध्यें ही हेमीं मुकुटकटकादीक चि जसें ॥
पहातां ये रीती असुनि जनवृंदीं[49] हि विजनीं[50]
वसे योगी ऐसें नसोते गिरिगुह्यीं न विजनीं ॥ २१३ ॥
जडा काननीं पर्वताचे दरीतें वसोनी त्वदीं पाहतोसी जनातें ॥
असोनी असा राजयोगी जनीं हे जना निर्जन ब्रह्मभावें च पाहे ॥२१४॥
समान सर्व देह तसि जगदुपादानसमता ॥
सदां जो पाहे त्या जगिं घडतसे अंगसमता ॥
अतर्क्यें ज्या साम्यें करुनि च हि होतो समतनू ॥
जनत्यागें खुंटासम तरि नव्हे तो समतनू ॥ २१५ ॥

---

३७ विश्वास=जगतास. ३८ प्रतीत=अनुभव. ३९ उदंड=पुष्कळ. ४० बुद्बुद=बुडबुडा. ४१ यमीश=योगिश्रेष्ठ. ४२ अंबर=वस्त्र. ४३ दग्मी=दृष्टीतें आंवरणारा. ४४ सिंधु=नदी. ४५ वाग्मी=वाणीतें आंवरणारा. ४६ अंबु=पाणी. ४७ तरंग=लाटा. ४८ ऊर्मि=लाट. ४९ वृंद=समूह. ५० विजन=एकांत.

असिद्धा जगीं दीसतें ब्रह्म सिद्ध सतां नित्य सिद्धासनातें प्रसिद्ध ॥
जरी देह फीरे स्वकर्मानुरूपें उरे आसनीं राजयोगी प्रतापें ॥ ३१६ ॥
बाहेर वृत्ती निघताति लोकीं त्या प्रत्यगात्मा अखिलात्मनीं कीं ॥
सच्चिन्मयी शीघ्र करी तयांतें तो राजयोगी वद पूरकातें[५१] ॥ ३१७ ॥
जों स्थीर वृत्ती च निषेधशेषीं तों तो तरी कुंभक आत्मनीशीं ॥
जगीं उपादानपणें पाहाया वृत्ती हळू सोडित रेचकें[५१] या ॥ ३१८ ॥

स्वयें ध्याता ध्येयो घडत तदअन्ये नमनसा ॥
स्मृती तद्ध्यानाची सतत इतर ध्यान हि कशा ॥
कचित् ते विस्मृती स्मरत जडता तेथ चि तया ॥
तयीं मी प्रत्याहार घडत खलु योगीक्षितिपें[५२] त्या॥ ३१९ ॥

कटकीं जसि हेमधारणा तसि मनिं जगीं स्वधारणा ॥
होय जरि निरंतर स्थिर राजयोगि तो बोलियला तर ॥ ३२० ॥
चराचरीं या लहरीं[५३] चिदब्धी अखंड पाहे तरि तो समाधी ॥
कालात्मनें वंचितें[५४] कालमृत्यु चित्पृथ्वि चित्पार्थिव पाहे उक्त ॥ ३२१॥

मृषा[५५] बाळें बाळा रचुनि म्हणती मी सुतवती[५६] ॥
जडें अंगें अज्ञ जन तसे यमादिक[५७] करिती ॥
तया बोले योगी तरि हि पडतो मृत्युवदनीं ॥
जगीं नाना द्रष्टे श्रुति वदाति तो मृत्यु सदनीं ॥ ३२२ ॥

जड चि तो यम तैं जड इंद्रियें नरि हि सेवि न त्यां विषयां स्वयें ॥
करितसे च जडा नियमादि तो अमर होय कसा जड दृग्चितो ॥ ३२३

जड प्राणायाम जड विजनवासो जड तनू[५८] ॥
करूनी खुंटासा बसवित जडा आसनिं तनू ॥
अहो कैसा योगी श्रुति वदति मृत्यूवरि च जो ॥
*    *    *    *    *    ॥ ३२४ ॥

योगांग जें मात्र चिदात्ममात्र नानात्व मात्र चि खपुष्पमात्र[५९] ॥
तो राजयोगी गुरुदेवभक्त तो मृत्युचा मृत्यु जितांच मुक्त ॥ ३२५ ॥
श्री सच्चिदानंद गुरू मुकुंद मल्याद्रिदेशीं प्रकटे स्वछंद ॥

---

५१ पूरक, रेचक, कुंभक हे योग शास्त्रप्रसिद्ध वायुनिरोधाचे तीन प्रकार आहेत. पूरक याचा भावार्थ "भरणारा" व रेचक याचा "रिकामा करणारा" असा होतो. ५२ क्षितिप = राजा. ५३ लहर = लाट. ५४ वंचित = फसविलेला. ५५ मृषा = खोटा. ५६ सुतवती = लेंकुरवाळी. ५७ यम = वायूनिरोध. ५८ तनू = शरीर. ५९ खपुष्प = आकाशपुष्प (ज्याला) अस्तित्व नाहीं अशी गोष्ट).

त्याचे कृपेनें लवलेशलब्ध अनूभुतिलेशटिका प्रसिद्ध ॥ ३२६ ॥
त्रिविक्रमत्व खलु वामनातें विश्वात्मतें कृष्णकृपेन ज्यातें ॥
त्यासिंअनूभूतितरंग तेथ लेशानुभूति प्रकटे तो येथ ॥ ३२७ ॥
इति श्रीसच्चिदानंद मुकुंदचरणांबुजीं ॥
लब्धचिन्मकरंदातें वर्णी वामन ग्रंथिं या ॥ १२८ ॥

## उपसंहार.

अर्थानुभव हा घेतां मन मोह न त्यागतां ॥
मुरतें स्वसुखानंदीं सर्व ही तो चि पाहु तें ॥ ३२९ ॥
यास्तौ अनूभूतिलेश नामें संपूर्ण ग्रंथ हा ॥
करूनि अर्पिला पायीं शेषशायी हरीचिया ॥ ३३० ॥
समश्लोकी असी टीका तो श्रीवत्सांक स्फूरवी ॥
तसी करूनि ते अर्पी त्याच श्रीपदपंकजीं ॥ ३३१ ॥
सत्यज्ञानानंत आत्मा असे ब्रह्म चि निश्चयें ॥
सत् अज्ञान अल्पत्व निषधानें च जाणतो ॥ ३३२ ॥
आत्मा सत्य असत् देह अनित्यं[60] तद्विलक्षण[61] ॥
आत्मा देह नव्हे तेव्हां असे अन्य तयाहुनी ॥ ३३३ ॥
देहात्मता निषेधें या पंच भूतें समातृक ॥
जातां तमोगुणायुक्त अन्नमय निषेध हा ॥ ३३४ ॥
आत्मा ज्ञान असे प्राण अज्ञान तद्विलक्षण ॥
तेव्हां आत्मा नव्हे प्राण असे अन्य तयाहुनी ॥ ३३५ ॥
प्राणात्मता निषेधानें इंद्रियें[62] द्विप्रकार ही ॥
जातां रजोगुणासह निषेध प्राणकोश हा ॥ ३३६ ॥
आत्मा अनंत चि मन अल्पत्वें तद्विलक्षण ॥
आत्मा तेव्हां मन नव्हे असे अन्य तयाहुनी ॥ ३३७ ॥
मनात्मता निषेधानें चित्तबुद्धि अहंमन ॥
जातां सत्वगुणा युक्त मनोमयनिषेध तो ॥ ३३८ ॥
कोशत्रय[63] निषेधें या आत्मता नाहिं जाणतां ॥
दावी गुरु नखशिखे साक्षित्वीं मग त्या हि तीं ॥ ३३९ ।

---

६० अनित्य=चिरकाळ न राहणारा. ६१ तद्विलक्षण=त्याहून भिन्न. ६२ द्विप्रकार इंद्रियें=पंच कर्मेंद्रियें व पंच ज्ञानेंद्रियें. ६३ कोशत्रय=अन्नमय कोश, प्राणमय कोश. मनोमय कोश. कोश=कोसळा, आवरण.

देहीं ब्रह्मांडि ही तैसा जो देहद्वयातीत[६४] त्या ॥
दिसे जेणें अहंराहू चंद्र आत्मा तयास ची ॥ ३४० ॥
एवं कोशत्रयातीत आत्मा चंद्र तया मनें ॥
अहंकृत्शाखे परता पाहती सत्वदृष्टिनें ॥ ३४१ ॥
प्रळयीं जें उरे शेष निषेधशेष ही तसें ॥
आदि अंतीं एक चि जें मध्यें ही तें असे च कीं ॥ ३४२ ।
ब्रह्मांडीं प्रत्यकत्वें जे आत्मता कळतां च ते ॥
ब्रह्मांड उत्पत्तिलय आत्मत्वीं मग जाणती ॥ ३४३ ॥
सृष्टी प्रळयज्ञानानें कीं आत्मा सत्यकारण ॥
त्यास्तौ भासे जगजळ न तें सत्य असत्य ची ॥ ३४४ ॥
देह द्रष्टा भिन्न स्थूळ सूक्ष्म देह चराचरा ॥
साक्षित्वें जाणता सर्व वास सर्वत्र यास्तव ॥ ३४५ ॥
कोशत्रय जडोपाधी-निषेधें आत्मासिद्धता ॥
झाली मनोमया कोशीं शुद्धी ते त्वंपदात्मक ॥ ३४६ ॥
न मोडे परि संस्कार अविद्येचे अनादि ते ॥
मोडती ते हि विद्येनें जाणतां तत्पदात्मक ॥ ३४७ ॥
जीवात्मता त्वंपदें[६५] ची तत्पदें परमात्मता ॥
विद्याऽविद्योपाधित्यागें ब्रह्म असें असी[६५] पद ॥ ३४८ ॥
जो आकाश घटमठीं महदाकाश तो असे ॥
आत्मा तसा स्वप्रकाश जाणती दोहिं ठांयिं त्या ॥ ३४९ ॥
जो जेथें देखिला होता तेथें आतां दिसे च तो ॥
ते देशकाळ टाकितां असे पुरुष एक ची ॥ ३५० ॥
उभयोपाधिनीराशें ब्रह्मानुभव होतसे ॥
परि विद्या शुद्धसत्व ब्रह्मानुभव हा तिणें ॥ ३५१ ॥
अविद्या उपाधि जसा घट देह तसा मठ ॥
विद्योपाधि ही ब्रह्मांड निराशें ब्रह्म जें महत् ॥ ३५२ ॥
देहीं ब्रह्मांडि त्या बाह्य असे एक चि ब्रह्म तें ॥
तो चि कूटस्थ जो देहीं अभोक्ता बिंब आत्मता ॥ ३५३ ॥
कूटस्था पासुनी होंते वृत्ति सत्वजळीं च त्या ॥
तें चि कूटस्थ चैतन्य प्रतिबिंबें तयास ची ॥ ३५४ ॥

---

६४ देहद्वयातीत=स्थूळ व सूक्ष्म या दोहों प्रकारच्या देहांहून भिन्न. ६५ "तत् त्वमसि" या महावाक्याचें विवरण पंडित करीत आहेत.

जीवात्मा प्रतिबिंबात्मा भोक्ता हा वदती श्रुती ॥
वृत्तियोगें चेतउनी इंद्रियां विषयां[६६] भुतां[६७] ॥ ३५५ ॥
एवं सर्व हि तें एक अनात्म तद्विलक्षण ॥
वसे आत्मा वृत्ति ज्यांत साक्षित्वातीत देहिं जो ॥ ३५६ ॥
कूटस्थ वदती त्यातें ब्रह्मांडीं हि मठस्थ तो ॥
महत् जो त्या हि बाहेरी असे येक चि ब्रह्म तें ॥ ३५७ ॥
तत्त्वमस्यर्थश्रवणें अविद्याग्रंथि सूटतां ॥
प्रकटे ब्रह्मविद्या जों समाधि निर्विकल्प तो ॥ ३५८ ॥
होतां ब्रह्माकार चित्त ते ब्रह्म जग पाहती ॥
सर्व खलु इदं ब्रह्म अभिप्रायें श्रुतीचिया ॥ ३५९ ॥
निराकार चि हें सर्व निश्चयें वाटतें परी ॥
होतां आंगीं विकारित्व जाणती त्या गुरूक्तिनें ॥ ३६० ॥
ठसतां निश्चयो चित्ता देह ब्रह्मांडपासुनी ॥
जें जें आठवतें तें तें निराकार चि जाणता ॥ ३६१ ।
कीं जें भासे जग जळ असे आत्मा च कीरण ॥
सत्यें भासे जें असत्य नसे तें सत्य ची असे ॥ ३६२ ॥
विना चैतन्य हें विश्व न भासे जड कांहिं च ॥
चित्स्फूर्तिनें जड स्फुरे ब्रह्माद्वैत अखंड तें ॥ ३६३ ॥
दोर ची सर्प तंतू च पट माती च तो घट ॥
समुद्र लहरी हेम अळंकार असे परी ॥ ३६४ ॥
आत्मा च आपला ब्रह्म तो सर्वात्मपणें असे ॥
जाणती सर्व भूतांतें आत्मत्वें च करूनियां ॥ ३६५ ॥
बळें ब्रह्म चित्प्रकाश प्रपंच पाहतां दिसे ॥
ये हातास हि तें ब्रह्म घटमाती बळें जसी ॥ ३६६ ॥
माती हेमीं नग घट शुक्तीं[६८] रंजत[६९] शब्दची ॥
दोरीं सर्प नाम जसें ब्रह्मीं जीवत्व ही तसें ॥ ३६७ ॥
मन प्राण इंद्रियें ही सत्क्रिय ब्रह्म सर्व तें ॥
सात्वीक धारणें पाहे स्फुरे नग चि हेम तें ॥ ३६८ ॥
नामें रूपें क्रिया सर्व ब्रह्म ची धरिती स्वयें ॥
नगशाश्वत जसें हेम जगशाश्वत ब्रह्म ची ॥ ३६९ ॥

---

६६ विषय = रूप, रस, गंध, शब्द, स्पर्श. ६७ भूतें = पृथ्वी, आप्. तेज, वायु, आकाश हीं पंच महा भूतें. ६८ शुक्ति = शिंपला. ६९ रजत = रुपें.

कारणीं कार्य पाहातां जड दृष्टीस तें नसे ॥
चित्स्वरूपीं जड वसे हेमीं नग असे परी ॥ ३७० ॥
येतां अनुभवा सर्व निराकार चि ब्रह्म तें ॥
परि आकार जो दृश्य न राहे काळशक्तिनें ॥ ३७१ ॥
आकार वाटत मना कल्पने च करूनियां ॥
कल्पना विषयेंद्रीयें जाणती ब्रह्मदृष्टिनें ॥ ३७२ ॥
व्याप्य व्यापक आत्मा च वदताति असें श्रुती ॥
ऐसें समजतां तत्त्व जडभेदा नुरे उरी ॥ ३७३ ॥
प्रियत्वें ज्या प्रीति होय पुत्र वित्ता दिकीं पुरी ॥
तुटे काळें स्वप्रियत्व असे दुःख हि भोगितां ॥ ३७४ ॥
हेम सर्व अळंकारीं ब्रह्म तैसें चराचरीं ॥
दृष्टी हेमावरी आधीं भूषणें मग दीसती ॥ ३७५ ॥
हे श्रीगुरुकृपाउक्ती जोंवरि मनिं स्थीरता ॥
सर्व ब्रह्म ठसावे तैं समाधीस विशेष तो ॥
प्रिय आत्मा दुःख देह दृढ निश्चय जो असा ॥
चित्तच स्वरुपाकार समाधिस्थिति ते असे ॥ ३७७ ॥
विज्ञानमय हा कोश जेथ ब्रह्म चि अद्वय ॥
वैराग्यें आणि अभ्यासें सिद्ध आनंदकोश तो ॥
जागृती[७०] स्वप्न सुषुप्ती[७१] या अवस्थात्रयतीत जे ॥
तुर्या[७२] एकपणें पाहे तेव्हां अनुभवी असे ॥ ३७९ ॥
समुद्रीं लहरी जैसी आत्मत्वीं वृत्ति ही तसी ॥
लहरी च जळ जसें वृत्ती च ब्रह्म तें तसें ॥ ३८० ॥
लहरीवृत्ति जे धांवे चित्समुद्रीं न त्या फुडां ॥
सिद्ध असे ब्रह्मजळ वृत्ती लहरि रूपि यां ॥ ३८१ ॥
आकार जो कल्पि मन तो निराकार बुद्धिस ॥
विश्व जें इंद्रियां भासे बुद्धीस ब्रह्म तें असे ॥ ३८२ ॥
जेथें लक्षी शुद्ध सत्व ब्रह्म ची अन्य नाठवे ॥
जेव्हां वृत्ती शून्यचित्त उन्मनी स्थिति ते मग ॥ ३८३ ॥
लय आणिक विक्षेप विघ्न जें कल्पनात्मक ॥
युक्ता[३]हारविहारानें लय-निद्रा न बाधते ॥ ३८४ ॥

---

७० जागृती = जागेपणा. ७१ सुषुप्ति = निद्रा. ७२ तुर्या = चवथी (अवस्था).
३ युक्त = बेताचा.

मोडे तत्त्वस्मृतीनें तो विक्षेप सह कल्पना ॥
तेव्हां आनंद हा कोश सिद्ध होय न त्या विण ॥ ३८५ ॥
ध्येयें[७४] ध्याता नसे अन्य शुद्ध चैतन्य ची असे ॥
अनंतसुख अपार आनंदमय कोश तें ॥ ३८६ ॥
नाठवे अन्य कांहीं च एक आत्म खुणे विना ॥
आठवे जें जें जितुकें आत्मा आपण तीतुकें ॥ ३८७ ॥
आत्म प्रतीतिमात्र ची ना ते स्मृति न विस्मृती ॥
आनंदाचा अनुभव कोश आनंद यास्तव ॥ ३८८ ॥
अनंतानंत ब्रह्मांडीं अळंकारीं सुवर्णवत् ॥
आपण चि निराकार आनंदान्भव वैभव ॥ ३८९ ॥
तें च हें सगुण ब्रह्म ह्मणूनि श्रुति वर्णित ॥
"पुरुष एवेदं सर्वं" पुरुष जाण सर्व ही ॥ ३९० ॥
पुरुष[७५] ह्मणतां येते प्रकृती[७६] तीस घेउनी ॥
व्यापी आपण चि जग सगुण ब्रह्म तें असे ॥ ३९१ ॥
अव्यक्त तत्त्व प्रकृती ब्रह्मानुभूति ब्रह्म जें ॥
अन्भवात्मक त्यातें चि सगुण ब्रह्म बोलिजे ॥ ३९२ ॥
व्यापिलें जग ब्रह्मानें रज्जूनें सर्प ज्या परी ॥
असे तें जग ब्रह्मींच सर्व रज्जूमधें जसा ॥ ३९३ ॥
न तें ब्रह्म जगामाजी न रज्जू सर्पि त्या परी ॥
जग ब्रह्मीं नसे तें ही जसा सर्प न रज्जुंत ॥ ३९४ ॥
एवं चारी प्रकारें ही जग नाहीं च जें असे ॥
ब्रह्म तें सगुण ब्रह्म असावें जाणुनी तया ॥ ३९५ ॥
आकार जो दिसे तो ची योग ऐश्वर्य ची असे ॥
योग तो युक्तिचातुर्य सामर्थ्य ऐश्वर चि तें ॥ ३९६ ॥
आहे वस्तु परब्रह्म नाहीं तें जग दाखवी ॥
युक्तिचातुर्य तें ऐसें कीं सामर्थ्य चि तें तसें ॥ ३९७ ॥
ज्याचें सामर्थ्य ऐश्वर्य असें कीं तो चि तें स्वयें ॥
भगवंताय त्या विश्वा-काराय चि नमो नमः ॥ ३९८ ॥
हा अघटीत घटना-योग-ऐश्वर्य गूण जो ॥
सिद्ध यांत असे ब्रह्म नाहीं तें जग दाखवी ॥ ३९९ ॥

---

७४ ध्येय = ध्यानाचा विषय. ७५ पुरुष = आत्मा. ७६ प्रकृति = स्वभाव.

दिसोनि जग तें नाहीं ऐश्वर्यीं ज्ञान प्राप्त जें ॥
ज्ञानीं त्या सिद्ध स्वरूप त्रिगुणातीत निर्गुण ॥ ४०० ॥
जाणे चिच्छक्ति त्या ज्ञानीं सत् स्वरूप असत् जग ॥
परीकल्पे जग ही ते कल्पना सह तें जग ॥ ४०१ ॥
मिथ्या स्थाणुत्विं पुरुष जाणे ज्ञान गुणें च त्या ॥
तेव्हां जग चि तें ज्ञान वैराग्य सिद्ध त्यांत ची ॥ ४०२ ॥
प्रिय सत्य स्वरूप ची असत्य जगिं अप्रिति ॥
श्रुतिज्ञ जो तया मिथ्या रजतीं अप्रिती जसी ॥ ४०३ ॥
वैराग्यगुण हा त्यांत तुझा धर्म फळद्रुप ॥
भवबंधन त्या धर्मीं मिथ्याच जग जाणतां ॥ ४०४ ॥
धर्में सत्कर्म समता कर्माचें फळ देउनी ॥
सदयें तरुणोपायें सन्मार्गीं जीव तारिले ॥ ४०५ ॥
धर्में अशा कल्पिलें तें जग कर्म तुझें असे ॥
तें ब्रह्म तूं दयायुक्त सगूण समनॉथँ ही ॥ ४०६ ॥
शुद्ध सत्त्व तुझा धर्म नाहीं तो तुज वांचुनी ॥
जसें न कनका बाह्य कटकत्व असे परी ॥ ४०७ ॥
धर्म गुणीं सिद्ध यश अपेश ज्यांत तें नसे ॥
यशें त्या तारिलें विश्व अवतारादि निश्चयें ॥
हें पवित्र यश तुझें ते श्री माया असेच कीं ॥
जग मायामयी यांत असे सत्य स्वरूपची ॥ ४०९ ॥
एवं ऐश्वर्य वैराग्य ज्ञान धर्म यश श्रि ही ॥
षड्वीध गुण जे त्यांतें भग नाम चि बोलती ॥ ४१० ॥
भग तें चि जग असे आत्मा तोच ह्मणूनियां ॥
भगनाम जगीं वंत आत्माच भगवंत तो ॥ ४११ ॥
तो आत्मवंत सुवर्णे भगनाम जगीं नगीं ॥
ह्मणुनी तो वासुदेव भगवंत हि तो असे ॥ ४१२ ॥
भगवंत वासुदेव देहीं ब्रह्मांडनांतिं ही ॥
जाणती कल्पिती त्यातें नमिती च पुनः पुनः ॥ ४१३ ॥
दिसे निर्गूण बुद्धीतें इंद्रियां जग सँगुण ॥
पाहे प्रत्यक्ष निर्गूण भगवान् हरि तो स्वयें ॥ ४१४ ॥

---

७७ सम=सह (सत्रा साकं समं सह इति कोशः) ७८ षड्गुण=ऐश्वर्य, वैराग्य, ज्ञान, धर्म, यश, श्री हे साहा गुण. (श्लोक ४१० त सांगितलेले).

जगीं षड्गुण पाहे जों मनीं आवेश होय तो ॥
निर्जी निर्गुण षड्गुणीं पाहे विश्व हरी च तो ॥ ४१५ ॥
रीती अनुभवाची हे सर्व भूतीं च षड्गुण ॥
आत्मा भक्त अनुभवी त्या सर्वी भगवंत तो ॥ ३१६ ॥
त्रिगुणातीत निर्गुण षड्गुण सगुण चि जो ॥
सेव्य-सेवक-भावें ही ज्यां ध्यानीं वासुदेव ची ॥ ४१७ ॥
वसे सुवर्ण चि नगीं भगवंत तसा भगीं ॥
भगशब्दें जग चि त्या ह्मणुनी वासुदेव तो ॥ ४१८ ॥
इंद्रियां जो जगद्भास पहाती जगदीश्वर ॥
गुरुक्ती करुनी ज्ञान होतां जें आठवूनि तें ॥ ४१९ ॥
वासुदेवाय भगवते नमो प्रणवयुक्त ची ॥
जपती ते ब्रह्मभूत पदवी पावती स्वयें ॥ ४२० ॥
सर्वभूतीं ब्रह्मदृष्टी भगवंत चि पाहती ॥
प्रसन्न वर्तति सदां शोककांक्षादिवर्जित ॥ ५२१ ॥
सर्वभूतीं न त्यां द्वेष सृष्टी ज्यां भगवद्रुप ॥
दिसे जें तें लहरी त्या पाहे अमृत सिंधु ची ॥ ४२२ ॥
मुमुक्षां तारि मित्रत्वें दया भूतीं असी च कीं ॥
प्रतिबिंबरुपें भोक्ता सर्वत्र वासुदेव ज्यां ॥ ४२३ ॥
न त्यां अहंकृति परि स्फुरे प्रारब्ध भोगितां ॥
कर्मशक्ती जाणुनी तें पाहे दुःखें सुखीं सम ॥ ४२४ ॥
भगवद्भाव सर्वत्र क्षेत्रज्ञ जगदीश्वर ॥
पाहे करी सुखी नेदी दुःखें भलतयां हि तो ॥ ४२५ ॥
सर्व भूतीं स्वात्म खूण क्षमापरा पराधित्या ॥
न दाखवी वक्रभाव कायवाचामनें हि जो ॥ ४२६ ॥
द्वादशाक्षरमंत्राच्या जपादिंहि जपांति च ॥
अर्चिती त्या यथाउक्त उपचारकल्पनात्मकें ॥ ४२७ ॥

---

७९ त्रिगुणातीत=सत्व, रज, तम यांनीं विरहित. ८० प्रणव=ओंकार. ८१ कांक्षा=इच्छा. ८२ मुमुक्षां=मोक्षेच्छूंस. ८३ अहंकृति=अहंकार, मीपण. ८४ प्रारब्ध=आरंभिलेलें. ८५ क्षेत्रज्ञ=इदं शरीरं कौंतय क्षेत्रमित्यभिधीयते ॥ एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ १ ॥ भगवद्गीता. ८६ द्वादशाक्षर मंत्र="ओं नमो भगवते वासुदेवाय" हा मंत्र.

स्वकर्माधिक कर्मे जीं कृष्णपदीं च अर्पिती ॥
सर्वात्मभाव नमिती अनंतत्व स्मरोनियां ॥ ४२८ ॥
अर्पिती नव ही भक्ती तशा च सकळ क्रिया ॥
क्रियमाणातीत ऐसे निरहंकृति वर्तती ॥ ४२९ ॥
संचीत दग्ध ज्ञानाग्नी करूनि जाहलें परी ॥
राहे प्रारब्ध जें त्यातें भोगें करूनि सारिती ॥ ४३० ॥
प्रारब्ध भोगितां ही ते विरक्त प्रेमयुक्त ची ॥
गोविंद अच्युत मुखीं अमृतवृष्टिसर्वदा ॥ ४३१ ॥
अनंत हरि मुकुंद रामकृष्णादि नाम जें ॥
येतां मुखीं बुद्धि अर्थी रूपाभिभव ज्या मनीं ॥ ४३२॥
भगवंतीं प्राण चित्त बोधिती त्या परस्परें ॥
कथिती त्या तोषती ही रमती नित्य त्यांत ची ॥ ४३३ ॥
अनंत वदतां पाहे व्यापुनी उरला जगा ॥
अच्युत वदतां देखे नाशरहित शाश्वत ॥ ४३४ ॥
त्रिभंगी मांडिती ठाण अधरीं वेणु दाविती ॥
क्रीडती नाचती गाती ते अभिनव दाउनी ॥ ४३५ ॥
येतां मुखीं वासुदेव पाहे विश्वरुपें तया ॥
भगवान्वदतां तो चि प्रत्यक्ष भगवद्रुप ॥ ४३६ ॥
जगातें भगवद्रूपें भजताति जगीं च त्या ॥
चिदात्मा देखती तो ची वासुदेव ची सर्व हें ॥ ४३७ ॥
सुखदु:खें तुष्टकष्ट नसे आनंद चि असे ॥
जो विश्व भरुनी राहे आनंदकंद बोलतां ॥४३८ ॥
पंचभूतें ज्योतिरूपें प्राणि वृक्ष दिशा नग ॥
शरीर हरिचें विश्व आत्मत्वें वदती तया ॥ ४३९ ॥
अवतारादि हि जग मनें आकार कल्पुनीं ॥
बुद्धिनें तें अनुभवी कीं चैतन्य चि तें असे ॥ ४४० ॥
सुख अनंत चि जया संतुष्ट सर्वदा हि तो ॥
लाभ ज्या स्वरुपीं चित्त भगवद्भक्तियुक्त चि ॥ ४४१ ॥
लाभ जो भक्ति-सुखाचा कृपा सर्वेश्वरा चि ते ॥
आठवी निरहंकारें वर्ते प्रारब्ध भोगुनी ॥ ४४२ ॥
गुरु ईश्वर जो त्याचे सेवे भक्तींत सर्वदा ॥

---

८७ कंद=कांदा.

ध्यानीं च मूर्ति पूजूनी अर्पी सर्व हि ध्यानिं त्या ॥ ४४३ ॥
प्रार्थूनी त्या वासुदेवा मागतांति पुनः पुनः ॥
भगवद्भाव सर्वां ही भूतीं द्यावा ह्मणूनियां ॥ ४४४ ॥
सर्वांत तुझे चरण थोर होय असें करीं ॥
आत्मत्वें चरणीं तूझ्या अखंड प्रीति दे हरी ॥ ४४५ ॥
सनक नारद शुक भक्तांची गति दे तसी ॥
दे समागम संतांचा अंतीं स्मृति तुझी च जे ॥ ४४६ ॥
उरी ज्ञानाचि जे कांहीं बुद्धितें दिसते तिही ॥
होतां भक्ति असी येतें ज्ञान पूर्ण अनूभवा ॥ ४४७ ॥
निर्दिध्यासें च करुनी आत्मत्वीं स्थैर्य पावतो ॥
नित्याभ्यासें च करुनी बुद्धीसी सच्चिदात्मता ॥ ४४८ ॥
आत्मा सत्य असें ज्ञान त्या सत्यत्वीं च तेवढें ॥
आनंद तेथ तैसाची सच्चिदानंद तो असा ॥ ४४९ ॥
सत्पदें जो असे आत्मा चित्पदें तो चि दीसतो ॥
आहे आनंद आत्माच सच्चिदानंद तो असा ॥ ४५० ॥
कालत्रयीं असे तें ची सत्य जें नित्य जाणणें ॥
असत्य आणि अनित्य नसे त्या वेगळें च कीं ॥ ४५१ ॥
आत्मरज्जू असे सत्य असत्य जग सर्पतो ॥
जगसर्प न तो मिथ्या असे आत्मा च दोर तो ॥ ४५२ ॥
ह्मणा सर्प तरी रज्जू स्वभावें असतो तसा ॥
चराचर नाम मात्र आहे ब्रह्मचि सर्व ही ॥ ४५३ ॥
चराचरदेह सह नाम आकार मात्र ची ॥
आकारीं त्या निर्विकार आहे येक चि ब्रह्म तें ॥ ४५४ ॥
नेत्रां दिसे जळ चि तें बुद्धीस मात्र कीरण ॥
इंद्रियां विश्व भासे तैं बुद्धीस ब्रह्म वाटतें ॥ ४५५ ॥
एवं प्राप्ति निराकार-स्वरुपाची च सर्वदा ॥
साक्षित्वातीत प्रथम निराकार चि तें असे ॥ ४५६ ॥
घट-मठ-उपाधीच्या निषेधें जें "असी"पद ॥
व्यतिरेकमहावाक्यें निराकार चि ब्रह्म तें ॥ ४५७ ॥

---

८८ निदिध्यास = निजध्यास (मराठी) = अतिशय ध्यान करणें, मनांत सतत घोळणें. ८९ विकार = बदल (नाम).

तंतू पट माती घट दृष्टांतें विश्व ब्रह्म ची ॥
तें अन्वय महावाक्यें निराकार चि बाणतें ॥ ४५८ ॥
षड्गुणीं हि निराकार हेमवत् नगिं पाहणें ॥
सत्यज्ञानानंत जें कां निराकार चि सर्वदा ॥४५९॥
गेली आवरणा विद्या परि विक्षेप युक्त जे ॥
राहे ते जाय कळतां जडही चित्स्वरूपचि ॥४६०॥
अनुभव असा त्यांत फलितार्थ चि निर्गुण ॥
दिसेना कांहिं च जडा जड कांहीं च नाहिं तें ॥४६१॥
अखंडानुभवें ऐसा देहीं वर्ते विदेहि जो ॥
त्या पूर्ण भगवत्प्राप्ती मुक्ति ही हरिभक्ति ही ॥४६२॥
ब्रह्म सर्व अशा ज्ञानें दिसती ब्रह्म इंद्रियें ॥
अभ्यास हा अशा ज्ञानें होतो इंद्रिय-संयम[९०] ॥४६३॥
पाहे चैतन्यहेम चि जडत्वनग टाकुनी ॥
नियमें पाहाती ज्ञानी स्वानंदप्रद नेम तो ॥ ४६४ ॥
आत्मा च पाहतो सर्व प्रपंच जड त्यागतां ॥
बोलण्यांत हि तें मौन निःशब्दीं मन वर्ततां ॥४६५॥
ब्रह्म च आदिअंतीं जें मध्यें हि तें चि वीजन[९१] ॥
ब्रह्म काळ असे ज्यांत निमिषादिक काळ ची ॥४६६॥
सुख ब्रह्मस्फुरण जें नित्य आसन सिध्द तें ॥
ब्रह्म च जडमायेचें मूळ ज्ञा [अज्ञान ?] मूळ-बंध तो ॥ ४६७ ॥
तरंग जड चिदब्धि-ज्ञान जें समता च ते ॥
दृष्टि तें कारण ब्रह्म जडकार्य चि पाहणें ॥ ४६८ ॥
ब्रह्म सर्व हि वृत्तींच्या निरोधानें च मानणें ॥
अंतर्मुख तो पुरक सुटे प्रपंचि रेचक ॥ ४६९ ॥
अद्वैत-स्थीर वृत्ती जे तो प्राण-स्थीर कुंभक ॥
प्राणायाम असा त्यांचा न होय इतरांस तो ॥ ४७० ॥
व्यतिरेकें आवरणा विक्षेपा अन्वयें तसी ॥
नाशे तेव्हांच जाणावें अद्वैत कळलें तया ॥ ४७१ ॥
गेली आवरणाविद्या विक्षेपा राहाते तया ॥
नाशिती जाणुनी सर्व जड हें चित्स्वरुप ची ॥ ४७२ ॥

---

९० संयम=निग्रह. ९१ वीजन=एकांत.

आत्मा च विषयीं वाटे मन चित्स्वरुपीं असे ॥
प्रत्याहार असत्यांचा जो मुमुक्षूंस उत्तम ॥ ४७३ ॥
ब्रह्मीं निराकारवृत्ती स्थीर जें ध्यान त्यांस तें ॥
ब्रह्माकारपणें वृत्ती स्थिरता जे समाधि तो ॥ ४७४ ॥
ब्रह्म ची स्फुरतें तें ची मन जेथें चि जाय तें ॥
मनाची धारणा हे ची मुमुक्षां अति उत्तम ॥ ४७५ ॥
तो राजयोगी गुरुदेव-भक्त योगांग मात्रींच समाधियुक्त ॥
विष्णु स्वयें तो तनु जे तयाची जीवोद्धरा *देवनदी च साची ॥४७६॥
वसे प्रपंचीं परि निःप्रपंच असा असे ज्या परमार्थ साच ॥
होऊनि त्या युक्त जरी अशुद्ध प्रपंचि साधे परमार्थ शुद्ध ॥ ४७८ ॥
नारायण पद्मभव नारद व्यास शूक हीं ॥
आचार्य जे गौडपाद गोविंद भगवत्पद ॥ ४७८ ॥
यतींद्र शंकराचार्य पृथ्वीधर हि ते तसे ॥
यति श्री सच्चिदानंद रूपें परमहंस जे ॥ ४७९ ॥
तत्कृपे वामनस्वामी ज्यांहीं गुह्य प्रकाशिलें ॥
परात्पर श्यामराज तुकोबा परमेष्ठि ते ॥ ४८० ॥
बाळकृष्ण ते परम परमानंद श्रीगुरु ॥
प्रकाशी गुह्य तें ऐसें सर्वात्मा वासुदेव हें ॥ ४८१ ॥
कृतार्थ तें वदन नित्य ज्यांतें कृपेन ज्यांचे वदलों तयांतें ॥
परंपरा वर्णुनि त्याच पायीं पुनः पुना वंदिच सर्व ठाईं ॥ ४८२ ॥
कायावाचा मनेंद्रियें अहंकारें स्वभावें हि ॥
ज्यां हें केलें कर्म सर्व अर्पी नारायणा प्रती ॥ ४८३ ॥
इति श्रीवामनस्वामीकृत-अनुभूतिलेशग्रंथ-टीका समाप्त ॥

समाप्त.

---

* देवनदी = भागीरथी. १२ पद्मभव = ब्रह्मा.

# भूगोल-वर्णन.

आत्मा हेमें जसें तसा स्थिर-चरीं नाना नगीं संचला ।
हें नेणें नुसतें सुवर्ण वळखे आत्मत्व तो वंचलौं ॥
एवं जो भगवंत विश्व अवघें वंदूनियां त्यास मी ।
हा भूगोल-तरंगीं[4] वर्णित असें त्या चित्समुद्रीं समीं ॥ १ ॥
सहस्र-पत्राब्जें[5] तशी धरा हे । तत्कर्णिका होउनि मेरु राहे ॥
द्वीपांचिया सिंधुचिया जळाच्या । पंक्ती तयाच्याच जशा दळाच्या ॥ २
कोटापुढें खंदक खंदकाहीं । पुढें दुजा कोट चि जेंवि काहीं ॥
द्वीपापुढें सागर सागरासी । द्वीप,क्रमें त्यास हि वारिराशी ॥ ३ ॥
अशी योजनें भूमि पन्नास कोटी । मधें मंडळाकार हे मध्य कोटी ॥
पुढें कंकणाकार सर्वा धरा हो । तसे सिंधु ही हा मनीं बोध राहो ॥ ४

अशी सप्तद्वीप[10] क्षितिवरि मधें त्यांत मिरवे ।
वरी जंबुद्वीपें क्षिति नवचि ते भाग बरवे ॥
तयामध्यें मेरू तळिंहुनि हि जो रुंद वरता ।
उभा [11]गांवें लक्षप्रमित म्हणती वेदें[12] पुरता ॥ ५ ॥

**ओव्या**—मेरूस दक्षिण दिशे । निषधनाम पर्वत असे ॥
नीलाद्रि उत्तरे वसे । माल्यवान पश्चिमेसी ॥ ६ ॥
पूर्वेसी गंधमादन । समुद्र पर्यंत या पासून ॥
भूमी भद्राश्व म्हणून । म्हणवी खंड ॥ ७ ॥
पश्चिमे माल्यवान् पर्वत । त्या पासून समुद्रपर्यंत ॥
केतुमाल म्हणोनी विख्यात । तिसरें खंड ॥ ८ ॥
पूर्वपश्चिम समुद्रवरी । तीन खंडे या परी ॥
इलावृत्त चहूंकडे चारी । सीमा-पर्वत ॥ ९ ॥
त्यास दक्षिणेस निषध-गिरी । पूर्वपश्चिम समुद्रवरी ॥
दक्षिणे जातां आडवा परी । पूर्वे पश्चिम तो नीट ॥ १० ॥

---

१. हेम=सोनें. २ नग=दागिना. ३ वचला=फसला. ४ तरग=लाट. ५ अब्ज=कमल. ६ कर्णिका=मधला भाग. ७ द्वीप=बेट. ८ वारिराशी=समुद्र. ९ अर्वाचीन शोधान्वयें पृथ्वीचा व्यास ८००० मैल ह्मणजे ८०० योजनें, परीघ २५००० मैल ह्म० २५०० योजनें, व क्षेत्रफळ २०,००,००,००० कोटी मैल ह्मणजे २,००,००,००० दोन कोटि योजनें आहे. १० सप्तद्वीपें=जंबूप्लक्षाहवौ द्वीपौ शाल्मलीश्चापरोद्विज । कुशः क्रौंच स्तथा शाकः पुष्करश्चैव सप्तमः ॥ १ ॥ (विष्णुपुराण). ११ गांव=योजन १२ वेद=चार

त्यास ही दक्षिण दिशे । हेमकूटें[13] पर्वत असे ॥
या दोहींमध्यें खंड वसे । हरिवर्ष म्हणूनी ॥ ११ ॥
हेमकूट पुढें पर्वत । दक्षिणेस उभय सिंधू पर्यंत ॥
या दोंगिरींमध्यें विख्यात । किंपुरुष खंड ॥ १२ ॥
हिमाचल दक्षिण दिशे । समुद्रवरी पृथ्वी असे ॥
तिथें हें भरत-खंड वसे । कर्मभूमी ॥ १३ ॥
एवं पूर्वपश्चिम दोन्ही । मध्यें एक दक्षिण तिन्ही ॥
मेरू भोंवतीं खंडें नेमूनी । सांगितलीं साहा च ॥ १४ ॥
आतां मेरू भोंवतें इलावृत्त । त्यास उत्तरें नीलपर्वत ॥
त्या ही पुढें नामें श्वेत । गिरी आडवा उत्तरें ॥ १५ ॥
या दों पर्वतांभीतरीं । पूर्वपश्चिम समुद्र वरी ॥
रम्यकू खंड तया [14] वैखरी । बोले मुनीची ॥ १६ ॥
यास ही उत्तर दिशे । शृंगवान् पर्वत तैसाच असे ॥
तेथ पर्यंत वसे । हिरण्मय खंड ॥ १७ ॥
तेथून उत्तरें समुद्र वरी । उत्तर-कुरु-खंड या परी ॥
एवं नवखंड कूसरी । जंबुद्वीपाची ॥ १८ ॥

**श्लोक**—मधें मेरू त्या भोंवति भू अखंड । गिरि चौंत दावी इलावृत्त खंड ।
तया मध्यखंडास जे पूर्व भागीं । तया नाम भद्राश्व पृथ्वी विभागीं ॥ १९ ॥
इलावृताहूनि हि पूर्व भागीं । तें खंड भद्राश्व धराविभागीं ॥
जें पश्चिमे तें तरि केतुमाला । या दोंस ही सागर-युग्म-माळा ॥ २० ॥

**घनाक्षरी**-लोक आतल वितळ । तया तळीं ही सुतळ ॥
तळातळ महातळ । एक एका खालते ॥ १ ॥
तया खालें रसातळ । तया खालें ही पाताळ ॥
तया तळीं महा [15]व्याळ । व्यास-वाणी बोलते ॥ २ ॥
भूमीवरी भुवर्लोक । स्वर्गावरी महर्लोक ॥
जन-तप-सत्य-लोक । एक एका वरते ॥ ३ ॥
ब्रह्मांड हें विवरण । वरी वरी आवरण ॥
पुढें वामन-चरण । सत्व तेंची उरतें ॥ ४ ॥ २१
कोटि योजन पन्नास । अंड कोटीचा विन्यास ॥
सांगितलासे धन्यास । राजयासी श्रीशुकें ॥ १ ॥

---

१३ कूट=शिखर. १४ वैखरी=वाणी. १५ व्याळ=शेष.

मध्यें भूगोलाचें स्थळ । मेरु[16] सोन्याचा अढळ ॥
तया भोंवतें अचळ । असंख्यात कौतुकें ॥ २ ॥
कर्णिका सहस्र-दळीं । तसा मेरु भूमंडळीं ॥
जैशा केशराच्या वळी । हेमगिरी-शतकें ॥ ३ ॥
मेरु भोंवतें भूतळ । जैसें वर्तुळ कमळ ॥
जंबुद्वीप तें केवळ । लांब रुंद तितुकें ॥ ४ ॥ २२
लक्ष योजनें विशाळ । मेरु सोन्याचा सुढाळ ॥
जंबुद्वीप भूमी माळ । भोंवती त्या पर्वत ॥ १ ॥
सोळा सहस्र योजन मेरु । भूमींत निमग्न जैसें धर्तुरु[17]
सुमन रुंद जों जों वरु । .. .. .. .. ॥ २ ॥
तया भोंवती ते धरा । तो ची जंबुद्वीप खरा ॥
लांबी रुंदीनें जो बारा । लक्ष गांव पुरता ॥ ३
तया वेष्टण कंकण । सिंधु नामें जो लवण ॥
स्वयें वर्तुळ आपण । लक्ष गांव पुरता ॥ ४ ॥ २३
जंबुद्वीप हा अखंड । नद्या पर्वत उदंड ॥
त्या ही मध्यें नव खंड भूमंडळ वर्णिती ॥ १
मध्यें मेरु हा पर्वत । तेथें खंड इलावृत्त ॥
दोन्ही समुद्र पर्यंत । दोन्हीकडे असती ॥ २
तीन खंडें दक्षिणेस । तीन खंडें उत्तरेस ॥
शेवटील दोन्ही जैशा । धुनुष्याच्या आकृती ॥ ३
सिंधू उत्तर दक्षिण । दोन्ही धनुष्य लक्षण ॥
सीमा पर्वतांचे गण । दोहीं अंतीं ये रिती ॥ ४ ॥ २४
सिंधु नामें जो लवण । पूर्व पश्चिम दक्षिण ॥
हिमाचल तो आपण । गिरिराज उत्तरे ॥ १ ॥
तें हें भरताचें खंड[18] । पुण्य सद्गति उदंड ॥
येथें पापी लंड भंड । ते ची नरकी खरे ॥ २
एथें करिती जे पाप । तयां नरकीं संताप ॥
जो जो पुण्याचा प्रताप । तो तो लोक ही बरे ॥ ३

---

१६ मेरु—भास्कराचार्यादि ज्योतिषी पृथ्वीच्या आंसाला मेरु ह्मणतात. १७. धतुरु= धोतऱ्याचें फूल. १८ भरतखंडाच्या सीमा लघु आर्य सिद्धांतांत एथल्या प्रमाणेंच वर्णि-ल्या आहेत:—सागर-हिमगिरिमध्ये चापाकार हि भारतवर्षम्.

एथील ची पुण्यफळ । द्वीपें खंडें हें सकळ ॥
स्वर्ग अतळ वितळ । तेथूनी च हे सारे ॥ ४ ॥ २५
चित्त-शुद्धीनें चिद्भक्ति । हरिभक्तीनें विरक्ती ॥
भक्ति-विरक्तीनें मुक्ती । ऐशीं शास्त्रें बोलती ॥ १ ॥
पाकि[१९] ज्ञानाचा न ज्यास । सत्य लोकीं तया वास ॥
तेथें करूनी अभ्यास । अंतीं मोक्ष पावती ॥ २
मोक्ष अन्यत्र ही परी । तेथें ज्ञान होय जरी ॥
मोक्ष-प्रदत्व ही तरी । याच खंडीं साधिती ॥ ३
ज्ञानें वीण चित्तशुद्धी । तेणें जन्मांतरीं सिद्धी ॥
आत्मतत्व ज्ञान-बुद्धी । या च भूमी वरिती ॥ ४ ॥ २६
लक्ष योजनें समुद्र । खोल तितका च रुंद ॥
लंकादिक दुर्गवृंदें[२०] । त्याचि मध्यें वर्णिती ॥ १ ॥
पुढें द्वीप नामें लक्ष । तेथें प्लक्षनामें लक्ष ॥
रुंदीनें तो दोन लक्ष । लांब कवणाकृती ॥ २
रस उंसाचा केवळ । तैसें सागराचें जळ ॥
त्यानें द्वीप तें केवळ । वेष्टिलें हो बोलती ॥ ३
पुढें शाल्मली म्हणून । वृक्ष नामेंची करून ॥
द्वीप तयाचें वेष्टन । मद्य-सागर असे ॥ ४ ॥ २७
त्या ही पुढें कुशद्वीप । कुशस्तंभ जेंवि दीप ॥
ऐसें तेज तो अधीप । जाणों द्वीपांचा दिसे ॥ १
घृत-सिंधूचें वेष्टण । त्याही पुढें विचक्षण ॥
क्रौंच द्वीपाचें लक्षण । बोलताति हो असें ॥ २
ज्यांत क्रौंच डोंगर । घेरा क्षीराचा सागर ॥
जया क्षीराब्धींत वर । त्याचे कन्येचा असे ॥ ३
क्षीरनिधीपुढें धाम । शाकद्वीप त्याचें नाम ॥
शाकवृक्ष अभिराम । त्याचें नाम त्या प्रती ॥ ४ ॥ २८
त्या ही भोंवता तो अब्धी । त्याचें पाणी जाणों दधी ॥
पुढें द्वीप तें अवधी । सातवें हें बोलती ॥ १
तया वेष्टण जें जळ । गोड सिंधूचें केवळ ॥
त्या ही पुढें तो अचळ । लोकालोक येरीती ॥ २

---

१९ पाक=परिणाम, फळ. २० वृंद=समूह.

कीं ज्या[21] भीतरी हे लोक । जया बाहेरी आलोकें[22] ॥
सूर्यचंद्र अवलोक[23] । जयापुढें नसती ॥ ३
ब्रह्मांडाचा मध्य भाग । भूमी त्याचा हा विभाग ॥
जिला शिरीं शेष नाग । अहर्निशी वाहातो ॥ ४ ॥ २९
वरी वरी सत्य लोक । ब्रम्ह-पद जें विशोक ॥
लेखितां तें सत्यलोक । कटाहा[24] ची राहतो ॥ १ ॥
अंड-कटाहाचें दळ । कोश दशगुण जळ ॥
दशगुण ची अनळ । वायुपुढें वहातसे ॥ २ ॥
नभ अहं महत्तत्व । दशा दशगुणकत्व ॥
साक्षी पुढें निर्गुणत्व । वामन हें पाहातो ॥ ३ ॥

समाप्त.

---

## रसना[25]-स्तुति.

### सवाया.

पांडव-भाग्य सहस्रमुखां[26]स हि वाच्य नव्हे न धरे अनुमाना
जें महा थोर पितामह[27]-वैभव त्याहुनि ही अति उत्तम माना ॥
कोटि चतुर्दश निर्मुनियां विधि पात्र न ज्या पुरुषोत्तम-माना ।
तो हरि भाइ रे भाइ म्हणोनि थापटि पार्थ-तुरंगम[28]माना ॥ १ ॥
हे रसने तुज वीनवितों कर जोडुनि एक विनंति करीं ।
सर्व अमान्य जगत्रय दुर्गुण काढुनि होउं नको अखरी ॥
मौन्य-रूपें क्रमुं काळ कसा म्हणसी तरि निश्चळ ध्यान धरीं ।
श्रीशिव शंभु दयार्णव केशव माधव कृष्ण मुकुंद हरी ॥ २ ॥
हे रसने तुज सांगितलें हित काज हरि-स्मरण शिकावें ।
श्रोत्र-युगीं श्रवणादि करूनि कथामृत-सार मनांत धरावें ॥
हस्तकिं पूजन मस्तकिं वंदन नेत्रिं विलोकुन रूप भरावें ।
ईश्वर हे समबुद्धि निरक्षुनि मानुं नको मग आपपरावें ॥ ३ ॥

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ३० [illegible] शाखा. क्र. १५८०८ [illegible] ३१८४ [illegible] ३.२ [illegible]

---

२१ भीतरी=आंत. २२ आलोक=प्रकाश. २३ अवलोक=पहाणें. २४ कटाह=कढई. २५ रसना=जीभ. २६ सहस्रमुख=शेष. २७ पितामह=ब्रह्मा, भीष्म. २८ तुरंगम=घोडे.

## कंस-वध.

### घनाक्षरी.

वजाहुनी ही अभंग । मल्लां वाटला श्रीरंग ॥
नरां नरनाथ रंग । भूमी येतां वाटला ॥ १ ॥
वाटे नारींसी मदन । नंदादिकांसी स्वजन ॥
दुष्ट रायांसी शासन । धाकें ऊर फाटला ॥ २ ॥
मायबापां तान्हें बाळ । भयें कंसा वाटे काळ ॥
मूढां वाटे फटकाळ । शोकें कंठ दाटला ॥ ३ ॥
स्वात्म योगियां स्वरूप । यादवांसी विष्णु-रूप ॥
दृष्टी देखतां अरूप । दुःखसिंधु आटला ॥ ४ ॥ १ ॥

संगें गडी बळीराम । रंगा येता मेघश्याम ॥
कुवलयापीड नाम । द्वारीं गज देखिला ॥ १ ॥
पीतांबरें कसी कास । शिरीं बांधी अलकांसें[२९] ॥
दावी वीरकौतुकास । वीर-रसें रेखिला ॥ २ ॥
कृष्ण उचलुनी हात । म्हणे अरेरे महात ॥
जाणें रायाचे गृहांत । वाट सोडीं वहिलीं[३०] ॥ ३ ॥
नाहीं तरी हा वारण[३१] । तुज सहीत मरण ॥
पावेल हा अजी रण-रंगीं जय पहिला ॥ ४ ॥ २ ॥

सोंडेचा सांखळदंड । उचलुनी शुंडा दंड ॥
कुवलयापीड चंड । वेगें करी[३२] लोटला ॥ १ ॥
शृंखळा ते खळखळ । वाजे लोहाचे निःखळ ॥
यमें कवळीला खळ । खुळगासा[३३] उठिला ॥ २ ॥
घंटा जड मण मण । वाजताती घण घण ॥
मक्षिकांची खण खण । मध्यें जेव्हां धांविला ॥ ३ ॥
ऐसा करी हरी हरी । संहारी हो हरी हरी ॥
केशरी[३४] हो कोण सरी । श्रीहरी चपळ पावला ॥ ४ ॥ ३ ॥

सोंडेचा सांखळ-दंड । चुकवूनी भुजदंड ॥
हाणे हत्तींसी प्रचंड । निघे चहूं चरणीं ॥ १ ॥

---

२९. अलक=केस. ३० वहिला=तत्काळ. ३१ वारण=हत्ती. ३२ करी=हत्ती. ३३ खुळगा=रेडा. ३४ केसरी=सिंह.

पुच्छीं धरी गिरीधरें[३५] । मागें ओढी फरफर ।।
हत्ती हगे भर भर । चित्रितें[३६] करणी ।। २ ।।
पुढें येऊनी अनंत । कुवलयापीड दंत ।।
चुकावितात अत्यंत । घासती हो धरणी ।। ३ ।।
ऐसा मारूनी द्विरदें[३७] । उपडूनी दोन्ही रदें[३८] ।।
शोणितें[३९] वरद । रंगला हो त्या रणीं ।। ४ ।। †

समाप्त.

---

## ब्रह्मबोध. *

शुक म्हणत नृपाळा आयकें कर्णवापी ।
भरुनि रस निघे जो तो चि आकर्ण वा पी ।।
जग गुरु परमात्मा जो चिदानंद सारे ।
लव गुण कथिल्यानें त्यांत आनंद सारे ।। १ ।।
करुनि सावध चित हृदंबुजीं । श्रवण तूं करिं सौख्यदयांबु जी ।।
जग भवांत भुजंगमं[४०] भासतो । मग दिसे हरि रज्जु चि भास तो ।। २ ।
ऋषि समस्त मुखीं हरि दुंदुभी । पुसत त्यास चि आनक दुंदुभी[४१] ।।
तुम्हि समस्त समाधि-सुखीं हरी । स्तवितसां भव भ्रांतिक जो हरी ।। ३ ।।
तुम्ही ब्रह्म ध्यातां निजानंदरूपी । समाधिस्त होऊनियां चित्स्वरूपीं ।।
असे ब्रह्म तें काय कोठें वसे जें । मम ज्ञान कीं चंद्र आमावसे जे ।।४।।
म्हणे मी अज्ञानी मज निबिड अंधार रजनीं
जनीं ब्रह्मातें या न कळत असे काळ भजनीं ।
तुम्हां सर्वज्ञांते म्हणुनि पुसतों सत्व हृदया
दयाळुत्वें ब्रह्मार्पण कथन सांगा स्वहृदया ।। ५ ।।
स्तवितसे **वसुदेव** कृतांजली । करुनि वंदन लोचन सज्जळीं ।।
नयनिं घालुनि ब्रह्म निरंजना । तुम्हि समस्त करा नयनांजना ।। ६ ।।
या शून्य गेह हृदयीं दिप ऊजळाया ।
मोहांधकार भव लोचनिं काजळा या ।।

---

† हें प्रकरण अपुरतेंच आमच्याकडे आलें होतें.

* हें प्रकरण वामनाचें ह्मणून आम्हांकडे आलें परंतु याचे शेवटचे श्लोकांत "नरहरी" असें नांव आहे यावरून हें वामनी नसावेंसें वाटतें. भाषाही वामनी भाषेहून अधिक खडबडीत आहे.

३५ गिरिधर=कृष्ण ३६ चित्रित=चमत्कारिक. ३७ द्विरद=हत्ती. ३८ रद=दांत. ३९ शोणित=रक्त. ४०. भुजंग=सर्प. ४१ आनकदुंदुभी=वसुदेव.

वाटे प्रकाशकर तूंच तुम्हांविना ही
चिद्हृत्य दीप उजळी सम अन्य नाहीं ॥ ७ ॥
ऐकोनियां मुनिवरें वसुदेव-वाणी[४२] । जो ब्रह्म सेवनिं नसे स्वसुखासि वाणी[४३] ॥
ते बोलती तव गृहीं हरि ब्रह्म आहे । ऐसें असोनि तुज कां भवबंध आहे ॥ ८ ॥
तूझी प्रिया गुण वधू सति **देवकी** जे । गर्भांत ब्रह्मरूप वसति [?] देव कीजे ॥
तें प्राप्त ब्रह्म तुजला वसुदेव कीजे । लौकीक वृत्ति तपितां वसुदेव कीजे ॥ ९ ॥
ज्ञानांजनें करुनियां वसु ब्रह्म पाहे । जें शोधितां तव गृहींच करी कृपा हे ॥
त्या निर्गुणा गुणमयी जन आंत राया । राहे स्नुषा म्हणति ते हरि दुस्तराया ॥१०॥
सकळ व्यापुनियां सचराचरीं । अवतरे जयिं ब्रह्म चराचरीं ॥
भुजग हें जग सर्व विती सती । तव गृहीं तनुज रुक्मिणि दीसती ॥ ११ ॥
हरी रुक्मं[४४] विश्वीं अळंकार सारे । हरी रुक्म हें रुक्मिणि हार सारे ॥
हरि ब्रह्म माया घटीं बिंब राजे । तदंशें जिणें निर्मिले देवराजे ॥ १२ ॥
जसें चिदानंदकरूप साचें । जें देवकीच्या उदरांत साचे ॥
सर्वस्व आम्ही भजतां तयातें । तें तारितें पाप-भवानयातें ॥ १३ ॥
ते सर्व सांगति तया वसुदेव राया । कीं ब्रह्म निर्मित असे तुझिया घरा या ॥
ध्यानस्थ जे गुण कथूं तव नंदनाचे । जो गोकुळीं हरिस घेउनि नंद नाचे ॥१४॥
हा सर्व रज्जु भुजगा स्थिर जंगमाचा । जो गर्व नाशित जळांत भुजंगमाचा ॥
तो हें खरें जग समस्त तरंग सारें । या कारणें हरिगुणामृतिं रंग सारें ॥ १५ ॥
ऋषि-मुखीं निघतां अशि वैखरी[४५] । यदुवरा गमली कथिनी खरी ॥
करुनि वंदन सत्वर तो निघे । हरिगुणामृत नाम निघोनि घे ॥ १६ ॥
तदुपरि वसुदेवें येउनीयां घरातें । हरिस सदय भावें हें पुसे आग्रहातें ॥
सगुण रूप तुझें हे वाटसी ब्रह्म सारें । मम शिशु वदताती वृद्ध आबाल सारे ॥१७॥
ऋषीं तें मी प्रार्थीं तुम्हि सतत ब्रम्हात्मभजनीं ।
जनीं या राहोनी नलिनि दल भावें चि विजनी[४६] ॥
हरि ध्यातां ब्रम्हा त्यजुनि भववार्तासि सकळां ।
कळा चिद्रूपाची मज हि तुम्हि सांगा अविकळा ॥ १८ ॥
ते सांगती मजप्रती सदनात्मभावी । कीं कृष्ण पुत्र असतां पडसी अभावीं ॥
ऐसें असोनि वद कां तुज मोह जाची । हे ब्रम्हमूर्ति असतां उदरीं अजाची ॥ १९ ॥
जें ब्रम्ह सर्वांतरिं आरसा रे । न सेवित प्रकृति आरसा रे ॥
बिंबें तयाच्या पद-सारसा रे । सेवीति त्या तुच्छ हि सार सारें ॥ २० ॥

---

४२ वाणी=भाषण. ४३ वाणी=कमताई. ४४ रुक्म=सोनें. ४५ वैखरी=वाणी. ४६ विजनी=एकांतीं.

काळास जो केवळ काळसा रे । ज्या पासुनी निर्मित काळ सारे ॥
भासे तुला केवळ बाळसा रे । संगी करी गोकुळ-बाळ सारे ॥ २१ ॥
वाजवी अधरिं मंजुळ पांवा । तो तुवां स्वहृदयांत जपावा ॥
भक्त-उद्धरणिं जो भरि नावा । घे अशा सतत शंभर नांवां ॥ २२ ॥
ते सांगती मजप्रती वरि भ्रांति वाटे । या संशयांबुधितुनी मज काढिं वाटे ॥
तूं ब्रह्म केवळ कसें हरि सांग आधीं । तेणेंकरूनि हरि ते मम आंग आधी ॥२३॥
तूं ब्रह्म मातें न कळे कदापी । तूं खेळतां मी तुजलागिं दापीं ॥
तूं लेंकरूं भाससि स्वात्मभावा । मी तों न जाणें तुझिया प्रभावा ॥ २४ ॥
तुझें ब्रह्म तें काय कैसें असे जें । तुला खेळवूं नित्य घेऊनि सेजे ॥
यशोदा तुला मंचकीं थापटी जे । स्वयें तूं जगीं तंतुरूपें पटीं जे ॥ २५ ॥
मुनिवर-वचनाचे भाव जाणोनि सारे । पुसत तुज असें कीं ब्रह्म तूं हा कसा रे ॥
त्वरित कथिं मुकुंदा श्यामला पीतवासा । घरिं स्वसुख असोनी भोगणें कां प्रवासा ॥ २६ ॥

पित्याची हे वाणी श्रवण करि गोविंद हृदया ।
दयार्द्रे तातासी वदत अति आनंद सदया ॥
म्हणे माझे ठायीं तुज गमत कीं ब्रह्मरूप हा ।
पहा या देहा ज्या ऋषि म्हणति कीं ब्रह्म कुप हा ॥ २७ ॥

ब्रह्म तूज दिसतें मम देहीं । नाश कीं नयनिं देखति विदेही ॥
सांग या अधरिं कीं रसनेलीं[४७] । कीं कटीं मणिमयी रशनेलीं[४८] ॥ २८ ॥
ब्रह्म सांग करिं कीं मम कंठीं । कीं भुजांतरिं भुजीं उपकंठीं ॥
पृष्ठिभागउदरादिक नाभीं । सांग सत्वर मनीं न कदा भी ॥ २९ ॥
दशांगुळीं हस्त नखीं दिसे कीं । जानुद्वयीं या न दिसे चि सेखीं ॥
जंघादि गुल्फादिक या उपायीं । कीं ब्रह्म माझ्या दिसतें चि पायीं ॥ ३० ॥
सकळया मत इंद्रिय अंतरीं । न दिसतें वद या उपरी तरी ॥
म्हणसि ब्रह्म कसा मजला जनीं । तुज कसेंरिति सांगति वीजनी[४९] ॥ ३१ ॥
शुक म्हणे स्व दयामृत उत्तरीं । अजि वदों वदती भवि हे तरी ॥
अवयवात्मक मृन्मय भाजनीं[५०] । समघटीं रवि हा असे भा[५१] जनी ॥ ३२ ॥
जें दृष्टिगोचर दिसे नयनासि लोकीं । तें बुद्बुदा[५२] सम हि मानिं जळा विलोकीं ॥
हे स्थावरादिक भुजंग भुजंगमा या । रज्जू चि हा परिभ्रमे मुळ ईस माया ॥३३॥
अनंता परी एक तंतू पहाती । तयां या भवीं ब्रह्म लागेल हातीं ॥

---

४७ रसना=जीभ. ४८ रशना=कमरपट्टा. ४९ वीजनी=मुनी. ५० भाजन=पात्र. ५१ भा=तेज. ५२ बुद्बुद=बुडबुडा.

स्वयें मीं असा मानितों ब्रह्म सारें । मला मानिसी ब्रह्म आब्रह्मसा रे ।। ३४ ।।
तूं ही तसा स्व हृदयांत विलोकनातें । केल्यावरी तुजगमे हरि ब्रह्म नातें ।।
विश्वीं मणींत गुण जेंवि जसा पहातीं। त्या रज्जु सत्य धरिला जरि साप हातीं ।।३५।।
काचभिंग धरितां नयनांतरीं । नीळ त्यास जन दीसत अंतरीं ।।
भिंग पाट शत लोचनिं दावी । त्या सहस्र शिर आकृति लावी ।। ३६ ।।
अग्नीसि गंधक वसे भव चंद्रमासा । पुष्पाग्निवत दिसतो जनिं या तमासा ।।
सर्वत्र माइक खरा परि अग्नि साचा। माया निशेंत वसतो लटिकाचि साचा ।।३७।।
या कारणें सकळ मायिक विश्व सारें । ताता विलोकिं जनिं या भरले पसारे ।।
ते सर्व ब्रह्ममय मानुनि चित्स्वरूपा । ध्यावें मनीं समजसी मग आत्मरूपा ।। ३८ ।।
हा ज्ञानदीप हृदयांतरिं ऊजळाया । अज्ञान मायिक तरू जगिं या जळाया ।।
हा बोध सात्विकहृदीं अमृतासमान । वाटेल सत्य तरि देख जनीं समान ।। ३९ ।।

हरीची वाग्देवी शुक म्हणत ऐकें नृपतिला ।
अजी कर्णीं तातें श्रवण करितां बोध मतिला ।।
म्हणे सर्वीं ब्रह्म मज गमत मी ब्रह्म चि असे ।
मनाचे संकल्प गाति निजसुखा माजि च असे ।। ४० ।।

ब्रह्मावबोध घरिं आजि च प्राप्त झाला । सर्वात्मनें करुनियां कळलें अजाला ।।
सर्वत्र संशय मनांतिल फीटला हो । घेईन यावरि जनांत मुकुंदलाहो ।। ४१ ।।
विसरला सरला भवभास जो । दिनमणी रमणी मन भास जो ।।
समज गा भुजगा कृतिला न भी । अनिल त्या निल त्या न पवे न भी ।।४२।।
वसतसें सतसें मुनि संगती । अचरितो चरितो परमा गती ।।
भुचर तो चर तो हरि भोजनीं । अमळ तो मळतो हरि भोजनीं ।। ४३ ।।
सदयता दयितेस विभांडुनी । अदयता दयितेसि न वि भांडुनी ।।
विरस ते रस ते द्विज या जनीं । अचळ ते चळते मति या जनीं ।। ४४ ।।
त्यजुनियां मति या जनिं लालची । नुतन हे तनु हे हरि लाल ची ।।
विजनिं या जनिं यास चि भावितो । सफळता फळता हरि दावितो ।। ४५ ।।
सुरसता सरता हरिच्या पदा । सकळता कळता जरि आपदा ।।
परमता रमता पदसारसीं[५३] । सकळ हे फळ हें हरिच्या रसीं ।। ४६ ।।
समजला मजला हरि तूं जनीं । उमजला मज सांगति वीजनी ।।
प्रकट ते घट तें मम मानसीं । परम तूं रम तूं हृदमानसीं[५४] ।। ४७ ।।
बोले असा तो वसुदेव भावें । मीं धन्य झालों तुझिया प्रभावें ।।
सर्वांतरीं तूं मम अंतरीं तूं । तूं ब्रह्म मातें भविं या तरी[५५] तूं ।। ४८ ।।

---

५३ पदसारस=पादकमल. ५४ हृदमानस=हृदयरूपी मानससरोवर. ५५ तरी=नौका.

पित्यासी असा श्रीहरी बोध रीती । वदे त्या मनीं अन्य कोणी धरीती ॥
प्रपंची भवाब्धीस ते पार होती । वसे कामना मानसीं जी अहो ती ॥ ४९ ॥
हा ब्रह्मबोध कथनीं कथि भद्र काळीं । आंगें वदे सदय होउनि भद्रकाळी ॥
प्रार्थीतसे नरहरी चरणीं तराया । लोटीतसे निजपदीं भव दुस्तराया ॥ ५० ॥

समाप्त.

---

## अथ गोरसहरण.

श्रीविघ्नराज[५४ अ] विधिजो[५५ ब] पद सद्गुरूचें ॥ वंदीन यांविण मनीं सहसा न रूचे ॥
नानावतार धरि एक अनेक जाला ॥ मी सर्वदा शरण दीन तया अजाला ॥ १ ॥
जो ब्रह्मरूप अवतार बहू धरीतो ॥ नानारूपें स्वजन सेवक उद्धरीतो ॥
भूभारवारण दशांतिल आठवा हो ॥ नंदालयीं प्रगट तो हरि आठवा हो ॥ २ ॥
व्रजसुता सह गोकुळपाळ तो ॥ निजसुखें विविधापरि खेळतो ॥
ठकुनि गोपवधू रस घेतसे ॥ चपळ तो मन चोरुनि नेतसे ॥ ३ ॥
वयें वेद[५६] वर्षांचिया बाळकाची ॥ कसी कीर्ति ऐका जगत्पाळकाची ॥
सर्वे सींगडे ते बरे सीकवीले ॥ सदां माधवें गोरसा सोंकविले ॥ ४ ॥
जे सोंकले गोपकिशोर[५७] साची ॥ ते आणिती पाळत गोरसाची ॥
गेली असे गौळणि ते जळाला ॥ तों येति गोपाळ तया स्थळाला ॥ ५ ॥
संपूर्ण भाग्योदय होय जीचा ॥ तीच्या घरा ये सुत नंदजीचा ॥
जो चिंतनें सर्व भया हरीतो ॥ ऐका पुढें काय करी हरी तो ॥ ६ ॥
लोटूनियां गेहकपोर्ट[५८] हातें ॥ पाहे पुढें ऊर्ध्व तया गृहातें ॥
सिंक्यावरी पात्र दिसे पयाचें ॥ आरंभिलें साधन हो तयाचें ॥ ७ ॥
दूरस्थ तो यत्न बहु सूचवितो ॥ पाटावरी पाट हरी रची तो ॥
त्याहीवरी स्थापुनि गोपजाला ॥ त्याच्या गळां आपण रूढ जाला ॥ ८ ॥
पात्रा पयाच्या करि मोहरीनें ॥ पाडूनियां छेद तया हरीनें ॥
घटाघटी वाजति ते धरूनी ॥ आच्छादिलें अंबर सांवरूनी ॥ ९ ॥
मग करवदनेंसीं मज्ज दोन्ही करूनी ॥ कवळित पयधारा अंजुळीनें वरूनी ॥
डळमळ करि शिंकें कंप तेणें सिराला ॥ अवघड घडलें हें साधनीं श्रीधराला ॥१०॥
असा श्रीहरी तो पयाला पिताहे ॥ तळीं सींगडे त्यांजला वोपिताहे ॥
अशामाजि ये तेथ ते गोपजाया ॥ जिनें रोधिलें मार्ग नेदी च जाया ॥ ११ ॥
तदा माधवें अंतरीं आठवीलें ॥ मुखीं दुग्ध होतें बरें सांठविलें ॥

---

५४. अ. विघ्नराज=गणेश. ५५ ब. विधिजा=सरस्वती. ५६ वेद=चार. ५७ किशोर=बालक. ५८ कपाट=दार.

मुकुंदासि गोपी धराया निघाली ॥ तिच्या लोचना दुग्ध फुंकोनी घाली ॥ १२ ॥
गोपांगना नेत्र पुसे करानें ॥ गंतव्य केलें मुरलीधरानें ॥
ऐसा ठकी जो व्रजअंगनासी ॥ रक्षू म्हणे तो मुनि सज्जनासी ॥ १३ ॥
दारा दारा येत सांगों जनासी ॥ चोळी चोळी पद्मवेलोचनासी ॥
काळा काळा नातळे सिंतरोनि ॥ गेला गेला बाळ चोरी करोनी ॥ १४ ॥
काळा रूपें अंतरीं हा तसा ची ॥ साची बोली चोरटा हा दिसाची ॥
नाहीं शंका मानसा माजि याला ॥ माझे नेत्रीं घातलें हो पयाला ॥ १५ ॥
व्रजवधु मग तेथें पातलीया समस्ती ॥ अगइ म्हणति कैशी पातली यास मस्ती ॥
वय तरि लघु वर्षे वेद सीमा वयाची ॥ ठकविति परि थोरा हे असे मावें[५९] याची॥ १६॥
जैसीं मुलें आणिक सान माना ॥ तैसा चि हा हें सदृशा न माना ॥
केला भटाचा अपमान साचा ॥ आहे बहू कातिरें[६०] मानसाचा ॥ १७ ॥
हा धाकुटा परि बहूवस नष्ट गाई ॥ पाजी हळू च करिं सोडुनि वत्स गाई ॥
जावें पयास हि न घेउनि व्यर्थ कां म्यां ॥ वैसा म्हणे निज घरांत उग्या रिकाम्या॥ १८॥
गेहा मध्यें चोर तैसाचि वागे ॥ आतां यातें गोरसा लांबवा गे ॥
आम्हां कांहीं आकळेना हरीतो ॥ संतोषो कीं तोषवूंनां हरी तो ॥ १९ ॥
ठकूनि गेल्यावरि पूर्तनारी[६१] ॥ मिळोनि तेथें अगणीत नारी ॥
परस्परें बोलति वाक्यहारी ॥ सारें तया कृष्णभवापहारी ॥ २० ॥
अशीं कौतुकें शेषशार्या करीतो ॥ करी तो कथेनें अविद्या हरीतो
कथेच्या रसें शुद्ध केलें मनाला ॥ कळीमाजि या तारिलें वामनाला ॥ २१ ॥

इति श्रीगोरसहरण समाप्त.

---

## वामनकृत नौकाचरित्र ऊर्फ जलक्रीडा.

( द्वितीय. )

कोणे एक दिनीं हरी गवळणी घेऊनि वृंदावनीं
येवोनी रवि[१] नंदिनीतिरतटा नौका विलोकी जुनी ॥
बोले त्या मृगलोचनींप्रति[२] हरी अत्यंत संतोषुनी
जावें नीरें[३] तरूनियां परतिरा नौकेंत या बैसुनी ॥ १ ॥
राधा बोलतसे धवा[४] प्रति कसी अत्यंत नम्रोत्तरें
आम्हांला न कळे जळांतिल गती हे नाव कैसी तरे ॥
तूं तों बालक अंगना सकळिका नावेंत बैसोनियां

---

५९ माव=कपट. ६० कातर=भितरा. ६१ पूतनारी=कृष्ण.
१ रविनदिनी=यमुना. २ मृगलोचनी=स्त्रिया. ३ नीर=उदक. ४ धव=पति.

कान्हा[6] त्यांस म्हणे तुम्हीं न करणें चिंता असा निर्भया ॥ २ ॥
ऐकोनी हरि-उत्तरा व्रज[7]वधू नावेंत त्या बैसुनी
मध्यें माधव शोभला [8]शशि जसा वेष्टीत [9]तारागणीं ॥
नौका चालविली जळीं पहुडली [10]नौ काय केली असे
कृष्णें ते समयीं विचित्र करणी कौशल्य केलें असें ॥ ३ ॥
सूर्यातें लपवी सुदर्शन नभीं टाकोनियां सत्वरा
देखोनी तम लोचनीं मग मनीं चिंतातुरा सुंदरा ॥
आतां काय किजे उपाय रचिजे या माधवा रक्षिजे
केवीं नाव तरोनि जाइल तिरा आतां कसी वांचिजे ॥ ४ ॥
चिंता त्या करिती निशी प्रगटली जाला रवी-अस्त हा
तों कृष्णें पवना प्रती सुचविलें तूं सूट वेगें महा ॥
इंद्रा तद्वत-वंश-भूषण करी आज्ञा कसी आयका
चारी मेघ हि एकदा चि वरूषें ऐसें करीं कौतुका ॥ ५ ॥
आज्ञा हे हरिची धरी निज शिरीं वायू शचीचा[11] पती
झुंझाटा मग सूटला गडगडा मेघोदरीं गर्जती ॥
वीजांचे कडके भडाड भडके एकेसरें दाटती
मोठी वृष्टि पडे क्षिती जळमयी संपूर्ण झाली क्षिती ॥ ६ ॥
ऐसा हा प्रळयो [12]शशांकवदना देखोनि आकांतल्या
ब्रह्माचा समयो निदान गमला कल्पांतसा भासला ॥
वाऱ्यानें [13]लहरी उडेत गगनीं नौका उलंडे जळीं
कान्हा हा भयभीत होइल ह्मणी त्या झांकिती अंचळीं[14] ॥ ७ ॥
पाहे कौतुक [15]पन्नगारि प्रभु तो सत्वासि त्यांच्या कसा
मृत्यूलागिं भिती किती मज प्रती रक्षीति या राजसा ॥
तेव्हां काय करी हरी लवकरी नौकेस छिद्रें करी
त्या माजीं जळ येतसे मग पहा घाबीरल्या सुंदरी ॥ ८ ॥
मोठें संकट मांडलें यदुपती कैशा परी रक्षिजे
नाना छिद्र पडोनि वारि भरलें या लागिं कैसें किजे ॥
तो बोले व्रजपाळ गोकुळपती आहे तया यत्न कीं
छिद्रें हीं बुझणें तुम्हीं सकळिकीं फेडूनियां कंचुकी ॥ ९ ॥

---

६ कान्हा=कृष्ण. ७ व्रज=गोकुल. ८ शशि=चंद्र. ९ तारागण=नक्षत्र समूह. १० नौ=नांव. ११ शचीचा पति=इंद्र. १२ शशांक=चंद्र. १३ लहर=लाट १४ अंचळ=पदर. १५ पन्नगारि=कृष्ण.

कंसारीवचना प्रती परिसुनी हें गोपिका मानल्या
रामा[16] त्या नवयौवनीं[17] निजकरें चोळ्या तिहीं फेडिल्या ॥
नावे छिद्रबिळें विलोलनयना त्या घालिती कंचुकी
तेणें तों जळ नावरे लहरि त्या नावेंत येतात कीं ॥ १० ॥
बाळा[18] त्या सकळा मिळोनि वदती हा ! वारि तों नावरे
या कृष्णाप्रति रक्ष रक्ष गिरिजाकांता[19] ! त्वरें धांव रे ! ॥ *
सर्वांची करुणानिधी तुज प्रती कैसी नये कींव रे ॥ ॥ ११ ॥
ऐसी जों करुणा करीत अबला तों काय बोले हरी
चीरें[20] फेडुनि सर्व ही तुम्हि बुझा छिद्रें बहू सत्वरीं ॥
लज्जा त्या त्यजुनी विलासगमनी वस्त्रें करें फेडिलीं
कृष्णा लागुनि वांचवूं म्हणुनियां छिद्रांत त्या घातलीं ॥ १२ ॥
छिद्रें ही बुजलीं परंतु जळ हें नौके मधें चालिलें
गोपींचा कटिमध्यभाग उघडा व्यापोनियां राहिलें ॥
कृष्णाचे हृदयीं जळा गवसिलें तेव्हां कसें वर्तलें
गोपींहीं हरिलागुनी निजकरें स्कंधावरी घेतलें ॥ १३ ॥
मोठा लोट हि नावरे दिसतसे संपूर्ण नौका जळें
नारींच्या निजकंठ वारि चढलें कृष्णा शिरीं ठेविलें ॥
आतां ठाव नसे हरीस उरला कोणे स्थळीं ठेविजे
वेगें त्या यदुनंदना सकळ ही गोपांगना रक्षिजे ॥ १४ ॥
ऐशीया करुणोत्तरा यदुविरें ऐकोनियां सादरें
गोपींचा निजभाव जाणुनि मनीं संतोष दामोदरें ॥
तेव्हां काय करी हरी लवकरी चक्रासि पैं काढिलें
तेव्हां तो पडला प्रकाश रविचा वेगें तमा छेदिलें ॥ १५ ॥
गेलें अभ्र विरोनियां पवन ही झाला अती मंद हा
नौकेचें जळ शोषिलें परातिरा गेले त्वरेसीं पहा ॥
ऐशा देखुनि कौतुकासि वनिता आश्चर्य मानीतसे
लीला हे अवघी विचित्र करणी कौशल्य केलें असें ॥ १६ ॥
राधा माधव गोपिका सकळ ही आल्या अशा भूवना
आज्ञा घेउनियां हरि प्रियवधू गेल्या स्वयें भूवना ॥
गाती ऐकति हें प्रितीकरुनियां मोक्षास ते पावती

---

१६ रामा=स्त्रिया. १७ यौवन=तारुण्य. १८ बाळा=स्त्रिया. १९ गिरिजाकांत=पार्वतीपति. २० चीर=वस्त्र. * या श्लोकाचा चवथा चरण मिळाला नाहीं.

मागे वामन ठाव देई मजला पायीं तुझ्या श्रीपती[२१] ॥ १७ ॥
इति नौकाचरित्रं संपूर्णं

---

## उपदेशमाला. (प्रकरण दुसरें.)

ब्रह्म जाणायाची इच्छा तूज आहे ॥ तरी तूंची पाहें आपणातें ॥ १ ॥
आपणातें बरें वोळखीशी जेव्हां ॥ सर्वगत तेव्हां तेंची ब्रह्म ॥ २ ॥
ब्रह्म जाणों ऐशी इच्छा कवणासी ॥ तूंची अविनाशी ब्रह्म जाण ॥ ३ ॥
जाणोनी जो आत्मा ब्रह्म तें आपण ॥ पाहे हेही खूण तूझी तूंची ॥ ४ ॥
तूंची सांगे तूझें नीजरूप कोण ॥ आपणा आपण विचारोनी ॥ ५ ॥
विचारोनी देह मी जरी म्हणसी ॥ स्वप्नींही देखसी देह जैसा ॥ ६ ॥
जैसा स्वप्नदेह नव्हेशी सर्वथा ॥ हाही देह मिथ्या तैसा जाण ॥ ७ ॥
जाणोनी निजरूप या देहावेगळें ॥ जड हा केवळ आत्म्यावीणें ॥ ८ ॥
आत्म्यावीणें देह शव दिसताहे ॥ प्राण तोही नव्हे निजआत्मा ॥ ९ ॥
आत्मा प्राण तरी विषयाचें ध्यान ॥ मी तो ऐसें ज्ञान प्राणा नसे ॥ १० ॥
नसे ज्ञान प्राणा विषयचिंतन ॥ तेंहि तूझें मन आत्मा नव्हे ॥ ११ ॥
आत्मा नव्हे मन विषयाचें ध्यान ॥ मुरे तेंहि मन सुषुप्तींत ॥ १२ ॥
सुषुप्तींत नाहीं कांहींच प्रतीती ॥ त्याही शून्याप्रती जाणसी तूं ॥ १३ ॥
जाणशी तूं तेंहि कांहीं न कळणें ॥ जागृतींत जेणें तोची आत्मा ॥ १४ ॥
आत्मा तो वोळखें मनोमय कोशीं ॥ आतां उपदेशीं देईं चित्त ॥ १५ ॥
चित्त बुद्धि मन आणि अहंकार ॥ यांमाजी निर्धार स्वरूपाचा ॥ १६ ॥
स्वरूपाचा थारा चहूंमाजी जेथें ॥ वाटे तूज तेथें निज पाहें ॥ १७ ॥
पाहें तें पाहणें जे सर्व जाणणें ॥ पाहोनी राहणें उगें तेथें ॥ १८ ॥
तेथें आपणातें आपणची पाहे ॥ तेंची ब्रह्म आहे सर्व देहीं ॥ १९ ॥
देहीं जें जें आहे तें तें हेंची पाहे ॥ पाहता तो आहे वेगळाची ॥ २० ॥
वेगळेंची आधीं हें तत्व जाणावें ॥ मग तें पाहावें सर्वां ठायीं ॥ २१ ॥
सर्वां ठायीं सर्व देह इंद्रियांतें ॥ तेंची वर्ते चित्त ऐसें पाहें ॥ २२ ॥
पाहे तेंची सत्य सर्वत्र जाणीव ॥ असत्य हें सर्व मृगजल ॥ २३ ॥
मृगजल जैसें सूर्याचे किरणीं ॥ विश्व तैसें जाण सर्व ब्रह्म ॥ २४ ॥
सर्व ब्रह्म पाहे वामन स्वरूपीं ॥ त्रिविक्रमरूपी विश्वरूप ॥ २५ ॥

इति कविराजमुकुटालंकारहार श्रीमद्वामनविरचित उपदेशमालेचें द्वितीय प्रकरण समाप्त.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

[२१] श्रीपति=लक्ष्मीरमण.

[ वामनी प्रकरणांचें ]

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६ | टीप १ | दुहिता | दुहिता |
| ७ | ,, १ | कंबर | शुकाचार्यांची वाणी |
| ,, | ,, २ | दुर्दशा अ० | दुर्दशा अथवा कंबर |
| ९ | १३ | हें | हे |
| १० | २० | तुझें | तुझे |
| ११ | १ | केश | केश चि |
| ,, | टीप ११ | सुखामृत सागर | सुखचंद्र |
| १२ | ४ | खवण | कवण |
| १४ | टीप ११ | सिन्ह ५ | सिंह ५ |
| १५ | १८ | सद्मा | पद्मा |
| १५ | २१ | आशा | अशा |
| ,, | २३ | गुढय | गुढया |
| १६ | १८ | शद्ब | शब्द |
| १७ | २३ | द्वंदीं | द्वंद्वीं |
| १८ | टीप २ | शुंडाभातें | शुंडाग्रातें |
| १९ | ७ | पुसो | पुसों |
| ,, | ,, | तरुच्या | तरूच्या |
| ,, | टीप ७ | समूल्हास | समूहास |
| ,, | ११ | त्या सि | त्यांसि |
| ,, | टीप १६ | कृष्णचा | कृष्णाचा |
| १९ | टीप | ११ उचलून | १७ उचलून |
| २१ | १६ | जसें | जसे |
| ,, | २३ | गम | गमे |
| २२ | ९ | गमाविले | गमाविलें |
| ,, | २० | तथापि | तथापी |
| २३ | ४ | नसे | वसे |
| २७ | टीप ३ | हत्ती | करिता झाला |
| २८ | २२ | सर्वांवरीं | सर्वांबरीं |
| २९ | १८ | श्रृंगार | शृंगार |
| ३३ | १३ | फळे | फळें |
| ,, | १५ | ते | तें |
| ३४ | १२ | च रमे ३ | चरमे |
| ३५ | १३ | दान | दान |
| ,, | टीप १७ | अत्यल्पकाली ४ | अत्यल्पकाळ १४ |
| ३६ | १८ | वक्त्रें | वक्त्रें ६ |
| ३७ | ३ | घन | घन |
| ३८ | २९ | श्रीकांता त्या | श्रीकांत त्यां |
| ४० | १५ | प्रवृति | प्रवृत्ति |
| ४१ | ५ | बाले | बाळें |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | टीप ३ | व्यर्थ | खोटीं |
| ४२ | १५ | * येती | यती |
| ४४ | ३ | पुन: | पुन्हा |
| ४६ | २६ | आम्ही | अम्ही |
| ४८ | ४ | बळी सदारा | बळीस दारा |
| ,, | २६ | माळिया | माडिया |
| ४९ | १५ | ... | द्विज |
| ,, | ४ | ... ज्या | हंस जया |
| ५० | ३ | सुवर्णे | सुवर्णा |
| ५१ | २९ | इंधनाचे | इंधनाचे |
| ,, | ३० | उपाशी | उपाशीं |
| ५६ | १० | सुकानें | शुकानें |
| ,, | ,, | सांगीत भूपा | सांगीतलें त्या |
| ६२ | ३ | सिद्धर्थ | सिद्धयर्थ |
| ६३ | २८ | लिंगदेह | लिंगदेह |
| ६५ | टीप २ | जाणे असणें | जागें असणें |
| ,, | १७ | जशीं | जशी |
| ६७ | १ | आत्म | आत्मा |
| ६८ | १ | वंध | बंध |
| ७० | १६ | दिसें | दिसे |
| ७१ | टीप २ | व यपुत्र | वायुपुत्र |
| ,, | ,, ५ | दशमख | दशमुख |
| ,, | २१ | हृन्क | हृत्क |
| ७३ | ११ | अभ्यास | अभ्यास |
| ,, | २४ | जा॥ला | जाला |
| ७४ | ३ | विषदार्थ | विशदार्थ |
| ७५ | २६ | कुमरी | कुमरीं |
| ७६ | २३ | निदिध्यास | विधान |
| ७७ | १२ | सरे | तरे |
| ७९ | १४ | ... | गळे |
| ,, | ४ | ...डुल्लुनि | उचलूनि स्व |
| ७९ | १२ | जों मन | हें मन |
| ,, | १३ | म्ह | बाह्य |

,, सवाई ३ व ४ यांचे मध्यें ही अधिक सवायी पाहिजे.

नाठवितां हि परोक्ष नसे परि आठवितां हि परोक्ष दिसे ।
आठव नाठव दोनि हि मोडुनि आत्मसमाधि सुखांत बसे ॥
देह विलक्षण आपुल लक्षण हें स्मरतां हृदयीं गवसे ।
व्यर्थ कला सकळा म्हण वामन तें गुरुच्या भजनीं च असे ॥१॥

| | | | |
|---|---|---|---|
| ७९ | २३ | हाउनि | होउनि |
| ८० | टीप १ | समह | समूह |
| ८१ | १८ | मरंद | मरंद |
| ,, | १८ | षट्पद | षट्पद |
| ,, | टीप २१ | कट | संकट |
| ८२ | २ | माहित | मोहित |
| ८३ | २ | वागा | मागा |
| ,, | १३ | खोवज ती | खोबजती |

[ वामनी प्रकरणाचें ]

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८४ | ६ | आर्तें | आर्तें | १०५ | ८ | त्रिलोक | त्रिलोका |
| ” | १२ | ... | येकि दटाविति तर्जनि<br>नासिकिं ठेवुनि ओंठ<br>हि चाउनि दांतें | ” | टीप २६ | कैटभ=शत्रु | कैटभशत्रु |
|  |  |  |  | १०६ | ३० | असें | असे |
|  |  |  |  | १०८ | १८ | बोल तुं | बोलतू |
| ” | १७ | घराणी | गऱ्हाणीं | १०९ | ५ | वाग्मनें | वाङ्मनें |
| ” | १६ | ... | “लेंकरुं” इ० | ” | २३ | मजकडे | मज घडे |
| ” | १७ | “लेंकरु” इ० | हास्य म्हणे हरि हांसत<br>चाड हॉं याचि तुम्हास<br>हि काय शिराणी | ११० | १३ | षड्स | षड्स |
|  |  |  |  | ” | १५ | वोटिका | वीटिका |
|  |  |  |  | ” | १७ | हो इन | वीहिन (वहिनी) |
| ८८ | १६ | सरत्न | सद्रत्न | ” | टीप | ४ विडयाचे पानांची | विडयाचे पानांची |
| ९० | १३ | क्षेमला | क्षमेला | ” | ” | ५ हंसांचे परांची गादी | १ हंसाचे परांची गादी |
| ९३ | टीप ५ | क्ष | वृक्ष |  |  |  |  |
| ९४ | ३ | छेदुनि | छेदूनि | ” | २४ | कुचेल | कुचेल |
| ” | ५ | त्या रिपू जी | त्यासि पूजी | १११ | ३० | रे थ | तेथ |
| ” | टीप ३ | चलता | चुलता | ११४ | १३ | आज्ञानत्व | अज्ञानत्व |
| ९८ | ७ | तनुजेंद्र | दनुजेंद्र | ११५ | ४ | जाऊनि | जाउनि |
| ” | २० | चवळे | चावळे | १२१ | ११ | टेवुनी | ठेवुनो |
| ९९ | टीप | छ | * | १२३ | ६ | व्योमगामी | व्योमगामी |
| १०० | ६ | मनिं | मन | ” | ८ | अकाय | अकाय |
| ” | १३ | युग | युगें |  |  |  |  |

| | | | |
|---|---|---|---|
| १२४ | १६ | रित धरीसे | तरि धरेसि |
| १२६ | २२ | से ना | नासे ( न असे ) |
| १२७ | १७ | मानु तूं | मानू तुं |
| ,, | २५ | शीवतो | शीव तो |
| १२८ | १८ | चुकवीं | चूकवीं |
| ,, | २० | ,, | ,, |
| १२९ | टीप १३ | बांधताता | बांधतात ते |
| ,, | ,, १४ | ते भासें | भासे |
| ,, | १२ | खांबसूत्री | कळसूत्री |
| ,, | २९ | असे | नसे |
| १३० | ३० | मोक्षदारीं | मोक्षदानीं |
| १३१ | २२ | स्वयंभू ब्रह्म | स्वायंभू ब्राह्म |
| १३२ | १४ | दोय | होय |
| ,, | २३ | ज्ञानयोगे | ज्ञानयोगें |
| १३३ | २५ | मढी | मठीं |
| १३९ | ११ | नगजा | नग ज्या |
| ,, | १९ | तूझे | तूझें |
| १४१ | २४ | जे | जें |
| १४४ | १३ | म्हणे | म्हण |
| १४५ | १२ | समीध | संधान |
| ,, | १३ | ते घातले | तें घातलें |
| ,, | २५ | हढी | हट: |
| ,, | ३० | आणिक | अणिक |
| ,, | ,, | नलविहो | न लव हो |

| | | | |
|---|---|---|---|
| १४६ | ५ | क्षण न लागतां | क्षणा न लगतां |
| ,, | ११ | घनुवासर | धनु वासर |
| १४८ | १ | होतो | होई |
| १५० | १३ | उदारा | उदारा |
| १५१ | ३ | आणि | आणी |
| १५२ | टीप २९ | हरि | हीर |
| १५३ | ३ | हरिचा | हरीचा |
| ,, | ५ | नारि | नारी |
| ,, | १२ | तिचे | तिचें |
| १५४ | १५ | न करि | न करिं |
| ,, | ,, | अनुकंपा | अनुकंपा |
| ,, | टीप ६८ | तस साक्षी | सारसाक्षी |
| १५९ | ९ | अनूभूतिलेश | अनुभूतिलेश |
| ,, | २० | असें | असे |
| १६२ | २८ | पुसवाया | पुसावया |
| १६६ | २९ | वदता ती | वदताती |
| १६७ | २८ | ता | तो |
| १६८ | २१ | जे थनि | जेथूनि |
| १७० | ८ | वक्तारे | वक्तारो |
| १७१ | २७ | सर्वगत | सर्वंग |
| १७३ | २० | हंसगत | हंसग |
| १७५ | १ | नासी दासन्नो | नासदासीन्नो |
| १७६ | १४ | होता हे | होताहे |

[ वामनी प्रकरणांचें ]

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | शुद्ध. | अशुद्ध. |
|---|---|---|---|
| १७६ | २० | सर्वगत | सवंम |
| ,, | २३ | ,, | ,, |
| १७७ | १९ | गुण विलक्षण | गुणविलक्षण |
| १७८ | ७ | त्वब्रह्म | ब्रह्म |
| १७९ | ५ | सर्वगत | सर्वग. |
| ,, | २० (श्लोक २७३) | ,, | ,, |
| ,, | २१ | ,, | ,, |
| ,, | २५ | ,, | ,, |
| १८० | १२ | यास्तो | यास्तौ |
| १८४ | १ | अनूभूति | अनूभुती |
| ,, | ९ | अनूभूति | अनुभूति |
| ,, | १४ | निषधाने | निषेधानें |
| १८६ | २९ | धरिती | धरितें |
| | | ७७ | |
| १८८ | १५ | अव्यक्त | अव्यक्त |
| ,, | २८ | सर्व | सर्प |
| १९८ | १३ | ऌक्षनामें लक्ष | ऌक्षनामें ऌक्ष |
| ,, | १३ | द्वीपनामे लक्ष | द्वीपनामें ऌक्ष |

**समाप्त.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20288
REFBK-0020244

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा
अ. क्र.
विषय
क्रमांक
नों. दि.